विश्वनाथ खैरे

अडगुलं मडगुलं

वाडवडलांच्या बोलीचालींचा
मऱ्हाटी मागोवा

संमत प्रकाशन

अडगुलं मडगुलं
संमत प्रकाशन : ११
आवृत्ती पहिली : २९ मार्च १९८१
आवृत्ती दुसरी : १ मे २००१
आवृत्ती तिसरी : २६ जानेवारी २०१०

महाराष्ट्र राज्य पुरस्कार : भाषाशास्त्र व व्याकरण : १९८१-८२

प्रकाशक : उमादेवी खैरे
संमत प्रकाशन, ३७४ सिंच सोसायटी, औंध पुणे ४११ ००७

मुद्रक : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, आर्यभूषण भवन, पुणे ४११००४

किंमत : ९० रुपये

ISBN 81-85280-10-X

गुरुवर्य
गोविंद अण्णाराव नरसापुर
आणि
रा बा कुळकर्णी
यांना

भूमिका : नव्या पिढीसाठी

'अडगुलं मडगुलं'ची पहिली आवृत्ती 'साधना प्रकाशन'ने १९८१ साली काढली. तिला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले होते ही पुस्तकाच्या महत्त्वाची एक पावती होती.

पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा १९८१-८२ चा 'भाषाशास्त्र व व्याकरण' विभागातला उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार मिळाला. ही गुणवत्तेची पावती होती.

'द्रविड महाराष्ट्र', 'मराठी भाषेचे मूळ' आणि 'अडगुलं मडगुलं' ही तीन पुस्तके म्हणजे दूरवरच्या क्षितिजाकडे नेणाऱ्या संशोधन-प्रवासातले घडीभराचे थांबे होते. तेथून भाषा-संस्कृतींच्या शोधाचा माझा प्रवास वेगवेगळ्या दिशांनी पुढे चालूच राहिला. 'भारतीय मिथ्यांचा मागोवा', 'ज्ञानेश्वरांचे चमत्कार' 'वेदातली गाणी' 'साहित्य मिथ्य माहित्य' ही पुस्तके, 'गोष्टींचं गूढ', 'रामायणाची गोष्ट' या मालिका, पाच वर्षे चालवलेली 'चंद्रानंद व्याख्यानमाला', 'मौज, अक्षर, आजचा चार्वाक, नवभारत' इत्यादी दिवाळी अंकांतले व 'नवभारत, साप्ताहिक सकाळ, पंचधारा' इत्यादी नित्याच्या अंकांतले लेख, मुंबई पुणे वडोदरा नाशिक कोल्हापूर येथील विद्यापीठांमध्ये व्याख्याने, 'प्राच्य परिषद, द्रविडियन लिंग्विस्टिक्स असोसिएशन, भारतीय स्थलनाम परिषद' यांच्या अधिवेशनांतील इंग्रजी-मराठी निबंध इत्यादींतून, या शोधांत गवसलेली सामुग्री सतत अभ्यासकांच्या पुढे मांडीत आलो. भाषाकुळांच्या विभागणीला पार करून सर्व भारतीय भाषांचा 'संमत' व्युत्पत्तिकोश सिद्ध करण्याची शक्यता त्यातून दृष्टिपथात आली आहे.

'मराठी व्युत्पत्तिकोशा'च्या तिसऱ्या आवृत्तीच्या पुरयणीत संपादक श्रीपाद जोशी यांनी दक्षिणी शब्दांच्या नोंदींचा आवर्जून समावेश करताना माझा सहभाग घेतला. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत 'भारतीय भाषा आणि संस्कृती' यांचा नवा विभाग उघडवण्यात मला यश आले ही विशेष आनंदाची गोष्ट झाली.

भाषा-संस्कृतींच्या संबंधातले हे मूलगामी आणि अस्सल भारतीय संशोधन पंचवीस

वर्षे आणि आजही एकहाती चाललेले आहे, हे मराठी अभ्यासकांना भूषणावह नाही. विद्यापीठांनी विशिष्ट प्रसंगी संमत विचार प्रकटवून घेण्याची उत्सुकता दाखवली असली तरी अभ्यासक्रमांत त्याचा अनुल्लेखच जाणवतो. या पुस्तकाच्या आधी प्रसिद्ध झालेल्या 'मराठी भाषेचे मूळ'च्या प्रकाशनसभेत प्रा. अर्जुनवाडकर यांनी एकूण 'संमतदर्शन' (हा त्यांचा शब्द) च्या संबंधात आवाहन केले होते :

> *खैऱ्यांनी पंडितवादाचा अवलंब करून आपलं म्हणणं मांडलं आहे. त्याचा मराठीच्या अभ्यासकांनी गंभीरपणानं विचार केला पाहिजे. मराठीच्या अभ्यासात त्याला योग्य ते स्थान दिलं पाहिजे. पटेल ते प्रांजलपणं स्वीकारलं पाहिजे, पटणार नाही त्याचा पंडितवाद पद्धतीनं प्रतिवाद केला पाहिजे, नुसतं नाक मुरडून नाही.*

'अडगुलं मडगुलं'या पुस्तकाची रचनाच 'भाषाविषयक चर्चेत रस असणाऱ्या वाचकाला सरळसोट वाचता यावे पण संशोधकाला बारकाईने सारे पडताळता यावे' अशा रीतीने केली असल्याने, आयुष्यभर संस्कृत-मराठींचे अध्ययन-अध्यापन केलेल्या अर्जुनवाडकरांच्या आवाहनाला अभ्यासक आणि अध्यापकांच्या वर्तुळातून योग्य प्रतिसाद मिळायला हवा होता. प्रत्यक्षात, एका वृत्तपत्रात आलेला परिचयलेख सोडला तर या पुस्तकाचे दुसरे परीक्षण गेल्या वीस वर्षांत कोणी लिहिल्याचे माहीत नाही. विद्यापीठांतील अभ्यासक्रमांसाठी प्राध्यापकांनी लिहिलेल्या पुस्तकांत आढळणाऱ्या 'पंडितवादा'चा अगदी अलीकडचा प्रातिनिधिक नमुना पाहण्यासारखा आहे :

> तमिळ भाषेसंबंधी विशेष अभ्यास करून श्री. विश्वनाथ खैरे यांनी मराठी भाषेचे '*मूळ*', '*द्राविड* महाराष्ट्र' ही पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी अनेक *मराठी शब्दांचे स्वनसाम्य तमिळ शब्दांशी शोधण्याचा प्रयत्न* केला आहे. त्यांनी 'मराठी भाषेचे मूळ' या पुस्तकात 'व्युत्पत्तिकोश' या प्रकरणात भाषाशास्त्रज्ञ *ज्यूल ब्लोक यांच्या 'द्रविड व्युत्पत्तिकोशा'*तील नोंदींच्या आधारे *काही* मराठी शब्दांचे मूळ 'तमिळ'मध्ये शोधण्याचा प्रयत्न केला आहे. (*खैरे विश्वनाथ*). त्यातील फक्त काही उदाहरणेच आपल्याला पाहता येतील - (१) औत (तमिळ शब्द उत्ति म्हणजे *जोडीची गाडी* यावरून), (२) अलिकडे, ऐल (तमिळ 'अयल्' म्हणजे नजीकची जागा), (३) हळहळ (तमिळ 'अलक्कु' म्हणजे अस्वस्थ होणे, *ळमुळे* 'ह' येतो.) श्री. खैरे यांचा हा प्रयत्न *जिज्ञासूंनी मुळातून समजून घ्यावा.* (३१३)
>
> ('मराठीवरील अन्य भाषांचा परिणाम' - डॉ. श्रीराम संगोराम, पृ. ३०४-३३४, 'आधुनिक भाषाविज्ञान' - सं. डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन १९९९)

यातील (पुरवलेल्या) तिरप्या टाइपातील मजकुरात एक ना एक चूक, किंवा तपासणी-पात्र विधान आहे. 'मराठी भाषेचे मूळ' 'द्रविड महाराष्ट्र' ही पुस्तकांची नावेसुद्धा नीट दिलेली नाहीत. पहिल्या पुस्तकात नुसते *स्वनसाम्य शोधण्याचा प्रयत्न* नाही; नुसत्या स्वनसाम्याने मराठी शब्दांची मूळ संस्कृत म्हणून जी रूपे देण्याची भाषाशास्त्रीय परंपरा

आहे तिचे उदाहरणांनी खंडन करून दक्षिणी भाषांमधली, *अर्थ आणि ध्वनी या दोन्ही अंगांनी जुळणारी शब्दरूपे दिली आहेत. 'तमिळ मध्ये शोधण्याचा प्रयत्न'* हे अवमूल्यनी वर्णन झाले.'द्रविड व्युत्पत्तिकोश' *झूल ब्लोक यांचा नसून बरो आणि एमेनो यांचा आहे. झूल ब्लोक यांच्या 'मराठी भाषेचा विकास'* या ग्रंथातल्या शब्दकोशातील ७५ शब्दांच्या व्युत्पत्ती आणि एकूण सुमारे पाचशे दक्षिणी शब्द 'म.भा.मूळ'मधे विवेचिले आहेत. पाचशेपैकी विचारात घेतलेल्या फक्त *तीन शब्दांच्या उद्धृतांतही तीन चुका* आहेत (*जोडाची गाडी* / जोडीचा गडी, *अलक्कु* / अलक्कु *ळ चा ह* / **ल** चा ह). स्वतः काही समजून न घेता, 'जिज्ञासूंनी हा प्रयत्न मुळातून समजून घ्यावा' असा पोक्त आदेश दिला आहे. अशा स्थितीत

> श्री. विश्वनाथ खैरे (१९७७, १९७९) यांनी लोकभाषा किंवा बोलभाषेतील उदाहरणांच्या आधारे 'संमत'(संस्कृत, मराठी, तमिळ *अनुबंध*) **अशी उपपत्ती सिद्ध करून दाखवली आहे.** *परंतु भाषावैज्ञानिकांमध्ये त्यासंबंधी मतभेद आहेत* (३०४)

ही केवळ शैलीदार सोडवणूक होते.

पाठ्यपुस्तकांतून या पद्धतीने झालेल्या संमत संशोधनाच्या ओळखीने त्याच्याबद्दल गैरसमज करून न घेता, मूळ संमत लेखनाकडे वळल्यास, नव्या शतकातल्या भाषा-संस्कृती अभ्यासकांच्या नव्या पिढीला अभ्यासक्रमाच्या साच्याबाहेर जिज्ञासू बुद्धिवादी वृत्तीने संशोधन करण्याला मोठा पैस खुला झालेला दिसेल.

मराठी अभ्यासकांच्या या नव्या पिढीसमोर अफाट संधी आणि अचाट आव्हान हातात हात घालून उभी आहेत. अवघ्या मराठी जनतेला मराठीतून ज्ञानाची भांडारे उघडून देण्याची संधी आहे, तर गोलंकाराच्या किंवा जगत्काराच्या या युगात मराठी भाषा टिकवून धरण्याचे आव्हान आहे. संधीचा फायदा आणि आव्हानाचा मुकाबला दोन्ही साध्य होण्यासाठी मराठी भाषेविषयीची आपली जाण नेमकी आणि पक्की असली पाहिजे. ती नुसती भावनिक किंवा पारंपरिक असून पुरणार नाही; अनेकविद अभ्यासावर आधारलेली पाहिजे. अशी जाण 'अडगुलं मडगुलं'च्या अभ्यासातून मराठीच्या अनाग्रही अभ्यासकाला लाभेल. या विश्वासानेच ही नवी आवृत्ती आणि तिची भूमिका 'नव्या पिढीसाठी' असल्याचे म्हटले आहे.

तो विश्वास जुन्या पिढीतल्या अनेकांच्या प्रोत्साहनाने जागवला. पुस्तक ज्यांना अर्पण केले होते ते दोन्ही गुरुवर्य, 'साधना'कार यदुनाथजी थत्ते, 'तमिळ खांडेकर' का्श्रीश्री, संमत संशोधनाला नित्य उत्तेजन देणारे डॉ. सुरेंद्र बार्लिंगे आणि डॉ. दिनेश माहुलकर ही त्यांतली वडीलधारी मधल्या काळात हरपली. त्यांना प्रणाम करीतच 'अडगुलं मडगुलं'ची ही आवृत्ती नव्या पिढीच्या हाती देत आहे.

पुणे, १ मे २००१ **विश्वनाथ खैरे**

भूमिका

'अडगुलं मडगुलं' या मथळ्याखाली 'साधना' साप्ताहिकात क्रमाने १५ ऑगस्ट १९७७ ते ११ फेब्रुवारी १९७८ या काळात प्रसिद्ध झालेल्या लेखमालेची ही ग्रंथावृत्ती.

लेखमाला अनेक दृष्टींनी आगळी होती. ती मतप्रदर्शनापेक्षा विज्ञानदर्शनाला वाहिलेली होती. विषय भाषिक विज्ञानाचा होता. विज्ञान आणि भाषा यांचा संगम लेखनात घडवून आणायला वाव होता. सामान्य वाचकासाठी असलेल्या साप्ताहिकात प्रकाशित होत असल्यामुळे तिची शैली लोकबोध तरी एका पानाच्या मर्यादेत शक्य तितकी जास्त माहिती देणारी हवी होती. कारण, भाषिक विज्ञानात तोपर्यंत कोणी कल्पनाही न केलेल्या संबंधावर अनेक अंगांनी तिला प्रकाश पाडावयाचा होता. मराठी आणि तमिळ यांचा गाढ, प्राचीन संबंध आहे याचा साक्षीपुरावा गंभीर पण सोप्या भाषेत 'अडगुलं मडगुलं...' सारखी छोटीछोटी गाणी म्हणणाऱ्या मराठमोळा आईच्या धाटणीत ती पुढे आणीत होती. भारतीय भाषिक विज्ञानात प्रथमच काही वेगळा विचार साधार मांडला जात होता. तो विद्वत्ताप्रचुर भाषेतून किंवा विद्वानांसमोर नव्हे तर सामान्यजनांच्या समोर प्रकट झाला हे विशेष होते. म्हणूनच 'साधना'च्या स्वातंत्र्यदिन अंकापासून तिची सुरुवात केली. ती गणराज्यदिन विशेषांकात संपवावी असा मूळचा विचार होता. पण ती संपली ११ फेब्रुवारीला. एक हृद्य योगायोग असा की शेवटच्या लेखात 'सारे मूळगाव, सकळ सोईरे' या उद्घोषाचे पाईक डॉ. पोप यांची माहिती होती आणि ११ फेब्रुवारी १९७८ रोजी त्यांची सत्तरावी पुण्यतिथी होती!

याच दरम्यान पुण्याचे शताब्दी साहित्यसंमेलन झाले. मराठी खांडेकरांना तमिळ साहित्यात अढळपद मिळवून देणारे भाषासंगमाचे एकनिष्ठ उपासक काश्रीश्री (का.श्री.श्रीनिवासाचार्य) यांनी हजारो श्रोत्यांना तमिळ-मराठीचा दोन हजार वर्षांचा संबंध निवेदन केला. संमेलनाच्या मुहूर्तावरच मराठी स्थळनामांचा तमिळवरून शोध घेणारे 'द्रविड महाराष्ट्र' प्रसिद्ध झाले. त्याचाही परिचय काश्रीश्रींनी श्रोत्यांना घडविला.

या नव्या विचाराची दखल संशोधकांनी हळूहळू पण निश्चितपणे घेतली. 'मराठी संशोधन मंडळ'चे संचालक सुरेंद्र गावस्कर यांनी 'मराठी संशोधन पत्रिका'च्या रजतमहोत्सवी अंकात 'इतिहासपूर्व मराठमोळी तमिळ होती' या निष्कर्षाचा निबंध प्रसिद्ध करविला. त्यांनीच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या गजेंद्रगडकर व्याख्यानमालेसाठी 'मराठी भाषेचे मूळ' या विषयाची निश्चिती करविली. दुर्दैवाने व्याख्यानमालेच्या पूर्वीच त्यांचे अचानक निधन झाले. व्याख्याने झाली आणि त्या व्याख्यानांचा विषय संशोधनक्षेत्रातला म्हणून त्यांचा ग्रंथ मराठी संशोधन मंडळाने पुढाकार घेऊन प्रसिद्ध केला. त्याच्या प्रकाशनसमयी प्रा. अर्जुनवाडकर यांनी त्या ग्रंथात संशोधकाची प्रज्ञा प्रतिबिंबित झाल्याचे घोषित करून मराठी संशोधकांनी त्या प्रज्ञेची कदर केली पाहिजे असे आवर्जून सांगितले.

लेखमालेची सटीप ग्रंथावृत्ती काढण्याची कल्पना प्रथमपासूनच होती. तिच्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाकडे प्रकाशकांनी अनुदान मागितले. 'मराठी भाषेचे मूळ' छापून झाले तेवढ्यात हे अनुदान मंजूर झाल्याचे पत्रही आले. महाराष्ट्राच्या साहित्य-संस्कृती क्षेत्रांमध्ये तमिळ-मराठी-संबंध हा संशोधनविषय मान्य होत असल्याची ही आणखी एक खूण होती. २४-२५ मार्च १९८० रोजी मुंबई विद्यापीठ तौलनिक साहित्य विभाग आणि मराठी संशोधन मंडळ यांच्या संयुक्त अखत्यारात या विषयाचे विचारसत्र होऊन या संशोधनविषयाची मान्यता पक्की झाली. विचारसत्रात तमिळ-मराठी-अनुवाद हाही विषय होता. महाराष्ट्रातली भाषा आणि संस्कृती यांच्या आकलनासाठी प्राचीन तमिळ साहित्याचे प्रतिशब्द अनुवाद हवे आणि शक्य आहेत हे त्यात मांडले.

या सर्व प्रगतीच्या पार्श्वभूमीवर ग्रंथावृत्तीचे स्वरूप ठरवले. मूळचे लेख आपल्या परीने पूर्ण होते. त्यांचा विस्तार करण्यात घाट बिघडून गेला असता. त्यांतली माहितीपर विधाने साधार होती. पण ते आधार लेखांमध्ये उद्धृत करणे शक्य नव्हते. संदर्भभूत कोशादी ग्रंथ मराठी सामान्य वाचकालाच नव्हे तर संशोधकांनाही अपरिचितसे होते. त्या सर्वांची सटीप जंत्री लेखांना जोडणे ही काटेकोरडी पद्धत स्वीकारता आली असती. नव्हे, त्या पद्धतीने 'युगे अठ्ठावीस उभा विटेवरी' हा लेख विठ्ठलविषयक शोधचर्चेचा भाग म्हणून 'मराठी संशोधन पत्रिका'मध्ये प्रसिद्धही झाला. पण त्या माहितीपेक्षाही महत्त्वाचा भाग नव्या विचारधारेचा होता. दीडशे वर्षे नव्या भाषिकांत आणि शेकडो वर्षे जुन्या पंडितांत दृढमूल झालेली विचारसरणी बदलली पाहिजे हे सांगताना तिची साधकबाधक विज्ञानिक चर्चा अपरिहार्य होती; तशी चर्चा सूत्ररूपाने लेखमालेत आली होती. रूढ साहित्यिक भाषेपेक्षा वेगळ्या ढंगाच्या मऱ्हाटी बोलीत दोन लेख लिहून काही तत्त्वांचा वस्तुपाठही

दाखवला होता. या विचारधारेची चर्चा लेखांच्या विस्तारात करावी हे नुसत्या संदर्भ–अवतरणांहून अधिक महत्त्वाचे होते.

त्याप्रमाणे पूर्ण लेखांचा घाट ठरवला. त्यात मूळ लेखाशी सांधेजोड व्हावी आणि वाचकाला एकच एक समग्र लेख वाचीत असल्यासारखे वाटावे याचे अवधान सतत बाळगले. म्हणून संदर्भग्रंथ आणि अवतरणे यांचे सविस्तर उल्लेख लेखांच्या पोटातच केले. बारीक आकडे शब्दांच्या माथ्यावर देऊन शेवटी संदर्भ किंवा टीप देण्याची पद्धत टाळून टाकली. मात्र मूळ लेखातील टीपलेल्या अंशांना समासात क्रमांक दिले आणि विस्तारित लेखात तेच क्रमांक संबंधित टीपेच्या समासातही नोंदले. जुन्या ग्रंथांमध्ये सूत्र आणि वृत्ती असत तसाच काहीसा हा प्रकार आहे. भाषाविषयक चर्चेत रस असणाऱ्या वाचकाला सरळसोट वाचता यावे पण संशोधकाला बारकाईने सारे पडताळता यावे असा दृष्टिकोन सगळीकडे ठेवला आहे.

मग ओघानेच भाषाविचाराच्या ज्या अंगाभोवती मूळ लेखाची गुंफण केली होती त्याचा विचार विस्तारात मुख्यतः केला. चर्चित विषयांचे मथळे निबंधांच्या पोटात दिले नाहीत पण अनुक्रमात विषयसूची सविस्तर दिली आहे. पुनरुक्ती शक्य तितकी टाळली आहे. म्हणून संशोधकांनी ग्रंथातील प्रतिपादनाची समग्रपणे चिकित्सा करावी, खंडशः विचार करू नये. 'द्रविड महाराष्ट्र' आणि 'मराठी भाषेचे मूळ' हेही त्याचबरोबर विचारात घ्यावेत.

भाषेच्या पंचांगांपैकी मुख्यतः शब्दाच्या अंगाने येथे निरखणे आणि पारखणेही मांडली आहेत. शब्द हे भाषेचे शरीर. ते भाषेचे प्रधान अंग आहे. तुलाभ्यास करून भाषांचे नातेसंबंध ठरवताना व्याकरणादी अंगांचा अधिक विचार केला जातो. त्यातून निघणारा 'मराठी भाषेचे कूळ कोणते?' हा रूढ भाषिक प्रश्न येथे चर्चेला घेतलेला नाही. किंबहुना, निर्लेप जिज्ञासू वृत्तीने मराठी भाषेचा अभ्यास करताना हा प्रश्न अप्रस्तुत आणि शोधाला खीळ घालणारा आहे; आणि भाषाकुळांची प्रस्थापित कुंपणे ओलांडून दक्षिणी भाषांमध्येही मराठीचा शोध घेणे हेच ग्रंथाचे ध्येय आहे. वाचकांनीही त्या शोधात सहभागी व्हावे यासाठी दक्षिणी कोशांचे संदर्भ तपशिलाने नोंदले आहेत. मूळ लेखांमध्ये आलेल्या सर्वच दक्षिणी शब्दांच्या नोंदी विस्तारात केलेल्या नाहीत पण विस्तारातच आलेल्या नव्या शब्दांचे संदर्भ मात्र तेथल्या तेथे दिले आहेत. उतारे, अवतरणे, कोशांतले शब्दार्थ इत्यादी स्पष्टपणाने वेगळे दिसण्यासाठी जास्ती समासाच्या छेदकांमध्ये छापले आहेत. वेगळ्या भाषांतल्या शब्दांचे अर्थ देताना विरामचिन्हांऐवजी वाढीव मोकळीचा वापर केला आहे. (गोल) कंसातला मजकूर इतर मजकुरांशी सलगपणे वाचण्याचा आहे तर [चौकटी] कंसात स्पष्टक अर्थ दिले आहेत.

तमिळ आणि इंग्रजी उद्धृतांचे मराठी अनुवाद शक्य तितके शब्दशः आणि प्रामाणिक केले आहेत . संदर्भ निर्देशिले आहेतच त्यामुळे कोणाला मूळचे उतारे पहायचे असले तर सोय आहे . मराठी ग्रंथात इंग्रजी आणण्याची गरज नाही म्हणून ते उतारे रोमन लिपीत इंग्रजी भाषेत दिलेले नाहीत . ग्रंथांची नावेही नागरी लिपीतच दिली आहेत .

परिभाषेचा प्रश्न शास्त्रीय लेखनात नित्यच उद्भवतो . या ग्रंथात तो अधिकच . रूढ भाषिक विज्ञानातल्या अनेक संकल्पना इंग्रजीतूनच संशोधकांपर्यंतही पोचतात . त्यामुळे इंग्रजी परिभाषिक शब्दच जास्त घरगुती वाटू लागतो . त्याला मराठी पर्याय वापरून कंसात इंग्रजी शब्द दिला की मराठी शब्दाला अनुवाद– शब्दाचे कनिष्ठ स्थान मिळते आणि तो प्रचारात येण्याची शक्यता दुरावते . म्हणून लेखनात फक्त मराठी परिभाषिक संज्ञाच ठेवल्या आहेत . या मराठी संज्ञा हव्या तेवढ्या सोप्या होऊ शकतात . मात्र भाषेसारख्याच परिभाषेबाबतच्याही कल्पना बदलल्या पाहिजेत . प्रचारातला शब्द , योग्य ती नेमकी व्याख्या करून , परिभाषिक म्हणून वापरावा , संस्कृतवरून नवा शब्द बनवायचा झाल्यास वृद्धीचा पाणिनीय नियम सैल करावा , संस्कृत शब्दांमध्ये कालांतराने जे बदल होतात असे व्युत्पत्तिशास्त्र सांगते त्यांचे आरोपण नव्या बनीव संस्कृत शब्दावर करावे इत्यादी तत्त्वांना धरून सोपे परिभाषिक शब्द ग्रंथात योजिले आहेत . याशिवाय , भाषिकातला काही वेगळा विचार सांगायचा असल्यामुळे नवे शब्दही उपयोजिले आहेत . उदाहरणार्थ , विज्ञानशाखांची नावे इक-प्रत्ययान्त विशेषणाने दाखवणे सोपे आहे . जसे भाषेचे विज्ञान - भाषिक विज्ञान - ते ' भाषिक . ' भाषिक विज्ञानिकांनाही ' भाषिक 'च म्हणायचे . मानवविषयक विज्ञान ते ' मानविक ' . इक प्रत्यय लावताना इतिहासाचे इतिहासिक केले आहे . ऐतिहासिक हा प्रचलित शब्द वापरायचा तर ' इतिहासातून उत्पन्न झालेले , निघालेले , जन्मलेले ' अशा अर्थाने . हे सर्व शब्दप्रयोग सोपे आणि सार्थ आहेत तरी सर्वमान्यता मिळेपर्यंत प्रयोगच आहेत .

आजच्या विज्ञानयुगात जगभरच्या विज्ञानिकांचे प्रयोग , निरखणे , मानीव-मांडणी इत्यादी व्यापार प्रचंड प्रमाणावर चालू आहेत . विज्ञानाच्या शिस्तीला धरून केलेली निरखणे विज्ञानिक मंडळी जगासमोर मांडीत असतात . या निरखणांचे प्रयोग इतर विज्ञानिक स्वतः करून पाहतात आणि निष्कर्ष पडताळतात . ' मत ' ' नियम ' ' तत्त्वी ' ' मानीवे ' ' सिद्धान्त ' ' उपपत्ती ' या सर्व संकल्पनांना विज्ञानात नेमके अर्थ आहेत . भाषिकही त्याला अपवाद नाही . पण भाषेबाबत भावनेचे आणि अनेक शतकांच्या परंपरेचे ओझे फार मोठे असल्याने या संकल्पनांची अनेकदा गल्लत होते . निगमविगमांपेक्षा मत मोठे होते , विगमाला नियमाचे रूप येते , मानीव

सिद्धांताच्या रूपात मांडले जाते. असे होऊ नये म्हणून प्रतिलोम उपपत्तीची काही विधाने 'असे असेल' अशा अनुमान– स्वरूपात मांडली आहेत, त्या विधानांमधला विचार मात्र ठाम किंवा निश्चितच आहे, संदेहाचा नाही.

मराठी भाषा आणि दक्षिणी भाषा यांच्या परस्पर संबंधातली निरखणे आजवर झालीच नाहीत. ती येथे पहिल्यांदा निरूपिली जात आहेत. त्या निरूपणांतून प्रचलित भाषिकाने न उलगडणारी अनेक कोडी उलगडतात. त्याचबरोबर नव्या समस्याही उभ्या राहतात. शोध प्रगतिपर असल्याचीच ही खूण आहे. त्या समस्या सोडवण्यासाठी प्रचलिताहून वेगळे मानीव मांडले पाहिजे. ते 'संमत भाषिक' या नावाने 'मराठी भाषेचे मूळ' या ग्रंथात प्रकाशित झाले आहे. पण त्याचे बीज 'अडगुलं मडगुलं' या लेखमालेत रुजले आहे. ते मानीव भाषिकांच्या निगराणीत जरूर ते खतपाणी मिळून आणि जरूर ती काटछाटही होऊन सिद्धांतरूप पावेल तोवर भारतीय संस्कृतीतल्याच अनेक तणांचा आपोआप नायनाट करील.

ते सर्व लवकर होवो. तूर्त हा ग्रंथ भाषिक रसिकांच्या आणि विज्ञानिकांच्या समोर निरखणांचे निवेदन म्हणून मांडला आहे. शुद्ध जिज्ञासेपोटी आरंभलेल्या, एकलव्यमार्गाने केलेल्या तमिळच्या अभ्यासातून त्याचा उदय झाला आहे. महाराष्ट्रात भाषाभ्यासाची थोर परंपरा अजूनही जिवंत आहे. संस्कृत विद्येच्या चिकित्सक अभ्यासात महाराष्ट्र नित्य पुढे राहिला आहे. तशाच प्राचीन तमिळकडे मात्र त्याचे दुर्लक्ष झाले आहे, अजूनही होत आहे. ही स्थिती बदलून अनेकानेक अभ्यासकांनी आणि संस्थांनी 'संमत' अभ्यासाकडे लक्ष पुरवले तर आमूलाग्र नवीन आणि शंभर टक्के भारतीय अशा भाषिक संशोधनाचे श्रेय महाराष्ट्राच्या पदरी पडेल. या अभिनव संशोधनाची पहिली पावले पडताना 'अडगुलं मडगुलं'ची साथ कुणालाही संमतच होईल.

भाषिकाच्या विशाल वावरात संमत हे एक क्षेत्र आहे. त्याचा विकास एकट्या-दुकट्या व्यक्तीकडून किंवा एकाददुसऱ्या पुस्तकाने पुरेसा होणार नाही. पण त्या क्षेत्रात सोन्याचे पीक निघण्याची क्षमता मात्र आहे. ते पीक अनेक ग्रंथांच्या पानांमधून फुलेल या आंतरिक विश्वासाने 'अडगुलं मडगुलं' हा 'संमत ग्रंथ : १' म्हणून प्रकाशित होत आहे.

बोबडगाणी, जनपद छंद-गीते, भावनोत्कट उद्‌गार, शरीर-अवयवांचे नात्यागोत्यांचे जीवनव्यवहाराचे संस्कृतिव्यवसायाचे म्हणजेच एकंदर भाषेचे शब्द, मिथ्यकथा, लोकदैवते, कोरीव लेख, आर्ष मराठी काव्ये, लोककाव्ये इतक्या विविध अंगांनी मराठी आणि तमिळ यांचा संबंध या पहिल्यावहिल्या संमत लेखनात स्पष्ट झाला आहे. संमत म्हणजे संस्कृत-मराठी-तमिळ अभेद. 'द्रविड महाराष्ट्र'

आणि 'मराठी भाषेचे मूळ' या ग्रंथरूपाने आधी प्रकाशित झालेल्या पण संमत विचारविकासात थोडे पुढे गेलेल्या लेखनात याच संबंधाची आणखी प्रचीती झाली. यापुढे या संमत-संबंधाच्या अस्तित्वाविषयी समर्थनाचे काही लिहिण्याची गरज वाटत नाही. संमत तत्त्वांच्या प्रयोजनाने तिन्ही भाषांवर जो नवीन प्रकाश पडतो त्याची काही किरणे आगामी संमत ग्रंथांतून फाकतील. त्यांतून समग्र भारतीय संस्कृतीचेही नवे दर्शन घडेल.

या दर्शनाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे भारतीय मिथ्यकथांचा नवीन विचार हा होय. प्राचीन भाषांचे स्वरूप ज्या साहित्यावरून आपल्याला कळते ते साहित्य मिथ्यकथांचेच असल्यामुळे भाषिकाच्या समग्र विचारात मिथ्यकथांचा विचार अपरिहार्य आहे. दोनशे वर्षांपूर्वी संस्कृत आणि युरोपीय भाषांचे साम्य भाषिकांना प्रतीत झाले तेव्हापासून भारतीय मिथ्यकथांचा आणि मिथ्यांचा उलगडा करण्यात 'भारतयुरोपीय' भाषांची मदत घेतली जाते. दक्षिणी भाषा मात्र याबाबतीत कटाक्षाने दूर ठेवल्या जातात. 'संमत' भाषिकाचा एक आधार आणि निष्कर्षही असा आहे की, भारतीय मिथ्यकथांमध्ये दक्षिणी आणि संस्कृत भाषांची मिथक्रिया अतिशय मोठ्या प्रमाणावर झाली आहे आणि त्यामुळे त्यांचा उलगडा भारतयुरोपीय भाषांपेक्षा दक्षिणी भाषांवरूनच चांगला होतो. याची थोडी झलक प्रस्तुत ग्रंथात मिळेलच. 'सत्यकथा' मासिकात अलीकडे प्रसिद्ध झालेल्या काही लेखांमध्येही याचा पडताळा मिळेल.

समसामान्य मिथ्यकथांमधून उघड होणारी सामाजिक एकता, आज वेगळ्या भाषा बोलणाऱ्या भारतीय समाजांच्या इतर संस्कृतिक अंगांमधूनही प्रतीत होते. ही संस्कृतिक अंगाची एकता सहज दिसण्यासारखी असल्यामुळे आजवर अनेकांनी टिपली आहे. त्या एकतेचे स्पष्टीकरण देताना मात्र मान्य भाषिक सिद्धांतांनुसार मानलेल्या दोन भिन्न मानववंशांच्या संघर्षाचे मानीव पुढे आले. भरतखंडाचे आद्य रहिवासी 'द्रविड' आणि बाहेरून आलेले 'आर्य' यांच्या, संघर्षातून झालेल्या संघट्टणाने, भारतीय संस्कृती विकासली असा सध्याचा मानविक सिद्धांत आहे. त्याला दिला जाणारा भाषिक आधार खरोखरी मूळच्या एकतेचा द्योतक आहे असे संमत मानीव मांडणाऱ्या इंग्रजी निबंधांचा संग्रह 'नो आर्यन, नो द्रविडियन, . . .' अशा नावाने प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. भारतीय राष्ट्रवाद्यांनी अंत:स्फूर्तीने भारताच्या विविध भागांची जी एकता मनोमन मानली आणि जोपासली तिला संमत भाषिकाचा विज्ञानिक आधारही आता लाभू शकतो. येथे हे आवर्जून स्पष्ट केले पाहिजे की, भाषिक विज्ञानानुसार विवेचन करताना या ग्रंथात किंवा इतरत्रही, ही संस्कृतिक एकता गृहीत धरण्याचा किंवा सिद्ध करण्याचा भावनाप्रधान

अट्टाहास केलेला नाही . अशी एकता (खरे तर अभेद) सहज उघड होत गेली ; जेथे स्पष्ट दिसली तेथे तिच्याकडे लक्ष मात्र वेधून घेतले आहे . हा भाषिक अभ्यास भारतीय संस्कृतीचा इतिहास नव्याने लिहावयास लावील यातही केवळ ज्ञानानंदच वाटेल . 'अडगुलं मडगुलं'च्या वाचकांना असाच थोडाबहुत ज्ञानानंद मिळाला तर पुरे आहे .

तो मिळवून देण्याचे श्रेय 'अडगुलं मडगुलं' प्रकाशात आणणारांचे आहे . त्यांच्या नामावलीत पहिले नाव 'साधना' साप्ताहिकाचे . 'साधना'चे संपादक आणि अंतरीचे आंतरभारतीय यदुनाथजी थत्ते यांनी या नवविचाराचा सतत सक्रिय पाठपुरावा केला म्हणूनच एवढी मजल शक्य झाली . त्यांनीच काश्रीश्रींचा परिचय घडवून दिला . काश्रीश्रींनी बहुतेक मूळ लेखांची लिखिते वाचून त्यातला तमिळसंबंधी भाग चुकीचा नाही याचा दिलासा दिला . महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाने ग्रंथछपाईच्या खर्चासाठी साधना प्रकाशनाला अनुदान दिले . छपाईच्या आणि इतरही अनेक अडचणींना तोंड देत साधना प्रेसने किचकट छपाईचे काम सुबक आणि अचूक करून दिले . या सर्वांचे ऋण मनोमनी आहेच ते येथे शब्दांकितही करतो .

मुंबई , २९ मार्च ' ८१ विश्वनाथ खैरे

अनुक्रम

भूमिका

अनुक्रम

१. अडगुलं मडगुलं १-८

१ अदिकाल आणि बोलीभाषा
२ आधार निरखणांचा
३ कन्नडवरून जुळणी
४ तुलाभ्यास-शब्दकोश
५ मराठी–तमिळ–उसनवारी
६ ध्वनी–लिपी–साम्य
७ भाषांचा मेळ : अडगु
८ ध्वनिबदलाची धाटणी : सोने
९ संमत साम्य : रुपे
१० संमत विगमन : तान्हे
११ शब्दांची पूर्वापरता : तीट
१२ जिज्ञासाशोधाची प्रमाणे

२. ओवीची चित्तरकथा ९-१४

१ ओवीचा प्रतिलोम शोध
२ अपभ्रंशातून ओवी ?
३ निराधार अनुलोम व्युत्पत्ती
४ व्याख्याशब्दांवरून अनुलोम
५ तमिळवरून प्रतिलोम
६ लिपीतील ओ ओऽ
७ लोकव्युत्पत्ती
८ ओवीची तमिळ जुळणी
९ भाषा आणि राजसत्ता
१० अर्थबदलाची क्रिया
११ ओवी व कुरळ्
१२ प्रतिलोम कल्परचना

३. एकगीते–लोकगीते १५-२०

१ अर्थविस्तार : पल्
२ व्युत्पत्ती व संस्कृती : आई
३ व्युत्पत्ती व संस्कृती : आभीर
४ नादशब्द : हम्पा
५ तमिळ महाप्राण : न र ल
६ प्रतिलोम–अनुलोम : पवाडा
७ अनुलोम व्युत्पत्ती : भले मलत्ते

४. सरडाचा विष्णू झाला २१-२६

१ मराठीचा आदिकाळ
२ मिथ्यांची धाकटी-थोरली परंपरा
३ मिथ्यांचा शोध
४ मिथ्यकथा आणि व्युत्पत्ती
५ भाषांचा संक्रमण-काळ
६ सरडा व कुसुंब
७ मिथ्ये आणि झाडे
८ मिथ्यकथांची संमत जुळणी
९ तमिळाई आणि मराठमोळी
१० मराठीची पूर्वभाषा : नाग

५. दगडावरच्या रेघा २७-३६

१ महाराष्ट्रातले कोरीव लेख
२ भाजे लेखातील 'नाय'
३ नावे – माणसांची, झाडांची
४ बदलणारे अर्थ : कुलिर
५ णाक प्रत्यय जाति-वंश-निरपेक्ष
६ जुनीनवी ग्रामनावे
७ मूळ नावाचे शिष्टभाषिक बदल
८ व्युत्पत्ती आणि देवता : मावळ
९ कोरीव लेखांचे अर्थन
१० मराठी-तमिळ संपर्क : तिरण्णु
११ कोरीव लेखांचे स्थायी महत्त्व

६. मऱ्हाटेचि बोल ३७–४५

१ मऱ्हाटा म्हणजे काय?
२ 'असल मराठी' शब्द
३ तमिळच का?
४ तमिळ-मराठी शब्दसाम्य
५ भाषाकुळांच्या पार
६-८ द्वित शब्द : अळुमाळु
७-५ अळुकी
८-७ संदर्भपूरक अर्थ : अल्हे
९ साहित्यपूर्व सवत्या भाषा : अटावटि
१० विविध अर्थांचे शब्द : अरुवार
११ विविध ध्वनींचे वर्ण : अहळि
१२ शब्द मराठी, अर्थ तमिळ

७. छे छे ! इश्श, तमिळ? अय्या ! ४६–५१

१ विकसित भाषा, आदिम उद्‌गार
२ उद्‌गारांचे अर्थबदल
३ अनुलोम उपपत्ती अपुरी
४ भाषिक समुद्र
५ उद्गार-श्रुतींवरून जुळणी
६ उद्‌गारांवरून समाजस्थिती
७ संमत जुळणी : अय्या!
८ उद्गारांचे पर्याय : अरे-अडे
९ ग्रामीण उद्‌गार
१० प्राचीन आदिम भाषा

८. घरोघरी मुरुगन् ५२–६२

१ द्रविड मुरुगन्
२ मिथ्याचा उदय
३ देवतानामात मिथ्य: मानमोडी
४ श्रद्धेतून मिथ्यविकास : वेऽलन्
५ दैवताचा समाजव्याप
६ समास – शब्दांचा, संस्कृतीचा
७ संस्कृत मिथ्ये, तमिळ आधार
८ नक्षत्रनाम : कृत्तिका
९ मिथ्यांची मिसळ : स्कन्द
१० बोलीध्वनिक : मुलगा
११ उत्तर-दक्षिण विभागणी फोल

९. खंडुवाचा येळकोट ६३–७२

१ लोककथेतील सरमिसळ
२ मैलार आणि स्कंद
३ मल्हारि-माहात्म्याचे मूळ
४ थोरली आणि धाकटी परंपरा
५ सेनापती मल्ह
६ मुरुगाचा पवाडा
७ सारी रूपे एका संस्कृतीतली
८ सहामुखी खंडोबा
९ मूर्तिशास्त्र अपुरे
१० वाघ्या-मुरळी
११ येळकोट आणि खंडोबा
१२ लोकदेवाचा प्रागितिहास

१०. युगे अठ्ठावीस उभा विटेवरी ७३–९०

१ संस्कृतीतला गोपाळकाला
२ श्रद्धांची सरमिसळ : वेंकटेश
३ वैजयंती माळ
४ शिंके आणि शेंडी
५ रखमाईचे मूळ रूप
६ भक्तजनांचा मागोवा
७ मूळरूपाची विविधता
८ लोकव्युत्पत्तीची चिकित्सा : वीट
९ विष्णुरूपाचे आरोपण
१० पंढरपूर, फागनिपूर, पांडरीफड
११ अविरोधी पुरावे
१२ काव्य आणि प्रागितिहास

११. तेतीस कोटी देवा, गोंधळा यावं ९१–९७

१ दैवतांची नावेगावे
२ भाषांची मिथक्रिया
३ पुरातन उद्घोष : उदो उदो
४ पाणिनीय व्युत्पत्ती अपुरी : सिंह
५ कल्पक अर्थाने : मुंगी
६ देवस्थानाचे परिभाषिक शब्द
७ लोकव्युत्पत्ती आणि वस्तुनिष्ठा
८ लोकदैवतांची प्राचीनता
९ वेदकथांना दक्षिणी आधार
१० परंपरांची मिसळ
११ लोकपरंपरेची पुरातनता
१२ गोंधळ म्हणजे नाच

१२. भाषा मूळ अडाण्याची ९८–१०७

१ 'खेड्यापाड्याला येतंय कोन?'
२ अडाणी अज्ञान नव्हे
३ वाडवडिलांची आठवण
४ 'अडाणी' बोलीचे ध्वनिक : थान
५ शुद्ध-अशुद्ध : श्येनं
६ खेडेपाडे घे मूळ
७ 'शेती'तला अर्थविस्तार
८ खालती वरती : विश्वल गोचरे
९ अडाणी 'तु'कार तमिळेत
१० प्राथमिक क्रियांचे शब्द
११ अडाणी ग्यानबा होतो
१२. अडाणी व्याकरण : मी गेल्तो

१३. नखशिखान्त तमिळ १०८--११५

१ व्युत्पत्ती व संस्कृती : केस
२ प्राथमिक शब्द जुने
३ स्वाभाविक निवडीचे तत्त्व
४ व्युत्पत्तीची मानीवे : मिशी
५ संदर्भावरून व्युत्पत्ती : मुले
६ आधार-तात्पर्य-गोल : कीचक
७ समग्र भारतीय विचार
८ अवघड जागचे सोपे शब्द
९ समार्थ शब्दांची सरमिसळ
१० शेंडी शिंके आणि शिखा

१४. चूलमूल नातीगोती ११६--१२५

१ व्युत्पत्तीची सामाजिक पार्श्वभूमी
२ पोळी आणि गहू
३ लोकव्युत्पत्ती : दिंड
४ तमिळ त, मराठी त थ द ध
५ सार्थ नातेशब्द
६ वनस्पतींची नावे
७ प्राचीन मराठी रूपच मूळ?
८ समाजसापेक्ष लक्षणा : 'मूल'
९ आचारधर्म आणि व्युत्पत्ती
१० थंड पाणी व तण्हा
११ नात्यांच्या भाषेतून भाषांचे नाते

१५. यादुम् ऊरेऽ यावरुम् केऽळिर् १२६--१३३

१ भाषिक दक्षिणायन, उत्तरायण
२ भारतीय भाषाभ्यासातल्या मर्यादा
३ लिपिभेदाची अडचण
४ तमिळ-नागरी लिपींची तुलना
५ संमत-भाषिक सकळ सोईरे

संदर्भ साहित्य १३४--१३५
दक्षिणी शब्दसूची १३६--१४२
सामान्य सूची १४३--१५०

१. अडगुलं मडगुलं

अडगुलं मडगुलं। सोन्याचं कडगुलं।
रुप्याचा वाळा। तान्ह्या बाळा। तीट लावू॥

बाळाला तीट लावण्याचे हे गाणे मराठमोळी आई बहुधा मायमराठीच्या आदिकाळापासून म्हणत आली आहे. आदिम गाणी प्रचारात तर खूप असतात. पण त्यांचा अर्थ लागतोच असे नाही. किंबहुना तीच त्यांच्या आदिमतेची खूण असते म्हटले तरी चालेल. १

निरक्षर माउल्यांना आणि तान्हुल्या बाळांना हजारावर वर्षे आनंद देत आलेल्या या गाण्याने कोशकारांना मात्र गुडघे टेकायला लावले आहे. का, तर त्याचा अर्थ लागत नाही. ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचे तर हे गाणे आणि त्यातले शब्द 'कानडे' आहेत. 'कानडे' म्हणजे 'कानडी किंवा कन्नड भाषेतले' नव्हेत, तर 'अनोळखी' आहेत. ते कन्नड भाषेतून आलेले आहेत असे धरून त्यांचा अर्थ लावला आहेही. पण त्यासाठी बरीच झटापट करावी लागते. ती करूनही चपखल अर्थ लागत नाही तो नाहीच. २ ३

मराठी भाषा संस्कृतवरून महाराष्ट्री, महाराष्ट्री अपभ्रंश या पायऱ्यांनी विकसित झाली असे मानतात. कन्नड आणि तेलुगू भाषा बोलणाऱ्यांचे प्रदेश महाराष्ट्राला लागून असल्यामुळे त्यांचे काही शब्द मराठीत आले आहेत हेही मान्य केले जाते. तशा या दोन्ही भाषा द्रविड भाषासंघातल्या मानतात. पण त्या भाषासंघातली प्रमुख भाषा तर तमिळ. तेव्हा त्याही भाषेचा काही प्रभाव मराठीवर पडला असेल असे मान्य केले पाहिजे. पण तसे मानले जात नाही. कारण, मराठी ही संस्कृतची लेक किंवा नात आहे हा सिद्धांत, आणि तमिळ बोलणाऱ्या आजच्या लोकांचा मुलूख महाराष्ट्राला लागून नाही ही भौगोलिक वस्तुस्थिती. संस्कृत बोलणारे आर्य लोकही भारताचेच मूळ रहिवासी नव्हते हेही मान्य असते. तमिळ-मराठी संबंधात मात्र आपण आजच्या भाषिक प्रदेशांनाच धरून चालतो. ४

५ हे ग्रह आणि आग्रह सोडून 'अडगुलं मडगुलं'सारख्या 'कानडया' मराठी शब्दांसाठी तमिळ भाषेत शोध करायला हरकत नसावी. कारण ही भाषा किमान दोन हजार वर्षे प्रचारात आहे आणि ती बोलणारे लोक एके काळी भारताच्या खूप मोठ्या भागात नांदत होते असे विद्वानांचे मत आहे.

६ असा शोध करताना शब्दांच्या ध्वनिसाम्यावरून सुरुवात करावी लागते. मराठी भाषेत आणि नागरी लिपीत जितके एकूण ध्वनी किंवा वर्ण उपयोगात येतात त्यापेक्षा बरेच कमी तमिळ भाषेत आणि लिपीत आहेत. त्यामुळे जे फरक पडतात त्यांचे भान ठेवावे लागते. उदाहरणार्थ क ख ग आणि घ हे चारी मराठी ध्वनी तमिळ क या एकाच अक्षराने दाखवले जातील. तोच प्रकार च ट त प या चारी वर्गांमधल्या चारचार अक्षरांचा. ङ ञ ण न म तमिळमध्ये आहेत.

७ अडगुलं हा शब्द तमिळमध्ये अटकुल असा लिहितील. त्यातल्या अटकु (उच्चारात अडगु) याचा अर्थ ठेवीची विनिमयाची किंवा गहाणाची वस्तू. मड्क्कु म्हणजे मातीची मोठी थाळी. याच्यासारखाच दुसरा शब्द मट्कलम्. त्याचा अर्थ मडके. मण् म्हणजे माती आणि कलम् म्हणजे भांडे यांच्यावरून तो आला आहे. मडके मोल म्हणून दिले, गहाण ठेवले असा गाण्यातल्या पहिल्या ओळीचा अर्थ.

आणि घेतले काय? लोककथेतला पाजवा उंदीरसुद्धा 'फडकं देऊन मडकं घेतलं' अशा बढाया मारीत असतो. गाण्यात म्हटलंय सोन्याचं कडगुलं. सोने हा
८ शब्द मराठीच. पण तमिळमध्येही सोन्नम् असा शब्द आहे. (लिहितात : चोन्नम्.) आणि तमिळ कडगम् म्हणजे कडे. तर, सोन्याचं कडगुलं म्हणजे कडे घेतले.

९ पायात घालण्यासाठी रुप्याचा वाळाही घेतला. पैकी वाळम् म्हणजे गोल किंवा वर्तुळ. रुपे असाच शब्द तमिळमध्ये मिळणार नाही. कारण र ल ळ ट वगैरे काही अक्षरे शब्दाच्या सुरुवातीला येऊ नयेत असा तमिळचा नियम आहे. र ल येतच असले तर त्या शब्दांच्या सुरुवातीला येऊ नयेत असा तमिळचा नियम आहे. र ल येतच असले तर त्या शब्दांच्या सुरुवातीला इ किंवा उ लावतात. तसा इ लावलेला इरुप्पु हा शब्द मिळतो. त्याचा अर्थ रोकड शिल्लक असा आहे. 'लोखंड' या अर्थानेही तो जोडशब्दांत येतो. रुपे हा शब्द यांत कुठेतरी रुपलेला असावा.

१० सोन्यारुप्याचे हे दागिने तान्ह्या बाळाला घातले. तान् असा तमिळ शब्द तो ती ते, स्वतःचे या अर्थांचा. ताने म्हणजे स्वतःचेच असा अर्थ होईल. तान्ह्या बाळाबद्दल त्याची आई असाच उल्लेख करणार आणि आपल्या या नटवलेल्या बाळाला दृष्ट लागेल अशी काळजी वाटून ती त्याला तीट लावणार. हेच गाण्याचे सार.

ही तीट कुठून येते ? तमिळ ती म्हणजे आग, जाळ वगैरे. तीत्तल् करपवणे, काजळणे. तर तीट्टुतल् म्हणजे चोळणे, अंगाला लावणे किंवा घासणे. तीतु म्हणजे दुष्टावा, दुर्गुण. आपल्या लक्षात येईल की नजर लागू नये म्हणून काजळीची तीट लावतात, तिच्यात या साऱ्या अर्थांचे रसायन आहे. ११

नवतरण्या महाराष्ट्री माउलीने तान्ह्या मराठी बाळाला जी शब्दभूषणे घातली ती तमिळाईकडून तर घेतली नव्हती ? १२

□

जिज्ञासेने करण्याच्या शोधातला हा पहिलाच प्रश्न रूपकात्मक असला तरी त्यातले रूपक प्रचलित भाषिक विज्ञानातल्या मानीवांना पूर्णपणे धरून आहे तसेच शोधाच्या दिशेचे सूचन करणारे आहे. महाराष्ट्री ही संस्कृतची लेक, म्हणून तिच्यातून जन्मलेल्या मराठीची घटना पूर्णपणे संस्कृतशी संबंधित असे मानतात. शब्द हे भाषाघटनेच्या बाह्य अंगात पडतात, कारण ते अनेक ठिकाणांहून उसने घेता येतात. अडगुलं मडगुलं यांसारखे शब्द संस्कृतमधून आले नसल्यास दुसऱ्या भाषेतून उसनवार घेतलेले असतील अशीच प्रथम कल्पना करावी लागते. असे दुसऱ्या भाषेतले शब्द थोडेफारच असले तर उसनवारीचा आधार योग्य मानावा लागेल. पण जर त्यांची संख्या अगणित असेल तर उसनवारीपेक्षा अधिक खोल संबंध मानावा लागेल. त्याचे सूचन तमिळाई या शब्दात आहे. नवतरण्या मराठीला तमिळ भाषा आईच्या स्थानी असू शकेल हे सूचन. त्याचबरोबर तमिळाई हा तमिळ भाषा व संस्कृती या दोन्हींना समावून घेणारा उल्लेख आहे. भाषिक आणि सांस्कृतिक अशी सर्व प्रमाणे लावूनच हा एकूण शोध होऊ शकतो. नुसत्या भाषिक चिकित्सेने आजवर न उलगडलेली कोडी अशा संयुक्त प्रमाणांनी कशी सुटत जातात हे क्रमाक्रमाने उघड होईलच. त्यांच्या उत्तरातून या रूपक-प्रश्नाचे उत्तर येथे सुचवल्याप्रमाणे होकारार्थी मिळणार आहे. १२

तसे ते निश्चितपणे मिळेपर्यंत सध्याच्या मानीवांना धरूनच विधाने केली पाहिजेत किंवा कोड्यांची मांडणी केली पाहिजे. म्हणून मराठीचा आदिकाळ म्हटला तो येथे सध्याच्या मानीवानुसार सनाच्या आठव्या नवव्या शतकाच्या फारसा मागे जात नाही. त्या काळच्या आपल्याला उपलब्ध असलेल्या भाषिक दस्तऐवजांमध्ये आढळणारे अनेकानेक शब्द आजच्या मराठीतही जुळत्या किंवा त्याच रूपात सापडतात. यावरून तर भाषेच्या आजचे आणि जुने या दोन रूपांचा संबंध १

बसवलेला असतो. पण लिखित भाषेपेक्षा बोलीभाषेचा प्रचार, आवाका, शब्दसंग्रह इत्यादी अनेक पटींनी जास्त असतात. हा वरकड शब्दसंग्रह बोलीरूपातच प्रचलित असतो आणि तेथूनच तो विचारासाठी उचलावा लागतो. अडगुलं मडगुलं हे असेच गीत आहे. ज्या परिवरात ते गीत रचले गेले त्याला धरून त्याचा अर्थ असतोच आणि तो त्या जनकपरिवरात माहीतही असतो. कालांतराने संदर्भ बदलतात आणि अर्थ तर्काने निश्चित करावा लागतो.

भाषा, शब्द यांच्या बाबतीतला तर्क निरखणांच्या आधारानेच करता येतो.
२ शब्दांसाठी त्यांच्यासारख्याच किंवा जुळत्या ध्वनींच्या शब्दांचे निरखण करावे लागते. संस्कृतात अडगु-मडगु यांसारखे शब्द आढळत नसल्यामुळे त्या भाषेतल्या साहित्यातून यांची अर्थनिश्चिती होऊ शकत नाही. म्हणून सध्याच्या भाषिक मानीवानुसार त्यांचा अर्थ लावणे कठीण झाले. मग हे 'मूळ' मराठी शब्द नाहीत, दुसऱ्या भाषेतून उसनवार घेतले आहेत असे मानून जवळपास प्रचलित असलेल्या
३ कन्नड भाषेत निरखण झाले. त्या निरखणावरून महाराष्ट्र शब्दकोशात (पृ. ३४) असा अर्थ दिला आहे :

> अडगुलें मडगुलें [विशेषण] खेळकर–बोलकें (मूल)– गाण्याचा अर्थ: किती बाळ खेळतं! किती बाळ बोलतं! हातांत सोन्याची कडी, पायांत रुप्याचा वाळा घातला आहे. बाळा! तुला दृष्ट होऊं नये म्हणून तीट लावतें. [कानडी आडु = खेळ + कुळी = कर याप्रमाणे प्रत्यय. मातु = बोल, भाषा + गार – कार]

वरवर पाहिले तरी या शब्दसाम्यांच्या जुळणीतल्या अडचणी दिसून येतात. मातु हा शब्द जसाच्या तसाच ज्ञानेश्वरीत येतो, येथेच तो मड– असा कसा झाला? आडु + कुळी = अडगुलं, मग माडु + कुळी = मडगुलं का नाही? कानडी आ चा मराठी अ किंवा मा चा म होणे अशी इतर उदाहरणे आहेत का? शेवटी, अडगुलं मडगुलं या संयुक्त शब्दाचा विशेषण म्हणून इतरत्र उपयोग झाला आहे का?

४ या शंकांची उत्तरे भाषांच्या तुलाभ्यासातून काढली पाहिजेत. आजवरच्या अशा तुलाभ्यासावरून भारतातल्या भाषांची जी चार कुळे मानतात त्यातली मुख्य दोन : संस्कृतप्रधान 'भारतार्य' आणि तमिळप्रधान 'द्रविड'. मराठी पहिल्या कुळातली मानतात तर कन्नड दुसऱ्या कुळातली. ही कुळांची तत्त्वी मान्य केली तर वरील शब्दांचा तुलाभ्यास मराठी-कन्नड-तमिळ या तिन्ही भाषांमध्ये केला पाहिजे. बरो आणि एमेनो यांनी 'ए द्रविडियन एटिमॉलॉजिकल डिक्शनरी' या नावाचा वीस

भाषांतले शब्द संकलित करणारा बृहत् व्युत्पत्तिकोश संपादिला आहे. त्याच्यावरून हा तुलाभ्यास सोपा झाला आहे. तमिळ शब्दांची सविस्तर सोदाहरण फोड हवी असल्यास मद्रास युनिव्हर्सिटीने प्रकाशित केलेला सात खंडांचा 'तमिळ लेक्सिकन' उपयोगी पडतो. यापुढे शब्दार्थांचे संदर्भ देताना, द्रविड व्युत्पत्तिकोशातील नोंदीच्या क्रमांकामागे 'द' व तमिळ लेक्सिकनमधील पृष्ठांकामागे 'त' अशी खुणेची अक्षरे जोडली आहेत.

द्रविड व्युत्पत्तिकोशात आलेले शब्द निखालसपणे द्रविड कुळातलेच आहेत असे म्हटले आहे. सध्याच्या भाषिकानुसार द्रविड आणि भारतार्य भाषांचा एकमेकांशी संपर्क दोन अडीच हजार वर्षांहून अधिक जुना नाही. दोन्हीकडच्या प्रधान भाषा मात्र त्यांहून जुन्या आहेत. म्हणून निखालस भारतार्य आणि द्रविड शब्द एकमेकांपासून ध्वनी आणि अर्थ या दोन्ही अंगांनी वेगळे असतात असे मानीव आहे. त्यांच्यात थोडीफार देवाणघेवाण झाली आहे असे मानतात– पण घनिष्ट संबंध नव्हे. संस्कृत ही उत्तरेची तर तमिळ ही दक्षिणेची भारतीय भाषा अशा प्रदेशिक वस्तुस्थितीवर हे मानीव मुख्यतः उभे आहे.

पण हीच वस्तुस्थिती पाच हजार वर्षांपूर्वीही होती असे कोणी म्हणत नाही. ५
अभ्यासकांचे सामान्य मत असे की भारतार्य भाषा बोलणारे आर्य लोक भारतात येण्याआधीच्या काळातले भारतीय लोक द्रविड कुळातल्या भाषा मोठ्या प्रमाणावर बोलत होते. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी बंगाली भाषेचा इतिहास लिहिला त्यात असे म्हटले आहे. महाराष्ट्र-सारस्वताच्या दुसऱ्या आवृत्तीच्या पुरवणीत, द्रविड या नावाने नाही तरी वेगळ्या काही नावाने संस्कृतपेक्षा निराळी भाषा महाराष्ट्रात पूर्वीचे लोक बोलत असतील असा अंदाज व्यक्त केला आहे. या द्रविड कुळातली प्रधान भाषा तमिळ, तिच्यातले प्राचीन साहित्य उपलब्ध आहे. त्यातले सर्वात जुने सनपूर्व दुसऱ्यातिसऱ्या शतकातले तरी नक्कीच आहे असे मानतात.

गाथासत्तसई सारखे महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर प्राकृत भाषेत संकलित झालेले काव्य सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकातले मानतात. जिला मराठी म्हणता येईल अशा भाषेचा आरंभकाल लिखित पुराव्यांवरून नक्की ठरलेला नाही; सनाच्या पाचसहाव्या शतकापासून आठ दहाव्या शतकापर्यंत केव्हातरीचा मानतात. म्हणजे तमिळचा प्रचार मराठीच्या आरंभकालाआधीचा आहे. त्यामुळे उसनवारीने तमिळ शब्द मराठीत येणे आजच्या मानीवांनुसारही शक्य आहे.

भारतार्य आणि द्रविड या दोन्ही भाषाकुळांमधले कोरीव लेख साधारणपणे ६
एकाच काळातले आणि एकाच लिपीतले आहेत. अशोकाच्या धर्माज्ञा संगमरवरी स्तंभांवर कोरल्या गेल्या त्याच्या आगेमागेच भारताच्या दक्षिण टोकाच्या गुहांमध्ये

तमिळ भाषेतले दानलेख ब्राह्मी लिपीतच कोरले गेले. या दोन्ही भाषाकुळांच्या वर्णमाला तशा सारख्याच आहेत. भाषाकुळानुसार युरोपीय भाषा मराठी-संस्कृताशी संबंधित धरतात. पण त्यांची लिपी व वर्णव्यवस्था मराठीहून कितीतरी वेगळी आहे. तमिळच्या बाबतीत हा वेगळेपणाचा अडसर तरी नाही. मराठी-तमिळ ध्वनींची तुलनाही तशी सोपी आहे.

७ स्वरांच्यामध्ये येणाऱ्या कठोर वर्णाचा उच्चार मृदु व्हावा अशी तमिळची सरणी आहे. म्हणून अट्अक्उ = अट्कु या लिखित शब्दाचा उच्चार अडगु असा होतो. तसाच मड्कु मधला ड हा उच्चार. उलट क् + क चा उच्चार क्क असाच होतो. मण् + कलम् = मट्कलम् असा ण् चा ट् होतो हाही तमिळचा विशेष. असे अनेक व्यंजनसंधी तमिळमध्ये संस्कृतपेक्षा वेगळ्या रीतीने होतात. वेगळी भाषा म्हटल्यावर वेगळी प्रवृत्ती असणारच.

खरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की अडगु हा सबंध शब्द तमिळ भाषेत मराठीतल्या सारखाच विद्यमान आहे. अ + (ट,ड) + (क,ग)– अशा जोडणीने झालेल्या इतरही अनेक शब्दांमध्ये या दोन भाषांतले साम्य दिसते. म्हणून अडगु, मडगु हे शब्द केवळ आपाततः दोन्हीकडे सारखे नाहीत. या दोन भाषांचा तुलाभ्यास करणे शक्य आणि जरूर आहे असेच ही साम्ये सांगत आहेत :

द ६९ (अ)	अट्टै	ठेव ठेवणे; कराराने देणे
	अट्कु	अनामत, गहाण
(क०)	अडवु, अडपु	अनामत, गहाण
द ५६ (अ)	अटक्कु	नियंत्रण करणे, ताब्यात ठेवणे 'अटक, अटकाव, अडकवणे इ.'
द ६३	अटि	पाय, पाऊल
(हिंदी)	एड़ी	टाच [सं. एड्क = हड्डी]

यावरून लक्षात येईल की तमिळ अट्कु हा तसाच्या तसा मराठीत आहे तर कन्नड मध्ये कु ऐवजी वु, पु असा बदल झाला आहे. म्हणजे तमिळ शब्द मराठीला कन्नडपेक्षा जवळचा आहे. अटक्कु – अटक सारख्या शब्दांनी ही जवळीक आणखी सिद्ध होते. मराठी आणि हिंदी शब्दांमध्ये पुष्कळच सारखेपणा असतो.. तरी एड़ी – टाच यासारख्या जोडीत तो दिसत नाही; तोच अडि – एडी यांमध्ये दिसतो. म्हणजे असे की आजच्या भाषिकाने ज्यांना भगिनी मानले आहे त्या या दोघींच्याही घरात त्या अन्यकुळातले शब्द वावरत आहेत. द्रविड भाषा भारताच्या मोठ्या भागावर प्रचलित होत्या याशी हे सुसंगत आहे. आता, एड़ीचे मूळ संस्कृत एड्क दिले आहे ('संक्षिप्त हिंदी शब्दसागर' पहा) त्याचे काय? एड्क हा

'संस्कृत' शब्दच पुढील द्रविड शब्दांशी तुल्य म्हणून दिला आहे :

द ७१४ एलुम्पु, एनुपु हाड.

म्हणजे या सर्वच भाषांचा एकमेकींशी मेळ बसला असे झाले.

आदिम शब्दांप्रमाणेच उत्तरकालीन शब्दांबाबत आलेला या दोन भाषाकुळांचा संबंध चोन्नम् यासारख्या शब्दात दिसतो. त १६६० चोन्नम् < स्वर्ण अशी उपपत्ती आहे. मराठी सोने स्वर्णवरूनच आला असे मानतातच. म्हणजे संस्कृत शब्दात ध्वनिबदल करण्याची या दोन्ही भाषांची धाटणी सारखीशीच दिसते. ८

भाषाकुळांची कुंपणे ओलांडून जाणारे सं-म-त साम्य म्हणजे संस्कृत-मराठी-तमिळ या भाषांचे साम्य या उदाहरणावरून दिसू लागेल. अशी शब्दसाम्ये अगणित आहेत. ती ध्यानी घेतल्यावर विगमनाच्या आधारावर आपण आणखी साम्यसंबंध प्रतीत करून घेऊन नव्या उपपत्ती उभारू शकतो. रुपे–इरुप्पै हा संबंध त्यातलाच आहे. ९

द ४११ इरुम्पु लोखंड, हत्यार, शस्त्र

लोखंडवाचक या शब्दाला थोड्या फरकाने धातू हा सामान्य अर्थ येणे शक्य आहे. रूप्य–रुपे–इरुप्पै अशी 'संमत' जुळणी होते. मान्य भाषिकानुसार रूप्य हे संस्कृत मूळ मानले जाईल. येथे रुपणे – रुतणे हे मराठी शब्द कामी येतात :

द ४०७ इरुत्तु पक्के बसवणे

इरुप्पु बैठक, घर

रुतून बसणे, रुपणे हा जो आद्य शस्त्राचा धर्म त्यावरून इरुप्पै हा धातुवाचक शब्द येणे संभाव्य आहे. या उपपत्तीच्या तुलनेने 'रूप'वरून रूप्य ही निगमनात्म व्युत्पत्ती वाटते. तिला समाजविकासाचा इतिहासिक आधार कमी; ध्वनिसाम्यावरून भेदक गुणाची कल्पना करून त्यावरून केलेली व्याख्या अधिक. 'रूप' हा भेदक गुण धरला, मग 'ज्याला रूप असते ते रुपे' अशी व्याख्या केली. ही सहज व्युत्पत्ती होत नाही.

संमत भाषांमध्ये निरखणे केली म्हणजे सहज-असहज व्युत्पत्तींचा पडताळा पाहता येतो. तान्हे याचे मूळ स्तन्य असे दिले जाते. स्तन्य म्हणजे दूध. अंगावर पिते ते तान्हे असा आर्थिक भाव असावा. मराठी थन, थान असे शब्द स्तन वरूनच आले असे मानतात. स्तन् या संस्कृत धातूचा अर्थ आवाज करणे असा आहे. उलटपक्षी 'थन'शी जवळचा तमिळ शब्द १०

द २४७५ तणि भरपूर असणे, चिक्कार असणे, आकाराने वाढणे, लठ्ठ [पीन] होणे

तणिचु मांसल होणे

ध्वनीप्रमाणेच अर्थाच्या अंगानेही त्याच्यासारखा वाटतो. म्हणजे 'स्तन'चा थान किंवा तान्हे यांच्याशी अपरिहार्य संबंध नाही. तमिळ तान् तान्हे शी जास्त जुळता वाटतो. न-न्ह ची जुळणी इतरही अनेक शब्दजोड्यांमध्ये दिसते. याहून अधिक सार्थ उपपत्तीसाठी

द २१३४	चिनै	गर्भ, भ्रूण, गर्भारपण, पिले, अंडी
(क.)	तने, तेने	प्राण्यांचा गर्भ, गर्भारपण
(तुळू)	तने	फळणे (गाई-बकरीचे), गर्भधारणा

यांचा विचार करावा लागेल.

११ अर्थध्वनींच्या साम्यांवरून शब्दाची पूर्वपीठिका कळल्यावर त्याच्या पूर्वापरतेची कल्पना बांधता येईल. तीट या शब्दात भरलेला यथातथ्य अर्थ तमिळवरून मिळतो. सध्याच्या तमिळमध्ये तीट ला पोट्टु (म्हणजे टिळा) असे म्हणतात. म्हणजे तीट हा यथार्थ शब्द मराठीत राहिला, तमिळेत मागे पडला. रूढ भाषिकानुसार तमिळ किंवा संस्कृत शब्द हे मराठी शब्दांच्या आधीचे मानतात. संमत भाषिकानुसार या तीन भाषांमधल्या शब्दांची एकाच पायरीवर तुलना केली तरच बाह्य प्रमाणांनी या शब्दांची पूर्वापरता ठरवता येईल. संभव असा आहे की तीट किंवा त्याच्या अगदी जवळचा शब्द मूळचा होता तो मराठीत शिल्लक राहिला, 'तिलक' हा संस्कृत शब्द अर्थावरून आणि ति या आद्य ध्वनीच्या साम्यावरून व्युत्पत्तीसाठी सुचवला गेला आणि तमिळचा संबंधच कधी ध्यानात न घेतल्याने त्या तीट ची खरी पीठिका आपल्याला कळली नाही.

मराठीतल्या बहुसंख्य शब्दांची पीठिका, आजवर न कळलेली, तमिळच्या किंवा दक्षिणी भाषांच्या निरखणाने आपल्याला कळू शकते. हा तमिळ-मराठी संबंध अस्तित्वात आहे, शोधनीय आहे आणि उपयोगी आहे हे उलटसुलट विवेचनाने, या बोबडगाण्यात आलेल्या शब्दांवरून दाखवून दिले. या संबंधाच्या मानीवावरून आपण संस्कृतीच्या पीठिकांचाही नव्याने शोध घेऊ शकतो.

□ □ □

२. ओवीची चित्तरकथा

ओवी हा महाराष्ट्राचा खास छंद आहे. ओवी हे आर्षगीत आहे तसेच १
जानपद गाणे आहे. 'ओवी ज्ञानेशाची' प्रसिद्ध आहे, तर 'महाराष्ट्रातल्या स्त्रिया
दळणकांडण करताना म्हणतात ती ओवी' अशी तिची फार जुनी व्याख्या आहे.
अलीकडच्या काळात विनोबांनी साडेतीन चरणांच्या ओवीची उपनिषदातील साडेतीन
मात्रांच्या ॐकाराशी तुलना केली, तर संस्कृत पंडितांनी तिची कुळी वेदांमध्ये काढून
दाखविली.

'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' सांगतो : 'ओवी ही मराठी बोलणारांची २
हक्काची संपत्ती असून ती त्यांना अपभ्रंश बोलणाऱ्या त्यांच्या वाडवडिलांपासून
वंशपरंपरेने मिळाली आहे. प्रो. वेलणकरांनी 'ओवी' ही संज्ञा 'अर्धचतुष्पदी'पासून
'अठ्ठोठ्ठवअि– अड्ढुड्ढवयी– अड्ढूहवअी– अड्ढवअी– ढूहवअी– हूहवअी– ३
हूअवयी– होवअी– ओवाअी– ओवी' अशी व्युत्पादिलेली आहे. डॉ. एस्.एम.
कत्रे यांनी संस्कृत 'अपपादिका– अववाइआ– ओवैया–ओवी' अशी ओवीची ४
परंपरा दिलेली आहे.'

संस्कृतवरूनच व्युत्पत्ती काढायची म्हटल्यावर असा द्राविडी प्राणायाम करावा ५
लागतो. उलट द्राविडी तमिळकडे वळले तर असंस्कृत तमिळ शब्दांमध्ये ओवी
ओवलेली दिसून येते.

तमिळमध्ये ओ या स्वराचे ऱ्हस्व आणि दीर्घ असे दोन उच्चार आहेत. ६
संस्कृत ओकार दीर्घ ओ ने दाखवला जातो यावरून या दोन्हींचे ध्वनिमूल्य लक्षात
येईल. तेथे तमिळ शब्द मराठीत लिहिताना सोयीसाठी दीर्घ ओ करिता 'ओऽ'
वापरायचा आहे. ऱ्हस्व ओ आपण नेहमी लिहितो तसाच राहील. त्याचा उच्चार
अ कडे झुकणारा असतो. शब्दाच्या सुरुवातीला दोघांच्याही उच्चारात काहीसा
व चा ध्वनी असतो.

तान्ह्या बाळाला न्हाऊ घालून तीट लावून निजवताना, त्याची आई त्याच्याच
ओ ओ च्या तालावर ओऽ ओऽ करीत त्याला थोपटते, बाळाची ओ ओ हळूहळू

अस्पष्ट होत जाते आणि पापण्या पाकळ्यांसारख्या मिटून घट्ट होत जातात.
७ चरणीला नेलेल्या गुरांमध्ये ओढाळ गुरू लांब गेले तर त्याला माघारी बोलवण्यासाठी गुराखी आजही ओऽ ओऽ करून 'ववई' किंवा 'ओवई' घालीत असतो. ओवी हे छंदनाम मुख्यतः नादानुसारी कसे आहे ते यावरून कळते.

८ तमिळ ओऽ ला उद्‌गारवाचक अर्थ आहेत. ओलि याचा अर्थ आवाज, ध्वनी असा आहे. ओ या तमिळ धातूला 'सारखे असणे' असा अर्थ आहे. ओऽ मध्ये याच अर्थाला आणखी घनता येऊन 'एका मनाचे असणे' असा अर्थ आला. एखाद्या वस्तूच्या हुबेहूब सारखे असते चित्र : तमिळ ओऽवि, ओऽवम्. चित्रकार म्हणजे ओऽवियन्, ओऽवर. गंमत अशी की ओऽवर् याचा दुसरा अर्थ भाट, राजाला 'ओव्या गाणारे' बंदीजन असा आहे.

९ हे अर्थ एका दृष्टीने सुसंगतच आहेत. भाट गातो ते यथार्थ शब्दचित्रच असते; राजाची तशी प्रामाणिक समजूत असते. चित्रकार आणि भाट दोघेही राजाने आपल्या विनोदनासाठीच बाळगलेले असतात. तेव्हा दोघांनाही ओऽवर्च्या एकाच माळेत गोवले तर फारसा दोष आहे असे नाही.

१० भाषेची खुबी अशी की 'ओऽवि'चा गीतवाचक अर्थ ती विसरली, 'ओऽवर्'मध्ये त्याची स्मृती मात्र टिकवून राहिली. ओऽवि प् पेच्चु म्हणजे गोड बोलणे यातही 'ओऽवि' गोड म्हणून राहिली. एरवी ती चित्र या एकाच अर्थाने उरली. ओवीची चित्तरकथा ही अशी झाली.

११ ओवीचा चौथा चरण तुटका असतो. म्हणून तर मारून मुटकून संस्कृत व्युत्पत्ती आल्या. या तुटकेपणालाही 'ओऽवाय्' या तमिळ शब्दाचा आधार मिळतो. ओऽवाय् म्हणजे दात नसलेले मुख, काठ तुटलेले भांडे. नुसते वाय् म्हणजे मुख. थोडक्यात, ओऽवाय्मध्ये काहीतरी त्रुटीचे सूचन आहे.

१२ ओवी हा जानपद छंद आहे हे नक्कीच. पण त्या छंदातल्या रचना जानपदांच्या आणि त्याचे नाव मात्र नागरांनी ठेवले (जसे अलीकडे आपण तमाशाला लोकनाट्य असे 'ठसठशीत' नाव ठेवले) असा काही प्रकार नसावा. ओवी हे नावही नादानुसारे, जानपदांनीच ठेवले असले पाहिजे. ते ठेवणारे प्राचीन तमिळ भाषा बोलत असावे आणि त्या वाडवडिलांकडून ही हक्काची संपत्ती वंशपरंपरेने आजच्या मराठी भाषिकांपर्यंत पोचली असावी.

□

१२ या वंशपरंपरा वगैरे माणसांच्या असतात, भाषांच्या नव्हे. माणसाचे रंगरूप त्याला आईवडिलांकडून मिळते तशी भाषा मिळत नसते. मराठी बोलणाऱ्या आईबापांचे

मूल कानडी मुलखात म्हणजे कानडी बोलणाऱ्या समाजात वाढले तर त्याची भाषा कानडी होईल. तेव्हा आजच्या मराठी बोलणारांचे पूर्वज तमिळ, संस्कृत किंवा आणखी कोणती बरीवाईट भाषा बोलणारे असले तर त्याचा धक्का बसण्याचे कारण नाही. ते बोलत होते ती भाषा कोणती हे विज्ञानिक पद्धतीने ठरवण्यासाठी शब्दांच्या अभ्यासाचा मोठाच उपयोग असतो. आज प्रचारात असलेले शब्दरूप, तुकारामाच्या काळातले शब्दरूप, मग ज्ञानेश्वरांच्या काळातले शब्दरूप... अशा रूपांची तुलना करीत प्रतिलोम म्हणजे मागेमागे जाण्याच्या पद्धतीने आधीचे शब्दरूप कल्पिता येते. याला कल्परचना आणि अशा कल्पिलेल्या शब्दाला कल्पशब्द म्हणता येईल. हा कल्पशब्द त्याकाळच्या ज्या भाषेतल्या शब्दासारखा असेल, 'त्या भाषेतून तो आला' असे ढोबळपणे म्हणता येईल. कल्परचना हा प्रतिलोम प्रवास किंवा प्रयास आहे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

ओवी या शब्दाचा असा प्रतिलोम शोध करता 'कांडताना ओवी गावी' हा १
अकराव्या बाराव्या शतकातला उल्लेख सापडतो. 'मानसोल्लास' नावाच्या ग्रंथात तो आला आहे : 'महाराष्ट्रेषु योषिद्भिर् ओवी गेया तु कंडने' [महाराष्ट्रात बायांनी ओवी गायचि कांडणीं]. हा आणि यापुढचे संदर्भ डॉ. ना. ग. जोशी यांच्या 'मराठी छंदोरचना' या ग्रंथातून (पृ. १२६ इ.) घेतले आहेत. मानसोल्लासातल्या उल्लेखावरून असे दिसते की त्या काळातही श्रमपरिहारासाठी, कांडताना जी गाणी म्हणत त्यांना ओवी हे नाव होते.

डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' ग्रंथात २
पृ. ९ वरचे उद्धृत आहे. अपभ्रंश साहित्यात ओवीचा उल्लेख आहे असे दिसत नाही. तरीपण 'ओवी ही अपभ्रंश बोलणाऱ्या वाडवडिलांकडून मिळाली' असे विधान कसे केले जाते? जुन्या मराठी साहित्यातली भाषा आणि अपभ्रंश साहित्यातली भाषा यांच्या प्रतिलोम तुलाभ्यासाने अपभ्रंश ही मराठीची पूर्वावस्था मानली गेली. मग त्या मानीवा-वरून ओवीसुद्धा अपभ्रंश 'बोलणारांकडून' आली असे व्यापक अनुलोम विधान आले.

डॉ. वेलणकर यांनी सुचवलेली व्युत्पत्ती अशीच अनुलोम आहे. 'ओवी'च्या ३
आधी 'ओवाअी'... आणि अगदी पूर्वी 'अठ्ठोठ्ठवअि' असा शब्द प्रचारात होता असे प्रतिलोमपणे सिद्ध करणे अशक्य आहे. त्यामुळे अर्धचतुष्पदी हा ओवीचा कल्पशब्द होऊ शकत नाही.

'अर्धचतुष्पदी' हा एक व्याख्याशब्द आहे. 'साडेतीन चरणांची' असा ४
त्याचा अर्थ, सुचवणारांच्या मनात आहे. डॉ. कत्रे यांनी सुचवलेला 'अपपादिका' हाही असाच व्याख्याशब्द आहे. या दोघांमधला फरक ध्वनिबदलाचे नियम नेमके कसे लागतात याविषयीचा; निरखणांचा प्रतिलोम आधार दोघांनाही नाही.

५ व्युत्पत्तीची ही अनुलेम परंपराच मराठीत रुळलेली आहे. संस्कृत भाषा हे मराठीचे मूळ हा सिद्धांत या परंपरेच्या मुळाशी आहे. या सिद्धांताचा विस्तार म्हणजे, 'असंस्कृत' शब्द मूळचा असू शकत नाही; असंस्कृत म्हणजे संस्कृत नसलेला, तसाच गावठी, गावरान, जानपद वगैरे. तमिळ, कानडी वगैरे शब्द 'संस्कृत नसलेले, वेगळ्या भाषाकुलातले' म्हणून निरखणाबाहेर. गावरान शब्द 'अपभ्रष्ट रूपे' आहेत या विश्वासापायी मूलशब्द नसून फलशब्द गणले जातात. प्रतिलोम पद्धतीने निरखण केल्यास प्राचीन तमिळ साहित्यात गावरान मराठी शब्दाशी जुळता शब्द सापडतो.

६ लेखी साहित्यावरून अशा जुळणी करताना वेगवेगळ्या लिपींचे विशेष ध्यानात घ्यावे लागतात. तसे केले तर ओ ची दोन चिन्हे तमिळमध्ये असली तरी ओ चे एकच चिन्ह असलेल्या मराठीतल्या ओकाराशी दोन तमिळ ओकारांचा फारसा विरोध दिसत नाही. त्यामुळे ओकारसमावेशक तमिळ-मराठी शब्दांची तुलना होऊ शकते. म्हणूनच 'ओवी, ओवि, ओऽवि, ओऽवी...' इत्यादी थोड्याबहुत फरकाच्या शब्दांचा एकत्र विचार करता येतो.

७ ओवी-ववी इत्यादी बोलीरूपातला शब्दच ओवी असा प्रमाणभाषेत लिहिला बोलला जातो. सातआठशे वर्षे तरी तो तसाच आहे हे पाहिल्यावर तोच मूळचा धरून त्याचा काही अर्थ लागतो का? सामान्यजन स्वभाषेच्या ज्ञानाच्या मदतीने असा काही अर्थ काढतात त्याला लोकव्युत्पत्ती म्हणतात. 'पहिली माझी ओवी ओवीन जगत्र' या जात्यावरच्या ओवीच्या चरणात अशा लोकव्युत्पत्तीतले काव्य पहायला मिळते. शास्त्रीय व्युत्पत्ती सांगायची म्हणजे शब्दातला मूळ धातू व त्यावरून निघणारा अर्थ दाखवायचा. 'मराठी छंदोरचना' पृ. १३१ नुसार

> प्रत्यक्ष वापरला जाणारा 'ओवणे' हा धातु किंवा जुना 'ओवणिका ओवाणिका' हा शब्द, (किंवा जुन्या कानडीत आढळणारा 'ओव' 'संरक्षण करणे' या अर्थाचा धातु) यावरूनच ओवी व्युत्पादिणे योग्य होय.

अशा व्युत्पत्तीमध्ये ओवणे-अर्थ गुंफणे-काव्य रचणे असा अर्थविस्तार करणारी लक्षणा उघडच दिसते. प्रतिलोम पद्धतीने विस्तारहीन, थेट-अर्थदायक मुळाकडे जाता येईल का?

८ तमिळमध्ये शोध घेतला तर ते शक्य होते. ओवीच्या जवळपास ध्वनी असलेल्या शब्दांचा त्यासाठी विचार केला:

त ६१६	ओऽ	आनंद, दुःख, आश्चर्य, स्मरण, हाकारा इत्यादी व्यक्त करणारा उद्‌गार.

द ८८६	ओऽतु	वाचणे, पाठ म्हणणे, मंत्र म्हणणे
द ८९१	ओऽम्पु	रक्षिणे, लहानाचे मोठे करणे
(क.)	ओऽवु	रक्षिणे, काळजी घेणे
द ८३७	ओलि	आवाज करणे, गर्जणे
द ७८१	ओ(-त्त-)	सारखे असणे
त ६१६	ओऽत्तल्	एका मनाचे असणे. (त्यावरून, मैथुन करणे)
त ६३१	ओऽवम्	चित्र
	ओऽवर्	चित्रकार, भाट, बंदीजन

एकाक्षरी बीजशब्दाला आणखी शब्द लगटून नव्या अर्थाचे शब्द बनवण्याची ९
तमिळची प्रवृत्ती आहे. शिवाय, या संकलित शब्दातले सर्व अवयव आपल्याला अलगअलग दिसू शकतात. तु, तल्, त्तल्, व, म्प इत्यादी घटक विविध अर्थछटा जोडण्यासाठी पुढे लागतात. त्यामुळे वरच्या सर्व शब्दांमध्ये ओ– ओऽ हेच मूळ आहे. नादानुसाराने ओइ चा उच्चार तमिळमध्ये ओवि असा होईल. 'मराठी छंदोरचना' पृ. १२९ वर कन्नड त्रिपदी व ओवी यांचे साम्य दाखवले आहे. 'त्रिपदी अंगाईच्या शेवटी 'ओई' किंवा 'होई' म्हणण्याची प्रथा आहे.' यातल्या 'ओई, होई' यांचा ओवीशी अनुबंध दिसतो. 'कानडीभाषी राजांच्या अमलामुळे ही रचना, 'निर्विवादपणे लौकिक' असलेल्या ओवीमध्ये आत्मसात झाली असणे' शक्य नाही. कारण राजांचा अंमल दळणकांडण करणाऱ्यांच्या भावजीवनापर्यंत पोचत नाही. तमिळ, कन्नड, मराठी या आजच्या भिन्न भाषा. त्या बोलणाऱ्यांचे पूर्वज काही किमान समान शब्दादिक असलेल्या बोली बोलत असतील त्याचे हे पुरावे आहेत असे मानणे जास्त सयुक्तिक होईल.

या बोली वेगळेपणे विकासत गेल्या तेव्हा या शब्दांवर वेगवेगळे परिणाम १०
झाले. म्हणून तमिळमध्ये ओऽवर् म्हणजे चित्रकार आणि कवी असे दोन अर्थ तर ओऽवियम् म्हणजे चित्र हा एकच अर्थ शिल्लक राहिला. (हे शब्द प्राचीन तमिळ साहित्यात आहेत.) मराठीने ओवी म्हणजे गाणे या एकाच परंपरेची जपणूक केली. बहुधा 'ओ' म्हणजे गाणे या स्वरूपाचा अर्थ मूळचा असावा. 'ओऽतु' या तमिळ शब्दाचे 'होता' या संस्कृत शब्दाशीही अर्थ-ध्वनी-साम्य आहे. त्यातूनही ओ, ओवी यांची प्राचीनता प्रत्ययाला येते. ओवीची चित्तर कथा झाली ती तमिळमध्ये. चित्तरकथा = चित्रकथा, चमत्कारिक कथा; चित्तर म्हणजे मनोरंजक कथा. मराठीत मात्र तिचे लौकिक आणि ग्रंथितही नामरूप पहिल्यासारखेच राहिले.

काव्यग्रंथातले छंद जानपद गाण्यावरूनच आलेले असणार. पण शास्त्रीय ११
पद्धतीने चिकित्सा होऊन त्यांचे नामकरण होते तेव्हा बहुधा व्याख्याशब्द येतात.

ओवीचा चौथा चरण अर्धा असतो हा विशेष सांगितला जातो. तिरु क् कुरळ ज्या कुरळ-वेन्बा छंदात रचलेले आहे त्या छंदाचीही रचना अशीच तुटक्या चरणाची असते. किंबहुना कुरळ् याचा धात्वर्थच 'खुरटे' अशा स्वरूपाचा आहे. कुर् = खुर्. म्हणजे ओवीसारखा छंद प्राचीन-तमिळ बोलणारांच्याही प्रचारात असावा आणि त्याचे नावही तेच असावे असा अंदाज करता येतो.

□ □ □

३. एकगीते-लोकगीते

गीता म्हणजे गायिलेली, पण आता गीता शब्द इतक्या साध्या किंवा तोकड्या अर्थाचा राहिलेला नाही. भगवंतांनी गायिली तीच गीता. गीता म्हणजे अठरा अध्याय गीता. गीता म्हणजे नीती शिकवणारा ग्रंथ. असे अर्थ शब्दाभोवती साकळत जातात.

उलट दिशेने गेले तर एकाद्या खास अर्थाच्या शब्दाचा मूळ पूर्वज अगदीच १
साध्या किंवा किरकोळ अर्थाचा दिसतो. तो पूर्वज दुसऱ्या भाषेतला किंवा भाषाकुळातलाही असू शकतो, त्या दोघांच्या तोंडवळ्यांची तुलना करता येते. मधले दुवे कधी स्पष्ट असतात, कधी लुप्त असतात.

'आई' हा मराठी भाषेत नुसता शब्द राहिलेला नाही. त्याला दिव्य ध्वनीचे २
पद मिळालेले आहे. मात्र कोणत्याही आईचे कूळ मुळात जसे परकेच (मानलेले) असते तसे या शब्दरूप आईचेही झालेले दिसते. तिच्या आजोळी, तमिळमध्ये, 'आ' म्हणजे तोंड वासून करण्याचा आ नव्हे; तर आ म्हणजे गाय म्हैस वगैरे. मग आय्, आयि म्हणजे आई. खुद्द तमिळ बोलणाऱ्यांनी 'माझी आई एऽ' म्हणणाऱ्या लहानग्याच्या सुरावर जणू नंतरच्या काळात स्वतःच्या भाषेत आईला ताय् (स्वतःची आई) हा शब्द लावला.

'आ' पाळणारी जातही 'आय्' म्हणजे गोपालक झाली. आयन् म्हणजे ३
गोपाल आणि आय्चि म्हणजे त्याची कारभारीण. आय्चि म्हणजे आई पण. आपल्याकडे अजूनही कितीतरी ठिकाणी आईला आयशी म्हणतातच ना!

आई बाळाला झोपवण्यासाठी अंगाई म्हणते. बाळाला म्हणते, स्वतःशी पण म्हणत असते. एकटीच म्हणते म्हणून वर 'एकगीत' म्हटले. हे अंगाई एकगीत ऐकत बाळ झोपी जाते. यातल्या 'अंगा'चा तमिळ अर्थ तोंडाचा आ करणे, तोंड उघडणे एवढाच आहे. मात्र ते काही आलाप काढण्यासाठीच उघडले जात असावे. कारण 'अंगाडि' म्हणजे बाजार, 'अंगाडिकूरु' म्हणजे माल खपवण्यासाठी ओरडणे. बाळाची झोप त्याने मोडत नाही!

अंगाईला ज्ञानेश्वरीत हल्लरु म्हटले आहे. गुरुदृष्टीला आईची उपमा देऊन ज्ञानेश्वर म्हणतात : सतरावियेचे स्तन्य देसी। अनाहताचा हल्लरु गासी। समाधिबोधे निजविसी। बुझाउनि॥ —हे गुरुदृष्टी, तू चंद्राच्या सोळाच्या वरच्या सतराव्या अमृतकलेचे स्तन्य देतेस, अनाहत नादाची अंगाई गातेस आणि समाधिबोधाने शांतवून साधकरूपी बालकाला निजवतेस.

४ हल्लर शी समनाद तमिळ शब्द पाहिला तर त्याच्या अर्थामध्ये अनाहतपणा राहोच, सुस्वरपणाही कमीच दिसतो. 'अलरु' म्हणजे ओरडणे, गर्जणे, किंचाळणे याबरोबर हंबरणे, बे बे करणे असे अर्थ आहेत. शक्य आहे की, गाईला आणि आईला सारखे शब्द लावणारांना या हंबरण्यात गाईने गायिलेल्या अंगाईचा भास झाला आणि हल्लराला तो अर्थ प्राप्त झाला!

५ तमिळ अक्षर-ध्वनींचा एक विशेष येथे सांगायला हवा. वर दोनतीन जागी **न र** ही ठळक अक्षरे छापली आहेत. ती जुळणीची चूक नव्हे. न र ल या प्रत्येकाचे तमिळमध्ये दोन उच्चार आणि वर्ण आहेत. एक आपल्यासारखा. दुसरा या ठळक ठशाने दाखवलेला. **र** चा हल्लीचा उच्चार काहीसा 'ऱ्' सारखा. **न ल** हे दंतमूल आहेत. ते म्हणताना जीभ दाताच्या मुळाशी लावायची, टोकाशी नव्हे. हे वर्ण शब्दाच्या आरंभी कधी येत नाहीत. यांचे उच्चार प्राचीन काळी नेमके कसे होते याची भाषातज्ज्ञांना खात्री नाही. मराठी शब्दांवरून पाहिले तर एक विशेष गोष्ट दिसते. न्ह ऱ्ह ल्ह हे ध्वनी ज्या मराठी शब्दांमध्ये येतात त्यांच्याशी समनाद तमिळ शब्दांमध्ये **न र ल** हटकून आढळतात. काही नाही तर मराठी शब्दात त्यांच्यातला हकार आसपासच्या वर्णांमध्ये प्रतिबिंबित झालेला दिसून येतो.

अलरु चा हल्लरु शी संबंध हा असा लागतो. अलरु : अल्हु : हलरु अशी उपपत्ती मांडता येईल. र चा 'ठळकपणा' नसलेल्या र ने युक्त असा 'अलर्' शब्द पाहिला तर त्याचा अर्थ फुलोरा असा आहे. र र यांच्या भेदामुळे अर्थात कसा फरक होतो ते यावरून कळेल.

६ या 'एकगीता'कडून समूहाच्या 'लोकगीता'कडे वळावे. पा, पाडु म्हणजे गाणे. त्याचा पोवाड्याशी संबंध दिसत नाही. तेलुगूमध्ये पोवडु म्हणजे स्तुती करणे. त्याच्या मागे पुकळ्-पुहळ् म्हणजे स्तुती, कीर्ती वगैरे. पवाडे—पोवाडे गाणे म्हणजे स्तुती करणे, कीर्ती गाणे. 'तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे!' साऱ्यांचे मूळ पुहल् — बोल. कीर्ती म्हणजे बोलबाला!

७ सुगीच्या हंगामात जोंधळा काढणारे गडी 'भलरी दादा भलं गडी दादा' म्हणून भलरी घालत असतात. ती एकटा कधीच घालत नाही. पलर् म्हणजे तमिळमध्ये अनेक लोक. पलररि—चोल् : अनेकांचा बोल, म्हणजे अफवा किंवा

गावगप्पा. प चा मृदू उच्चार ब होतो आणि र चा ठळकपणा हकार आणतो हे लक्षात घेतले म्हणजे भलरीची भलीबुरी संगती लागू शकते.

□

या भले-भलते या शब्दाची व्युत्पत्ती डॉ. पां. दा. गुणे यांच्या 'कंपॅरेटिव्ह फिलॉलजी' मध्ये पृ. २९ वर आली आहे ती पहावी : ७

> भलें हा शब्द ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी भलतें किंवा भलेंतें असा आला आहे... भलें हा भद्रक → भल्लअ वरून आला आहे. राजवाड्यांचे हवल् वरूनचे उपपादन समर्थनीय नाही. महाराष्ट्री आणि पाली मध्ये द्र चा कधीकधी ल्ल होतो. जसे आर्द्र-अल्ल, छिद्रित-छिल्ल. तुल्यशब्द : चुल्लवग्ग-क्षुद्रकवर्ग. म्हणून भलें किंवा भलतें याचा अर्थ केवळ 'चांगले' इतकाच आहे. आणि माणूस नेहमी चांगल्याच गोष्टी *निवडणार*, म्हणून भलतें चा अर्थ 'तुम्ही निवडाल ते' असा झाला. अशा रीतीने रूपबदलाबरोबर आशय किंवा अर्थ यांचाही बदल झालेला दिसतो.
>
> या विशिष्ट अर्थाने भलें हा शब्द अजूनही महाराष्ट्राच्या काही भागात उरलेला आढळतो. 'मी तुमची सोय केली आहे; मग तुम्हांला भीक मागायची असली तर भलें मागा' असे वचन आपल्याला पुष्कळदा ऐकू येते.
>
> 'भलतें तेथें'चा अर्थ 'तुम्हास हवे तेथे' 'कोणत्याही जागी' असा होईल. त्याचप्रमाणे 'भले तेव्हडी' म्हणजे 'केवढ्याही मापाचे, कितीही (पुष्कळ)' असा होईल.

या अनुलोम व्युत्पत्तीत भलतेच स्पष्टीकरण द्यावे लागते. दक्षिणी भाषांमधले शब्द तपासले तर वरचे बहुतेक अर्थिक पल—वल्—वळ्—भले या शब्दसंहतीत आपल्याला प्रतीत होते आणि ध्वनिबदल हे स्वाभाविक आणि मामुली स्वरूपाचे दिसतात. ळ् मुळे मराठी शब्दात हकार येतो :

द ३२८८	पल्	दात
द ३२८९	पल	पुष्कळ, अनेक, वेगवेगळे
द ४३१७	वल्	बळकट, कुशल
	वलतु	उजवी बाजू, विजय
(तुळू)	बलु	खूप, मोठे, महान
द ४३४०	वळ्	सुपीकता, भरभराट, महत्ता, मोठे-पणा, बळकटी.

अर्थविस्ताराचा अंदाजच करायचा झाला तर पल् आणि वल् शब्दांकडे पहावे.

शरीरात पुष्कळ संख्येने असतात दात; किंवा बळकट बाजू असते ती उजवी. त्यामुळे पल् वल् या ध्वनींना थोड्याशा बदलाने ते अर्थ प्राप्त झाले असे दिसते. आर्द्र चा अल्ल असे असहज वाटणारे बदल येथे नाहीत. अर्थविस्तारही सहज आणि आदिम बुद्धीला अनुरूप असा वाटतो.

१ अशा अर्थविस्तारामागे तुलना असते. दात आणि अनेक यांच्यात अनेकत्व हा साम्याचा मुद्दा झाला. दात चांगले चमकत असतात. या त्यांच्या गुणावरूनच कदाचित पल्-पल्ह म्हणजे चमकणे हा अर्थ आला असेल. पल्हाटी-पळ्हाटी-पराटी म्हणजे कापसाचे झाडरू, त्याच्या मुळाशी हा चमकण्याचा साम्यभाव असावा. हे अर्थविस्तार शेती हाच मुख्य व्यवसाय असलेल्या समाजाने केले असतील.

२ आ-आय् यांच्यातही फार जवळचे नाते आहे. ते पशुपालसंस्कृतीने टिपले असावे. तमिळ भाषेचे व्याकरणकार सर्व शब्दांना नामशब्द मानतात. क्रियावाचक अर्थ काळाचे प्रत्यय वगैरे लावल्याने प्राप्त होतात असे त्यांचे म्हणणे. आ-आय्मधल्या 'आ'चे क्रियावाचक अर्थ आईपणाशी सुसंगतच आहेत :

द २८२ आ (आन्–आयि–) अस्तित्वात येणे, घडणे, असणे.
सगळ्या अस्तित्वाची जन्मदात्री ती आई!

द ३०८	आय्, आयि, याय्, ञाय्	आई
	आय्चि, आचि	आई, आजी
	आयाल्	आई, आजी
	ताय्	आई
	याय्	माझी आई

हा प्राचीन तमिळ शब्द आई याच अर्थाने अगदी दक्षिणेच्या तमिळ मुलखात हल्लीसुद्धा खेड्यातल्या लोकांच्या तोंडी आहे. इतर अनेकांच्या तोंडी ताय् अम्मा असे शब्द आहेत. मराठीत आलेला आई शब्द तमिळमध्ये जसाच्या तसाच आहे हे माहीत नसल्यामुळे त्याची व्युत्पत्ती संस्कृत 'आर्या'वरून वगैरे लावण्यात आली. अशा व्युत्पत्ती संस्कृतीचा इतिहास किंवा स्वरूप स्पष्ट करण्यासाठी वापरतात तेव्हा मोठी दिशाभूल होऊ शकते. उदा. इरावती कर्वे यांनी 'मराठी लोकांची संस्कृति'मध्ये (पृ. १५६) म्हटले आहे :

> हा शब्द संस्कृतोद्भव नसावा अशी पहिली कल्पना होती. पण तो संस्कृतापासूनच आला याचा पुरावा उडिया भाषेतील नातेवाचक शब्द गोळा करताना आढळला... पितृप्रधान कुटुंबात सर्वांत थोरला पुरुष पिता किंवा महापिता (पितामह) असतो तेव्हा त्याची बायको 'आई' हे योग्यच आहे.

येथे... या जागेत बरीच लांबलचक व्युत्पत्ती दिलेली आहे. इतके वळसे घ्यावे

लागणे हे व्युत्पत्तीच्या ओढघस्तीचे प्रमाण आहेच. पण मुख्य म्हणजे मराठी नातेवाचक संज्ञांवरून मराठी कुटुंबपद्धतीविषयी जी तत्त्वी त्या ग्रंथात मांडलेली आहे ती पूर्णपणे चुकीची ठरते, कारण व्युत्पत्तींचा आधारच चुकीचा आहे.

नातेवाचक शब्दांची जी गोष्ट तीच जातिवाचक शब्दांचीही. आयन् किंवा ३ आयर् या गोपाल-वाचक नावावरून आहीर-अहीर हे जातीचे नाव आलेले दिसते. आभीर हा त्या नावाचा उद्‌भ्रंश. पण संस्कृत महाकाव्यादी ग्रंथांमध्ये आभीर हे नाव आले असल्याने ते अहीर चे मूळ धरले जाते. 'शैव, वैष्णव आणि इतर धर्मपंथ' या इंग्रजी ग्रंथात डॉ. भांडारकरांनी लिहिले आहे :

> आभीर याचा मूळ लक्ष्यार्थ गोप असा नाही. ते एका वंशाचे नाव आहे. त्यांचा मूळ व्यवसाय गोवर्धन; आणि म्हणून नंतरच्या काळात ते नाव (आभीर) 'गोप'शी समार्थ झाले. या कारणामुळे, बालदेव कृष्ण ज्या गोपांमध्ये वाढला ते आभीर नावाच्या भटक्या टोळीचे होते... आभीरांच्या वंशजांना हल्ली आहीर म्हणतात... ते मराठी मुलखात सनाच्या पहिल्या शतकात आले असले पाहिजेत. बहुधा त्यांनी या बालदेवाची उपासना आपल्यासवे आणली.

या उताऱ्यात सूचित केलेला इतिहास बदलावा लागेल. आभीर या शब्दाचा वाच्यार्थ संस्कृतवरून लागत नाहीच. आभीर-आहीर-आयर् या 'संमत' व्युत्पत्तीवरून गोपाल हा त्याचा योग्य अर्थ मिळतो. तसेच मग आहीरांचे आगमन बाहेरून कुठून झाले असे मानण्याची गरज राहत नाही; हे गोपजन या भूमीतलेच होते हे उघड होते. आंध्र-कर्नाटकात सनपूर्व १८०० च्या सुमाराचे या गोपजन संस्कृतीचे अवशेष अलीकडे खणण्यात आले आहेत. म्हणजे आभीरांचे अस्तित्वही पुष्कळच जुने असणे शक्य आहे. भाषिक शोध याप्रमाणे संस्कृतिक इतिहासाला वेगळे परिमाण देऊ शकेल.

आ-आय् यामधून गाईगुरांना घरातीलच मानणारी पशुपाल संस्कृती दिसते ४ तीच हल्लर–अलरु किंवा हम्मा–अम्मा यांसारख्या शब्दजोड्यांमधून प्रतीत होते. जीवनाधार झालेल्या पाळीव प्राण्यांच्या आणि कुटुंबातल्या माणसांच्या विषयी असणाऱ्या अनेक दक्षिणी शब्दांतून ही प्रचीती येते. नादानुकारी शब्दांवरून भाषांची समानता ठरवू नये हे खरे. पण अनेक नादानुकारी किंवा नादप्रधान शब्द दोन 'भिन्न कुळांच्या' भाषांमध्ये तसेच्या तसेच सापडतात तेव्हा त्यांना डावलता येत नाही. मूलभूत समजल्या जाणाऱ्या शब्दांचे मूळ जर अशा नादानुकारी शब्दात असले तर त्यांचा अवश्य विचार केला पाहिजे, कारण त्यावरून भाषांची प्राचीनता व समानता मनावर ठसेल.

ही समानता पुष्कळदा उघड दिसली नाही तरी, भेदक समजल्या जाणाऱ्या ५

फरकांमध्ये सुद्धा आढळून येते. तमिळमध्ये महाप्राणाचा अभाव आहे आणि ऩ ऱ ऴ हे खास वर्ण आहेत या गोष्टी मराठीहून वेगळ्या समजल्या जातात. प्राचीनतेच्या बाजूने पाहिले तर कोरीव लेखांची लिपी समानता दाखवते. ही समानता क, च यांसारख्या दोन्ही भाषांना सामान्य असलेल्या वर्णांच्या लेखनात (कोरण्यात म्हणा) आहेच. पण ऩ ऱ ऴ यांची चिन्हे न र ल यांच्या चिन्हांवर थोडाच संस्कार करून बनवलेली आहेत. म्हणजे कदाचित न–ऩ र–ऱ ल–ऴ यांच्यातल्या सामान्य जवळिकेची जाणीव लिपीच्या चिन्हांमध्ये व्यक्त झाली आहे. तमिळ–मराठी यांच्या शब्दसंग्रहांच्या तुलाभ्यासातून ऩ ऱ ऴ यांमधला महाप्राण उघड होतो; म्हणजे सामान्य जवळीक ती हीच होय असे वाटते. ही सामान्य जवळीक या दोन भाषांतल्या महाप्राणालाही मग लागू पडते आणि या दोन भाषांतली ही लपून राहिलेली समानता स्पष्ट होते.

अशी साम्ये स्पष्ट झाल्यावर भेदांचा 'प्राचीन' म्हणून जोजार राहत नाही.
६ तसेच शब्दादिकांची मुळे योग्य प्रकारे शोधता येतात. पोवाडा शब्दाच्या विवेचनातून हे दिसते. 'मराठी छंदोरचना'मध्ये (पृ. २९४) म्हटले आहे :

> 'पोवाडे गाणे' हा शब्दप्रयोग जुन्या काळापासून रूढ आहे. 'पवाडा' हा शब्द याच अर्थाने जुन्या मराठीत रूढ होता, हिंदी–गुजराती भाषांतही तो शब्द एकेकाळी वापरात होता. जुन्या कानडीत 'पवाड' शब्द अद्भुत कृती, चमत्कार या अर्थी रूढ होता... शिवाय 'पवाडी' असा शब्द 'पवाडा' गाणारा या अर्थी रूढ होता. मात्र सध्याच्या 'गी गी' गीताचा प्रकार मराठीवरूनच तिकडे गेलेला आहे... 'पवाडा' शब्द संस्कृत 'प्रवृद्ध'वरून 'पवड्ढ' या प्राकृत रूपांतून देशी भाषांत आला असे जरी काही म्हणतात, तरी तो संस्कृत 'प्रवाद'वरून आला असावा असा बहुतेक तज्ज्ञांचा तर्क आहे.

या तर्काला निरखणाचे अधिष्ठान फारसे नाही हे उघडच आहे. प्रवाद आणि प्रवृद्ध हे निव्वळ उद्भ्रंश आहेत. प्रतिलोम व्युत्पत्तीला कानडी परंपरेचा आधार जास्त उपयोगी आहे. दक्षिणी कोशावरून 'बोल, बोलबाला' यांसारख्या अर्थांशी पवाड्याच्या अर्थाचे नाते जुळते. संस्कृत प्रवाद चा अर्थ कीर्तिवाचक नसून अपकीर्तिवाचक अधिक आहे. साहित्यात 'स्तुती किंवा प्रशस्ती' आहेत, 'प्रवाद' नाहीत. उलट तमिळच्या आद्य उपलब्ध ग्रंथात, तोल्काप्पियामध्ये, युद्धानंतर 'पाडान्' गाण्याचा कार्यक्रम वर्णिला आहे. त्याचे साम्य मराठी परंपरेशी थेटच जुळते. या युद्धांचा आरंभच गोग्रहणाने होत असे हेही तेथेच सांगितले आहे. म्हणजे या परंपरेचा मेळ एकीकडे पशुपालनाच्या लोकसंस्कृतीशी तर दुसरीकडे कौरव–पांडवांची म्हणून वर्णिलेल्या महाभारतीय संस्कृतीशी बसतो.

□ □ □

४. सरडाचा विष्णू झाला

भीमा नदीवर दौंडपासून दहाएक किलोमीटर अंतरावर पळसदेव नावाचे
लहानसे गाव आहे. एरवी तालुक्याच्या भुगोलातसुद्धा त्याचे नाव येईन न येईल,
मराठी भाषेच्या इतिहासात मात्र ते हटकून येते. कारण तिथल्या एका देवळाच्या
खांबावर शके १०७९ तला एक कोरीव लेख आहे. मराठी भाषेच्या 'आदिकालातील'
लेखांपैकी एक म्हणून या लेखाचे महत्त्व आहे. त्यात 'श्री चंगदेव दंडनाकें विष्णुगृह १
केलें' असे एक वाक्य आहे.

'महाराष्ट्र-सारस्वत' सांगते, 'हल्ली या देवळाला श्री सरडेश्वराचे देऊळ
म्हणतात. नहुष म्हणून राजा शापामुळे सरड झाला, तेव्हा या ठिकाणी तो पडला २
म्हणून या देवळाला सरडेश्वराचे देऊळ म्हणतात अशी एक कथा त्या प्रांतात
प्रचलित आहे.' सारस्वतातच आणखी माहिती आहे की, 'गावापासून सुमारे
पाऊण मैलावर थोडेसे जंगलात असे हे देऊळ आहे. शिलालेखातील वर दिलेल्या
मजकुरावरून हे देऊळ प्रथम 'विष्णुगृह' होते... यातील मूर्तीचा विध्वंस झाल्यावर
त्या ठिकाणी हल्लीच्या नवीन मूर्तीची स्थापना झाली.'

थोडक्यात, विद्वानांचे मत असे दिसते की, दंडनाकाने विष्णूचे देऊळ बांधले,
त्याला कालांतराने सरडेश्वर असे नाव मिळाले.

अलीकडे या विषयात वेगळा मतप्रवाह जोर धरून आहे तो असा: मूळच्या
शिकारी, गुराखी किंवा शेतकरी समाजांची दगडधोंड्यांची किंवा झाडाझुडपांची ३
दैवते होती त्यांना पुराणकारांनी इंद्र, विष्णू, शिव, स्कंद वगैरे देवतांचे रूप दिले
आणि एकश्रद्ध समाजात सगळ्यांना सामावून घेतले. असे करताना मूळचे आचार-
उपचार त्यांनी चालूच ठेवले. त्यांची मूळची नावे कधी बदलली, तर कधी तशीच
राहू दिली. वर्तमानकाळात भक्तप्रिय असलेल्या अनेक दैवतांचा नेमका इतिहास
त्यामुळे मोठा घोटाळ्याचा संशोधनविषय आहे. ४

या मतातून सरडेश्वराच्या दर्शनाला पळसदेवला गेले तर? पळसदेव सरळच
पळसाशी संबंधित वाटते. सरडेश्वराची पुराणकथा तितकीशी पटत नाही; पुराणान्तरी

नहुषाची कथा आहे तिच्यात नहुषाला सर्पाचे रूप मिळाले असे आहे, सरड्याचे
नव्हे. पुन्हा, विष्णूचे देऊळ जंगलात का असाही प्रश्न पडतो. सरडेश्वराला कौल
लावून उत्तरे मिळणे कठीण.

५ गोष्टी मराठीच्या नेणतेपणातल्या आहेत, तेव्हा तमिळेला पुसून पहावे. ती
ल-ळ शी संबंधित तीन उच्चार करते : ल ल ळ. ल साठी जीभ दाताला लागते, ल
साठी दाताच्या मुळाला, ळ साठी टाळूला. पळसाला पलाशम् म्हणतात त्यात तमिळपण
नाही. पळम् म्हणजे मात्र फळ. मग पळु म्हणजे जुने होणे हा धातू किंवा पळ–
म्हणजे जुने यात नवल वाटत नाही. पळसु म्हणजे जुनेपुराने. पळस–देव म्हणजे
प्राचीनदेव असा अर्थ सिद्ध होतो.

सरडम् याला दोन अर्थ आहेत. पहिला, मराठीतला सरड किंवा सरडा हा.
६ दुसरा, आपल्या दृष्टीने महत्त्वाचा, 'कुसुंबाचे झाड' हा. रंगबदल हे या दोघांतले
साम्यच कदाचित या समान नावांचे कारण असेल असे या झाडाच्या वर्णनावरून
वाटते : 'लालभडक कोवळ्या पानांमुळे कोणत्याही जंगलात हा वृक्ष उठून दिसतो.
पाने जून होऊ लागली म्हणजे प्रथम बैंगणी दिसू लागून मग सारखी हिरवी होतात.
नंतर पाने पिकून पिवळी पडतात आणि डिसेंबरमध्ये गळून जातात.' तमिळवरून
या झाडाचा देवाशी काही संबंध लागतो का?

निसर्गातल्या डोंगरदऱ्या, नद्या, राया यांमध्ये देवदेवता व भूतपिशाच्चांचा
७ निवास असतो अशा समजुतींचे अनेक उल्लेख तमिळ संघवाङ्मयात आहेत. ते वाङ्मय
इसवी सनाच्या पाचव्या शतकापूर्वीचे नक्कीच आहे असे मानतात. या उल्लेखांवरून
पाहता त्या काळात ताड, माड, निंब, वड यांसारख्या झाडांमध्ये तर देवत्व मानले
जात असे. माल् च्या म्हणजे विष्णूच्या ध्वजावर ताडाचे प्रतीक असते. मुरुगन्
म्हणजे स्कंद फुललेल्या कदंबावर असतो. शिवाचा वास वडाखाली असतो आणि
तो रक्तवर्ण आहे. कोट्रवै किंवा दुर्गा ही त्रिशूळ धारण करून आहे.

या 'जुन्या' देवांपैकी एखाद्याचे अस्तित्व 'सरड' वृक्षावर असू शकते.
कुसुंबाच्या पर्णदलातला त्रिशूळाकार त्याला पोषकच आहे. तेव्हा वृक्षावरचा देव तो
सरडेश्वर झाला असावा. दंडनाकाने देवालय बांधले तेव्हा आपल्या इष्टदेवाचे नाव
त्याला दिले : विष्णू. सामान्य लोक त्याला जुन्याच सरडेश्वरसारख्या नावाने ओळखत
राहिले असा प्रकार दिसतो.

पुराणान्तरी साप असलेल्या नहुषाचा लोकोक्तीने सरडा का केला? हे
८ ध्वनिसाम्याने झाले असावे. सर्प आणि सरडा यांच्यात सरसरत जाण्याचे साम्यही
आहेच. पुन्हा नहुष या नावाशी नहु या तमिळ धातूचे साम्य आहे. नहु म्हणजे
फुलून येणे. सरडाच्या झाडाशी नहु ची ही सांगड फारशी चुकीची ठरू नये. नहु

म्हणजे हसणे ही. नहुष राजा ऋषींना भार होऊन खदखदा हसला म्हणतात.

सबंध आख्यायिकेचा काही सुसंगत अर्थ अशा रीतीने, तमिळच्या मदतीने ९
आपल्याला लावता येतो.

हे विष्णुगृह कुणीही बांधले असते तरी वरील विवेचनात काही फरक पडला नसता. तरी ते निर्मिणाराचे नाव दंडनाक होते याचाही विचार करण्यासारखा आहे. सत्यनाग नावाच्या सेनापतीने सन ३६५ मध्ये एरण येथे एक स्तंभलेख कोरविला होता. मराठेशाहीतल्या शिदनाक महाराचे नाव आपल्याला ऐकून ठाऊक असते. यासारखी व्यक्तिनामे किंवा नागोठणे, नागाव, नागपाडा यांसारखी ग्रामनामे यावरून व इतर काही प्रमाणांवरून प्राचीन महाराष्ट्रात नागांची वस्ती असावी असे
एक मत प्रचलित आहे. प्रा. तुळपुळे म्हणतात, 'हा नागवंश आर्य नसून द्रविडांचाच १०
एक दूरतः संबद्ध असा वंश असावा असे वाटते. कारण नागांची संस्कृती द्रविडांहून थोडी निराळी असली तरी त्यांची भाषा द्राविडी वंशातीलच असणार. एरव्ही नागांची सांस्कृतिक छाया जशी दक्षिणापथावर पडली तशी त्यांच्या भाषेचीही छाया आर्येतर भाषांवर पडून त्या भाषिक देवघेवीतून एखादी नवभाषा निर्माण होण्यास प्रत्यवाय नव्हता.' हे सारे खरे असले तर, महाराष्ट्रातल्या त्या नागांची भाषा बहुधा तमिळ असावी.

□

महाराष्ट्र-सारस्वत ग्रंथाच्या पुरवणीत मराठीच्या पूर्वभाषेचे जे ओझरते सूचन १०
आले आहे ते तमिळचा निर्देश करीत असले तरी त्याचा पाया मिथ्य, तथ्य आणि सत्य यांच्या मिश्रणावर उभा आहे. वंश आणि संस्कृती यांची एकरूपता नसते हेही अर्धेमुर्धे मान्य केले आहे. शिवाय या सगळ्यांच्या मागे 'मराठी ही आर्यभाषा आहे' हे ठाम गृहीत आहे. मुख्य म्हणजे नागवंश असा तिसरा वंश कल्पिणारे मानीव मिथ्यावर आधारलेले आहे. वास्तविक नाग किंवा साप हे सर्वच मानवी संस्कृतींमध्ये एक पूजास्थान किंवा देव-प्रतीक म्हणून आदिम काळी प्रचलित होते. द्रविडांचे किंवा आर्यांचे खास वेगळेपण त्याच्या असण्यावरून ठरत नाही. महाभारतात नागांचा आणि पांडवांचा झगडा दाखवला आहे. त्यात नागांची नावे वगैरेही दिली आहेत. पण म्हणून काही तो सत्य इतिहास होत नाही; ती मिथ्यकथाच आहे. नग म्हणजे पर्वत, नग–निवासी ते नाग अशी स्पष्टीकरणाची व्युत्पत्तीही या संदर्भात मांडली जाते. पण तीही उत्तरकालीन कवींनी मिथ्यकाव्य रचताना काढलेली दिसते. नाग हा शब्द दक्षिणी भाषांमध्ये प्राचीन आहे. 'ना'ने सुरू होणाऱ्या अनेकशा शब्दांचे अर्थ पाहता दीर्घता, लांबी यांचे सूचन त्यातून होताना दिसते. (तमिळ

न – मराठी ल यांची जुळणीही अनेक ठिकाणी प्रत्ययाला येते.) त्यामुळे नाग या नामाच्या मुळाशी सापाच्या लांबलचकपणाचा भाव असावा असे वाटते. दैवत किंवा 'विभूती' मानलेल्या या प्राण्याभोवती मिथ्यकथा तयार झाल्या यात नवल नाही. बायबलसारख्या ग्रंथाच्या आरंभालाच सापाची मिथ्यकथा आपल्याला भेटते. मिथ्यकथांवरच भावजीवन पुष्ट करणाऱ्या समाजात '–नाग' पद असलेली नावे आढळली तर नवल नाही. प्रागितिहास – समाजाचा किंवा भाषेचाही– निश्चित करताना या मिथ्यकथांचा आधार घ्यावा लागतो; पण मिथ्यकथेतली विधाने, वर्णने किंवा घटिते सत्य धरता येत नाहीत. त्यांचे योग्य अर्थन करून निघणाऱ्या तथ्यावरून सत्याची कल्पना करावी लागते. त्या विधान-वर्णन-घटितांवरून मिथ्यकथा रचणाऱ्याची वृत्ती, श्रद्धा, संस्कृती यांची कल्पना आपण करू शकतो; मिथ्यकथेतल्या पात्रांना सत्य मानून त्या पात्रांच्या वृत्ती-श्रद्धा-संस्कृतींची नव्हे. महाभारत रचणाराची संस्कृती नागकथेवरून समजू शकते; नागांची समजते असे मानता येत नाही.

१ मराठीचा आदिकाळ म्हटला तो खरोखरी लेखी किंवा कोरीव-लेखी उल्लेखांचा काळ होय. मराठी भाषा (किंवा जिच्या स्वरूपामुळे तिला आजच्या मराठी म्हटल्या जाणाऱ्या भाषेची आधीची अवस्था मानता येईल ती भाषा) या कोरीव लेखांच्या आधीच प्रचारात होती. तिचा एक पुरावा म्हणून मिथ्यकथा उपयोगी पडतात. शब्दाचे ध्वनी, अर्थ, ध्वन्यर्थ इत्यादिकांभोवती मिथ्यकथेची रचना ज्या प्रमाणात झाली असेल त्या प्रमाणात हा उपयोग होतो. अशी एक मिथ्यकथा येथे उलगडली आहे.

२ ती उलगडताना चालू भाषेतल्याही प्राचीन शब्दांचा कसा उपयोग होतो ते पाहण्यासारखे आहे. 'विष्णुगृह' असा नऊशे वर्षांपूर्वीचा लेखी उल्लेख असतानाही '*हल्ली* सरडेश्वराचे देऊळ' का म्हणतात? वर नहुष हा सरडा होऊन पडल्याची कथा देतात. नहुषाचा सरडा होऊ शकतो असे घटकाभर मान्य केले तरी ही घटना 'विष्णुगृह निर्मिले' त्यानंतरच्या काळात खात्रीने झाली नाही; कारण नहुषाचा सर्प झाला हे महाभारतात फार पूर्वी येऊन गेले आहे. बरे, विष्णू हे देवाचे नाव गेली नऊशे वर्षे वरच्या समाजाच्या चांगलेच परिचयाचे आहे. तरी ते मागे पडून सरडाचे क्षुद्र नाव देवाशी कसे जोडले गेले?

जुन्या नावांच्या चिवटपणामुळे. ज्या लोकसमाजाचा राबता देवळात होता त्यात बहुतकरून 'सरड' हे देवाचे नाव आधीपासूनच प्रचारात होते. कोरीव लेखावरून ते बदलावे इतकी साक्षरता किंवा 'विष्णू'सारखे नाव 'थोरल्या' परंपरेतून उचलावे असे वाटण्याइतका तिचा प्रभाव या लोकसमाजात नसेल. म्हणून 'धाकट्या' परंपरेतून चालत आलेले नाव टिकले. '*हल्ली*' फरक इतकाच पडला की सरड या

नावापुढे ईश्वर लागला. सरड या नावाची प्राचीनता आणि गोष्टीतली मिथ्यता अशी आकळल्यावरच आपण मिथ्याचा शोध घेऊ लागतो.

अरा शोध आदिसमाजाला संदर्भबिंदू धरून दामोदर धर्मानंद कोसंबी यांनी पुष्कळ केला. रामचंद्र ढेरे यांनीही केला आहे. गणेश हरी खरे यांच्या 'महाराष्ट्राची चार दैवते' या ग्रंथावरून, निव्वळ लेखी किंवा कोरीव पुराव्यांच्या आणि रूढ भाषिक व्युत्पत्ती आदिकांच्या आधारावर हा शोध कसा पुरा होऊ शकत नाही, हे ध्यानात येते. कोसंबी–ढेरे यांच्या संशोधनातही भाषिक उपपत्तींना केवळ संस्कृतकडचे आधार घेतल्यामुळे सुसंगत निष्कर्ष निघण्यात अडथळा येतो. लोकसाहित्य मंडळाच्या 'कुलदैवत' सारख्या ग्रंथामध्ये दैवतांविषयीच्या मिथ्यकथा मिळतात, पण त्या उलगडण्याचा प्रयत्न नाही. ३

मिथ्यकथांचे आद्य विचारक माक्सम्यूलर यांनी 'यच्चयावत मिथ्यकथा या शब्दांच्या चुकीच्या व्युत्पत्तीमधून जन्माला येतात' असा अतिरेकी पक्ष घेतला. आपण तसे न करता अलीकडच्या संशोधनपद्धतींचाही आधार घ्यावा. मात्र दोन भाषिक परंपरांमध्ये एकाच ध्वनीच्या शब्दाला असलेल्या वेगळाल्या अर्थांमुळे, मिथ्यकथा उपजायला मदत होते याचे भान सतत ठेवले पाहिजे. सरड सारख्या शब्दाला मराठीत एकच अर्थ आहे असे म्हटल्यावर त्याच्यावर श्लेष काय करणार आणि मिथ्यकथा काय रचणार? तेच तमिळ–मराठीच्या संक्रमणकाळात सरड या ध्वनीला दोन अर्थ, दोन वेगळ्या भाषांत का होईना, लाभले तर कथा रचणे सोपे झाले. त्यातला एक अर्थ पूज्य मानलेल्या झाडाशी संबंधित असला तर त्या कथेचा देवाशी संबंधही जोडता येतो. ४

या संक्रमण काळाला येथे नेणतेपणा म्हटले आहे. (नेणतेपणी मूल भोवताल्या समाजाकडून भाषा शिकत असते– म्हणजे त्याच्याकडे भाषेचे संक्रमण होत असते.) मराठीबाबत हा नेणतेपणाचा काळ नवव्या दहाव्या शतकाशी निगडित झालेला नाही. तो बराच जुना असला पाहिजे. ल, ळ हे ध्वनी त्या बऱ्याच जुन्या काळात प्रचलित होते हे वेदांमधल्या भाषेवरून कळतेच. तमिळमधला ळ तसाच जुना आहे. त्याचे विवेचन मागच्या निबंधात आलेच आहे. पळसु हा शब्द तमिळमध्ये पळचु या वर्णांनी लिहिला जातो. त्याला पलाश पेक्षा प्राधान्य देता येते कारण कथेत पळस वृक्षाचा (पलाश चा) उल्लेख कुठेच नाही आणि 'विष्णू' पेक्षा 'सरड' आधीचा तसाच 'पलाश' पेक्षा पळस आधीचा असावा. अर्थ सारखे नाहीतच. ५

सरड (तमिळ लेखनात चरट) याचे अर्थसंदर्भ असे : ६

द १९४३ (सी)	चरट्टु–एनल्	झटकन जाण्याबद्दलचा नादानुकारी शब्द

त १३१२	चरटम् ८ सरट	सरडा
	चरटम्	कुसुंबाचे झाड
द १९४७	चरटु	दोरी [मराठी : चऱ्हाट]

यातल्या कुसुंबाच्या झाडाचे वर्णन 'परिचित वृक्ष' (पृ. ११२) या श्री. बा. रानडे यांनी अनुवादिलेल्या ग्रंथात आले आहे. भाषेतल्या शब्दांचा अर्थविस्तार मुख्यतः काही ना काही साम्याच्या अनुरोधाने होत असतो या तत्त्वाला धरून सरडा–कुसुंब यांचे नाते दाखवले आहे. 'कुसुंबी' रंग प्रसिद्धच आहे. अशा उपयुक्त वृक्षातले देवत्व किंवा विभूतिमत्त्व सहज जाणवते.

७ झाडांवर अतिमानव योनींचा निवास असतो अशी समजूत तमिळाईत आहे तशी महाराष्ट्रातही आहे. 'झाड धरणे' सारखे वाक्प्रचारच मराठीत आहेत. गाथासत्तसई सारख्या प्राकृत काव्यातही असे उल्लेख आहेत. तमिळ संघवाङ्मयातल्या बऱ्याच परंपरा मात्र आजतागायत जतन झालेल्या आहेत. संस्कृती आणि भाषा यांची एकरूपता मानून, साहित्यातल्या भाषेवरून भाषाविकासाचे टप्पे ठामपणे ठरवता येणार नाहीत हेच यातून दिसते; कारण संस्कृत वाङ्मयात लोकसंस्कृतीचा मोठाच भाग व्यक्त झालेला नाही. त्यामुळे ती संस्कृती व्यक्त करणारी शब्दसंपत्तीही त्यात येणार नाही. मग ती ज्या लोकसाहित्यात आली त्याला संस्कृतची कसोटी कुठून लावणार? म्हणून लोकसंस्कृतीतल्या मिथ्यकथा उलगडताना नुसत्या संस्कृत भाषेचा आणि साहित्याचा आधार पुरत नाही. शब्दव्युत्पत्तींप्रमाणे मिथ्यांसाठीही प्रतिलोम पद्धतीने अनेक निरखणे करून निष्कर्ष काढावे लागतील.

८ मग शब्दांमध्ये जशी 'संमत' जुळणी सापडते तशी मिथ्यकथांमध्येही सापडू शकते. येथल्या नहुषकथेपुरता दक्षिणी संदर्भ द २९४४ नकु (नहु) या शब्दाच्या अर्थांचा आहे. याचप्रमाणे इतरही अनेक संस्कृत मिथ्यकथांचा उलगडा करता येतो. 'सागर' सारख्या संस्कृत शब्दांची व्युत्पत्ती 'सगरेण निर्वृत्तः = सगराने आणलेला' अशी मिथ्यकथेच्या आधाराने देतात! तेव्हा मिथ्यकथांची फोड त्या भाषेच्या खऱ्या आकलनासाठी किती जरूर आहे ते कळते. ती दक्षिणी भाषांच्या मदतीने होते तेव्हा या दोन 'भाषाकुळींचे' लोक समाईक संस्कृतीचे होते हेच पुन्हा सिद्ध होते. त्यातूनच आर्य–द्रविड भेदाला पहिला तडा जातो. भाषिक अभ्यासाचा हा मोठा फायदा.

९ संस्कृतऐवजी तमिळाईचा आधार घेतला तर मराठीतल्या अनेक मिथ्यकथांचा, उपासनांचा, दैवतांचा उलगडा होतो. तमिळाई आणि मराठमोळी यांच्या प्रागितिहास एकरूपतेची त्यातून खात्री पटते.

□ □ □

५. दगडावरच्या रेघा

महाराष्ट्राचे गीत गाताना कवीने नमनालाच 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' असे म्हणून त्याच्या रूपाचे नेमके वर्णन केले आहे. या राकट आणि कणखर अंगावरच या देशाच्या भूमीने वीस बावीसशे वर्षांपासून भव्य, सुंदर तशीच साधीसुधीही लेणी धारण केली आहेत. ती बहुतेक दानरूपाने कोरविलेली धर्मकीर्तने आहेत. त्यांचे दाते रंकापासून रावापर्यंत साऱ्या थरांतले आहेत. अनुत्तर (सर्वश्रेष्ठ) ज्ञानाच्या शोधात असलेल्या साधक संघाच्या सोयीसाठी, निकट आप्तांच्या स्मरणासाठी, राजविजयाच्या आनंदासाठी अशा अनेक निमित्तांनी ही दाने घडली.

खेळातल्या देवळात एकुलती एक फरशी बसवणारासुद्धा आधी आपले नाव फरशीभर कोरून घेतो. जुन्या काळात तेच होत होते. बहुतेक दात्यांनी आपल्या दानाविषयीचे त्रोटक तरी लेख लेण्यांमध्ये कोरवून घेतले आहेत. ते दाते गेले, त्यांचे लेख मात्र इतिहासकारांना मार्गदर्शन करण्यासाठी मागे राहिले. काही तुटले, फुटले किंवा पुसून गेले. जे आहेत त्यांचे सूक्ष्म वाचन भांडारकर, भाऊ दाजी,
भगवानलाल इंद्रजी, बर्जेस यांच्यासारख्या पंडितांनी शंभर वर्षांपूर्वीच केले आहे. १
बर्जेस यांनी त्यांचा संग्रह केला. त्याच्या पुनर्वाचनात चारदोन नव्या गोष्टी हाताशी येतात. शोध चालूच रहावा लागतो.

भाजे येथील विहारातला सर्वांत जुना लेख 'नादसव नाय' याच्या दानाचा २
आहे. तमिळ नायन् म्हणजे धनी. नायर, नायक, नायडू इत्यादी नावांमध्ये तो येतो. साम्य लक्षणीय खासच आहे.

पितळखोऱ्याच्या एका लेखात 'मगिलस दानं'– मगिलाचे दान– असा उल्लेख ३
आहे. हा मगिल पतिठाणाचा म्हणजे पैठणचा राजवैद्य होता. लेखसंग्राहक बर्जेस यांनी मगिल याचे संस्कृत रुप मृगिल असे दिले आहे. मगिल हा मृगिल चा 'अपभ्रंश' अशी यामागची कल्पना असावी. अन्य भारतीय भाषेतल्या शब्दाचे संस्कृत मूळ म्हणून कल्पिलेल्या शब्दाला आपण उलट 'उद्भ्रंश' म्हणू शकतो. मृगिल हा मगिल चा उद्भ्रंश असावा कारण मृगिलला नेमका असा अर्थ काही दिसत नाही. तमिळ

'मकिळ्' म्हणजे आनंद. व्यक्तिनामाला हा अर्थ शोभूनच दिसतो. बुद्धाचा प्रसिद्ध शिष्य आनंद याचीही आठवण त्याने येते.

४ जुन्नर येथे 'कलिअकस कुळिरपुतस' म्हणजे 'कल्याणच्या कुळिर (नावाच्या सोनाराच्या) पुत्राचे' एक टाके दान गेल्याचा उल्लेख आहे. या कुळिराच्या नावापुढे कंसात त्याचा उद्भ्रंश कुलीर असा दिला आहे. कुलीर म्हणजे संस्कृतात खेकडा. कुलीराच्या आई-वडिलांनी त्याला असले चमत्कारिक नाव कसे ठेवले? की आपल्या चिमट्याशी खेकड्याचे साम्य त्यांना दिसले? हे काही पटत नाही. वाटते की ते बहुधा तमिळभाषी असावेत आणि त्यांनी आपल्या मुलाला 'कुलिर्' म्हणजे शीतल या अर्थाचे हे नाव ठेवले असावे.

५ इतर दात्यांची नावे आहेत त्यांत 'नाग' हे नाव आहे. तशीच नाग किंवा नाक या प्रत्ययांची आठवण करून देणारी कपणणक, विरसेणक, पुसणक अशी नावे आहेत. वसुलणक नावाच्या एका सेठीचेही नाव आहे. आज कदाचित त्याच्या 'वसुली'चीच आपल्याला भीती वाटेल. स्त्रियांच्या नावात पुसा, सपा, लोटा अशी नावे आहेत. एकीने वादसिरी किंवा 'वादश्री' हे आपले नाव दिले आहे. वाद नसलेली गोष्ट अशी की 'श्री'ची 'सिरी' यासारखी जोडाक्षरांची फारकत तमिळमध्येही फार मोठ्या प्रमाणावर चालते.

६ माणसांच्या नावांची जी गोष्ट तीच स्थळांच्या नावांची. कार्ल्याच्या गुंफांमध्ये लेख आहे त्यात त्यांचे स्थळनाम वळूरक असे दिले आहे. आजही या टेकडीच्या टोकाशी वळक या नावाचे गाव आहे. तमिळ वल् ऊर् म्हणजे दणकट गाव. याच
७ लेखात उत्तरेकडचे करजिका गाव मठाला लावून दिल्याचा उल्लेख आहे. वळक च्या उत्तरेला करंजगाव आहेच. जुन्नरच्या लेण्यांमध्ये वलाहक, करज, सेउरक अशी गावांची नावे आली आहेत. त्यांच्याशी जुळणारी वलखळे, करंजाळे, शेवली अशी गावे जुन्नरच्या परिसरात आहेत. सेऊर म्हणजे लाल गाव. वल [पक्के] आणि कल [खळे] असे दोन्ही शब्द तमिळमध्ये आहेत. लकारामुळे क चा ख झाला.

ही नावे पाहता बर्जेस यांनी लेखसंग्रहात दिलेली टीप योग्यच वाटते. ते म्हणतात, 'दोन हजार वर्षे उलटली तरी त्याने पश्चिम भारताच्या आणि त्याच्या प्रादेशिक विभागांच्या भौगोलिक नावांमध्ये मोठासा बदल घडवलेला नाही.' आणि
८ याचा आधार म्हणून ते 'मावळ' हे नाव देतात. कार्ले येथे एका शिलालेखात 'मामाळे' 'मामालाहारे' असे उल्लेख आहेत. त्याबद्दल ते लिहितात, 'मामाल हे नाव उघडच आधुनिक 'मावळ'चे प्राचीन रूप आहे. शब्दांच्या मध्ये येणाऱ्या म चा व होणे मराठीत सर्रास आढळते.' हे स्पष्टीकरण अपुरे आहे कारण मावळ च्या अर्थावर त्याने काही प्रकाश पडत नाही.

तो तमिळच्या आधाराने पडू शकतो. म चा व होणे तमिळमध्येही चालते. सुप्रसिद्ध महाबलिपुरम्‌ची मामल्लपुरम्‌ व मावेल्लिपुरम्‌ अशी दोन जुनी नावे आहेत. मामाल आणि मावळ या दोघांशीही जुळणारा तमिळ शब्द 'मामळै' म्हणजे महामेघ, पावसाळी ढग. मावळ प्रांताला हे अभिधान किती सार्थ आहे हे सांगायला नकोच.

नाशिकजवळची पांडवलेणी ज्या डोंगरात आहेत त्याचे नाव शिलालेखात ९
'तिरण्हु' असे आले आहे. नंतरच्या काळातला एक शिलालेख संस्कृतमिश्र आहे त्यात याला 'त्रिरश्मि' म्हटले आहे. साहजिकच त्रिरश्मि वरून तिरण्हु आले असे अनुमान निघाले. तरी बर्जेस यांनी टीप मारलीच की, तिरण्हुतला उ नियमात बसत नाही. नियमाचा भाग सोडला तरी त्रिरश्मि = तीन किरण यावरून अर्थबोध काही होत नाही. साहजिकच असे वाटते की तिरण्हु किंवा त्याच्या जवळच्या ध्वनीचे नावच खरे मुळातले व अर्थपूर्ण असावे आणि त्रिरश्मि हे त्याचे उद्‌भ्रंश रूप उत्तरकाळातला लेख कोरताना वापरले असावे.

तमिळ भाषेतला निकटचा शब्द तिरण्डु आहे. तिरळ्‌ म्हणजे गोल्टे होणे, १०
फुगणे. या धातूचे भूतवाचक साधित रूप तिरण्ड असे होते. त्यावरून तिरण्ड म्हणजे दंडगोलाकार किंवा वरचंट्याच्या आकाराचा. यावरूनच तिरण्हु हे लेखातले रूप असावे. उत्तरकालीन लेखाच्या वेळी भाषा आणखी बदललेली असणार. त्यामुळे लेख कोरणाराला उमगले त्यावरून जुळले ते रूप त्याने वापरले असावे.

इतर अनेक विषयांप्रमाणे भाषांच्या संबंधाबद्दलही काही कल्पना दृढमूल ११
झालेल्या असतात आणि त्या दगडावरच्या रेघांसारख्या चिरंतन मानल्या जातात. तशा न मानता मोकळ्या मनाने आणि शास्त्रपूत रीतीने त्यांच्याकडे पाहिले तर 'दगडावरच्या रेघा' सुद्धा नवनवीन माहिती पुरवतील.

□

भाषेच्या आणि संस्कृतीच्या संदर्भात कोरीव लेखांना 'दगडावरच्या रेघा' ११
म्हणता येते, कारण त्यांचा पुरावा प्रत्यक्ष आणि स्थायी स्वरूपाचा असतो. इतिहासकाळातल्या भाषेचे ध्वनिरूप आपल्याला कधीच उपलब्ध होणे नाही. त्यामुळे या लेखी पुराव्याला भाषेच्या इतिहासाचे साधन म्हणून अनन्य महत्त्व असते. अंगाईगीते, छंदांची नावे, मिथ्यकथा इत्यादींना प्राचीन अशी परंपरा असली तरी त्यांच्यावरून सिद्धांत काढताना मुळापासूनच तर्काचा आधार घ्यावा लागतो. तितका प्रकार कोरीव लेखांसंबंधात नाही. संस्कृत भाषेतून अपभ्रंशादी प्रक्रियांनी भारतीय भाषांचा विकास झाला या मान्यतेच्या पुष्टीसाठी महाराष्ट्रात आणि इतरत्र उपलब्ध

असलेल्या कोरीव लेखांचा भाषिक विज्ञानिकांनी पुष्कळच आधार घेतलेला आहे.

१ महाराष्ट्रातील जुन्या लेण्यांमधल्या लेखांचा एक संग्रह पुरातत्त्व खात्याचे जॅस बर्जेस यांनी संपादित करून 'रिपोर्ट ऑन दि बुधिस्ट केव्ह टेम्पल्स अँड देअर इन्स्क्रिप्शन्स' या ग्रंथात १८८१ साली प्रसिद्ध केला. त्यात पृ. ८२ वर पूर्वसूरींच्या कार्याची माहिती दिली आहे. पुढे स्थळवार आणि क्रमवार लेखांच्या संहिता रोमन लिपीत, इंग्रजी अनुवाद आणि टीपा व शेवटी मूळ लेखांचे ठसे दिलेले आहेत. प्रस्तुत लेखात रोमन लिपीतल्या संहिताच आधाराला घेतल्या आहेत.

२ भाजे येथील सर्वात जुना लेख विहारात आहे. त्याची संहिता :

नादसवस नायस

भोगवतस गाभो दानम्

'भोगवती (?) च्या नायाचे नादसवाचे दान, लेणे.'

या लेखाची अक्षरे इतक्या आद्यकाळातल्या वळणाची आहेत की त्यांना ख्रिस्तशकाच्या खूपच पूर्वीच्या काळाची ठरवण्यात आपण काहीच चूक करीत नसू. (८२)

यातल्या नाय या कुलनामाविषयी काही उल्लेख किंवा टीप आलेली नाही. त्या शब्दाचे तमिळ अर्थ :

द ३०२२	नाय्, नाइ	कुत्रा
त २२२२	नायन्	देव. धनी
त २२२१	नायक्कन्	वन्नियर्, वेऽटर्, इरुलर् इत्यादी तमिळ जातींचे मानाचे नाव.
त २२२२	नायर्	मलबारमधील एक जात

कोशात जातिनामाचा 'कुत्रा' या अर्थाशी संबंध जोडलेला नाही त्यामागे संस्कृत नी > नायक ही उपपत्ती असावी. वेऽटर् म्हणजे शिकारी यासारखे अर्थ पाहता मात्र मानविकाच्या दृष्टीतून कुत्रा या अर्थाशीच त्या शब्दांचा जास्त संबंध जुळेल. कुत्रा हा अर्थ हीनतासूचकच मानण्याचे कारण नाही. सूर्य या अर्थी नायिरु असा शब्द आहेच. देव या अर्थाचे कोशातले उदाहरण 'दिव्य प्रबन्धम्' या काव्यावरील विवरणग्रंथातले आहे. तमिळ शैव भक्तांना नायन्मार् ही संज्ञा प्रसिद्धच आहे.

३ पितळखोऱ्याच्या लेण्यातील लेखांचा पाठ :

राजवेजस वच्छीपुतस (म)गिलस दहुतु दताय दानम्

'राजवैद्य वच्छीपुत्र मगिलाच्या मुलीचे, दताचे, दान'

राजवेजस वच्छीपुतस मगिलस दा(नम्)
'राजवैद्य मगिल (किंवा मृगिल) – वाच्छी (किंवा वत्स कुलाची आई)
हिचा पुत्र याचे दान.' (८४)

या लेखातल्या मगिल चे मृगिल करण्याला खास आधार नाही. तसेच वच्छी चे घाच्छी हे रूप करून वत्स कुलाशी संबंध जोडण्याचेही कारण दिसत नाही. दोन्ही नावांचे तमिळ अर्थ लागतात :

द ३७७०	मकिळ्	आनंद, धुंद
द ३७७१	मकिळ्	बकुळ. [संस्कृत बकुल – वकुल यांचाही व।म अशा बदलातून संबंध असू शकेल.]
त ३४५४	वच्चि	अंजन, लोखंडी यांच्या जातीचे झाड (मेमेसायलॉन मलबारिकम्)

वृक्षलतांच्या नावांशी संबंध मानला तर या दोन्ही नावांची संगतीही लागते. बकुळ आणि अंजन, लोखंडी यांचा हनुमान-मिथ्याशी निकट संबंध आहे. त्या झाडाच्या लोकप्रियतेचे ते गमकच आहे. वच्छी म्हणजे अंजनी. मुख्य गोष्ट ही की नुसती कल्पित ध्वनिसाम्ये धरून 'मूळची' शब्दरूपे न ठरवता अनेक अंगांनी विचार करून त्यांचे सार्थपण ठरविले पाहिजे.

कुळिर–उल्लेखाच्या जुन्नर–लेण्यातल्या लेखाचा पाठ : ४
कलीअजकस कुळिरपुतस सुवण–
कारस सघकस पोढि देयधम्मम्

'कल्याणच्या कुळिरपुत्र (सं. कुलीर) संघक सोनाराचे टाके धर्मादाय.' (९४) संग्रहातल्या अनुवादात 'टाके' (पोढि) शब्द सुटलेला दिसतो. 'जुन्नरचे पुष्कळ लेख खूप आधीच्या काळातले आहेत. आणि सगळेच बहुधा सनपूर्व १५० ते सन १५०–२०० या दरम्यानचे आहेत. पण नंतरच्या काळातले मुळीच नाहीत', (९२). या नोंदीवरून या नावांच्या प्राचीनतेचा अंदाज येतो. कुळिर ची तमिळवरून फोड :

द १५२३ कुलिर् शीतल वाटणे - असणे. थंडपणा, शितळाई, शीतलता.

यातल्या ल चा तमिळ उच्चार दंतमूल, काहीसा मृदु ळ सारखा होतो. प्रत्यक्ष बोलण्यात ल ळ यांचे पर्यायी बदलही होत असतात. 'मराठी भाषेचे मूळ' प्रकरण २ पहावे. तमिळ ल ची मराठीतल्या ल्ह शी संगती लागते या सामान्य नियमाला अशा उदाहरणांनी बाध येत नाही. मूळ लेखातही ळ च आहे हेही लक्षणीय आहे.

शिदनाकसारख्या नावातल्या 'नाक' प्रत्ययावरून महाराष्ट्रात प्रागितिहासकाली ५

नाग लोकांची वस्ती असावी अशी अनुमाने संशोधकांनी काढली आहेत. णक सारख्या प्रत्ययाचेही नाग शी साधर्म्य कल्पिण्यात आले आहे. हे प्रत्यय वास्तविक अमुक एका जातीतल्या किंवा गटातल्या व्यक्तींच्या नावातच आढळतात असेही नाही. एकाच कुटुंबातही नावांची सरमिसळ आढळते. उदा. कुडे लेण्यातल्या क्र. ११ च्या लेखात 'सोमदेव' या वैद्याच्या मुलांची नावे आहेत : नाग, इसिरखित (ऋषिरक्षित), शिवघोष; इसिपालिता, पुसा, धम्मा, आणि सपा. वसुलणक हे सेठीचे नाव कुड्याच्या (२५–२६) या लेखांमध्ये आले आहे. जुन्नरच्या (शिवनेरीच्या) चैत्यातील क्र. ४ च्या लेखात वीरसेणक हे सेठीचेच नाव आहे. वादसिरि हेही महाडच्या क्र. २ च्या लेखातले सेठीच्या पत्नीचे नाव आहे. जातीपातींना ओलांडून जाणारी नावांची सरमिसळ होत होती तशीच त्या नावांमध्ये भाषांचीही होत असावी असे अर्थावरून निघणारे अनुमान. ज्या काळातली ही नावे आहेत तो काळ, आधुनिक भाषाभेद उदित होण्याच्या (मानलेल्या) काळाच्या हजारपाचशे वर्षे आधीचा आहे हे या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे भाषांची सरमिसळ होत होती असे मानण्याचेही खरे कारण राहत नाही. तत्कालीन नावांची समकालीन भाषांच्या संदर्भात आपण फोड करीत आहोत इतकेच.

माणसांची नावे पिढीगणिक बदलत असतात, स्थळांची नावे मात्र पिढ्यानपिढ्या टिकून राहतात. त्या दृष्टीने स्थळनामांना अक्षरशः दगडावरच्या रेघा म्हणता येते. त्या नावांचे ध्वनिरूप बहुतांशी न बदलता किंवा थोड्याफार बदलानिशी तसेच राहते, अर्थ मात्र कालांतराने नेमके कळेनासे होतात. ते शोधण्याआधी स्थळनामांचे अबदल स्वरूप, कोरीव लेखांमधल्या उल्लेखांचा चालू नामांशी मेळ बसवून दाखवले आहे.

६ कार्ले लेख क्र. १९ मध्ये उषभदात याने मठाला गाव लावून दिल्याचा उल्लेख लेखाच्या चौथ्या व पाचव्या ओळीत केला आहे :

> ...वलूरकेसु लेणवासिन पवजितानं चातुदिसस सघस
> यपणथ गामो करजिको दतो सवान वसवसितान–
> 'वलूरकातील लेण्यात राहणाऱ्या परिव्राजकांच्या चारी दिशांतील संघाला
> जोपासण्यासाठी गाव करजिक दिला – (पावसाळ्यात तेथे)
> राहणाऱ्या सर्वांसाठी. (१०१)

७ जुन्नरचा लेख क्र. २८ असा आहे :

> गमे वलाहकेसु कर –
> जभति उदेसेण नियत –
> नानि बारस॥ गाम से –

उरकेसु निवतणानि

'वलाहक गावात करंज–गावाच्या दिशेला दोन निवतने

(जमीन दिली). सेऊरक गावात... निवतने...' (९७)

संग्रहात 'करंजराई' म्हणजे करंजवृक्षांची राई असा अनुवाद दिला आहे त्यापेक्षा 'करंज–गावा'च्या दिशेला असा अनुवाद अधिक बरोबर वाटतो. वर लेखात दिलेली आजची ग्रामनामे पुणे जिल्ह्याच्या मोठ्या नकाशात आढळून येतील. कोरीव लेखातील नावांची तुलना केल्यास, बोलभाषेचे लेखन करताना शिष्टभाषेला सुभग वाटतील असे बदल कसे केले जात असतात ते कळते.

मात्र या शिष्टभाषानुरूपी बदलांचा ग्रामनामाच्या अर्थाशी संबंध असतोच असे नाही. म्हणूनच त्यांच्या अर्थाचा शोध शिष्टभाषेत न करता बोलभाषेच्या मूळभाषेत करावा लागतो. येथे निर्देश केलेल्या ग्रामनामांच्या तमिळ अर्थांचे संदर्भ असे :

द ४३१७	वल्	दणकट, कठीण इ.
द ६४६	ऊर्	खेडे, गाव, शहर
द १६०७	चे–	लाल
द ११६०	कलम्	उघडी जागा, खळे

कार्ले लेख क्र. २१ गौतमीपुत्र शातकर्णी किंवा वसिष्ठीपुत्र पुळुमायि या ८
शातवाहन कुळातल्या कोणातरी राजाचा असावा. त्यातल्या पहिल्या दोन ओळी अशा :

...(आनापयति) मामा (ले) अमच प... ग... मसु एथ लेणस वलुरकस वाठवान पवजितान भिखुन निकायस महासधियान यपनय एथ मामालाहारे उतरमगे गामे करजकेसु

'...मामालच्या अमात्याला आज्ञापितो की... येथे वलूरकाच्या लेण्यात राहणाऱ्या 'महासंधिकांच्या निकायातील परिव्राजक भिक्षूंच्या जोपासनेसाठी येथे मामाल आहारातील उत्तरभागातल्या करजक गावात...' (११२)

याच लेखावर बर्जेस यांची टीप पुढीलप्रमाणे :

वलभीच्या दानपत्रावरून आपल्याला कळते की 'आहार' ही संज्ञा आधुनिक 'जिल्हा' किंवा 'कलेक्टरी'शी तंतोतंत जुळते. *मामाल* हे नाव उघडच आधुनिक *मावळ* (माउल) चे प्राचीन रूप आहे; शब्दामधल्या *म* चा *व* होणे मराठीत नित्याचे आहे. सह्याद्री पर्वताच्या किंवा घाटाच्या जवळच्या मुलखाचे नाव अजूनही मावळ असल्याने, मामाल च्या प्राचीन स्थानाशीही पूर्णपणे जुळते...(११३)

या टीपेत मामाल किंवा मावळ यांच्या अर्थाचा विचार झालेला नाही, ध्वनिसाम्याचाच फक्त झाला आहे. 'मिथ अँड रिॲलिटी' या ग्रंथात कोसंबींनी या नावाचा संबंध मातृदेवतांच्या उपासनेशी जोडला आहे :

> मातृदेवता अगणित आहेत; अनेकांना स्वतंत्र नावे नाहीत त्यांचे गटच आहेत. सर्वात प्रसिद्ध *मावलाया* होत; त्या जलदेवता आहेत, नित्य अनेकवचनी, मावळ आणि पौन मावळ या दोन तालुक्यात पसरलेल्या. या नावाचा अर्थ 'धाकट्या माता' असा आहे, मात्र *आया* हा प्रत्यय 'माता'ची द्विरुक्ती करतो. हे नाव या प्रदेशात दोन हजार वर्षांवर माहितीचे आहे, कारण *मामाल–हार* आणि *मामाले* हे शब्द कार्ले येथील चैत्यलेण्याच्या दर्शनी भागावर सातवाहनांच्या एका लेखात कोरलेले आहेत. म्हणजे मावळ हे देशनाम खरोखरी या उपासनेवरून आले आहे. (८६)

हा संबंध वास्तविक दूरान्वित आहे. *मामाल* आणि *मावळ* यांच्यातली पूर्वापरता ठरवून *मावळ* ला प्राचीनता दिल्याशिवाय आणि *माउली–मावलाई* हे शब्द दोन हजार वर्षांहूनही जुने मानल्याशिवाय उपासनेवरून देशनाम सिद्ध होऊ शकत नाही. मराठी भाषाच नव्हे तर महाराष्ट्रातली संस्कृतीही आर्यांकडून आली असे कोसंबींचे साधारण मत असल्याने या दोन्ही गोष्टी मानता येणार नाहीत.

'मावळतीकडचा देश म्हणून मावळ' हे स्पष्टीकरण व्युत्पत्ती होऊ शकत नाही कारण ते पूर्वेकडच्या आणि मावळाबाहेरच्या लोकांनी दिलेले नाव आहे असे मानावे लागेल. त्यातल्या त्यात सरळ अर्थाचे आणि काही प्राकृतिक विशेषाचे द्योतक असे नाव सामान्यतः प्राचीनतर स्थळनाम संभवते. त्याचा अर्थ आजच्या तमिळ शब्दात जतन झालेला दिसतो यावरून त्या मूळच्या शब्दाला तमिळ म्हणावयाचे.

द ३८९३	मळै	पाऊस, ढग, पाणी
द ३९१८	मा	काळा
द ३९२३	मा	महा, थोर, थोरवी
द ३९१८	माल्	काळेपणा, काळा, ढग, विष्णू

यांवरून मामळै –: मावळ आणि मामाल् –: मामाल अशी दोन्ही शब्दांची एकाच अर्थाची उपपत्ती लागते.

९ लोकभाषेतले आणि कोरीव लेखातले नाव अर्थध्वनींसहित एकच असावे असा योग बहुधा येत नाही. लोकभाषेतल्या नावावर थोडा किंवा फार संस्कार करूनच ते लेखात वापरले जाते. नासिक क्र. ७ च्या लेखात (१२२)

> कापुराहारे च गामे छिखलपद्रे दतानि नालिगेरान मूल सहस्रानि अठ
> 'कापुराहारातील चिखलपद्र गावात नारळीची आठ हजार झाडे दिली'

अशी ओळ आहे तिच्यात 'छिखलपद्र' हे *चिखलपाडा* या प्रचलित नामाचे संस्करण आहे हे उघड दिसून येते. ते निव्वळ ध्वनीचे संस्करण आहे. मूळ अर्थाला त्यात धक्का तरी पोचत नाही. पण ध्वनीवरसुद्धा मनमाना संस्कार करून वेगळ्या अर्थाचा संस्कृताभास शब्द निर्माण करण्याचा प्रघातही कोरीव लेखांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर दिसतो. महाराष्ट्रातली माणसांची, स्थळांची किंबहुना यच्चयावत वस्तुजालाची नावे संस्कृतमधून आली असे गृहीतच असल्यामुळे या संस्कृताभास किंवा 'उद्भ्रंश' नावांना प्रथमतेचा मान दिला जातो. तिरण्हु–त्रिरश्मी या नावाची ही गत झाली आहे. त्याचा पहिला उल्लेख नासिक क्र. ९–१० या आणि नहपान–आंध्रांच्या कालक्रमाने चौथ्या लेखात आला आहे :

...भडाकारिकयस भारियाय कपणणकमातुय चेतियघरम् पवते तिरण्हुमि निठपातित

'...भडाकारिकाची भार्या, कपणणकाची माता हिने चैत्यघर तिरण्हु पर्वतावर स्थापिले' (९९)

कालक्रमाने पाचवा असलेल्या संस्कृत लेखातला उल्लेख असा :

...गोवर्धने त्रिरश्मिषु पर्वतेषु धर्मात्मना इदं लेण कारितम्

'गोवर्धनातल्या त्रिरश्मि पर्वतात धर्मात्म्याने हे लेणे करविले' (९९)

कालक्रमाने तेरावा लेख गौतमीपुत्र सातकर्णीचा आहे त्यात 'इमेस पवजितान तेकिरसिना वितराम' असा वाक्यांश आहे (१०४). त्याचा अनुवाद संग्रहात आहे तो :

त्या तेकिरसि (तेरसिक? तिरस्सि किंवा त्रिरश्मि टेकावर राहणाऱ्या) परिव्राजकांना दान करीत आहोत. (१०५)

यातल्या तेकिरसि शब्दावर बर्जेस यांची टीप आहे तिच्यावरून कोरीव लेखांच्या अर्थनातल्या पद्धती, अडचणी या सर्वांची चांगली कल्पना येते म्हणून ती उद्धृत करतो :

> हा शब्द कदाचित *तेकारसिना* असेल. या किंवा इतर कोणत्याच ग्राह्य पाठभेदाचे मला काहीच स्पष्टीकरण सापडत नाही. पण जर का आपण *तेरसिकान* लिहिले आणि *का* आपाततः चुकीच्या जागी पडला असे मानले तर तो शब्द तंतोतंत महाराष्ट्रप्राकृत *तेरस्सिकाणम्* (संस्कृत त्रैरश्मिकानाम्) 'त्रिरश्मीवर राहतात त्यांच्या' या शब्दाशी जुळतो. क्र. ५, १२ या संस्कृत लेखांवरून दिसते की ज्या टेकात लेणी खोदली त्याला त्रिरश्मि म्हणत आणि प्रोफेसर भांडारकरांप्रमाणेच मला वाटते की पुळुमायीचे तिरण्हु आणि तेरण्हुक त्या संस्कृत शब्दावरूनच आले आहेत. मात्र उ अनियमित आहे. (१०४)

१० वास्तविक, या टीपेवरूनही 'तिरण्डु' किंवा त्याच्यासारखे नाव हे मूळचे असण्याचा संभवच जास्त आहे हे दिसून येते. म्हणून त्याच्या अर्थाचा तपास जरुरीचा ठरतो. तमिळवरून

द २६५५ तिरळ् गोल्टे होणे, फुगणे

द २६५३ तिरङ्कु सुरकुतणे

द २६५५ तिरि फिरणे, वळणे

या सर्व शब्दांमध्ये 'तिर–' या बीजशब्दाच्या वळणे, *तिरपे* होणे इत्यादी अर्थांचा बोध होतो. त्यातूनच 'तिरण्डु' सारख्या वर्णनवाचक नावाचा उदय झाला असावा.

मराठी आणि तमिळ यांचे नाते असावे असे म्हणताच 'पण त्यांचा संपर्क तरी कधी आणि कोठे आला?' असा शंकाप्रश्न उभा केला जातो. कोरीव लेखांमध्ये आलेल्या व्यक्तिनामांवरून आणि स्थळनामांवरून, त्यांचे अर्थ तमिळवरूनच समाधानकारक लागत असल्यामुळे, हा संपर्क वीसबावीस शतकांपूर्वीपासूनच महाराष्ट्राच्या भूमीवरच आला होता असे मानता येते.

□ □ □

६. मऱ्हाटेचि बोल

'माझा मऱ्हाटाचि बोल' म्हणून 'कौतुकें' गीतार्थ सांगणारे ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरीत
'भावार्थ' न सांगता 'मऱ्हाटा विवेक' म्हणजे सुस्पष्ट, गोंधळात न टाकणारा १
विवेक सांगतात. त्या ज्ञानेश्वरीची भाषा कशी आहे? महाराष्ट्र–शब्दकोशाच्या
प्रस्तावनेत म्हटले आहे, 'मराठी भाषेचें अस्सल व निष्कलंक असें स्वरूप आपणास
या कालांत पाहावयास मिळते.' पुढे शब्दसंपत्तीबद्दल म्हटले आहे, 'नाही म्हणावयास २
मराठी भाषेच्या जन्माच्या वेळी मराठीचा आणि कानडी, तेलगू या द्राविडी भाषांचा
अति निकट संबंध आल्यामुळे त्या भाषांच्या काही खुणा मराठी भाषेवर उमटल्या
आहेत. ज्ञानेश्वरीत काही तेलगू शब्द आढळतात, पण ते फारच थोडे (चार). त्या
मानाने कानडी शब्द बरेच, सुमारे ६० आढळतात.' अर्थात तमिळचा मराठी
शब्दसंपत्तीशी काही संबंध नाही हे ओघानेच आले.

पण ते खरे नसावे. अस्सल मराठी वाटणाऱ्या किंवा मुळात कानडी भासणाऱ्या
अनेक शब्दांची कुळी तमिळ असली पाहिजे हे थोड्या खोलात गेले की अनुभवाला ३
येते. सरकारी ज्ञानेश्वरीत शेवटी कठीण शब्दांचे अर्थ देणारा कोश आहे. त्यातले
अ या एकाच अक्षराने आरंभ होणारे शब्द पाहिले तर त्यांत उघड अनोळखी
अकरा तरी शब्द आहेत. त्यांचा भावार्थ तमिळ कोशावरून चांगला लागतो. कोठे
कठीण शब्दांच्या कोशात दिलेल्या अर्थाचे मूळ समजते, कोठे घनतर अर्थ लाभतो,
कोठे वेगळी छटा दिसते, कधी अर्थांची उलटापालट होते, तर कधी अगदीच
वेगळा अर्थ पदरात पडतो. मात्र, तमिळवरून घेतलेले अर्थ सर्वच जागी अधिकच
योग्य आहेत असे दिसते.

कठीण शब्दांच्या कोशातला पहिलाच शब्द 'अइल' म्हणजे अलीकडे हा
आहे. तमिळ अयल् म्हणजे शेजारची, अलीकडची किंवा लगतची जागा. पयल् ४
म्हणजे भाग, तुकडा, वाटा; लक्षणेने– पलीकडचा भाग. ऐलपैल शब्द असा
साधतो. कितीतरी शब्दांवरून असे दिसते की या विशाल शब्दप्रवाहाचे मराठी
आणि तमिळ हे अयल आणि पयल तीर आहेत आणि विचारांती, 'अनादि ऐक्य

जें आहे। तेंचि निवडे॥ '

५ असे कोणतेही ऐक्य पाहण्यात अभिमान आडवा येत असतो. अति अहंकारी
माणूस तर म्हणतो, 'माझिया कुळाचा उजाळू। कां ज्ञातिगोत्राचा मेळू॥ पाहाता
ब्रह्मा हिं अळू। उणा चि दीसे॥ – माझ्या कुळाचा उजेड फाकला की ब्रह्मदेवसुद्धा
दबून जाऊन उणाच दिसतो.' येथे ज्ञानेश्वरांनी अळू हा शब्द सार्थपणेच योजलेला
असणार. त्याचा अर्थ कोशात 'थोडासा' असा दिला आहे. जो ब्रह्मदेवाशी होड
लावतो तो त्याला थोडाच उणा म्हणून कां थांबेल? तमिळ अळु म्हणजे दबणे,
दाबणे. या अर्थांच्या धातूवरून अवतरणात दिलेला त्या ओवीचा आणि शब्दाचा
आशय चांगला व्यक्त होतो. अळू ची उपपत्ती मग 'अणू' वरून लावावी लागत
नाही.

अळु हा बीजशब्द विनाश, नुकसान, शोक, रडणे अशा अनेक अर्थांचा
आहे. त्यामुळे तो संबंधित अर्थांनीच विविध रूपांत वावरत असतो. दोन सारख्या
६ अर्थांचे शब्द, उदा. पांढरा शुभ्र, जोडण्याची मराठीची लकब या शब्दाच्या साधित
शब्दांनाही लागू पडते. म्हणून अळुमाळु असा शब्द येतो. माळ् माळुगु म्हणजे
खराब होणे, हरवणे. 'योगभ्रष्ट माणूस 'छिन्नाभ्रा' प्रमाणे नष्टतो काय?' या
अर्जुनाच्या प्रश्नाच्या ओवीत तो शब्द येतो. 'जैसें अवकाळीं आभाळ। अळुमाळु
सपतळ। विपायें आलें केवळ। वसे ना वरिषे॥ ': अळुमाळु चा कोशातला अर्थ
'थोडे लहान' असा आहे. तो लक्षणेने कदाचित ठीक असला तरी मोडतोड होण्याचा
छिन्न–अभ्र–भाव, तमिळ अर्थावरून चांगला व्यक्त होतो.

माणूस छिन्नाभ्रापेक्षा भरलेल्या मेघाच्या वर्षावाची वाट पाहत असतो. ज्ञानदेव
७ सुद्धा 'तुम्हां संतांचा प्रेमवर्षाव कसेही करून आम्हांवर होवो' असे मागून, पुढे
म्हणतात, 'इया बहुवा अळुकी जी आहों। सलगि करित॥ – अशा बहुत आर्ततेने
हो ही सलगी करीत आहोत.' अळुकि याचे तमिळ मूळ अळुकै. अळु म्हणजे
रडणे. अळुकै चा अर्थ आर्तता असा आहे. कोशातल्या 'आसक्ति, भूक' या
अर्थापेक्षा तो जास्त समर्पक आहे. कारण बाळकाच्या भूमिकेत आसक्तीला स्थान
नसते.

हे ज्ञानी बाळक गुरुदेवाची तुलना कधी सूर्याशी करते आणि 'ती सार्थ
कर' म्हणून आग्रह धरते. मूळ तमिळमधला ळ चा भेदही ध्यानात घेते आणि
म्हणते, 'तूकिलास ते अल्हें। पुरें करीं जी॥ – तुला सूर्याच्या मापाने तोलला ते
मोजमाप पुरे करीव.' यातला अल्हें हा शब्द अल = मोजणे अलवु = मोजमाप
८ यांच्यावरून धरला तर तो सार्थ होतो. कोशातला 'लवकर' हा त्याचा अर्थ 'अलघु'
या संस्कृत शब्दावरून दिला आहे तो कृत्रिम वाटतो.

असाच ल्ह असलेला एक शब्द अवल्हाओ; तमिळ ळ असलेला अवलम् म्हणजे दुःख, दोष, वाईटपणा. 'कर्म करणाराच्या आत्म्याला अवल्हाओ येतो' असे म्हटले आहे. त्यातल्या अवल्हाओचे अर्थ आळ, अपलाभ असे मराठी कोशात आहेत. त्यांची तुलना तमिळ अर्थांशी करावी म्हणजे योग्य कोणता ते सहज कळेल.

'मी वृष्णींमधला, गवळ्यांमधला वासुदेव आहे' हे सांगताना कृष्णाने म्हटले
आहे : 'प्रथम दशेचिये अटाटे। माझिं कंसा ऐसीं अचाटें। महाद्वेंडीं अवचटें। ९
लील्या नाशिलीं ॥ ' बालपणीची अटाटी म्हणजे काय? मराठी कोशानुसार धांदल, गडबड, श्रम. पण कृष्णाने तर कंसासारखी अचाट धेंडे लील्या नष्ट केली. त्यात धांदल किंवा श्रम कुठे? तमिळ अटावटि म्हणजे हिंसाचार हा अर्थ अटाटेचा घेतला तर ओवीचा अर्थ स्पष्ट होतो, आणि प्रत्येक चरणात आशयाचा चढता उत्कर्ष अनुभवता येतो.

१० अरुवार हे विशेषण ज्ञानेश्वरीत अन्न आणि गीतार्थाचा कळस अशा अगदी भिन्न वस्तूंना लावलेले आहे. मराठी कोशातले अर्थ 'सुंदर, चवदार, कोमल, नाजुक' हे कानडी 'अरळु = फूल' यावरून दिले आहेत. अरुवारचा संबंध तमिळ अरुवम् (म्हणजे अलभ्यता, निर्विशेषता, कष्टसाध्यता) यांच्याशी दिसतो.

११ अशाप्रकारे अनेक 'बांधलेले' अर्थ समूळ 'उत्पटून' निघतात. सतराव्या अध्यायात गणेशावर रूपक आहे. त्याच्या गंडस्थळावरून येणाऱ्या गंधानिलाने नीलकमळे फुलतात. प्रवृत्तिरूप सोंडेने त्या कमळांनी गणेश पूजिला जातो. 'पाठी निवृत्ती कर्णताळे। अहळि ते पूजा विधुळे ॥ – नंतर निवृत्तीरूप कानांच्या हलवण्याने ती अहळली म्हणजे फेकली जातात, तेव्हा पूजा विस्कटते.' येथे अहळ् या तमिळ धातूवरून अर्थ लागतो. मराठी कोशातला 'बांधलेली' हा अहळि चा अर्थ योग्य वाटत नाही.

चक्रवाकांची जोडी विरहवेडी होते, नदीच्या दोन्ही थडी आरटते तेव्हा शब्दाची 'अडचण' होते काय? मराठी कोशात 'अशंकडी' चा तसा अर्थ दिला आहे. तमिळ अचङ्कु म्हणजे हलवणे, क्षोभणे, हेलकावे किंवा झोके देणे. एकमेकांच्या आर्त शब्दांनी चक्रवाकांच्या जोडीची मने हेलावून जातात असा सरळ अर्थ तमिळवरून निष्पन्न होतो; उगाच हेलकावे खावे लागत नाहीत.

१२ ज्ञानेश्वरीत सारे 'म्हाटेचि बोल' असले तरी त्यांच्यातल्या अनेकांचे अर्थ तमिळवरूनच 'अढंच' (तमिळ अडंचु) म्हणजे सघन किंवा पक्के असे आपल्याला लाभू शकतात.

□

शब्द मराठी आणि अर्थ तमिळ हा विरोधाभास नीट समजून घेतला पाहिजे. ध्वनी किंवा ध्वनींचा समूह म्हणजे शब्द. त्याला 'निसर्गत:' काही अर्थ नसतो. ज्ञानेश्वरीतला मियां (मी) आणि उर्दूतला मियाँ यांच्या अर्थांमध्ये अजिबात सारखेपणा नाही. म्हणजे मराठी भाषेत विशिष्ट अर्थ असलेल्या ध्वनिसमूहाला आपण मराठी शब्द म्हणत असतो. त्या ध्वनिसमूहाला दुसऱ्या एखाद्या भाषेत तसाच किंवा जवळजवळ तसाच अर्थ असला तर तो शब्द दोन भाषांना समसामान्य म्हणता येतो. मराठीच्या आधी त्या दुसऱ्या भाषेत त्या शब्दाचा वापर झालेला असला तर तिच्यातून तो मराठीत आलेला असू शकतो. कालांतराने मराठीतच जर त्या शब्दाचा वापर कमी होत गेला तर त्याचा अर्थ आकलन होण्यात अडचणी येतात. ज्ञानेश्वरीतला शब्द दुसऱ्या मराठी ग्रंथात आला असला तर तुलनेने त्याची अर्थनिश्चिती होते. अशी मराठीतल्या मराठीत अर्थनिश्चिती न झालेले अनेक शब्द ज्ञानेश्वरीत आहेत. संस्कृत ही प्राचीन भाषा म्हणून तिच्यातल्या, किंवा कानडी ही शेजारच्या मुलखातली भाषा म्हणून तिच्यातल्या शब्दांवरून हे अर्थ लावण्याचे प्रयत्न झाले आहेत; तमिळवरून ते लावणे ही पुढची पायरी किंवा वेगळी वाट.

या शब्दांचा अर्थ दुसऱ्या कोणत्या भाषेवरून ठरला म्हणून ते शब्द 'अस्सल मराठी' नाहीत असे नव्हे. भाषा हे अभिधान शब्द, अर्थ, व्याकरण इत्यादी पाच अंगांच्या विशिष्ट संहतीला दिलेले असते. मराठीची ही संहती संस्कृत किंवा तमिळ यांच्या संहतींहून निराळी आहे म्हणून तर तिला मराठी हे वेगळे नाव मिळते. मराठीची ही संहती ज्या काळात भेदक स्वरूपात वेगळ्या आकाराला आली त्या काळात मराठीचा उदय झाला असे म्हणता येईल. या संहतीत किंवा कालवशाने बदलत आलेल्या त्या संहतीच्या रूपात, जे जे बसेल ते अस्सल मराठीच म्हटले पाहिजे. ज्ञानेश्वरीतले शब्द हे या अर्थाने अस्सल मराठी आहेत, मऱ्हाटे चि बोल आहेत.

१ पण मऱ्हाटा म्हणजे काय? मऱ्हाटा म्हणजे स्पष्ट, उघडा, सरळ, सोपा. याचा मूळ शब्द, म्हणजे ज्या शब्दातल्या अधिक प्राथमिक अर्थाचा आधार त्याला असावा तो शब्द, परिचित मराठी शब्दांमध्ये आपल्याला आढळत नाही. तमिळ र आणि मराठी ऱ्ह यांच्या साम्यावरून तमिळमध्ये शोध घेतला तर

द ३८९७ मर — विसरणे, नाहीसे करणे

मरै — लपवलेले असणे, आवरणात असणे, झाकणे, लपवणे

इतर दक्षिणी भाषांमध्ये मर या रूपाचेही अर्थ वरच्या मरै सारखे आहेत. मरै हा शब्द तमिळमध्येच मरय् असाही लिहिणे अप्रशस्त नाही. मर चे नकारार्थक मरा

असे तमिळमध्ये होईल. मरा – मऱ्हा म्हणजे न झाकलेले अर्थात उघड किंवा स्पष्ट. या शब्दाचे आणखी विवेचन 'द्रविड महाराष्ट्र' मध्ये आहे. त्या ग्रंथकात पुढे आणलेला स्थळनामांच्या तमिळत्वाचा पुरावा भाषेच्या प्रदेशिक इतिहासाला महत्त्वाचा आहे. मराठीला निकटच्या भाषा कोणत्या हे ठरवायलाही तो आधार म्हणून कामी येईल.

भाषिक विद्वारांची याविषयीची कल्पना विविध भाषांच्या वर्तमानकालीन प्रदेशिक सीमांवर आधारलेली आहे. याच सीमा 'मराठी भाषेच्या जन्माच्या' वेळीही अशाच होत्या असे समजणे योग्य होणार नाही. वास्तविक सगळ्या संबंधित भाषांचा प्रतिलोम तुलाभ्यास करूनच जुन्या काळच्या सीमा ठरवता येतील. प्रस्तुतच्या अभ्यासावरून असे दिसते की दक्षिणी भाषांच्या पूर्वबोली म्हणता येतील अशा बोली महाराष्ट्रातही मराठीच्या पूर्वकाली प्रचलित असाव्या. २

त्यांच्यातली शब्दसंपत्तीच 'अस्सल मराठी' म्हणून आपल्याला म्हणता येईल. आजवर असे मानण्यात आले की मराठीची पूर्वतम भाषा संस्कृत, म्हणून मराठीतले बहुसंख्य शब्द संस्कृत शब्दांमधूनच निघाले. ज्या मराठी शब्दाचे संस्कृत प्रतिरूप (कल्पशब्द किंवा कल्पितशब्द) प्रतिलोम किंवा अनुलोम पद्धतीने सिद्ध करता येत नसेल त्याचाच शोध तेवढा इतर भाषांमध्ये घेतला जातो. ज्ञानेश्वरीत तेलुगू शब्द चार आणि कानडी साठ या गणिताची रीत ही अशी आहे. म्हणजे भाषिकाच्या विज्ञानिक पद्धतीने मराठी शब्दभांडाराचा अभ्यास अजून झालेलाच नाही. तसा तो करताना प्रदेशिक दूरत्वाच्या नावाखाली तमिळचा विचार मराठीच्या संदर्भात टाळता येणार नाही, कारण कानडी–तेलुगू–तमिळ वगैरे भाषांचे इतिहासपूर्व मूळ एकच होते असे दृढमूल मानीव आहे.

म्हणूनच, मराठीतले जे शब्द आजवर तेलुगू किंवा कन्नडवरून आलेले मानले आहेत त्यांचा तुलाभ्यास समग्र दक्षिणी भाषांच्या संदर्भात व्हायला पाहिजे. त्यांच्यापैकी तमिळचे साहित्य आणि व्याकरण सर्वांहून जुने उपलब्ध आहे आणि तिचा भाषिक अभ्यासही बराच विस्तृत झाला आहे. म्हणून दक्षिणी भाषांत तिला प्रथमता आहे आणि म्हणून आपण तिचा मुख्यत्वाने निर्देश करीत आहोत. ३

तमिळ आणि मराठी यांचा नेमका संबंध काय, त्यांची पूर्वापरता कशी यांसारख्या बाबी अभ्यासांतीच नक्की होतील. प्रस्तुत अभ्यासात त्यांच्या शब्द-संपत्तीतली साम्येच साधार मांडावयाची आहेत. चालू मराठीत आपण 'ऐल'तीर म्हणतो आणि ज्ञानेश्वरीत तो शब्द अइल असा येतो यात आपल्याला काही अस्वाभाविक वाटत नाही. ही ऐ–अइ यांची एकरूपता आपण भाषेची एक ढब मानतो. तमिळच्या आद्य व्याकरणात (तोल्काप्पियम् मध्ये) याची सूत्रेच दिली आहेत की ४

अकार आणि इकार मिळून ऐकार होतो.
अकारोत्तर य् मिळून ऐ हा दीर्घवर्ण होतो.
इकार आणि यूकार शब्दांती विकल्पाने येतात.

म्हणजे अयल्–अइल्–ऐल हे मुक्त भेद ठरतात. कोशातला या शब्दाचा संदर्भ :

द १५९ अयल् शेजार, नजीकची जागा

हा शब्द तमिळ आणि मल्याळम् या दोनच भाषांत नोंदला आहे. कन्नड-तेलुगूत नाही. कन्नडमध्ये समान ध्वनीचा शब्द नोंदला आहे तो :

द ४१ अचिल् गांगरणे, वेडेपणा

अर्थात मराठी ऐल व कन्नड अयिल् चा काही संबंध सुचवणे हा वेडेपणा ठरेल. अशी उदाहरणे आपल्याला सारखी सापडतात. म्हणून सध्याच्या प्रदेशिक सीमांवरून जरी कन्नड आपल्याला ऐलीकडची वाटली तरी तमिळही काही पैलीकडची नव्हे.

५ या सर्व भाषांमधले ऐक्य पाहण्याच्या आड भाषाकुळांची मांडणी येत असते. किंबहुना, भारतार्य कुळातल्या मराठी शब्दांची उपपत्ती द्रविड कुळातल्या भाषांमध्ये पाहणे हे जुन्या काळातल्या वर्णसंकरासारखेच नियमबाह्य कृत्य समजले जाते. तसे खरोखर काही नाही. भाषाकुळे ही भाषांच्या तुलाभ्यासातून निघालेली ज्ञानव्यवस्था आहे. त्रिकोण चौकोन या कोनाकृती आहेत तर वर्तुळ, लंबवर्तुळ या वक्राकृती आहेत. ही दोन आकृतींची कुळे मानली तर भूमितीत जसा झगडा किंवा संबंधाचा अभाव उद्‌भवू नये तसाच प्रकार दोन भाषाकुळांमधल्या भाषांचा आहे. त्यामुळे भाषेच्या प्रत्येक अंगाबाबत भाषाकुळांना स्वयंभू गृहीताचे स्थान द्यावे व नंतर निगमनाने त्यावरून उपपत्ती बसवाव्या असे सरसहा करता येत नाही.

हा कुळव्यवस्थेचा आधार घेऊन, अळू हा मराठी शब्द संस्कृत अणू वरूनच आला आहे असे महाराष्ट्र शब्दकोशाप्रमाणे म्हणता येणार नाही. अर्थ आणि अनुलोम किंवा प्रतिलोम व्युत्पत्तीनुसार काढलेले मूळ यांची सांगड असावीच लागते. पण अनोळखी शब्दाचा संदर्भावरून मानलेला गोळाबेरीज अर्थ (उदा. अळू = थोडे) आणि त्या भाषाकुळातला म्हणून दूरान्वित ध्वनि–अर्थ–संबंध असलेला शब्द (उदा. अणू मधला णू = अळू मधला ळू, अणू = अति लहान कण) यांची सांगड घालून तीच व्युत्पत्ती बरोबर असे मानू नये. अळू शी संबंधित दक्षिणी अर्थ–ध्वनी :

द २४४ अळुत्तु दाबणे, दबवणे.

तमिळ शब्दघटनेनुसार – त्तु लावल्याने 'परिणाम करणे' असा अर्थ क्रियावाचक शब्दात येतो. म्हणून अळु चा अर्थ 'दबणे' यासारखा धरता येतो. त्याच्याशी संबंधित, कोशातल्या नोंदी :

द २४२ अळुङ्कु खराब केले जाणे, विरूप होणे

द २४१ अळुक्कु घाण, डाग

तमिळ शब्दांमधला ळ मराठी शब्दांमध्ये ळ म्हणूनच बहुधा येतो.

द २४० अळु रडणे, शोक करणे, मुळुमुळु रडणे ६

अळै बोलावणे, ओरडणे, फर्मावणे–पुकारणे (हळी)

अळुकै आर्तता

द २५२ अल मोजणे ७

अलवु माप

या शब्दांपैकी तमिळ ळ कार मराठीत तसेच राहतात तर ल कार ल्ह होतात. ल–ल्ह यांतला महाप्राण अंगभूत आहे. तर, अळै–हळी यातला ह हा मराठीच्या ल्कबीनुसार उच्चार ठसठशीत करणारा आहे. संस्कृत अलघु हे अल्हे चे मूळ बहुधा या महाप्राणामुळे सुचवले गेले असावे. आपटे कोशातला अलघु चा अर्थ मोठा, भारी, लांबका इत्यादी आहे. लवकरपणाचा भाव त्यात नाही. तो ओवीतल्या संदर्भानेच त्याच्यावर लादलेला दिसतो.

तेवि भेदबुद्धिचिये तुळें। घालूनि सूर्यश्लेषाचें कांटाळें।

तूकिलासि तें अल्हें। पुरें करीं जी॥ १६.२८

या ओवीत तुळें, कांटाळें, तूकिलासि हे मोजमापाशी संबंधित असेच शब्द आहेत. त्यांच्याशी अल्हें चा तमिळाधार अर्थ नेमका जुळतो.

पांढराशुभ्र यासारख्या शब्दातले द्वित्व एका प्रकारचे. मिणमिणणे, घमघमणे ८
यांतले द्वित्व दुसऱ्या प्रकारचे. हे मराठी शब्द असेच्या असेच तमिळमध्ये ही भेटतात:

द १०४५ कमकम अतिसुगंधी असणे

द ३९९४ मिनूमिनि काजवा

ल चा तमिळ उच्चार महाप्राणविरहित होतो तर 'अटावटि' सारख्या शब्दाचा ९
'अडावडि' असा होईल. मराठीची या बाबतीतली प्रवृत्ती मिश्र आहे. म्हणजे असे की या अशा, स्वरांच्या मध्ये येणाऱ्या लिखित ट चा उच्चार ट ठ ड ढ असा चारी प्रकारांनी होऊ शकतो. उदा.

द ६६ अटु–आटु उकळणे, शिजवणे : आटवणे

द १०६ (मलै.) अण्टि अठी, आंब्याची कोय : अठी

द ७३ अटै बंद करणे, अडथळा करणे : अडवणे

द ७४ अटै घट्ट होणे, साकळणे

अटचु गर्दी होणे : अढंच

ट ठ ड ढ हे उच्चार एकमेकांना अगदी जवळचे आहेत. त्याचमुळे ते तमिळ मध्ये

ट या एकाच लिखित अक्षराने दाखवता आले अशी कल्पना होते. या दृष्टीने मग तमिळ–मराठी उच्चारात फरक भासत नाही. भाषिकात ध्वनिबदलाचे नियम अबाधित मानतात. (तसे ते नाहीत हे बोलींच्या भुगोलावरून आता समजू लागले आहे.) त्यांना या उदाहरणांनी बाधा येते असे वाटेल. याचा परिहार माक्समूलर यांनी 'लेक्चर्स ऑन दि सायन्स ऑफ लँग्वेज' या ग्रंथात, भाषाकुळांच्या वर्गणाबाबत लिहिताना केला आहे. भाषेच्या अवस्थेचे दोन प्रकार त्यांनी कल्पिले आहेत : साहित्यिक आणि साहित्यपूर्व.

> बोली ह्या साहित्यिक भाषेच्या आधीपासूनच अस्तित्वात असतात, कारण प्रत्येक साहित्यिक भाषा ही अनेक बोलींपैकी एक असते. असेही नाही की, बोलींपैकी एक साहित्यिक भाषेच्या पदवीला पोचवली की बाकीच्या लगेच मूक होतात. उलट त्या पुरेपूर जोमाने जगत असतात; मात्र तुलनेने थोड्या अज्ञातवासात. (५६)
>
> भाषाकुळाची वर्गवारी नीटपणे फक्त धुपल्या भाषांना लागू पडते. धुपल्या भाषा म्हणजे, साहित्यिक मशागतीमुळे ज्यांची व्याकरण–वाढ रोधली आहे त्या... पण धुपणीआधी भाषा वाढीच्या वयातून गेलेल्या असतात. आणि एका गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्यासारखे दिसते की त्या आद्य काळात ज्या बोली सवत्या झाल्या त्या कुळवर्गवारीच्या प्रयत्नांना साहजिकच दाद देत नाहीत. (२००)

तमिळ, मराठी वगैरे बोली या अशा साहित्यपूर्व अवस्थेत सवत्या झाल्या असे मानले तर त्यांच्यातले साम्य आणि त्यांच्या संबंधात भासमान होणारा भाषिक नियमांचा विरोध, यांची संगती लागू शकते. म्हणजेच स्थळनामांवरून वगैरे जो प्रागितिहास संबंध त्यांचा कल्पिला तो मानीव म्हणून योग्य ठरतो.

१० मग बोलीभाषांमध्ये ध्वनिबदलाची किंवा शब्दघटनेची काटेकोर व्यवस्था नसते यावरून त्यांच्यातल्या शब्दांचे संबंध तपासता येतात. अरुवार चे उदाहरण :

द १८४	अरु	दुर्मिळ, कठीण, कष्टसाध्य
	अरुवम्	दुर्मिळता (अलभ्यता)
	अरुन्तल्	,,
त १३३	अरुन्तु	खाणे, पिणे
	अरुत्तु	भरविणे
द २०९	अलर्	फुलणे, बहरणे
(क.)	अरल्	फूल

पहिल्या दोन नोंदींवरून अरुवार हे विशेषण कळस आणि अन्न अशा अगदी भिन्न

वस्तूंना कसे लागले याचा बोध होतो. तिसरीवरून कानडी अरलु चे मूळ कळते व त्याचा संबंध अरुवार शी नाही हेही स्पष्ट होते.

याच अनियमाने तमिळ क चा ह हा उच्चार मराठी अहळि मध्ये कायम राहिलेला दिसतो. ११

द १२ अकळ् खोदणे, खणणे, उपटणे (मुळासकट)

याचा उच्चार अहळ् केला जातो. याचेच रूप आळ् असेही दिले आहे. खेड्यापाड्यात मोठ्या स्वैपाकासाठी चर खणतात त्याला हाळ म्हणतात. त्यात महाप्राण आढळतो.

अशा एकंदर ज्या संगती लागतात त्यांच्या आधारानेच 'अस्सल' तमिळ आणि 'अस्सल' मराठी शब्द एकाच भांडारातले मुक्त भेद आहेत हे समजून येते. आद्य लोकभाषांच्या अखंडित समुद्रातून आजच्या वेगवेगळ्या भाषांचा उदय झाला असावा हे त्याच्याच पुढचे मानीव.

□ □ □

७. छे छे! इश्श, तमिळ? अय्या!

त्याकाळी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत मुख्य वक्त्याचे भाषण झाले की
उपवक्ते बाजी मारीत असत. एका मुख्य वक्त्याने भाषणात सांगितले की इंग्रजीच्या
१ तुलनेने मराठी भाषेचे अभिव्यक्तीचे सामर्थ्य उणे आहे. मराठीचा अभिमान धरणाऱ्या
एका उपवक्त्याने प्रश्न केला, 'कोण म्हणतो मराठी भाषा उणी आहे? या भाषेतल्या
एका 'इश्श' या उद्‌गाराने जितक्या विविध भावभावना व्यक्त होतात तितक्या
जगातल्या कोणत्या तरी भाषेतल्या एका शब्दाने व्यक्त होतात का?' प्रश्न श्रोत्यांना
सुखावणारा होता त्यामुळे त्यांनी मोठ्या पसंतीची दाद दिली. श्रोत्यांमधल्या महिलांनी
बहुधा 'इश्श!' म्हणूनच आपले कौतुक व्यक्त केले.

दगडाला दगड म्हणणे जसे आपण शिकतो तसेच विशिष्ट भावना उत्कटतेने
दाखवण्यासाठी विशिष्ट उद्‌गारांचा उपयोग करावयास शिकतो. वेगवेगळ्या भाषिक
२ समाजात या उद्‌गारांचे शब्द वेगळ्या ध्वनीचे तसेच वेगळ्या अर्थाचेही असतात.
आपण दुःखाने 'अयाई' म्हणतो तर युरोपीय माणूस देवाला आठवतो. हे सारे
परंपरेतून येते. साधे शब्द जसे पिढ्यान पिढ्या प्रचारात राहतात तसेच हे उद्‌गार
उच्चारात राहतात. त्यांचे मूळ शोधणे मनोरंजक असतेच.

इश्श या बहुढंगी उद्‌गाराचे मूळ आद्य भाषाचार्यांनी इतर अनेक मराठी
शब्दांसारखेच संस्कृतात शोधण्याचा प्रयत्न केला. विस्रं = मांसाची घाण. त्यावरून
इश्शरं–इश्शरे अशी एक, तर स्त्रीच्छ्–ईच्छ्–इश्श–इशी अशी दुसरी उपपत्ती त्यांनी
लावली.

इश्शच्या जवळपास उच्चाराचा शब्द संस्कृतात नाही हे उघडच आहे. तमिळ
३ कोशात मात्र ईशि, शी हे शब्द धिकार, तिरस्कार, उबग या अर्थांचे उद्‌गार
म्हणून सापडतात. कानडीतही इस् इस्सि हे याच अर्थाचे आहेत. या दोन भाषांत
समान शब्द असले म्हणजे प्रथमपणाचा मान तमिळ शब्दाला असतो. तेव्हा मराठी
बोलण्यात हा इश्श शब्द तमिळमधूनच आला असे म्हणता येईल.

अशा बाबतीत सब घोडे बारा टक्के करता येत नाहीत. इश्श इतकाच

प्रचारातला शब्द 'हुश्श' हा आहे. तो तमिळमध्ये नाही पण कानडीमध्ये मात्र ४
आहे. कानडी ही पण द्रविड कुळातली भाषा आणि मराठीहून जुनी. तेव्हा तो मराठी भाषिकांच्या बोलण्यात पूर्वीच्या कन्नड भाषिकांकडून आला असावा. थोडक्यात, प्रत्येकच शब्दाचे मूळ तमिळ असे काही म्हणता येणार नाही.

पण चेऽ या तमिळ शब्दाचा अर्थ मराठी छे सारखाच असतो तेव्हा चेऽ मूळचा आहे असे म्हणता येते. चेऽणूचा एक अर्थ 'वरचा, उंच' असाही आहे.
मराठीने त्याचा उच्चार शे करून शेंडा यासारख्या शब्दात जतन करून ठेवला ५
आहे. चे उद्‌गार वाचक म्हणून वापरताना त्याच्या उच्चारात हकार घालून त्याचा छे करून टाकला.

शब्द-अर्थाच्या पाठी तर्काचा कुत्रा लावला तरच तो अर्थ गवसणार. त्या
कुत्र्याला छुः करताना आपण पुन्हा चू हे तमिळ उद्‌गारवाचकच वापरीत असू. ६
मुळात हा शब्द वैदूंसारख्या भटक्या जमातींच्या बोलण्यात असला पाहिजे. यावरून इथे वावरणाऱ्या समाजाची अवस्था सामान्यतः कशी असावी याचाही अंदाज बांधता येईल. अशा शिकारी समाजाच्या भाषेतूनच थूः हा उद्‌गारही आला काय? 'तू' या तमिळ शब्दाला थूः चा अर्थ आहेच, शिवाय मांस असाही अर्थ आहे.

स्त्रियांची शब्दशक्ती आणि शब्दभक्तीही पुरुषांहून अधिक असते. मराठी स्त्रियांना जर आपले ठेवणीतले शब्द तमिळ आहेत असे कळले तर आश्चर्य वाटेल. आणि त्यांच्या तोंडून सहजच 'अय्या!' असा आश्चर्योद्‌गार निघेल. पुन्हा 'अय्या' म्हणण्याची पाळी. कारण हा अय्या 'मद्रासी अय्या' पेक्षाही खास तमिळ आहे.
ऐ म्हणजे आश्चर्य किंवा नवल, तर ऐयम् म्हणजे संदेह. या दोन्हींच्या अर्थसंयोगातून ७
अय्या हा नवलाचा उद्‌गार आला यात काय नवल! मद्रासी अय्या मात्र संस्कृत 'आर्य' वरून आला असावा असे अनेक तमिळ पंडित मानतात.

एवढी सगळी उद्‌गारवाचके तमिळाईतून आली असतील तर 'अरे' हे तरी
संस्कृत वरूनच का मानायचे? ते तसेच संस्कृतमध्ये आहे हे मान्यच. पण तमिळमध्येही ८
'अडे' आहेच की! आणि समान मराठी व तमिळ शब्दांमध्ये र आणि ड ची आलटापालट अनेक जागी दिसून येते.

'ए' हा उद्‌गारही या दोन्ही भाषांमध्ये सारखाच आहे. संस्कृतमध्ये 'हे' म्हणतात. ह हा उच्चार तमिळ शब्दांच्या आरंभी येत नसल्यामुळे 'ए' असा उच्चार होणे साहजिकच आहे.

केवळ ग्रामीण मराठी भाषेतच आढळणारे काही उद्‌गार असेच तमिळ आहेत. दोराची गाठ कशी मारावी किंवा गाडीचा बैल कसा वळवावा हे शेतकरी
आपल्या मुलाला सांगतो. मुलाने या गोष्टी व्यवस्थित केल्या म्हणजे शेतकरी समाधानाने ९

म्हणतो, 'आंगऽ अश्शी!' यातल्या आंगऽशी समान तमिळ शब्द आंगु. त्याचा अर्थ 'असे, अशा रितीने'. सारख्या अर्थाचे दोन शब्द एकत्र आणण्याची मराठीची प्रवृत्ती येथेही दिसते.

'मनऽ' हा एक उद्गार खेडवळ माणसाच्या तोंडी आपल्याला ऐकायला मिळेल. विशेष जोर देऊन काही विधान करायचे असेल तर तो म्हणेल, 'नाय मनऽ', 'केलं मनऽ'. हा शब्द मनू, मन असा तमिळ कोशात आढळतो. 'एक उद्गार, अतिशयित' असे त्याचे अर्थ आहेत.

हे सर्व उद्गार कोशात आहेत म्हणजे तमिळाईत केव्हा ना केव्हा नक्की वापरले गेले आहेत. आङ्गु सारखे शब्द तमिळ संघसाहित्यातही आले आहेत. ते सगळे आजच्या तमिळ बोलभाषेतही असले पाहिजेत अशी अपेक्षा करणे योग्य होणार नाही. इश्श आणि अय्या हे मराठी शब्दसुद्धा विशिष्ट वर्गातल्या स्त्रियांच्याच तोंडी ऐकू येतात. मंडईतली भाजीवाली 'इश्श, अय्या' म्हणाली तर तिची शेजारीण ताडकन म्हणेल, 'मुठी बामनीन लागली बोलायला!' उलट 'आंगऽ मनऽ' असे उद्गार शिक्षित माणसाच्या तोंडी 'शोभणार' नाहीत. त्यांचे मूळ शब्द तमिळ कोशात आहेत हेच विशेष आहे. ते एक वा अनेक, मराठी समाजाच्या सर्व
१० थरांच्या बोलण्यात आढळतात यालाही विशेष अर्थ आहे. या सर्वच वर्गांचा पूर्वज जो प्राचीन लोकसमाज या प्रदेशात वावरत होता त्याची भाषा आजच्या तमिळ बोलणारांच्या प्राचीन पूर्वजांच्या भाषेसारखीच असावी असा अर्थ त्यातून निदर्शित होतो.

□

१० प्राचीन किंवा आदिम समाजाची भाषा म्हटले की ती काहीशी अक्षम, आधुनिक किंवा 'सुधारलेल्या' भाषांइतकी भावभावनांची किंवा तर्कविचारांची धुमाळी व्यक्त करण्यास असमर्थ, अशी पुसटशी तरी विचारधारा आपल्या मनात धावत असते. ती भाषिक विज्ञानाला धरून नाही. 'मेन ट्रेंड्स इन मॉडर्न लिंग्विस्टिक्स' या ग्रंथातले पुढील विधान पहावे (पृ. ४५):

> वस्तुतः ज्याच्यापाशी सांगण्याचे काही आहे अशा कोणाही माणसाला, कोणत्याही भाषेत, ते सांगण्यासाठी पुरेशी साधनसामुग्री गवसू शकते. देकार्तला हे कळत होते. तेव्हाच त्याने लिहिले, 'जे अगदी प्रभावी चिकित्सा करतात आणि आपले विचार स्पष्ट आणि आकलनीय होतील अशा रीतीने पचवून घेतात, ते फक्त ब्रेटन याच भाषेत बोलू शकत असले तरी, आपली बाजू मांडण्यास सर्वदा समर्थ असतात.'

भाषांची उतरंड हे सामाजिक वास्तव आहे, भाषिक–विज्ञानिक वास्तव नव्हे;
कारण भाषेला घडवणाऱ्या कारणांचा खुद्द भाषेशी संबंध असतोच असे नाही.
पहा ना, प्राथमिक आणि विश्वल महत्त्वाच्या भावनांना व्यक्त करणारे शब्द १
किंवा उद्‌गार 'विकसित' भाषांमध्ये आदिम भाषारूपांतून आलेले दिसून येतात.
त्यांचा उदय केव्हा आणि कसा झाला हे अज्ञात असण्याइतके ते जुने असतात.
भाषेतल्या इतर शब्दांचा अर्थबदल वगैरे जसा काळाच्या ओघात होत असतो तसाच
या उद्‌गारांचाही होतो. असे होत होतच इश्श सारख्या मराठी उद्‌गारात इतके
वेगवेगळे भाव व्यक्त करण्याचे सामर्थ्य आले. त्यात मराठीच्या श्रेष्ठपणाचा वगैरे
भाग काही नाही. सर्वच भाषांमध्ये त्यांचे असेच खास उद्‌गार असतील.
ते नुसत्या ध्वनिरूपात जुळते नसतील इतकेच नाही, तर मूलार्थाच्या बाबतही २
त्यांच्यात फरक असू शकेल. त्या त्या समाजाच्या विचारांचा, प्रवृत्तींचा, श्रद्धांचा
परिणाम भाषेतल्या शब्दांवर साहजिकच होत जातो. म्हणूनच, उद्‌गारांचा मूलार्थ
कळला तर त्यांच्याभोवती साकळलेल्या भावविशेषांवरून आपण त्या समाजाच्या
कालक्रमणेत घडत आलेल्या सामाजिक फेरफारांची कल्पना करू शकतो. धिक्कार,
तिरस्कार, उबग या अर्थांचा उद्‌गार स्त्रियांनी आपलासा केला यावरून त्यांना
समाजात खालचा दर्जाच मिळत आला आहे असे मानता येईल का? मानता येईल;
मात्र एवढ्या एकाच पुराव्यावरून ते सिद्ध होणार नाही. इतर पुरावे याच्याविरुद्ध
संकेत करीत असले तर ते कल्पिलेले मानीव बदलावे लागेल.
अनुलोम पद्धतीने नुसत्या ध्वनिबदलांचे नियम वापरून, अशा उद्‌गारांचे ३
मूळ काढता येणार नाही. इतिहासाचार्य राजवाडे यांनी सुचवलेली इश्श ची व्युत्पत्ती
या भाषाबाह्य पण भाषेवर प्रभाव पाडणाऱ्या गोष्टी विचारात घेत नाही. आजच्या
मराठीतले सारेच घटक संस्कृतमधून आले असे समजण्यात, 'मराठीची वाढ होत
गेली' हे सुद्धा आपण एकापरीने नाकारीतच असतो.
'अमुक शब्द तमिळमधून आला, तमुक कन्नडमधून आला' ही शब्दयोजना ४
चकवणारी आहे. टोकदार कोन आणि धारदार कंगोरे असलेल्या भूखंडांसारख्या
भाषा आणि त्यांच्या अलगविलग क्षेत्रांची कल्पना तिच्यामागे आहे. 'मऱ्हाटेचि
बोल' या निबंधात मांडल्याप्रमाणे, व्यामिश्र (बोलींची) संयुगे पाण्यात विखरून
असलेल्या (भाषिक) समुद्राची कल्पना करावी. त्यातून विविध (भाषांचे) स्फटिक
तयार होत गेले अशी कल्पना केली तर (शब्दांचे) व्यूहाणू वगैरे इकडेतिकडे मिसळून
गेले याचे नवल वाटत नाही. (भाषांचे) स्फटिक तयार होण्याची क्रिया कित्येक
शतके निरनिराळ्या कारकांच्या प्रभावाने होत आहे हे उघडच आहे.
उच्चार आणि श्रुती यांतला फरक हा असाच एक कारक प्रभाव आहे. च ५

या वर्णाचा उच्चार मराठीतही आपण दोन प्रकारांनी करीत असतो. तमिळमध्ये त्याचे च ज स श असे विविध उच्चार होतात, आपल्या श्रुतीत येतात. त्यामुळे चेऽ, चेऽण् या शब्दांचे ध्वनी उच्चारांत आणि श्रुतींत अनेक रूपे घेऊ शकतात. ती बहुतेक रूपे मराठीत वेगळाल्या वर्णचिन्हांनी आपण दाखवू-लिहू शकतो. म्हणून अर्थांवरूनच चेऽ-छे, चेऽण्-शेंडा अशा जुळणी होऊ शकतात.

त १६२६	चेऽ	'शीः!' या अर्थाचा उद्‌गार (वैतागाने वापरायचा.)
द २३०६	चेऽण्	अंतर, उंची, रुंदी, लांबी

६ पहिल्या चेऽ चा एक अर्थ 'जनावरे हाकण्यासाठी काढलेला उद्‌गार' असाही आहे. मराठी शेतकरी चक् चक् असा आवाज करून जनावरे हाकीत असतो, हैक किंवा थैक म्हणून गाईला हाकलतो. हे शब्द कुठल्या परिवरात सापडतात त्याची कल्पना यावरून येईल. 'थैक म्हणता ब्रह्महत्या' अशी एक म्हण आहे ती पूर्णपणे वेगळ्या परिवरातली आहे. पण तिचे मूळ मात्र गाय हाकलणाऱ्या समाजातले आहे. घरगुती लाडली म्हणून गोजिरवाणी कुत्री पाळणाऱ्या समाजात 'छूः' करून कुत्र्याला सशावर किंवा लांडग्यावर सोडण्याचा प्रसंगच कशाला येतो? पण कधीकाळी तसा प्रसंग आला तर उद्‌गार 'छूः' असाच येईल. इतक्या आतवर पोचलेला हा शब्द पुष्कळच जुना असला पाहिजे असे धरून, ज्या समाजात किंवा परिवरात त्याची अपरिहार्य गरज होती, त्या समाजाशी त्याची सांगड घालता येते.

७ अशी सांगड घालताना आरंभभूत मानीव महत्त्वाचे ठरते. अय्या या शब्दाकडे दोन मानीवांवरून पाहता येईल. तो तमिळ बोलणारांचाच मूळचा आहे हे पहिले, तो संस्कृतवरून आला आहे हे दुसरे.

द ७७८	ऐयम्	संशय, अनिश्चय
द ७७९	ऐयम्	भिक्षा, भिक्षापात्र
द ७८०	ऐय	आश्चर्यदर्शक उद्‌गार
द १६३	अय्यन् ऐयन् ऐयर्	ब्राह्मण, मुनी वगैरे (सं. आर्य?)
त ५८०	ऐयर् < पाली अय्य < आर्य	आदरणीय व्यक्ती, ब्राह्मण, मुनी.

द्रविड व्युत्पत्तिकोशात संस्कृत आर्य वरूनची व्युत्पत्ती प्रश्नांकित केली आहे पण तमिळ लेक्सिकनमध्ये तीच एक दिली आहे. प्रतिलोम पद्धतीने पाहता पाली संस्कृत धरून सर्व शब्द जुळतेच म्हणता येतील. असे म्हणण्याला ऐय चे अर्थ पोषकच आहेत. आर्य या शब्दाची उपपत्ती 'नांगरणे, कापणे' या अर्थांच्या धातूवरून

लावली जाते तिचा विचार 'संमत भाषिकाची चिकित्सा' या लेखात केला आहे.
तेथेही संस्कृत आणि तमिळ या दोन्ही धारांनी एका उगमापर्यंत पोचता येते.

ही 'संमत' एकरूपता भावत असल्यामुळेच अरे–अडे यांच्यातही भेद कल्पिला ८
नाही. तमिळ–मराठी र–ड च्या सारखेपणाची उदाहरणे :

द १०८७	करै	किनारा, तट, कापडाची कड	: कड
द १८२२	कोऽटि	नवे खरीदलेले कापड	: कोरे
द ३३११	पर	उडणे, पंख हलवणे	: फडफड
	परपर	घाई करणे	: (र = ऱ्ह) फरफर
द ३३१७	परि	कापले जाणे, कापणे	: फाडणे

तमिळ–मराठी जुळणीची ही सर्व उदाहरणे तशी सर्वंकष असली तरी मराठी
शब्द 'शिष्ट किंवा साहित्यिक' मराठी 'बोली'तले आहेत. खास ग्रामीण बोलीतली
उदाहरणेही येथे दिली आहेत त्यांवरून या दोन भाषिक समाजांच्या आद्य शेतकरी
अवस्थेतल्या जवळिकेची कल्पना येते. जोवर सामान्य समाज आणि साहित्यिक
यांची फार फारकत झालेली नसते तोवर शेतीसारख्या व्यापक व्यवहारातले शब्द
मुक्तपणे साहित्यात वावरत असतात. तुकारामाच्या अभंगात किंवा ज्ञानेशाच्या ९
ओवीत हे आपल्याला दिसते. आंग हा शब्द तोल्काप्पियम् या आद्य तमिळ
साहित्यग्रंथात आला आहे. 'आङ्गक् कुयिलुम् मयिलुङ् काट्टि – असे कोकिळ
आणि मोर यांना दाखवून' असे उदाहरण त्या शब्दाविषयीच्या सूत्रावर आहे.
तुलनेचा शब्द म्हणूनही त्याच ग्रंथात त्याचा उल्लेख आहे. तमिळाईच्या पेरणीच्या
हंगामातच हा शब्द भाषेत चांगला रुजला होता याची ही साक्ष आहे. म्हणूनच
तमिळ–मराठीच्या प्राचीन संबंधाचा तो पुरावाही आहे.

□ □ □

८. घरोघरी मुरुगन्

नवतरण्या शिवबांनी स्वराज्याचे तोरण बांधले. त्यांचे पराक्रम ऐकून
१ बंगळूरातल्या शहाजीराजांना कोणी द्रविड म्हणाला, 'महाराज, धाकटे राजे कोवळे
आहेत, देखणे आहेत, तरुण आहेत, पटाईत भालेकरी आहेत. तरुणींनाच काय,
महंतांनासुद्धा भुरळ घालणारे आहेत. दैवी गुणांनी युक्त आहेत. डोंगरदऱ्यांतल्या
भोळ्या मावळ्यांचे देव आहेत. खरोखर, मला वाटते ते जणू मुरुगन् आहेत!'
शहाजीराजे म्हणाले, 'मुलगा म्हणून मुरुगन् एवढे मानतो आम्ही, पण शेयोन्
म्हणजे लालमुखी म्हणून काही मानणार नाही. स्कंद किंवा कार्तिकेय म्हणून सत्पक्षाचे
सेनापती मात्र होवोत.'

इतिहासात हे संभाषण नमूद नाही. शिवाजी म्हणजे शिवाईचा प्रसाद ही
२ समजूत मात्र नमूद आहे. शिव म्हणजे शंकर आणि मुरुगन् म्हणजे कार्तिकेय यांना
शेयोन् हे नाव प्राचीन तमिळमध्ये आहे. त्याचा शिवाई–शिवनेरीशी संबंध नसेलच
३ असे म्हणता येत नाही. शिवनेरीजवळच मानमोडीच्या डोंगरात लेणी आहेत आणि
तेथेच मानमोडी देवीच्या मूर्तीही आहेत. या डोंगराचे नावही दोन हजार वर्षांपूर्वीच्या
तेथल्या शिलालेखात 'मानमुकड' असे कोरलेले आहे. त्याचा संस्कृत उद्‌भ्रंश
'मानमुकुट' असा दिला आहे त्याला खास अर्थ वाटत नाही आणि देवी मोडीत
असलेल्या 'माने'शी त्यातल्या 'मान'चा मेळ बसत नाही.

तमिळ मान् म्हणजे हरिण. त्यावरून सगळा मेळ बसतो. मान् मुडि = मान् मुगडु = हरिणाचा शीर्षभाग = मृगशीर्ष. दुसऱ्या शब्दांवरून मान् मरि = मान् मगडु = मृगकन्या. पुराणकथेनुसार मुरुगाची एक बायको वळ्ळि हिला हरिणांनी वाढवली. म्हणून मानमोडी ही मुरुगपत्नी असावी. त्या दोघांची देवळे वेगळी असू शकतात; मुरुगासारख्याच कोवळ्या ज्ञानियांच्या राजाच्या नेवासे गावात पहा, मोहिनीराज आणि महाल्या यांची वेगवेगळीच देवळे आहेत.

मुळात चिरतरुण मुरुगन् 'मोहिनीराज'च होता. भोळीभाळी बाळी (तमिळ
४ माळै) प्रेमार्त होऊन, सुकून 'नलगे औषध मजला' अशा अवस्थेला पोचली म्हणजे

मुरुगाचा पुजारी वेऽलन् [भालेकरी] झाड उतरवायला यायचा, अंगात आणून
नाचायचा आणि 'मुरुगाची बाधा आहे' म्हणून सांगायचा. म्हणूनच बहुधा मराठी
बायका अजून त्याचे तोंड पाहत नाहीत. पुढे या मुरुगाचा पसारा वाढला. तो
समृद्धीचा देव झाला. कुरिंचि म्हणजे पर्वत प्रदेश, त्यातल्या कुरव लोकांचा तो ५
कुळदेव झाला. शूर (= भयप्रद) या असुराचा संहारक, म्हणून देवसेनापती झाला. ६
'आर्य' संस्कृतीच्या संदर्भात तोच षडानन कार्तिकेय झाला.

अर्थात सहा कृत्तिकांची त्याच्या मातृपदी, शिवाची किंवा रुद्राची पितृपदी
आणि देवयानीची त्याच्या पत्नीपदी स्थापना झाली. त्याला अग्नीचे तेज प्राप्त
झाले. गंगेने त्याचे भ्रूणरूपाने धारण करण्याचा प्रयत्न केला. त्याने क्रौंच पर्वत ७
जिंकला — वगैरे वगैरे कथा वाढतच गेल्या. आकाशातल्या नक्षत्रतारकांविषयीच्या
मूळ समजुती, शतपथ ब्राह्मण, तैत्तिरीय संहिता यांसारखी वेदांची उपाख्याने,
महाभारत आणि पुराणे या सर्वांचे कलम द्रविड लोकाचारावर झाले आणि मुरुगन्
मागे पडून सुब्रह्मण्यम् पुढे आला. या सर्वांची संगती लागते.

इतर नक्षत्रांच्या तारा एक वा दोन, कृत्तिकांच्या सहा. म्हणून संतती व ८
समृद्धीसाठी त्यांची उपासना करावी हा दंडक. एके काळी त्या थेट पूर्वेला उगवत
तेव्हा, त्यांची देवता अग्नी हिचे त्यांचेवर आधान करावे लागे. या सहाजणी
(सटवाया) पहिले सहा दिवस तान्ह्या बाळाच्या अवतीभोवती असतात. साहजिकच
कुमारदेवाच्या माता व्हायला त्याच योग्य. त्यांच्या जवळपास मृगशीर्ष नक्षत्र आहे.
त्याची मुलगी या कुमाराला सुयोग्य वधू. म्हणून ती वल्ली किंवा मानमोडी होऊन
उभी राहते. रुद्र, अग्नी या नावांच्या तारा आहेतच. आकाशगंगा गंगा होते. ९
'कुमारसंभव' काव्यात हा कुमार 'तारकासुराचा' वध करतो, महाभारतात क्रौंच
पर्वताला जिंकतो आणि तमिळ संघवाङ्मयात 'कुरिंचि' प्रदेशाचा देव असतो.

नाव मुरुगन् असले तरी म्हणताना 'मुरुगा' म्हणतात. बोलभाषेत उच्चार
'मुरगा' असा होतो. र, ल यांचा अभेद सुविख्यात आहे. बालक, तरुण, पुत्र १०
या अर्थांच्या तमिळ मुरुगन् वरून मराठी मुलगा हा असा सिद्ध होतो. महाराष्ट्र
शब्दकोशात संस्कृत 'मूलक' हे त्याचे मूळ दिले आहे. ते शहाजीला पटले नसते; ११
शहाजहान बादशहाला पटले असते— कारण, जगन्नाथ पंडिताने त्याला 'मूलक
माने एक प्रकारका विष' हा अर्थ सांगितला असता.

आरुमुगन् षण्मुगन् वेलायुधन् सुब्रमणियम् यासारख्या अनेक नावांनी
तमिळनाडूच्या घरोघरी मुरुगन् जीवमान आहे. महाराष्ट्राच्या घरोघरी तो भाषेत
चिरंजीव आहे.

□

१ द्रविडदेशी किंवा द्रविडभाषी लोक आणि मुरुकन् हा देव यांचा अगदी अविभाज्य संबंध आहे असे मानतात. आर्य किंवा आर्यभाषी लोकांपासून त्यांचे संस्कृतिक वेगळेपण दाखवण्यासाठी मुरुकन् हा खुणेचा शब्द असल्यासारखा आहे. त्याच्या नावाचे अर्थ :

त ३२७९	मुरुकन् < मुरुकु	तरुण, स्कंद देव, स्कंदाने पछाडलेला, पालैचा म्हणजे उजाड प्रदेशाचा प्रमुख.
	मुरुकु	कोवळीक, कोवळे वय, यौवन. सौंदर्य. स्कंदाची बाधा झाली असताना नाचणे (वेरियाट्टु)
त ३८१५	वेरियाट्टु	वेऽलन् या स्कंदभगताचे अंगात येऊन नाचणे
त ३८३८	वेऽलन्	भालेकरी, स्कंद, स्कंदभगत

'देव देवळ परिवारू' कसे एकरूप होऊन जातात हे या शब्द-अर्थांवरून दिसेल शेयोन् किंवा शेय् ही या देवाची दुसरी आणि जुनीच नावे आहेत :

त १६३२	चेऽय्	लालपणा [चिवप्पु], स्कंद; मुलगा, मूल; बाल्य, तारुण्य
त १६३३	चेऽयोऽन्	स्कंद, शिव [चिवन्]

यातल्या चिवप्पु आणि चिवन् या शब्दांवरून लालपणा आणि शिव यांचे साहचर्य ध्यानात येते. देवतांची नावे अलंघनीयपणे वेगळी नसत हेही 'स्कंद, शिव' या अर्थांवरून दिसते.

२ मुरुगाचे गुणवर्णन जसे शिवाजीच्या गुणकलापाशी जुळते तसे त्याचे नावही चेऽयोऽन्–शिव–शिवाई या मार्गाने शिवाजीच्या नावाशी जुळण्याची शक्यता येथे दाखवली आहे. 'धाकटे राजे जणू मुरुगन् आहेत' या उत्प्रेक्षा अलंकाराचे 'धाकटे राजे मुरुगाचे अवतार आहेत' या विधानात रूपांतर केले की मिथ्याचा उदय होतो. त्याच प्रकारे मूळच्या सामान्यनामाचा वापर दैवताच्या विशेषनामासारखा झाला तर विशेषनामाच्या मिथ्य-अर्थामधे सामान्य नामाचा मूळ अर्थ लोपून जाऊ शकतो. 'मुलगा म्हणून मुरुगन्' हे म्हणताना हा परस्परसंबंध सूचित करावयाचा आहे. हा लेखच, मिथ्यांची उकल करीत, विशेषनामातून मूळ सामान्य नामाकडे जाण्याचा प्रयत्न आहे.

३ देवतांच्या विशेषनामांमधला मिथ्य–अंश ध्यानात घेतला नाही तर चुकीची इतिहासिक अनुमाने निघू शकतात. उदा. मानमोडीच्या संबंधात 'मिथ अँड रिॲलिटी' ग्रंथात कोसंबी म्हणतात :

> मानमोडी टेकडीवर, एका लेण्यामध्ये मानमोडी या विलक्षण आणि आदिम देवीची पूजा चालत असलेली दिसते, आणि हे नाव निदान लेण्याइतके जुने आहे हे आपल्याला ज्ञात आहे. एक कोरीव लेख *मानमुकुड* येथे वसती करणाऱ्या भिक्षुसंघाचा उल्लेख करतो. मानमकुड म्हणजे मानमोडी : प्राकृत उच्चारसरणीत क चा अ होतो हे ध्यानात घ्यावे. ही देवी तर कोठेही कोणत्याच संदर्भात सापडत नाही... या नावाचा अक्षरार्थ 'मान मोडणारी' असा आहे आणि तो शेजारच्याच आर खोऱ्यातल्या कवड दरा *(कवटी फोडणारी)* या देवीची आठवण करून देणारा आहे. (१८–१९)

ही उपपत्ती मानली तर 'मान–मोडी' यातले दोन्ही मराठी शब्द त्यांच्या आजच्या अर्थाने दोन हजार वर्षांपूर्वी लोकभाषेत प्रचलित होते, मानमकुड याचाही प्राकृतातला अर्थ तोच होता असे गृहीत धरावे लागते. मूळ कोरीव लेखात (जुन्नर क्र. २५) आलेला उल्लेख बर्जेस यांच्या संग्रहातून :

> सेलस मानमुकडस पुरतो तलकवादके निवतणानि तिणि
> 'शैल मानमुकडाच्या पुढे... तीन निवतणे'
> मानमुकड (संस्कृत मानमुकुट : 'मानाचा मुकुट') हे मानमोड या लेण्याच्या टेकडीचे जुने नाव आहे असे दिसते. (१७)

या अनुवादात 'तलकवादके' याचे रूपांतर आले नाही. हे बहुधा गावाचे नाव असावे. डोंगराचे नाव मात्र मानमुकुट > मानमोड असे व्युत्पादिले आहे. त्याऐवजी तमिळवरून सुचवलेल्या व्युत्पत्तीचे आधार :

द ३८१७	मान्	हरिण, वन्य प्राणी
द ४०२०	मुटि	शीर्ष, डोंगराचा माथा
द ४००२	मुकटु	शिखर, सर्वोच्च भाग
	मोऽटु	उंची, टेकडी, टेक
द ३९०१	मरि	हरिणशावक इ., हरिणी
द ३७६८	मकटु	स्त्री (मुलगी), बाई

ध्वनी आणि अर्थ या दोन्ही अंगांनी या शब्दांमधून आपल्याला योग्य अर्थ सापडतो. मानमोडी म्हणजे हरिणकन्या हा सुचवलेला अर्थ देवतास्वरूपाला धरून आहे. 'हरिणटेकडी' असाही अर्थ डोंगराच्या वर्णनाचा म्हणून निघू शकतो. पुन्हा, देव-देवळांचे कोरलेल्या डोंगरांशी सारूप्य दिसून येते. मात्र संस्कृत मुकुट किंवा मराठी मोडणे यांच्याशी या नावाचा संबंध नाही हे सहज दिसते. मग 'मान मोडणे' हा मराठी शब्दार्थ किंवा त्यावरून कल्पिलेले उग्र आदिदैवत यांची अनुमानेही तर्कसंगत वाटत नाहीत. मराठी लोकसमाजातली लोकव्युत्पत्ती कदाचित तशी असली आणि

आजच्या समाजाची उपासनापद्धती तशा स्वरूपाची असली तरीही मूळ दैवताबद्दल असा अंदाज ठामपणाने बांधता येणार नाही. कोसंबींनीच दुसरीकडे 'गोमाशी' नावाच्या गुंफेचे मूळ 'गौतम ऋषी' असल्याचे दिले आहे. त्यावरून लोकव्युत्पत्ती मूळ अर्थाचे कसे अनर्थ घडवून आणीत असते याची कल्पना येईल.

४ दैवतांच्या संबंधात श्रद्धा महत्त्वाच्या असतात. त्या एकेका समाजातसुद्धा काळाबरोबर बदलत जातात किंवा नव्यानव्या रूपात अवतरतात, त्या श्रद्धा दैवताच्या विविध नावांमध्ये व्यक्त होतात. भगवान विष्णूची सहस्र नामे ही हजार श्रद्धांची, त्या श्रद्धांमधून उदयाला आलेल्या मिथ्यकथांची व्यक्तरूपे असतात. त्या हजारांपैकी सगळ्यात पहिली कोणती याचा आपण अंदाजच बांधू शकतो. ज्या श्रद्धेची सामाजिक पार्श्वभूमी त्यातल्या त्यात आदिम समाजाशी संबंधित असेल ती आपण पहिली किंवा मूळची श्रद्धा म्हणू शकतो. अशी एक श्रद्धा मुरुगाच्या वेऽलन् या नामरूपात आढळते. तिचा विकास या शब्दाच्या अर्थांवरून दिसेल :

त ३८३८ वेऽल् बाभूळ

तोल्काप्पियातील (शब्दः ३७५) या सूत्रात 'पूल्, वेऽल्, आल्' म्हणजे शाल्मली (सावरी), बाभूळ आणि वड या तिघांचा एकत्र उल्लेख आला आहे. पूल् आणि आल् यांना मिथ्यघटनेत मोठे स्थान आहेच. वेऽल् चा उल्लेख नुसत्या व्याकरणीय समानधर्मामुळे आलेला नसावा; या तिन्ही झाडांना दैवतसंबंधात महत्त्व असल्यामुळेच त्यांची सांगड सहज बसली असावी. शेळ्यामेंढ्या पाळणाऱ्या समाजाला बाभळीचे महत्त्व फार, त्या झाडाच्या टणक लाकडाची काठी आणि जोडकाटे यांच्यावरून 'भाला' हा अर्थ वेऽल् ला चिकटला, त्याचा 'प्रीपल्लवन् तमिल इंडेक्स' (पृ. ९५) नुसार अर्थ :

> वेऽल् : भाला; मुरुगाला खास महत्त्वाचा; शूल; हे पराक्रमी वीराचे शस्त्र असे. त्याने हत्तीशी लढून त्याला ठार करीत, ढालीला जोडून तो 'वीरगळा' जवळ रोवीत; त्याच्या अणीदार टोकाला घंटिका लावीत; एका प्रकारच्या भाल्याची अणी पेचांनी बसवीत. 'मूवाय् वेऽल्' [तीन तोंडी भाला] म्हणजे त्रिशूल.

या अर्थाचे संघवाङ्मयातले संदर्भ या सूचीत पानभर दिले आहेत यावरून त्याच्या प्रसाराची कल्पना येईल.

या आयुधप्रतीकाचेच नाव देवाला आणि देवभक्तालाही मिळाले. उक्त ग्रंथातच पृ. ७९७ वरील उल्लेख :

वेऽलन् मुरुगन्

मुरुगाच्या पूजनातला अधिकृत भालाधारी पुजारी;

त्याच्या हातात दंडा असे.

वेऽल् कोऽट्टम् 'भाल्याचे' म्हणजे मुरुगाचे देऊळ.

हा वेलन अंगात आल्यावर नाचत असे. त्या वेळी आपल्या प्रश्नांची उत्तरे आणि दुःखांवरचे इलाज लोक त्याला विचारून घेत. त्याच्या नाचाचे नावही मिथ्ये आणि श्रद्धा यांच्या विकासाच्या संबंधात लक्षणीय आहे :

द ४५३६ वेरि पिऊन झिंगणे, उन्मत्त होते; ताडी
वेरियू–आटु स्कंद अंगात आल्यामुळे नाचणे

झिंग ताडीची, नाच मुरुगाचा. जी स्थिती देवाची तीच भक्तांची. म्हणून तरुणीची आर्तता मुग्ध प्रणयाची असली तरी ती बाधा मुरुगाची असे तिच्या शेजार-पाजारणी मानीत. आणि तिच्या आईला 'कौल लावायला' सांगत. तरुणीला हे नको असे. कधी कधी तिची सखी ही भाकणूक टाळण्यात यश मिळवी. पण बहुधा, धास्तावलेली आई मुरुगाची करुणा भाकीच. वेलनला पुसावे का नाही याचा निश्चय वडीलधाऱ्या शेजारणीला विचारून होई. एका सुपात साळीचे दाणे घ्यायचे आणि चार चार दाण्यांचे वाटे घालायचे. बाकी दाणे एक दोन किंवा तीन उरले तर मुरुगाचा कोप झाला असे समजायचे. मग वेलन ला बोलवावे, नेमल्या जागी जावे, मुरुगाची करुणा भाकावी, त्याला निवदबोने करावे, वाटल्यास बोकड–मेंढा कापावा, गाणी गावीत, वाद्ये वाजवावीत. मग वेलनच्या अंगात येई. मग त्याच्या तोंडून व्याधीचे कारण आणि उतारा दोन्ही कळत. मुरुगाची बाधा हेच कारण निघाले तर खास विधि–उपचार करावे लागत. (के. के. पिल्ले : ए सोशल हिस्टरी ऑफ द तमिल्स, पृ. ३५०–५२)

याच श्रद्धेची दुसरी बाजू म्हणून अशा झाड धरणाऱ्या दैवताची भीती आणि पुढे त्याला टाळण्याची प्रवृत्ती जन्माला येऊ शकते. मुरुगन् आणि कार्तिकेय यांची एकरूपता सर्वांना मान्य आहे. कार्तिकेयाला ब्रह्मचारी मानून स्त्रियांनी त्यांचे दर्शन टाळावे अशी प्रथा महाराष्ट्रात आहे. ती प्रथा या दुसऱ्या विरोधी श्रद्धेचा आविष्कार असावा.

मुळात एखाद्याच कुळाचे किंवा जातीचे असलेले दैवत, त्याचा पडताळा ५
येऊन किंवा आणखी काही कारणांनी अनेक जातींचे किंवा साऱ्या समाजाचे होऊन जाते. त्यातल्या त्यात प्राचीन पुराव्यांवरून ते मूळचे कोणाचे याचा अंदाज करावा लागतो. मुरुगन् हा मुळात डोंगरवासी लोकांचा देव होता असे तमिळ संघ वाङ्मयावरून कळते. तोल्काप्पियम् सांगते :

चेऽयोऽन् मेऽय मैवरै उलकमुम्
मुरुगाने राखलेले डोंगरी जगत अन्

त्याच्या मिथ्यकथा तयार झाल्या त्यांमध्ये त्याने चूर् (शूर) असुराला मारले असे कथानक आले :

> शूर् : लोकांना भीती घालून मारणारा देव. याने समुद्रात आश्रय घेतला तेव्हा मुरुगाने त्याला मारले. असे सांगतात की एका आंब्याच्या झाडाने या असुराला संरक्षण दिले. पण मुरुगाने आंब्याचाच नाश करून त्याला ठार मारले, राजाचा कुलवृक्ष शत्रूने उखडून टाकण्याची परंपरा येथे आठवते. या आदिम शूर् वरून 'शूरपन्मा'ची उत्पत्ती झाली असणे शक्य आहे. (प्री-पल्लवन तमिल इंडेक्स पृ. ३७७)

यात शूरपद्म हे संस्कृतकरण आहे. संस्कृत 'शूर' हेच या साऱ्यांचे मूळ असे मानण्याकडे प्रवृत्ती होणे साहजिकच आहे. पण दक्षिणी कोशावरून

> द २२५० चूर् भिवविणे, क्रूर असणे. क्रूरता, दुष्ट दैवत, 'आसरा' (पाण्यातल्या)

हा अर्थ पाहता, शूर हा एक 'संमत' शब्द असण्याची शक्यता अधिक. 'आर्य' आणि 'द्रविड' या दोन्ही पातींना मान्य असलेल्या या दैवताच्या भाषिक संभारातही कशी एकता दिसून येते हे पाहण्यासारखे आहे.

६ भाला धारण करणाऱ्या, या 'शूर' देवाच्या अंगी लढवय्याचे गुण होतेच. तो जर जमातीचा प्रमुख देव असला तर देवांचाही प्रमुख वीर होण्यात अडचण नव्हती. समासशब्दांनी या बाबतीत संस्कृतींचाही समास घडवल्यासारखा दिसतो. किंवा उलट दिशेने, समासशब्दांमध्ये संस्कृतिसमासाच्या खुणा दिसतात. तोल्काप्पियापासून तमिळमध्ये तेयूव (देयूव : दैव, देव) हा देव या अर्थाचा शब्द साहित्यात आहे. खास तमिळ म्हटला जाणारा शब्द कटवुळ्. तेयूव मुरुगन्‌ची एक बायको तेयूवयानै. या शब्दाची सामासिक फोड तेयूव-यानै म्हणजे देवाचा हत्ती अशी होते. वेऽलन् हा भाल्याने हत्तीशी सुद्धा झुंज देतो हे वर आलेच. तेव्हा तो तेयूव–यानै–पती व्हायला अडचण नाही. संस्कृतात साऱ्याचे मूळ पाहणाऱ्या पंडितांच्या मते तेऽयूवयानै हा 'देवसेना'चा 'अपभ्रंश' आहे आणि म्हणून 'देवसेनापति' या कार्तिकेयाच्या वास्तव पदवीची फोड 'देवसेनेचा पती' अशी करून मुरुगाची बायको देवयानी करून टाकली. मिथ्यकारांनी हे सारे केले असणे शक्य आहेच. मात्र त्यासाठी संस्कृत आणि तमिळ बोलणारे दोन युध्यमान मानववंशांचे 'आर्य' आणि 'द्रविड' होते असे मानण्याचे कारण नाही. किंचित उच्चार भेद असलेल्या समार्थ शब्दांचे समास सारख्याच प्रकारांनी बनवणाऱ्या मुक्तभेदांचे भाषिक आणि समान संस्कृतीचे पाईक असे हे दोन समाजविभाग होते असेही म्हणता येईल.

७ भाषाविषयक संकल्पनेत एवढाच बदल केला की वेदांपासून महाकाव्यांपर्यंत

संस्कृत परंपरेने जतन केलेल्या मिथ्यकथांचा उलगडा करण्याचे प्रभावी भाषिक साधन आपल्या हाताशी येते. विल्यम जोन्सनी संस्कृतचे ग्रीक-लॅटिनशी साम्य असल्याचे अठराव्या शतकाच्या शेवटी शेवटी सांगितले. तेव्हापासून वेदांतल्या मिथ्यकथांचा उलगडा करण्यासाठी युरोपीय भाषांचा आणि मिथ्यकथांचा आधार घेणे विद्वन्मान्य झाले, नव्हे विद्वत्तेचे मुख्य गमक झाले. विष्णू सारख्या अखिल भारतीय दैवताचे गूढ उकलण्यासाठी लेटिशमधल्या जनपदगीताचा आधार घेणे शास्त्राला धरून असते, पण तमिळसारख्या प्राचीन काळीही खूप विकसित झालेल्या भाषेतले विष्णुगानाचे आधार घेणे त्याच शास्त्राला मंजूर नसते! उजव्या डोळ्याला डावा डोळा कधीच दिसू नये अशी ही अवस्था. पण दोघांचीही प्रतिबिंबे 'मऱ्हाटी' आरशात स्वच्छ दिसत असल्यामुळे ही अवस्था सहज बदलते.

उदाहरणार्थ, वेदिक मिथ्यांचा आकाशातल्या ज्योतींशी संबंध आहे ही गोष्ट ८
सर्वमान्य आहे. स्कंद–मुरुगन्–कार्तिकेय याचा कृत्तिकांशी बरावाईट संबंध पुराणातल्या कथांनी जोडलाच आहे. 'सज्जनांच्या तेजज्योती म्हणजेच नक्षत्रे' किंवा 'नक्षत्रे हीच देवांची मंदिरे' यांसारखी वचने वेदवाङ्मयात आहेत. नक्षत्रांचे विशिष्ट गुणकलापही सांगितले आहेत. त्यात शतपथ ब्राह्मणातला एक महत्त्वाचा उल्लेख 'भारतीय ज्योतिषशास्त्र' ग्रंथात कै. शं. बा. दीक्षित यांनी पुढे आणला. (पृ. १२७)

> इतर नक्षत्रें एक, दोन, तीन, चारच. ह्या कृत्तिका मात्र पुष्कळ. [जो ह्यांवर अग्न्याधान करितो तो] त्यांचा पुष्कळपणा (विपुलता) मिळवितो. म्हणून कृत्तिकांवर आधान करावें. ह्या मात्र पूर्व दिशेपासून चळत नाहीत. इतर सर्व नक्षत्रे पूर्व दिशेपासून च्युत होतात. [ह्यांवर आधान करितो] त्याचे दोन अग्नि प्राची दिशेस आहित होतात. म्हणून कृत्तिकांवर आधान करावें. (शत. २.१.२)

यातला कृत्तिकांचा 'पुष्कळपणा' त्यांच्या संस्कृत नावात दिसत नाही; त्यांची आकाशातली आकृती वस्तऱ्यासारखी दिसते हे त्यांच्या नावाचे स्पष्टीकरण देतात. तमिळमध्ये मात्र हा पुष्कळपणा दिसतो :

त २३९ आर् — भरून जाणे, समाधान होणे, खाणे, पिणे, पूर्णता, सौंदर्य

त २४२ आरल्, आर् — तिसरे नक्षत्र [कृत्तिका], 'कार् तिकै'

आरल् हे नाव संघसाहित्यातील 'कलि त् तौके' या गीतसंग्रहात आले आहे म्हणजे चांगले प्राचीन आहे. याशिवाय इतरही नावे अर्थपूर्ण आहेत. त्यांच्या अर्थांचे संस्कृत परंपरेशी साम्य लक्षात येण्यासारखे आहे :

त २२०९ नाटन् — रहिवाशी, राजा

त २२३०	नावितन्	न्हावी
	अरुमीन्	सहा तारका
त ८७९	कार्	पाऊस, मेघ, पाणी
त १८६५	तिकळ्	तारांप्रमाणे लुकलुकणे

यातल्या शेवटच्या दोन शब्दांवरून कार् तू तिकै हे नाव व्युत्पादिले तर 'पावसाचे नक्षत्र' असा त्याचा अर्थ होईल आणि अभ्रयंती मेघयंती इत्यादी नावे या सहा तारकांची दिली आहेत त्यांचा मेळ बसेल. कार् याशी मराठी गार ('गारा पडतात') याचा संबंध जुळतो.

कार्तिक हे महिन्याचे नाव कार्त्तिकै शी जुळते. संस्कृत कृत्तिका वरून ते सामान्यतः काढतात. तमिळ महिन्यांची नावे (चित्तिरै, आवनि वगैरे) नक्षत्रांच्या नावांचीच असतात. संस्कृत नक्षत्रनामे आणि मासनामे यांच्यात मात्र जनकजन्य संबंध काटेकोरपणे पाळलेला असतो. जसे 'चित्रा'चा तो चैत्र. कदाचित 'कार् तू तिकै' आणि कृत्तिका यांचा असाच जनक-जन्य संबंध असेल तर ते संमत भाषिकाला अनुसरूनच होईल!

इतर अनेक प्रमाणांनी स्पष्ट होणारा आणि कृत्तिकांच्या बाबत उठून दिसणारा संमत संबंध कालनिश्चितीला फार उपयोगी आहे. दीक्षित म्हणतात :

> वरील वाक्यांत कृत्तिका पूर्वेस उगवतात असा वर्तमानकाली प्रयोग आहे. आणि अयनचलनामुळे त्या सर्वकाल पूर्वेस उगवण्याचा संभवच नाही. हल्ली उत्तरेस उगवतात. शकापूर्वी ३१०० च्या पूर्वी दक्षिणेस उगवत होत्या. यावरून शतपथ ब्राह्मणाच्या ज्या भागांत ही वाक्ये आहेत, त्यांचा काल शकापूर्वी सुमारे ३१०० हा होय हे सिद्ध होते. (पृ. १२८)

कृत्तिकांविषयीची जनपदमिथ्ये ज्या संस्कृतीचा निर्देश करतात तिच्या स्वरूपाशी हा काळ जुळणारा आहे.

९ कार्तिक्याचे 'कुमार' स्वरूपही मुरुगाच्या 'शेऽय् = मुलगा' या रूपाशी जुळणारेच आहे. या कुमार स्कन्दाची जन्मकथा, उदा. महाभारतात दिली आहे, तिचे आजच्या आदिवासी जातींच्या पारंपरिक मिथ्यकथांशी ढळढळीत साम्य आहे. शिव-पार्वती ही विश्वाचीच आईबापे. त्यांचा मीलनकाल हजारो वर्षांचा असावा, शिवाचे उग्र वीर्य धारण करण्याची क्षमता कुणाच्यात नसावी या सरळ मिथ्यकल्पना आहेत. स्कन्द हा कोणी हाडामासाचा पुरुष नव्हे, मिथ्यकथेतला दैवी वीरकुमार आहे. 'शिवाचे वीर्य स्कन्न झाले-सांडले' म्हणून या कुमाराचे नाव स्कन्द पडले अशी व्युत्पत्ती देतात. ही मिथ्यव्युत्पत्ती झाली. संमत तत्त्वाने पाहिले तर दक्षिणी कोशावरून

द ११८७	कन्रु	वासरू, प्राण्याचे तान्हे, रोपटे
(मलै.)	कन्नु	गाईम्हशीचे तान्हे
(कन्नड)	कन्द	लहान मूल
(तेलुगू)	कन्दु	तान्हे

यातल्या कन्द–कन्दु इत्यादिकांचा उद्भ्रंश स्कन्द असू शकतो. अशी क–स्क जुळणी अनेक दक्षिणी–संस्कृत शब्दांमध्ये दिसते.

मिथ्यांची मिसळ केवळ मिथ्यकवीच करतात असे नाही; मिथ्यकथांना नवे रूप देणारे महाकवीही करतात. म्हणून कालिदासासारखा महाकवी कुमारस्कन्दाच्या जन्माचे काव्य रचताना समाजात प्रचलित असलेल्या अनेक कथांची गुंफण त्यात करतो. मुरुगाने शूर किंवा शूरपद्म असुराला मारले. कृत्तिकांसारख्या तारा या माता असल्यामुळेच बहुधा 'तारकासुर' मारल्याचीही एक कथा स्कन्दाच्या नावे रचली गेली. तिचा कालिदासाने उपयोग केला. दैवतांची स्वरूपे एकसंध नसतात हेच या विविध कथा दाखवीत असतात. याचमुळे दैवताचे अमुक रूप आर्य आणि तमुक रूप द्रविड अशी विभागणी करता येत नाही.

स्कन्द–मुरुगांच्या मिथ्यरूपातही अशी विभागणी करता येत नाही. त्या १०
दोघांचीही नावे तथ्यरूपातल्या 'मुलगा' याच अर्थाची आहेत. कन्द हे सामान्यनाम कन्नड भाषेत उरले. तमिळ प्रमाणभाषेत कन्रु हा शब्दोच्चार असला तरी बोलभाषेत रु चा तु–दु होत असल्यामुळे बोली–ध्वनिकाचा आधार कन्दु या रूपाला मिळतो. याखेरीज, एकंदरीतच उकारान्त व्यंजनाचा उच्चार अकारान्त करण्याकडे तमिळ बोलणारांची प्रवृत्ती असल्याने कन्दु–कन्द या रूपांमध्ये तसा फरक नाही.

स्कन्द–कन्द प्रमाणेच मुरुगा–मुलगा ही जुळणी बोलभाषेवरून प्राप्त होते. संमत भाषिकाने बोलभाषेच्या प्रथमतेकडे आवर्जून लक्ष वेधले आहे. प्रमाणभाषा काहीशी बनीव असल्याकारणाने दोन प्रमाणभाषांमधल्या शब्दांच्या जुळणीचे नियम किंवा निगम त्यांच्या बोलींच्या शब्दजुळणीच्या निगमांपेक्षा निराळे असू शकतात. त्यांचा उपयोग मिथ्यकासारख्या भाषाबाह्य किंवा भाषिकबाह्य शास्त्रविचाराच्या मदतीने केला तर 'मुलगा' सारख्या शब्दांच्या समाधानकारक उपपत्ती मिळतात. त्यातूनच मग मराठीच्या आदिकाळाविषयीच्या रूढ कल्पनाही बदलाव्या लागतात. तमिळ संघसाहित्याच्या काळापर्यंत तो आदिकाळ नक्कीच मागे न्यावा लागतो. आणि या शब्दांच्या आदिशब्दांचा उदयकाळ तर वर दाखवल्याप्रमाणे सनपूर्व ३००० पर्यंत मागे जातो.

संमत मानीवाच्या अभावी कोशकारांनी मुरुगाचे मूळ बनीव संस्कृत उद्भ्रंशाने ११
दाखवले. मुलगा हे वंशवृक्षाचे फळ किंवा वंशवेलीचे फूल मानतात. पुढल्या पिढीचे

मूळ असे रूपक त्याच्यावर कोणी बसवीत नाही. त्यामुळे मूळक ही मुलगा ची व्युत्पत्ती सुसंगत वाटत नाही. मूल्क या संस्कृत शब्दाचा 'मुळी' या मराठी अर्थाशी जुळणारा, 'एक प्रकारका विष' हा अर्थ हिंदी आपटे–संस्कृत–कोशात दिलेला आहे.

येथे शहाजी–शहाजहाँ यांचे संदर्भ सहेतुक आहेत. 'राजे शहाजी' या मराठी रियासतीतील चरित्रात गो. स. सरदेसाई यांनी एका जुन्या हिंदी कवनाचा उतारा दिला आहे. सतराव्या शतकाच्या प्रथमार्धात शहाजी आणि शाहजहाँ यांच्यात जणू अवघ्या हिंदुस्थानाची राजकीय वाटणी झाली होती हे सांगताना कवीने मिथ्यकाव्याचा आश्रय घेतला आणि म्हटले : जगदीश विष्णूने ब्रह्मदेवाला पुसले, सृष्टीची रचना केलीस तिचे रक्षण कोण कुठे करतो? त्यावर ब्रह्मदेव म्हणाला :

शशि ओ रबि पूरब पच्छिममें तुम सोय रहो सिरसिन्धुमहाँ
अरु उत्तर दच्छिन रच्छनको इत साहजि है उत साहजहाँ ॥

भाषांच्या बाबतीतही जणू ब्रह्मवाक्य म्हणून 'उत्तरेला संस्कृत आणि दक्षिणेला तमिळादि' अशी विभागणी करून आपण स्वस्थ आहोत! वास्तविक स्थिती तशी नाही. चिरंजीव मुरुगाच्या षण्मुखांमधून उत्तर दक्षिणेच्या भाषिक एकतेचाच घोष आपल्याला ऐकायला येईल!

□ □ □

१. खंडुबाचा येळकोट

'रामनगरी' या आत्मकथेत नगरकरांच्या आज्याने केलेली 'नाभिक' शब्दाची फोड दिली आहे. ब्रह्मदेवाने आपल्या दोघा मुलांना एकेक वाटी दिली. पोट भरण्यासाठी. थोरला म्हणाला, चार घरी मागून वाटीत मिळेल ते खाईन. धाकटा म्हणाला, वाटीत पाणी घेईन, चार दाढ्या करीन, भीक मागणार नाही. ना-भिक जात त्याच्यापासून झाली.

लोकोक्ती शब्दांमधून असे विलक्षण अर्थ काढीत असते. भीक न मागण्याचा अर्थ कोणत्याही धंद्याच्या जातीला लागू पडला असता. आज्याने आपल्याच धोकटीतल्या दोन वाट्या पुरवून नाभिक चा न्हावी बनवला.

लोकोक्तीने शब्दालाच काय, देवालासुद्धा न्हावी बनवला. रावणाने म्हणतात, १
साऱ्या देवांना हलकी कामे दिली. त्यात 'खंडेराव असे नापित होऊनि' किंवा 'मैराळ देव कानडे। करिती राक्षसांच्या दाढ्या खांडे'!

हे कसे झाले? मैराळाला 'मयिराळ देव तमिळ' म्हणावे, बस! मयिर् म्हणजे केस. आळ् म्हणजे नोकर. दाढ्या करणे ओघानेच आले.

मैराळ हे मैलारही होतात. ते एक ग्रामदेव आहेत. पण ते मुख्यतः परटांचे २
आहेत म्हणतात. त्याचे कारण असे दिसते की मै म्हणजे मळ, आर् म्हणजे भरून जाणे. आरु म्हणजे तर नदी. सहजच नाते जडले.

हे मातीच्या मूर्तीच्या रूपात मण्-मैलार म्हणून कर्नाटकात आहेत. ते कानडी ३
खंडेरावच आहेत. खंडेराव म्हणजे मल्हार किंवा मल्लारि : मल्लाचे संहारक; म्हणून पाचसहाशे वर्षांपूर्वी एक मल्लारि-महात्म्य रचले गेले. त्यात बहुधा मण् या शब्दावरून मणिमल्ल हे असुरनाम कवीने बनवले आणि त्याच्या संहाराची कथा कार्तिकेय-स्कंद-मुरुगन् यांच्या पुराणकथेशी सांधून टाकली. हेही साहजिकच झाले. कारण स्कंद मुरुगन् हा सगळ्या देवांचा सेनापती म्हणून श्रेष्ठ देव आणि त्याचे वाहन मोर : तमिळ मयिल्.

महात्म्यकाराने मल्हाराचा मल्लारि केला आणि जणू वाल्मीकीचा वाल्या झाला. ४

शब्दवेधी संशोधकांच्या लेखी प्राचीन देवाधिदेव खंडोबा 'मूळचा मध्ययुगीन क्षुद्र
५ ग्रामदेव मैलार' होऊन राहिला. तमिळ ल ल यांच्या भेदाने हा फरक घडवला.
तमिळ मल्लन् = मल्ल. मल्लारि = भांडकुदळी! तर मल्लन् = सेनापती, तरुण;
व्यंजनेने तरुण सेनापती स्कंद. त्याला आर् हा तमिळ आदरार्थी प्रत्यय लागून
मल्लार, मराठीत साहजिकपणे मल्हार, सेनापतीराव!

६ किमान पंधराशे वर्षांपूर्वी ग्रथित झालेल्या तमिळ संघवाङ्मयात तिरु मुरुगआट्रु
प् पडै [श्री मुरुगाचे वाटगाणे : 'मुरुगाचा पवाडा!'] हे ३१७ ओळींचे काव्य
आहे. मुरुगाच्या अर्चनेत अजूनही त्याचा पाठ होतो. त्यातल्या मुरुगनामावलीत
७ हा मल्ल स्तवला आहे. 'पोरु विरल् मल्ल : शत्रूवर चालून जाणाऱ्या सेनापते!'
'मलैमकल्-मगने : पर्वत-कन्या-पुत्रा!' 'कोट्रवै शिरुव : दुर्गेच्या बालका!' अशी
संबोधने त्यात आहेत. ती अर्थाच्या दृष्टीने संस्कृतातल्यासारखीच आहेत.

या पवाड्यात षण्मुख स्कंद आणि एकमुख मुरुगाचा प्रयासपूर्वक मेळ साधला
आहे. स्कंदाच्या सहा काया तपोधन मुनिवरांपासून पोतधन धनगरांपर्यंत सगळ्या
८ वर्गांना वाटून दिलेल्या आहेत. पैकी एका कायेच्या कमरेला कलिंग म्हणजे कांबळे
आहे – खंडोबाला असते तसेच. हातात मात्र हत्तीचा अंकुश आहे आणि मुख
भक्तगणांना अभय देत आहे. वर्णनात क्रमाने सहाव्या असलेल्या कायेचे मुख
ठुसकी 'कुरव' कन्या [शैलजा] वल्लि हिला सुखावीत आहे; एक हात 'वान'कन्या
[स्वर्गजा] देवयानी हिच्या गळ्यात वरमाला घालीत आहे, तर दुसरा नीलमेघांकरवी
९ पाऊस पाडीत आहे. संस्कृत मूर्तिविज्ञान असल्या सुब्रम्हण्याच्या किंवा खंडोबाच्या
मूर्तींना कसे लागू पडणार? किंवा त्यांचे एकरूप कसे दाखवणार? ते एकरूप
दिसेल – पवाड्यात गायिलेल्या आणि खंडोबापुढे आजही चालणाऱ्या
लोकाचारातून : नाचणीचा, गव्हाचा 'चौक', कण्हेराची फुले, लाह्या, भंडार, 'खारा
निवद' यांतून.

संघवाङ्मयानुसार, स्कंदाचे भक्त मोरपिसासारख्या फुलणाऱ्या 'वाघै' (शिरीष)
१० फुलांच्या माळा घालीत. त्या फुलच्या नावावरूनच खंडोबाचे 'वाघ्ये' आले असावेत.
तमिळ मुरल् = गाणे. गाणारी ती मुरलि-मुरळी. तमिळ तलि = देवळी. तीच
झाली खंडोबाची तळी. कोट्टै, कोऽट्टम् = मंदिर; एलु = उचलणे. एलकोट = मंदिर
उचला! हे मंदिर असते 'काठी'त. अठराशे वर्षांच्या जुन्या गाथासप्तसईतही 'एका
११ सोटाला चार रंगीबेरंगी वस्त्रे गुंडाळून इंद्रध्वज होतो' असे सांगितले आहे. आजही
धनगर लोक तेच करतात. तमिळ इंडर् = धनगर. इंडर् चा उद्भ्रंश इंद्र? ते
असो. 'पवाड्यात' मुरुगाला म्हटले आहे 'कन्दुडै निलैयिन्' म्हणजे 'कन्दु' किंवा
१२ काठी मध्ये बसणारा. या 'कन्दु'चाच खंडु-खंडोबा झाला. तोच सदानंद अर्थात

मूळचा षडानन.

हा प्राचीन लोकदेव आहे. त्याची तळी उचला, काठी नाचवा. बोला खंडुबाचाऽ येऽळकोऽट.

□

खंडोबाला 'कुलदैवत मानणारे लोक ब्राह्मणापासून अस्पृष्टापर्यंत सर्व जमातींत १२
फार मोठ्या प्रमाणात आहेत. किंबहुना असेही म्हणता येईल की यास कुलदैवत मानणारांची संख्या इतर सर्व दैवतांहून अधिक आहे. यास लोकदेव हे नाव सर्वाधिक यथार्थतेने लागू पडेल यात शंका नाही' अशा शब्दांत ग. ह. खरे यांच्या 'महाराष्ट्राची चार दैवते' या ग्रंथात (पृ. ७८) खंडोबाचे विशेष स्थान वर्णिले आहे. 'त्याची भक्तीही केवळ मराठी प्रदेशातच नव्हे तर कर्नाटक, तेलंगण व काही अंशी तमिळ प्रदेशातही चालते आणि सर्व ठिकाणच्या आचारांत साम्याचा अंश एवढा मोठा आहे की सर्वत्र एकच देवता अभिप्रेत आहे यात शंका नाही' असेही तेथेच सांगितले आहे.

एवढा लोकदेव खरा, पण इतिहासलेखनात ज्यांना खात्रीचे पुरावे म्हणून मान आहे असे लेखी किंवा कोरीव उल्लेख या दैवताबाबत फार नाहीत, त्यांतही कालाच्या गणनेला उपयोगी होतील असे थोडेच. पण दळणवळणाच्या सोयी नसलेल्या काळात इतक्या विशाल भूप्रदेशावर ज्याचे भक्तिराज्य चालू राहिले त्याचे कालमानही मोठे असले पाहिजे. भक्तिराज्याचा इतिहास समाजाच्या लेखात नसला तरी मुखात असतो, तवारिखांमध्ये सापडला नाही तरी लोककथा– मिथ्यकथांमध्ये असतो आणि बहुधा प्राग्‌इतिहास असतो. या लेखात मुख्यतः खंडोबाच्या काही मिथ्यांची फोड आणि 'सर्वत्र एकच देवता अभिप्रेत' असल्यामुळे मराठी व तमिळ मिथ्यकथांमधली समानता दाखवणे या गोष्टी साधावयाच्या आहेत.

भारतीय समाज रामायणाला इतिहास मानतो, राम आणि रावण यांना
हाडामासाची प्राचीन माणसे मानतो; या प्राचीन पराक्रमी पुरुषांचा संबंध आणून १
इष्ट देवता, आचार इत्यादिकांच्या मिथ्यकथा उभ्या करतो. राम-रावणांच्या, कृष्ण-पांडवांच्या उल्लेखाने त्या कथांना विश्वसनीयता किंवा सत्यता लाभते ही श्रद्धा त्यामागे असते. रावणाने देवांचा छळ केला हे सूत्र समाजमान्य असते. त्याच्यावरून तपशिलात रंग भरताना एकेका देवाच्या स्व-रूपांना अनुरूप अशी सत्याभासी वर्णने कथेत येतात. खांड किंवा तलवार हे खंडोबाचे मानलेले हत्यार. तलवारीने डोकी कापण्याऐवजी केस कापण्याचे काम करायला लावले तर तलवारधारी खंडोबाचा

पुरेसा अपमान किंवा छळ झालाच. हे काम करायला लावण्याची कल्पना सुचण्यात कवीला मैराळ या शब्दाची चटकदार फोड उपयोगी पडली असेल.

२ मैराळ मधला मयिर् म्हणजे केस, मैलार मधला मयिल् म्हणजे मोर. मयिर् व मयिल् यांच्यात अर्थिक संबंध आहे. मैराळ हे वर्णविपर्यासाने झालेले मैलारचेच रूप असू शकते. मैलार मधला मयिल् म्हणजे मोर हे स्कंदाचे वाहन मानलेले आहे. त्यामुळे मैलार हा ग्रामदेव, स्कंदाचेच रूप असू शकतो. एकाएका जातीने समसामान्य देवाचे एक-एक नाव आपले करून ठेवण्यात अस्वभाविक काही नाही.

उपरोक्त ग्रंथात (पृ. १५६, १३८ इ.) मैलार च्या संदर्भात तमिळ लेक्सिकनमधील उतारे आले आहेत. प्रस्तुत लेखनाच्या पूर्वी मराठी साहित्यात या कोशाचे उल्लेखही दुर्मिळच, त्यातला हा महत्त्वाचा. पण दुर्दैवाने मैलार् यासारख्या एकाद्याच शब्दाचा शोध झाल्यामुळे मैलराचे संभाव्य स्वरूप उघड झाले नाही. मनपसंत वर मिळावा म्हणून कुमारिका उपास करतात त्याचे नाव मयिलार् असे कोशात आहे. त्याच्यापुढेच

त ३०७८	मयिलालि	स्कंद - मोरावर आरूढ होणारा
	मयिलि	स्त्री - मोरिणीसारखी म्हणून

हे दोन शब्द शब्द आहेत. त्यांच्यावरून या व्रताचाही संबंध स्कंदाशी असावा असे वाटते.

३ हा स्कंद 'थोरल्या' परंपरेत देवांचा सेनापती आहे. त्यामुळे मैलार-मल्हारी या दैवतांनाही सेनापतिपद मिळाले. दैवताचे नाव आणि त्याचे कर्तृत्व यात अविभाज्य संबंध असतो ही समजूत अनेक मिथ्यकथांच्या मुळाशी दिसते. मल्हारी चा सेनापतिपर अर्थ लावणे मिथ्यकवीला जरूर वाटत होते. दोनशे वर्षांच्या बुद्धिनिष्ठ भाषिक अभ्यासानंतरही 'संस्कृत शब्दांचे अपभ्रंशच लोकभाषांमध्ये वापरतात' हा विचार बराचसा कायम आहे. संस्कृतला देववाणी मानण्याच्या काळात ही श्रद्धाच होती. त्यामुळे मल्हारीला सेनापती ठरवायचे तर त्याच्या संस्कृत नावात सेनापतित्व प्रकटावयास हवे. मल्लारि असे त्याचे रूप या गरजेची उत्तम भरपाई करते. मल्लाचा अरी तो मल्लारि असा समास सोडवता येतो. मण्-मैलार्, मण् मल्हार असे नाव असले तर 'मणिमल्लाचा अरी' अशी फोड करता येते.

पैकी मल्ल हा शब्द संस्कृत पुराणवाङ्मयात वापरला गेलेला असला तरी त्याचे मूळ दक्षिणी भाषांमध्येच आहे :

द ३८७०	मल्, मल्लल्	ताकद
द ३८७१	मल्, मल्लम्	कुस्ती
	मल्लन्	कुस्तीगीर

यामुळे मल्लाचा शत्रू असे सामान्यनाम करण्यापेक्षा मल्ल या नावाच्या असुराचा शत्रू असे विशेषनाम कल्पिणे जास्त प्रभावकारी होते. तत्कालीन भाषिक परिवरात तर मण्-मैलार् हेही नाव प्रचलित होते. मण् चा अर्थ माती. या मैलराची मूर्ती मातीची असावी. पण मल्लारीला विशेषनाम द्यायचे तर 'मणि' असा प्रयोग करणे जास्त सोयीचे होते. मणि म्हणजे रत्न हा संस्कृत अर्थ आकर्षक होता. (जरी त्याचा मूळचा अर्थ मण् = माती वरून 'मूल्यवान दगड' इतकाच असावा.) म्हणून मग मल्ल ऐवजी मणिमल्ल आला. विग्रह सोपा होता. जरूर तर मणि आणि मल्ल असे दोन 'मल्ल' मानता येत होते.

येवढे झाल्यावर 'मणि-मल्लला मारणाऱ्या मल्हारीचे माहात्म्य रचणे सोपे होते. खंडोबावरती मराठी-संस्कृतात रचले गेलेले हे एकमेव काव्य. ते बरेच अलीकडच्या काळातले असल्यामुळे खंडोबाची ऐतिहासिकता अजमावण्यासाठी त्याचा कोणी उपयोग करीत नाहीत. तरीपण मल्लारी > मल्हारी ही उपपत्ती भाषिक आखाड्यात पाय रोवून ताठ उभी आहे.

वर 'थोरली' परंपरा म्हटली ती सामान्यतः संस्कृत-परंपरा असते. धाकटी ४
परंपरा लोकसमुदायात अलिखित स्वरूपात जिवंत असते. धाकट्या परंपरेतला वाल्या कोळी वाटमाऱ्या असतो तर थोरल्या परपरेतला वाल्मीकी मुनिवर्य असतो. वाल्याचा वाल्मीकी होणे ही उन्नती असते म्हणून वाल्मीकीचा वाल्या होणे ही अवनती मानता येईल. संस्कृत शब्दांचे अपभ्रंश लोकभाषेत वावरत असतात असे म्हणताना काहीशी हीच भावना असते. त्याचप्रमाणे शब्दांवरून दैवतांचा शोध होतो तेव्हा लोकभाषेतल्या शब्दाने सूचित होणारे दैवत हे संस्कृत शब्दाने सूचित होणाऱ्या दैवतापेक्षा खालच्या दर्जाचे समजले जाते. मैलार या ग्रामदेवाचे मल्लारि दैवतात उन्नयन झाले असे म्हणतानाची विचारसरणी काहीशी या स्वरूपाची असते.

पण थोरली परंपरा धाकट्या परंपरेलाच सुभग शब्दांमध्ये मांडीत असेल ५
असेही मानता येते. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात, असा संबंध त्या दोहोंमध्ये मानण्यानेच अनेक समस्या सहजपणे सुटतात. मैलाराला स्कंद मानले ते केवळ मोर या वाहनावरूनच की मैलारातच काही स्कंदत्व किंवा सेनापितत्व होते? ते मल्हारात होते का? पंधराव्या शतकातल्या माहात्म्यकाराला अशा शंका येणे शक्यच नव्हते. आपल्याला येऊ शकतात. मलन् म्हणजे तमिळमध्ये सेनापती हे लक्षात आल्यावर या दैवताच्या बाबतीतली थोरली परंपरा धाकटीवरच आधारित आहे हे सत्य आपल्याला प्रतीत होते!

या दोन परंपरांच्या एकरूपतेचे उत्तम उदाहरण तिरु-मुरुग-आरूप्पडै या ६
संघसाहित्यातल्या काव्यात मिळते. पत्तु प् पाट्टु [दश गान] हा संघ-साहित्यातील

दहा स्फुट खंडकाव्यांचा संग्रह आहे. त्यातले हे पहिलेच काव्य. नक्कीरर् त्याचा कवी. या काव्याच्या रचनेची लांबलचक आणि गुंतागुंतीची जी कथा आहे तिचा सारांश इतकाच दिसतो की या काव्याचा पाठ केल्यामुळे नक्कीररच्या अंगावरचे कोड नाहीसे झाले. मुरुगाची कृपा व्हावी म्हणून या काव्याचा पाठ केला जातो. त्यात मुरुगाच्या आवाहनाची जी विविध नावे किंवा वर्णने आली आहेत त्यांमध्ये दोन्ही परंपरांच्या मिथ्यकथा समावलेल्या आहेत. उदा० २५५ ते २६९ ओळी अशा :

अरुवर् पयन्त वारमर् चेल्व
सहाजणींना झालेल्या, सहा-देही श्रीमंता
आल् केळु कडवुट् पुतल्व माल्वरै
वट-तल-वासी-ईश्वर-पूता, मेघ-पोचत्या–
मलैमकन् मकनेऽ मार्रोऽर कूर्रेऽ
पर्वताच्या कन्या-पुत्रा, शत्रूंच्या संहारका,
वेर्रि वेल् पोऽर् कोर्रवै चिरुव
विजयी-भव रणरंगी वनदुर्गेच्या तान्ह्या,
इळैयणि- चिरप्पिर् पळैयोऽळ् कुळवि
झळकत-भूषण-शोभित पुरातनेच्या पुत्रा,
वानोऽर् वणङ्कु विर्राने त् तलैव
देवांच्या वक्रधनुर्धर सेनेच्या प्रमुखा,
माले मार्प नूलरि पुलव
माला-वक्षा, ग्रंथ-जाणत्या ज्ञात्या,
चेरुविलोरुव पोरुविरन् मल
समरी अद्वितीया, युद्धविजेत्या मल्हा,
अन्तणर्– वेरुक्कै यरिन्तोऽर् चोन्मलै
मुनिजन-विभवा, ज्ञानवंत-शब्द-पर्वता,
मङ्कैयर् कणव मैन्दरेऽरेऽ
कुमारिकांच्या नाथा, वीरतरुण-पुंगवा,
वेऽळ् केळु तटक्कै च् चाल् पेरुञ् चेल्व
शूलधारी दृढ-भुजार्जित भूरि-श्रीमंता,
कुन्रङ् कोन्र कुन्रा क् कोर्रत्तु
पर्वत भेदुन अभेद्य-विजयी वीरा,
विण् पोरु नेटुवरै क् कुरिञ्चि क् किळव

आकाशपोच कळकांच्या कुरिंजिच्या नाथा,

पऌरपुकळ् नन्मोळि प् पुलवरेऽरेऽ

बहुतीं वाखाणल्या उत्तमभाषी विद्वानांतिल सिंहा,

अरुम्पेरन् मरपिर् पेरुम्पेयर् मुरुक

अलभ्य अभवा भूरि-नाम मुरुगा.

'संघसाहित्य काळात आर्यांचा शिरकाव द्रविडांच्यात मोठ्या प्रमाणात झाला होता याच्यात ह्या खुणा आहेत' अशी साधीभोळी स्पष्टीकरणे येथे पुरी पडत नाहीत. कारण, यातली द्रविड समजली जाणारी बरीचशी पीठिका तोल्काप्पियाइतकी जुनी आहे; तसेच खास संस्कृत मानली जाणारी पीठिका तमिळ आधाराने केलेल्या अर्थनावरूनच नीटपणे आकळते. म्हणून अशा ठिकाणी आढळणारा 'मल्ल' नावाचा उल्लेख मल्हार च्या आकलनाचा संकेतशब्द होतो. स्कंद-मल्हार-मुरुगन् अशी संमत जुळणी मग दैवताचीही होते. या जुळणीत नुसत्या नावांच्या ध्वनिसाम्याचा विचार नाही तर एका समग्र मिथ्याचा विचार आहे. हे मिथ्य तथाकथित वेगळ्या अशा दोन संस्कृतींना व्यापून राहिलेले आहे. पण वेगवेगळ्या भाषांचे आजचे प्रदेश शाश्वतचे धरून भाषांचा इतिहास जसा सांगता येत नाही तसाच संस्कृतीचा व्याप आर्य-द्रविड या स्थूल पण व्यावर्तक विभाजनात मांडता येत नाही. ७

गटवारी करण्यासाठी आपण जे गमक किंवा गमकांचा जो संच निवडू त्यानुसार समाजाचे गट पाडता येतात आणि ते एकमेकांहून निराळे दिसतातही. चार वर्ण आणि पंचम जाती अशा पाच विभागांत समाजाचे वर्गण संस्कृत परंपरेत झाले. तोल्काप्पियाच्या परंपरेत, भूप्रदेशाच्या पाच विभागांत राहणाऱ्या लोकांचे वर्गण झाले. यासाठी निवडलेली गमके तोल्काप्पियाच्या 'अर्थ' विभागातील २० व्या सूत्रात सांगितली आहेत:

तेय्वम् उणावेऽ मा मरम् पुळ् परै

चेय्ति याळिन् पकुतियोडु

अव्वके पिरवुम् करु एन मोळिप

'दैवत, खाणे, प्राणी, झाड, पक्षी, वाद्य

धंदा, वीणा यांच्या वर्गणाने

ते ते भाग पाडणाऱ्या (वस्तूंना) 'करु' [साधने] म्हणतात.'

यानुसार कुरिंञ्चि या 'मैवरै उलकम्'ची म्हणजे पर्वतीय विभागाची 'करु' सांगतात— दैवत: मुरुगन्; खाणे: वरी— नागलीसारखे दाणे, जव, बांबूचे बी; प्राणी: हत्ती, वाघ, वराह, अस्वल; झाडे: वेऽङ्कै = बिबळा, कोंगु = ताड; पक्षी: मोर, पोपट; वाद्य: 'फरा' आणि दोण्डाक; धंदा: मध गोळा करणे; वीणा: कुरिंञ्चि-वीणा.

या वर्णनात जातपात नाही. मुख्य म्हणजे, या पर्वतीय जनांच्या बरोबरीने चराऊ राने, किनारी प्रदेश इत्यादी विभागातही राहणारे लोक होतेच. त्यांची 'करु' वेगळी होती. आता कुरिंचि या (पाचांपैकी) एका विभागाचे दैवत मुरुगन् हे सबंध द्रविड संस्कृतीचे आणि स्कंदरूपाने आर्यसंस्कृतीचेही मानचिन्ह कसे झाले?

उन्नयनाने खासच नव्हे. कारण, या मुरुगाची सारीच रूपे समवायाने या पवाड्यात किंवा वाटगाण्यात गायिलेली आहेत. गाई वळणारा कान्हा आणि गीता गाणारा कृष्ण हे एकाच संस्कृतीचे आहेत तशीच स्कंद-मुरुगाची ही सारी रूपे एकाच संस्कृतीची असली पाहिजेत. कोणता विभाग कोणत्या रूपाला महत्त्व देत होता ही गोष्ट अलाहिदा.

८ याचमुळे मुरुगाची सहा मुखे किंवा शरीरे म्हणजे सहा प्रकारच्या मूर्ती अशी रोचक कल्पना करणे या पवाड्याच्या शाहीराला शक्य झाले. त्यांतली एक कांबळे नेसलेली. हे तिचे खंडोबाशी साम्य. खंडोबाच्या दोन बायका आहेत. तशा मुरुगाच्याही आहेत हे साम्य मराठीत आधीच टिपले गेले आहे. तमिळ देशात हत्तींचा वावर असल्यामुळे या वीरदैवताच्या हाती अंकुश आला, तर म्हाटयांच्या मुलखात 'खांड' म्हणजे तलवारीचा प्रचार जास्त असल्यामुळे ती खंडेरावांच्या हाती देण्यात आली. जेजुरी या खंडोबाच्या स्थानाशेजारी वाल्हे आणि परिंचे ही 'तलवार' आणि 'तलवारीची मूठ' या अर्थांच्या नावांची गावे आहेत– हे 'द्रविड महाराष्ट्र'मध्ये नमूद केले आहे.

दैवताचे मूर्तिरूप आणि त्याचे मिथ्यरूप अशा रीतीने त्याच्या भक्तगणांवर अवलंबून राहते. म्हणून संस्कृत मूर्तिशास्त्र रचणाराचे मूर्तिवर्णन हे त्या दैवताचे एक रूप असते, एकमेव रूप नसते. ध्यान-महात्म्यादी ग्रंथांमधली मूर्तिरूपे वस्तुनिष्ठ वर्णन आणि कल्पनासंचार या दोघांच्या मिश्रणाने उभी राहतात. त्यामुळे लिखित मूर्तिशास्त्राशी प्रत्यक्षातल्या मूर्तींचा मेळ अंशतःच बसू शकतो. दोन दैवतांचा सारखेपणा नुसत्या मूर्तिरूपावर आधारण्यापेक्षा त्यांच्या भोवतीच्या लोकाधारावरही आधारावा लागतो. मुरुगाच्या 'कुरिंचि' प्रदेशातील रूपाला कोणता नैवेद्य देतात त्याचे पवाड्यातील वर्णन : (ओळी २३१-३७).

चेन्नूल् यात्तु वेण् पोरि चितरि
(मनगटी) लाल दोरा बांधुन ढवळ्या लाह्या चिदरुन
मतविल निलैइय मात्ताट् कोळुविटै क्
अतिबळ बळकट महापाद पुष्ट एडक्याच्या–
कुरुतियोटु विरैइय तू वेळ्ळरिचि
रक्ताने शिंतडल्या धुवट पांढऱ्या भाताचे

चिल्पलि च् चेयूतु पल् पिरप्पिइ च्

चिमुकले बली करुन बहुत ठायि ठेवून

चिरु पचु मञ्चलोटु नरुविरै तेलित्तु

सुंदर ओल्या हळदीसहित सुगंधचंदन शिंपडून

यातले तपशील प्रयोजनाच्या थोड्याबहुत फरकाने खंडोबाच्या भक्तिचारात आढळतात हे महत्त्वाचे आहे.

इतकी साम्ये स्थापित झाल्यावर खंडोबाशी संलग्न असलेल्या इतर तपशिलांबाबतची अनुमाने तमिळ पार्श्वभूमीवर आपण बांधू शकतो. वाघ्या मुरळी या भक्तजोडीचे पुरेसे स्पष्टीकरण अजून झालेले नाहीत. वाघ्या म्हणजे कुत्रा, म्हणून लक्षणेने भक्त यासारखे स्पष्टीकरण 'इतर देवांच्या भक्तांना वाघ्या का म्हणत नाहीत?' अशा शंका उभ्या करते. वाघ्याचा गळ्यातल्या व्याघ्रचर्माशी संबंध हाही लोकव्युत्पत्तीनेच जोडता येतो. खंडोबा हा डोंगरदऱ्यातल्या धनगरांसारख्या लोकांचा देव आहे हे पाहता "वाघै"च्या फुलमाळांशी वाघ्याचा संबंध अधिक सुसंगत आहे. १०

द ४३६९	वाकै	शिरीष, काळा शिरीष वगैरे
त ३५७४	वाकै	विजयी वीरांनी मस्तकावर धारण केलेली शिरीषमाला

'वाकै' मोरपिसासारखी फुलते असा दाखला संघसाहित्यात आला आहे. हा मोराशी भासणारा साम्यसंबंधही लक्षणीय आहे.

येळकोटासारख्या सांघिक घोषाभोवती अनेक अर्थ आणि भावना पिढ्यानपिढ्या साकळत येत असतात. 'सप्तकोटीश्वर'सारख्या संस्कृत शब्दांवरून त्याचा अर्थ निश्चित होणे कठीण. उलट एलु कोटि अशी फोड करून त्याचा उद्भ्रंश-अनुवाद सप्तकोटी झाला असणे जास्त शक्य. मस्तकी फुलांचे हार घालून भंडार फेकीत नाचत असताना 'उचला तळी उचला (मंदिर उचला) काठी उचला' असा घोष होणे सहज आहे. त्यावरून येळकोटाची उपपत्ती लाभते. देव काठीत असतो या समजुतीचा 'पवाड्या'तील उल्लेख : (ओळी २२३-२६) ११

काडुङ् कावुङ् कविन्पेरु तुरुत्तियुम्

रानात, राईत, मनोहर ओघळीत

यारुङ् कुलनुम् वेऽरु पल् वैप्पुम्

नदीत तटाकी इतरही किती ठायी

चतुक्कमुञ् चन्तियुम् पुतु प् पूङ् कडम्पुम्

चव्हाट्या-तिठ्यावर, मोहरलेल्या कदंबाच्या-

मन्रमुम् पोतियिलुङ् कन्तुटै निलैयिनुम्
—चावडीत, पटांगणी अन् कन्दुमाजि वसणार

अर्थात या कवनात मुरुगाचा वास सगळीकडेच असल्याचे सांगितले आहे. तरीही कन्तु, कन्दु याला या संदर्भात विशेष महत्त्व आहे. प्रीपल्लवन् तमिल इंडेक्स वरून त्याची माहिती :

कन्तु : गाईंनी खाजवण्यासाठी घासावे म्हणून उभा केलेला खांब. जुन्या काळातला हा एक धर्मादाय होता. एका पूज्य दैवताचे प्रतीक असा खांब. आधार, एकत्र धरणे. संस्कृतवादी या शब्दाची व्युत्पत्ती स्कन्दन् वरून देतात. ज्यात देवता वास करते असे तुटखोड किंवा डांब.

द ११८७ (क०) कन्दु वासरू, केळीच्या झाडाभोवतीच्या कोवळ्या केळी

(ते०) कन्दु लहान मूल

या सर्वातून स्कंद-मुरुगाशी कन्दु चे नाते सिद्ध होते. गाईंच्या खाजवण्याच्या उल्लेखावरून कन्दु-कण्डु अशी व्युत्पत्तीही लागते. कन्दु-कण्डु-खंडुबा हा एक नामविस्तार.

खंडोबाच्या मिथ्याचा आणखी विचार 'इतिहासपूर्व मराठमोळी' या निबंधात केला आहे. साकल्याने पाहता, या लोकदेवाची परंपरा पुष्कळच प्राचीन आहे यात शंका नाही. शिवाय 'संमत' संस्कृतिसंगमाच्याही खुणा त्याच्या इतिहासात आहेत. म्हणूनच त्याची काठी नाचवण्याचे किंवा त्याचा येळकोट बोलण्याचे आवाहन अर्थपूर्ण आहे.

□ □ □

१०. युगे अठ्ठावीस उभा विटेवरी

शनिवार सकाळ. भारताचे दक्षिण टोक रामेश्वर. मंदिराचे पिढीजाद मराठी
पुजारी कर्वे प्रातःकाळी सुप्रभातम् म्हणत आहेत- आकाशवाणीच्या बरोबर. तेथे
तमिळ स्वरलक्ष्मी सुब्बलक्ष्मी गाताहेत. सुप्रभातम् आंध्रातल्या तिरुपतीचे, तिरुपती
श्रीपती. सुप्रभातम् हिंदीभाषी उत्तरप्रदेशातल्या अयोध्येच्या रामाची संस्कृत भूपाळी,
ती संपल्यावर कर्वे भटजी 'रामेश्वरा!' म्हणून उद्योगाला लागतात. रामेश्वर महादेव १
आहे... साराच गोपाळकाला. तरी त्यात मेळ आहे.

जो प्रकार व्यापक संस्कृतीचा तोच एकेका दैवताचा. भाषा आणि भूगोल
यांच्या सीमा ओलांडून ती विविध जनमानसांत विविध रूपांत स्थिरावली आहेत.
वेगवेगळ्या ठिकाणी भावाची आणि भाषेची वेगळीच पुटे चढून त्यांना विभिन्न रूपे
लाभली आहेत. या साऱ्या क्रिया लिखित संस्कृतीच्या जन्माआधी मोठ्या कालावधीत
आणि मोठ्या प्रमाणावर झाल्या असल्यामुळे त्यांचा मागोवा घेण्यासाठी बोलभाषा
आणि लोकाचार यांवरच अवलंबून राहावे लागते.

तिरुपती वेंऽकै टेकडीवर आहे. प्राचीन तमिळांनी वेऽङ्कै आपल्या भाषेची
उत्तर सीमा मानली होती. पण तिरुपतीच्या तिरुमाल् या विष्णुरूपाची गीते परिपाडल् २
या संघ वाङ्मयातल्या गाथेत गायिली आहेत. तिरु=श्री, माल्=सावळा, आकाशवर्णी;
परिपाडल्=स्वरबद्ध गान. परिगानातला माल् मुल्लैचा म्हणजे चराऊ रानाचा,
गोकुळाचा देव आहे. आणि त्याची आठवण मराठीत 'माले' मागण्याच्या भिक्षाटनात
शाबूत आहे. कर्ज, जमीन यांच्या मुक्तीसाठी 'माले' मागणारा भिक्षेकरी गळ्यात
'लाकडी नांगर' अडकवून फिरे!

परिगानातला तिरुमाल् 'तुळशीहार गळां। कासे पीतांबर... कंठी कौस्तुभमणि
विराजित' याच वर्णनाचा आहे. 'गळां तुळशीच्या माळा' या तुकोबांच्या वर्णनानुसार,
विठ्ठलाच्या गळ्यात दोन तरी तुळशीमाळा आहेत. तिरुमालच्या गळ्यातही अशा ३
दोन माळा आहेतच. तमिळ 'तुळाय्' म्हणजे 'तुळशी' बरोबर 'वेट्चि' फुलांची
माळही त्याच्या गळ्यात आहे. पळवलेल्या गाई सोडवायला निघालेल्या विजिगीषु

वीरांच्या गळ्यात ही वेट्चि ची माळ असे. म्हणून तर तिची संस्कृत छाया,
विष्णुरूप विठ्ठलाच्या 'रुळे माळ कंठी 'वैजयंती' "

४ पंढरीच्या विठ्ठलमूर्तीच्या डोक्यावर शिंके असल्याची लोकसमजूत आहे.
लोकोक्तीने तमिळाईची देन जपून ठेवल्याची ही खूण आहे : शिंके या अर्थाच्या
चिमिलि या तमिळ शब्दाचा दुसरा अर्थ शेंडी असा आहे!

५ शेषशायी तिरुमाल् लक्ष्मीला छातीशी घेऊन आहे आणि विठ्ठलाची रखमाई
सवती राहिली आहे. ती लक्ष्मी नसावीच. तमिळ शब्दात, आरंभी र येऊ नये
म्हणून आधी इ लावतात. या 'इरखमाइ'चे तमिळ मूळ असावे : इरक्कम्=कळवळा;
आईला रडव्या तान्ह्याचा, गाईला वासराचा वाटतो तो.

अशा आईकडे येणार त्यांच्या 'अंतरी गजबज' होऊन ते अस्वस्थपणे सैरभैर
६ फिरत असणार. या दोन्ही क्रियांचा वाचक तमिळ धातू 'दिंडाडु'. वारकऱ्यांची
दिंडी आणि काव्यछंद दिंडी दोघांचेही मूळ या 'दिंडाडु'मध्ये असावे. 'वारी'
अशीच तमिळ असावी; कारण वारम् = सूर धरणारे; दुसरा अर्थ 'एक नृत्य'.
वारि = आवक, प्रवेश, दार, रस्ता. वा = ये.

देवाचिया द्वारी गातनाचत येणाऱ्यांचा देवही तसाच गाणारा-नाचणारा. पंडरंगम्
७ किंवा पांडरंगम् म्हणजे शिवाचा, अंगाला भस्म लावून केलेला नाच. विठोबा शिव
म्हटला तर नवल वाटायला नको. तो मूळचा कोणीही असेल. मराठीत इटा = भाला
हा शब्द आहे. त्याचे तमिळ मूळ ईट्टि. हा विठोबा : विठुबा : मुळातला इट्टिधर,
मुरुगन्सुद्धा असेल. नाहीतरी मुरुगन् आणि तिरुमाल् या दोघांचेही वाहन हत्ती
आहे. आणि त्यांच्या ध्वजावर तुरेबाज शेवल् [कोंबडा, गरुड] आहे; किंवा
ई = इणे, विणे यापासून झालेल्या ईट्टम् = मेळावा या शब्दात इठुबाचे मूळ असेल.
पुढे विट्टल म्हणजे मुक्त करणे या धातूशी त्याचा मोक्षदायक म्हणून संबंध जडला
८ असेल. संघवाङ्मयात तिरुमाल्च्या अंगी हे सारे गुण आहेत. मग 'उभा विटेवरी'
कसा? संस्कृत इष्टिका किंवा वीट या अर्थाच्या तमिळ 'इट्टिकै'मुळे. तिचा अर्थ
भालाधारी हात असा होऊ शकतो (कै=हात). समान ध्वनीमुळे, भाल्याची वीट
बनून तिच्यावर पुढची कथावास्तू उभी राहिली असावी.

'मातलेल्या पुंडया'च्या नावात संस्कृत पुण्ड्र, तमिळ पुण्डर् आहे. त्यातल्या
तमिळ पुण्चा अर्थ जखम असा आहे. म्हणून पुंड्र म्हणजे भस्म, चंदन यांचे पट्टे
अंगावर ओढण्याच्या चालीचा, प्राक्समाजातल्या — जखमा भरण्यासाठी हळदीसारखी
पूड टाकण्याच्या — उपायांशीही संबंध असू शकेल. तेव्हा विठोबा मुळात "उभा,
९ 'विटे'वरी कर" [भाला हातात घेऊन उभा] असा असू शकेल. विष्णुरूपाचे
आरोपण नंतर झाले. त्याचे तमिळ रूप विट्टुणु विठ्ठलशी जवळचे आहेच.

पंढरपूर म्हणजे पण्डरांचे गाव. पण्डर् किंवा पाणर् म्हणजे गाणारे लोक,
भाट. त्यांच्यासारखेच संस्कृत सूत आठवावेत. मग पागन् म्हणजे सारथी हा शब्द
पण्डर्सारखाच असेल. मग शिलालेखातील 'पांडरी फड', 'पागनिपुर' या १०
पंढरपूरच्या जुन्या नावांचीही संगती लागेल. 'चंद्रभागे'तला भागु, तमिळ बागु
म्हणजे नदीतट असावा. नदीने उभारलेले बेट (तमिळ नडु, अरंगम्) हे तिरुमालचे
फार प्रिय स्थान सांगितले आहे. तिरुचीचा श्रीरंग अशा अरंगावरच आहे. पंढरीनाथाचे
स्थान असेच आहे. एका परिगानात तिरुमालूचे एक स्थान 'सोलै' [राई, फुलवन]
पर्वतातून निघणाऱ्या शिलंबु नदीवर सांगितले आहे. सोलैचा मराठीत 'सोला'
होईल. पंढरपुराहून सोलापूर मोठा पल्ला नाही. त्याची ही तमिळमधली स्मृती असावी. ११

संघवाङ्मयातल्या अशा शब्दखुणा तमिळच्या महाराष्ट्र प्रदेशातील प्राचीनतेच्या
निदर्शक आहेत, तशा विठ्ठलाच्या प्राचीनतेच्याही सूचक आहेत. ज्योतिषात कोणत्या
तरी दृष्टीने स्पष्ट अशा कालखंडाला युग म्हणतात. संवत्सरचक्राची साठ वर्षे या
कालखंडाला युग मानले तर 'युगे अठ्ठावीस उभा विटेवरी' ही नामदेवांची ग्वाही १२
इतिहासाशीही जुळेल आणि विठ्ठलाला बुद्धाचा अवतार का मानला तेही आकळेल.

□

१२

'युगे अठ्ठावीस उभा विटेवरी' यांसारख्या ओळींवरून इतिहास सिद्ध करणे हा फार निसरडा मामला आहे. या ओळी भक्तकवींनी इष्टदेवतेच्या स्तुति-वर्णनासाठी गायिलेल्या गीतांमधल्या आहेत हे विसरून चालत नाही. विठोबा-विटोबा-इटल हा विटेवर उभा आहे हे मुळात मिथ्य. तो अठ्ठावीस युगे म्हणजे अनंतकाळ तसाच आहे ही भक्तकविकल्पना. त्याच्या ठायी विष्णु, कृष्ण, बुद्ध या साऱ्यांची स्थिती कल्पिणे हा देवतागौरवाचा भाग. ज्ञात इतिहासाशी या विविध चमत्कृतिपूर्ण कल्पितांचा सांधा जुळवण्यासाठी 'संवत्सरचक्राची साठ वर्षे म्हणजे युग' असे 'मानावे' लागते. इतिहाससत्य आहे ते फक्त विठ्ठलाच्या प्राचीनतेचे. त्या साठी हे संतवचन हा पुरावा किंवा प्रमाण होऊ शकत नाही. विठ्ठलाची कालनिश्चिती त्यावरून मुळीच करता येत नाही.

ती प्रागितिहास पुराव्यांनी आणि प्रमाणांनी करावी लागते. प्रागितिहास प्रमाणे साहित्येतर असतात कारण लिखित पुराव्यांच्या आधीचा इतिहास प्रागितिहास असतो. साहित्येतर म्हणजे 'भाषेतर' किंवा भाषेला वगळून जमवलेला मात्र नव्हे. भाषा ही स्वतःच प्रागितिहास पुराव्यांचे एक मोठे भांडार असते. तिच्यातल्या शब्दांमध्येही पुष्कळदा प्रागितिहासाचे दर्शन घडत असते. मराठी भाषेतल्या शब्दांवरून

ते घडवण्याचाच प्रयत्न येथे आहे. तो करताना शब्दांनी बनणाऱ्या विधानांची सर्वांगीण तपासणी करावी लागते. ती विधाने जुन्या काळातली असली तर त्यांचे मिथ्य-आशयही तपासावे लागतात.

अशा तपासाअंती विठ्ठलची प्राचीनता स्पष्ट झाल्यानंतर मग 'युगे अठ्ठावीस उभा विटेवरी' या वचनातल्या काव्याला सघनता आणण्याचा हा प्रयत्न आहे. 'कानडा विठ्ठल तो कर्णाटकू' या अशाच काव्यपंक्तीतल्या 'कानडा' आणि 'कर्णाटक' या शब्दांवरून विठ्ठल हा मूळचा कर्नाटकातला आणि तेथून तो महाराष्ट्रात आला अशी विचारसरणी प्रचलित आहे. तिचा आधारच सदोष आहे. शिवाय कर्णाटकू म्हणजे भुरळ घालणारा आणि कानडा म्हणजे अनोळखी किंवा अगम्य असे अर्थ भाषेत आहेतच. त्यांवरून हे वचन म्हणजे विठ्ठलाचे काव्यवर्णन आहे, त्याच्या इतिहासभूगोलाचे विधान नाही. त्याचसारखे 'युगे अठ्ठावीस उभा विटेवरी' हेही काव्यवर्णन आहे. अठ्ठावीस ही संख्या नक्षत्रसंख्या म्हणून मिथ्यसंकेती असू शकेल, तिला युग = ६० ने गुणून १६८० ही संख्या येते ती नामदेवांच्या १२७०–१३५० या सन कालतून वजा केल्यास सनपूर्व चौथे शतक हा काळ येतो त्यावरून विठ्ठलचा बुद्धाशी संबंध जोडला. ही सर्वच प्रणाली तर्कशुद्ध भासत असली तरी तशी नाही. या प्रकारची अनुमाने अनेकदा मांडली जातात तीही विश्वसनीय नसतात.

२ वेऽङ्कै म्हणजे वेंकटगिरी किंवा तिरुपति-तिरुमलै ही तमिळभाषी प्रदेशाची उत्तर सीमा हे वचन अशाच ग्रंथस्तुतीत आलेले आहे. तमिळ-तेलुगु असे भाषाभेद ठसठशीत झाले होते तेव्हाच अशी विभागणी शक्य होती. ही ग्रंथस्तुती नामदेवांप्रमाणेच जुन्या काळातली असली तरी ती तत्कालीन समाजाने मानलेल्या विभागणीचा निर्देश करीत आहे; तमिळ विद्वान तिच्यातल्या या विधानाचा इतिहास–विधानासारखा वापर करतात तोही तितकासा योग्य नाही.

पण वेऽङ्कै हे स्थलनाम त्या निर्देशाहूनही जुने असल्यामुळे त्याची भाषिक चिकित्सा करून प्रागितिहासाच्या दिशेने जाता आले तर ते जास्त सयुक्तिक होईल. या शब्दाचे अर्थ वाघ, बिबळा वृक्ष असे आहेत (द ४५४१). 'बिबळा वाघ' या मराठी शब्दाशी त्याचा लक्षणेने संबंध लागतो. स्थळनाम वाघाच्या किंवा वृक्षाच्या साहचर्यामुळे आले असणे शक्य आहे. वेंकटेश किंवा बालाजी हा सध्या विष्णुस्वरूप मानला जातो. विष्णूच्या श्रद्धेय रूपात वाघ या प्राण्याला किंवा बिबळा या वृक्षाला स्थान नाही. याचा अर्थ असा की वेंकटेश या नावामागेही अनेक श्रद्धांची सरमिसळ झालेली दिसते.

ही सरमिसळ किंवा हा 'गोपाळकाला' सर्वच संस्कृतींमध्ये झालेला असतो.

आपण जिला भारतीय संस्कृती म्हणतो तिच्यातही तो आहेच. रामेश्वरी अलिकडच्या १
दोन-तीनशे वर्षांत अनेक मराठी कुटुंबे जाऊन राहिली. त्याला आपण मराठी व तमिळ संस्कृतींचे मिश्रण किंवा सहजीवन समजतो. (त्या दोन संस्कृती विभिन्न आहेत असेही आपण मानीत असतोच.) मराठी आणि तमिळ यांचा संबंध कधी आला असला तर तो इतकाच आणि इतका अलिकडचाच अशीही आपली धारणा असते. प्रस्तुत लिखाणात, हा संबंध खरा किती प्राचीन आहे याचे दर्शन होत आहे.

या प्राचीनतेचे एक गमक म्हणजे श्रद्धेय दैवतांच्या बाबतीत आजच्या विविध भाषा-संस्कृती-प्रदेशांतील समाजांमध्ये दिसून येणारा संमिश्र सारखेपणा. संमिश्रता जितकी जास्त तितकी प्राचीनता अधिक. सारखेपणा आद्य एकता दाखवतो; या संमिश्र सारखेपणाची शास्त्रमान्य स्पष्टीकरणे काही मानीवांवर आधारलेली आहेत. दैवतांच्या बाबतीतले एक मानीव असे की, वैदिक आणि पौराणिक साहित्यात वर्णिलेल्या आर्य दैवतांचे आरोपण लोकदेवतांवर होत आले आहे; या दैवतांची रुढ नावेही आर्य दैवतांच्या संस्कृत नावांचे अपभ्रंश आहेत.

वास्तविक, अशा मानीवामुळे या दैवतांना आपण आधीच 'इतिहास' काळाच्या कक्षेत ओढून घेतो; कारण सगळे आधार लिखित (किंवा ग्रथित) साहित्यातूनच घेतले जातात. अनेकानेक लोकदैवते तर समाजाच्या आचार-व्यवहारांत आणि मिथ्यकथांमध्येच विद्यमान आहेत; आणि त्यांना मोठी परंपरा असल्याचे दिसते. म्हणजे दैवते अस्तित्वात आहेत पण त्यांचे 'शास्त्रमान्य' पुरावे उपलब्ध नाहीत! साहजिकच, उपलब्ध आहेत त्या पुराव्यांची छाननी प्रागितिहासाच्या पद्धतींनी करणे हाच पर्याय उरतो.

उदाहरणार्थ विठोबाच्या गळ्यातल्या माळा. यदाकदाचित विठोबा हा प्राचीन ३
आर्यांचा विष्णूच असला तरी वेदामध्ये ओझरताच उल्लेख आलेल्या विष्णूच्या गळ्यात अशा माळा असल्याचा उल्लेख सापडणेच नाही. त्यामुळेच या माळांचा शोध संस्कृतींच्या संमिश्रतेत करावा लागतो. मग आजच्या दक्षिणी संस्कृतीत विष्णुरूप मानलेला तिरुमाल आणि मराठी संस्कृतीत विष्णुरूप मानलेला विठोबा यांचा एकमेकांशी पडताळा पाहणे योग्य व अवश्य ठरते.

विठोबाच्या गळ्यातली वैजयंती म्हणजे काळी तुळस ही मराठी वारकऱ्याची श्रद्धा आपण नाकारीत नाही. पण तिरुमालच्या गळ्यात आणि गोग्रहणाच्या लढाईत विजयी होणाऱ्या वीरांच्या गळ्यातही वेट्चि फुलांच्या माळा असत हे ग्रथित उल्लेख आपल्याला दोन हजार वर्षांपूर्वीच्या काळातली परंपरा दाखवून देतात. या इतिहासावरून आपण प्रागितिहासाकडे जातो. मग विठ्ठलसदृश देव पुरातन आहे याची खात्री पटते. मग वेट्चि-विजय-वैजयंती यांच्यातले भाषिक नाते दिसू लागते.

वेरृरि असा लिहून वेत्ति असा उच्चारला जाणारा तमिल शब्द विजय या अर्थाचा आहे हा सहायक भाषिक पुरावा होतो. तमिळ उच्चारणात त्त चा अनेकांच्या तोंडी च्च होतो हे निरखणही कामी येते. परिणामी तुळशीच्या माळांमधला संमिश्र सारखेपणा उघड होतो.

४ विठ्ठलाच्या गळ्यातली एक माळ 'वैजयंती' तुळशीची आहे ही श्रद्धा अभंगात गोवली गेली म्हणून तिला लेखी पुराव्याची प्रतिष्ठा प्राप्त झाली. वास्तविक ही माळ असल्याचे कवीने मूर्तीवरून ठरवले. त्याच मूर्तीवरून लोकांनी विठ्ठलाच्या डोक्यावर शिंके असल्याचे श्रद्धेने ठरवले. ग. ह. खरे यांनी बारकाव्याने निरखून शिंके कोठे दिसत नसल्याचा निर्वाळा दिला आहे. याच शिंक्याचा प्राचीन ओवी-अभंगात उल्लेख असता तर त्याचे महत्त्व थोडे वाढले असते. खरे पाहता श्रद्धेच्या पातळीवर वैजयंती माळ आणि शिंके यांचे अस्तित्व सारख्याच तोलामोलाचे आहे. शिंक्याविषयीची श्रद्धा (किंवा मिथ्य) कशी उदित झाली असावी याचे भाषिक स्पष्टीकरण चिमिलि या शब्दावरून दिले आहे. शिंक्याच्या कल्पित अस्तित्वाचे मिथ्यसंबंधी कारण असे दिसते की हा देव गवळ्यांचा किंवा धनगरांचा होता म्हणून त्याच्या मानवरूपात शिंके त्याच्या डोक्यावर असणे साहजिक मानले गेले. याच देवाचा भक्त शेंडीची गाठ मारणारा ब्राह्मण असता तर त्याने शिंक्याच्या जागी शेंडीची कल्पना केली असती. शब्दाचे एकत्व अशा विविध अर्थनांना उपयोगीच होते.

५ मूर्तीच्या रूपाबद्दल जशा विविध कल्पना बांधल्या जाऊ शकतात तशाच तिच्या मानवसदृश कुटुंबाबद्दलही मांडल्या जातात. तिरुमाल् हा खरा द्वंद्व समास असावा. तिरु म्हणजे स्त्री, माल् म्हणजे सावळा वगैरे. माल् ला विष्णू म्हटले की त्याची 'तिरु' लक्ष्मीच होणार. हल्ली तिरु हा शब्द 'श्री' या उपपदाचा समानार्थी म्हणून तमिळमध्ये वापरतात. श्रीमतीसाठी तिरुमति. तिरुमाल् या दैवताचे मिथ्य मुळात कोणत्या गोचरावर बसवले गेले याचा वेगळ्या दिशेने शोध करणे शक्य आहे. इथे लक्षात घेण्याची गोष्ट अशी की माल्-विठ्ठल-विष्णु यांचे उत्तरकाली कल्पिलेले एकरूपत्व आदिम काळी होतेच असे मानता येत नाही. लोक-देश-काल-परत्वे त्या प्रत्येकाविषयी वेगवेगळ्या मिथ्यकथा निर्माण होण्यात नवल नाही; एकाच दैवताच्या एकाच लोक-देश-कालातही विविध कथा प्रचलित असतातच.

म्हणून रखमाई सवती राहत असेल तर ती 'तिरुमालच्या लक्ष्मीपेक्षा वेगळी कशाने?' या प्रश्नापेक्षा 'तिचे खरे स्वरूप काय असावे?' हा प्रश्न जास्त वाजवी ठरतो. भाषेच्या दृष्टिकोनातून ती 'कळवळा करणारी' देवता असावी असे अनुमान केले आहे. विठोबा रखमाईच्या लोककथांमधून याची छाननी करावी लागेल. रखुमाई ही रक्माई किंवा रुक्मिणी समजून विठ्ठलाचा कृष्णाशीही संबंध जोडला जातो. त्या

संदर्भात रुक्मिणी रखुमाई इरक्कु-आयि ही संमत जुळणीही ध्यानात घेण्यासारखी आहे.

दैवतांविषयीची निरखणे त्यांच्या नाम-रूपाभोवतीच घोटाळत ठेवून भागत नाही. ज्यांनी त्या दैवतांना निर्मिले आणि टिकविले त्या भक्तजनांचाही मागोवा ६
घेतला पाहिजे. त्यांच्या भाषेत दैवत, त्याचा पूजापाठ इत्यादिकांविषयी उपयोगात असलेल्या शब्दांना व्याख्या– किंवा परिभाषा- शब्दांचे स्थान मिळते. दैवतविषयक आचारधर्मांनी त्यांच्या संस्कृतीची घडण होत असते.

दिंडी, वारी, वारकरी या सर्वांचे विठ्ठलाशी घनिष्ठ संबंध आहेत. या प्रथांच्या स्वरूपावरून या शब्दांचे अर्थविस्तारही झाले आहेत. उदा. नापास होऊन पुन्हा पुन्हा परीक्षेला बसणारा 'वाऱ्या करतोय' असे आपण म्हणतो. यात वारी म्हणजे येरझारा असा अर्थविस्तार आहे. विठ्ठलासाठी होणाऱ्या वारीत देवभक्ती असते, परीक्षेच्या वारीत देवभक्तीला स्थान नसते. म्हणजे, 'देवभक्तीसाठी येरझारा' अशा अर्थाचा शब्द 'येरझारा' या सामान्य विस्तारित अर्थाने प्रचारात आला. याच न्यायाने 'देवभक्तीसाठी येरझारा' हाही विस्तारित अर्थ असू शकेल. देवभक्तीशी संबंधित दुसराही काही आचार मूळचा असू शकेल आणि तो देवाकडे जाऊन किंवा जाताना करावयाचा असल्याने त्या जाण्यालाच त्या आचाराचे नाव मिळाले असेल. असा तर्क वारम् वगैरे शब्दांचे तमिळ अर्थ आहेत त्यांच्यावरून करता येतो.

७
नाचून गाऊन आनंद किंवा भक्तीसारख्या भावना व्यक्त करण्याची परंपरा आदिम समाजांमध्ये होती. या दृष्टीतून पाहिले तर वारीची चाल बरीच जुनी असले पाहिजे. ही चाल विठोबाच्या संबंधातच टिकून राहिली आहे. यावरून विठोबा हे दैवतही प्राचीन असले पाहिजे. 'तो मूळचा कुणीही असेल' या वाक्याचा अर्थ असा की एकेका मिथ्यगुणाची वेगवेगळी दैवते ज्या आदिम काळात कल्पिली जात होती त्यातल्या नेमक्या कोणत्या गुणाचे विठोबा हे दैवतप्रतीक होते हे नक्की सांगता येणार नाही. नाचणे हा देवगुण शिव, मुरुगन्, कृष्ण या साऱ्या देवांना लागू पडतो. त्यामुळे नाचण्याच्या गुणविशेषावरून येणारे नाव तिघांनाही लागू पडण्याचा संभव असतो. अशा नावात मग साहजिकच आपल्याला दैवतांची संमिश्रता दिसू लागते.

'विठ्ठल'सारख्या नावाचे विश्लेषण व्युत्पत्तींच्या किंवा शब्दविग्रहाच्या रीतींनी वेगवेगळ्या पायांवर केले तर या संमिश्रतेचा प्रत्यय येतो. जवळजवळ समान ध्वनी असलेल्या शब्दांचे वेगवेगळे अर्थ लक्षात घेतल्यास विठ्ठल या दैवताची अनेक कल्पित 'मूळरूपे' सिद्ध होतात. अनुषंगी पुराव्यावरून त्यांचे बरेवाईट समर्थनही होऊ शकते.

पण ही 'मूळरूपे' ही दैवताच्या मूळोत्तर काळातली असू शकतात. आद्य 'मूळरूपा'चे शब्दवर्णन ढोबळ असावे असे धरले तर विठ्ठलाचे मूळरूप 'कंबरेवर हात ठेवून उभा राहिलेला देव' इतकेच शब्दवर्णनात येत असावे हे 'मराठी संशोधन पत्रिका' जुलै-सप्टें० १९७९ च्या अंकात दाखवले आहे. इटु, इटू, विठू वगैरे गाववरान मराठी रूपांमध्ये टिकून राहिलेले हे रूप शब्दांमध्ये मात्र अनेकांशी जोडले जाऊ शकत होते. तमिळमधल्या अशा शब्दांशी जोडले जाऊन 'विठ्ठल' या उद्‌भ्रंश-शब्दात त्याची परिणती कशी होऊ शकते ते या ठिकाणी दाखवले आहे.

८ दैवतांच्या संमिश्रणाला भाषांच्या संमिश्रणातून निघणाऱ्या लोकव्युत्पत्ती कामी येऊ शकतात याचे उदाहरण इष्टिका-ईट-इट्टिकै या संमत शब्दत्रिकूटावरून येथे दाखवले आहे. अर्थात 'विटेवरचा देव म्हणून विठोबा' या लोकव्युत्पत्तीला फक्त मिथ्याचे स्थान दिले आहे. मग पुंडलिक-पुंडरीक हेही मिथ्यपुरुष ठरतात. लोकसमाजात 'मातलेला पुंड्या' तर पुराणांतरी 'पुण्डरीक मुनिवर' अशी जोडगोळी 'वाल्या कोळी' आणि 'वाल्मीकी मुनी' या समांतर जोडीची आठवण करून देते. शब्दांचे उद्‌भ्रंश, कथानायकांची उन्नती आणि मिथ्यकथेचे उन्नयन असे तिन्ही प्रकार येथे घडताना दिसतात. विविध भाषा-बोली परस्परांवर परिणाम करीत होत्या याची ही चांगली खूण आहे.

संस्कृत शब्दांचे 'अपभ्रंश' लोकभाषांमध्ये स्थिर झाले या तत्त्वाशी हे प्रतिपादन विरोधी आहेच. ईट-इष्टिका अशा गावरान मराठी आणि वैदिक-संस्कृत शब्दांची जोडी बांधणे हे शुद्ध पाखंड मानले जाईल. यात कालविपर्यासाची परिसीमा झाली असेही वाटेल. वस्तुतः तसला काही प्रकार नाही. यात कालविपर्यास झाला असे मानण्यापेक्षा वेदकाल हा भारतीय भाषांचा प्राचीनतम काल मानणारी तत्त्वी बदलावी; गावरान मराठीत किंवा तमिळेत पूर्ववैदिक भारती भाषाकलापाचे अवशेष असू शकतात हे मानावे; आणि 'संमत' पद्धतीने या शब्दांची उपपत्ती तपासावी.

तशी तपासली तर 'इष्टिका' शब्द इष् इच्छिणे या धातूवरून व्युत्पादिला जातो असे आढळते. 'इच्छिले ते देणारी' असा वीट चा 'धात्वर्थ' या व्युत्पत्तीवरून प्राप्त होतो. यज्ञवेदीत विटांचा उपयोग होत असे. यज्ञच मुळी इष्ट कामनांची पूर्ती करीत असे. त्यामुळे वीटसुद्धा 'इष्टिका' म्हटली गेली असे दिसून येते. म्हणजे हे विटेचे 'वर्णन' नसून 'व्याख्यान' आहे! इष् या धातूवरून व्याकरणनियमांनुसार घडवलेला हा शब्द आहे. यज्ञप्रधान संस्कृतीच्या भाषिक पंडितांनी वीट या वस्तूविषयीची आपली श्रद्धाच त्याच्याद्वारे व्यक्त केली आहे.

याउलट ईट-इट्टिकै या शब्दांचे वर्णनपर स्वरूप त्यांच्या मुळाशी असलेल्या पुढील शब्दांवरून दिसते :

द ३७५	इट्टु (इट्टुव-, इट्ट-)	ठेवणे, आत घालणे, भरणे
(मलै०)	ईट्टु	ठेवण, स्थिरता, टिकाऊपणा
द ३६८	इटम्	जागा, 'अवकाश', ठिकाण
(मलै०)	इट	जागा, घर
द ३८५	इट्टलि	(इडली), तांदूळ आणि उडीद मिसळून केलेला काला उकडून बनवलेली वडी

यांत टु हा ध्वनी शब्दारंभी येऊ नये या तमिळच्या दंडकामुळे इट्टु मधली आद्य इ आली असेल असे मानून ग्रामीण मराठीने तिचा लोप केला असावा. कारण 'टु' हा आज्ञार्थी प्रयोग 'ठेव' या नागर प्रयोगाऐवजी ग्रामीण मराठीत येत असतो. या शब्दांच्या संदर्भात मराठी-तमिळचा संबंध असा दिसून येतो. मग, 'घर' बांधण्यासाठी साच्यात चिखल 'घालून' बनवली जाणारी, नंतर एकावर एक 'ठेवून' दिली जाणारी वस्तू हे विटेचे स्वरूप ईट-इट्टिकै या शब्दांनी व्यक्त होते. तो शब्द वर्णनाचा आहे, व्याख्येचा नव्हे.

ईट-इट्टिकै या वर्णनाची इष्टिका ही समध्वनी संस्कृत आवृत्ती झाली आणि तिची व्याख्या यज्ञसंस्थेच्या संदर्भात झाली. संमत शब्द एकाच बीजाचा पण त्याच्या उपपत्ती मात्र आता दोन झाल्या. या दोन उपपत्तींनी मिथ्यकथा घडवायला मदत केली असणारच. त्यांच्यापैकी इष् वरून काढलेली उपपत्ती तेवढी खरी असे मानता येणार नाही. वर्णनात्मक उपपत्ती अधिक खरी असावी. ती आपल्याला 'इष्टिका' या वैदिक-संस्कृत शब्दाच्याही मागे नेते.

विठ्ठलाच्या पायाखालचा विटेचा आधार जसा काढून घेतला तसाच विष्णु- ९
रूपाचा त्याचा मुखवटाही काढता येतो. पुंड्या-पुंडलीक, ईट-इट्टिकै ह्या तुलनांवरून एक, तर पुंड्र-पुंडरीक, इट्टिकै-इष्टिका या तुलनांवरून दुसरी अशा आदिम समाजाला जाऊन भिडणाऱ्या उपपत्ती निघू शकतात. या दुसऱ्या उपपत्तीत, या दैवताचे आधीचे किंवा एक रूप मुरुगन् देवाचे असण्याची शक्यता सुचवली आहे. तोल्काप्पियात पाच प्रदेशांचे पाच देव सांगितले आहेत. त्यांच्या संमिश्र सारखेपणाचा आधार या उपपत्तीच्या मुळाशी आहे. तिच्यावरून या देवाचा धनगरांशी असलेला संबंध स्पष्ट होतो. माल् असो की मुरुगन् असो, त्याला जर विष्णु नाव दिले तर विट्टुणु असे त्याचे तमिळ नाव पडले असते. ते विठ्ठल या नावाला कन्नड बिट्ट या नावासारखेच जवळ आहे. ही तिन्ही नावे त्या आदिम दैवतावरची आरोपणे असू शकतात.

इट्टिकै-इष्टिका, विट्टुणु-विष्णु अशा जोड्यांमधून ट्-ष् अशी जुळत्या ध्वनींची १०
जोडीही आपल्याला प्राप्त होते. अर्थात पूर्ववैदिक भाषाकलापातल्या ध्वनिकाची

कल्पना करता येते. इतक्या पूर्वकाळापर्यंत नजर पोचू लागली म्हणजे आर्य-द्रविड यांसारखे वैदिक कालोत्तर मानले गेलेले संस्कृतिक भेदही लुप्त होऊ लागतात. समान संस्कृती आणि भिन्न भाषा यांचा परिणाम आढळतो तो असा की, समान संकल्पनांच्या जोड्या असमान शब्दांनी व्यक्त होऊ शकतात. उदा० संस्कृत परंपरेतल्या सारथ्यांना तमिळेत पाकनर् तर गायकांना पण्डर्-पानर् अशा संज्ञा आहेत. पण जितांना सारथी आणि गायक म्हणून ठेवण्याची परंपरा तोलकाप्पियात वगैरे सांगितली आहेच. म्हणजे गोग्रहणासारखी हीसुद्धा परंपरा या तथाकथित दोन संस्कृतींना समसामान्य आहे.

म्हणून मग पांडरी-फड आणि फागनि-पुर या, शिलालेखांमध्ये आलेल्या दोन वेगळ्या नावांचीही अर्थसंगती आपल्याला लागू शकते. ही नावे शिलालेखांच्या पुष्कळ पूर्वीपासून प्रचलित असली पाहिजेत हेही पटते. म्हणजे समान संस्कृति-परंपरेच्या मानीवाला स्थळनामांचा प्रागितिहासदर्शी आधार प्राप्त होतो. ग० ह० खरे यांनी 'महाराष्ट्राची चार दैवते' या ग्रंथात म्हटले आहे :

> एवंच पंढरपूरच्या विठ्ठलाच्या स्थापनेचा काळ अकराव्या शतकाच्या पाठीमागे नेण्यास पुरावा नसला तरी विष्णूच्या विठ्ठलस्वरूपाची भक्ति मात्र महाराष्ट्र व सामान्यतः दक्षिण हिंदुस्थान यामध्ये यापूर्वीही चालू होती असे घारापुरी, तिरुपति, अहोबलम् इत्यादि ठिकाणच्या मूर्तीवरून म्हणता येते. पंढरपूर गावाचे मूळ नाव संस्कृतमध्ये पंडरिका व कानडीत पंडरगे असावे (१८९)

आपल्या या शोधाभ्यासामुळे पंढरपूरचे मूळ नाव संस्कृतातल्या अर्थ न लागणाऱ्या शब्दांशी निगडित करावे लागत नाही आणि विठ्ठलाने पंढरपूर हे स्थानही तिरुपती वगैरेंसारखेच अकराव्या शतकाच्या पुष्कळच पूर्वीचे असले पाहिजे याची खात्री पटते.

११ पंढरपूरच्या अरंगसदृश स्थानाचा पारंपारिक पाठिंबा या खात्रीला मिळतो. सोलापूरसारख्या गावाच्या नावाचा अर्थ एरवी स्पष्ट नाही पण तिरुमालविषयक काव्यात येणाऱ्या तमिळ शब्दांवरून त्याचाही अर्थ लागतो. हे सर्व पुरावे अनेक पैलूंचे असूनही एकमेकांना अविरोधी आणि पूरक आहेत. त्याचमुळे विठ्ठलाच्या अवतीभोवती गोपाळकाला झालेला असला तरी त्याचा मेळ लागतो.

□

या निबंधावर संशोधन-लेखनाच्या रूढ पद्धतीनुसार टीपा दिलेला लेख 'मराठी संशोधन पत्रिका' जुलै-सप्टेंबर १९७९ अंकात प्रसिद्ध केला होता. त्या टीपांमधले

आधार वरच्या 'वृत्ती'त आले नाहीत ते पुढे देतो. अभ्यासकांना त्याचा उपयोग होईल. संदर्भांक वरचेच. तमिळ वरूनचे अनुवादक् बहुतेक ठिकाणी प्रतिशब्द अनुवाद आहेत.

वेऽङ्कै : वाघ. बिबळा वृक्ष (प्टेरोकार्पस मार्सुपियम्). सोने २

मलैयाळम् वेङ्ङ ऐन वृक्ष (टर्मिनाल्यि टोमेंटोसा). द. ४५४१

या दोन्ही झाडांच्या फुलात पिवळा रंग असतो. म्हणून मराठीतला 'बिबळा वाघ' अर्थतः या रंगाशी संबंधित असावा, महाराष्ट्र शब्दकोशात दिल्याप्रमाणे बिब्याशी नव्हे. बिबळा म्हणजे चित्ता याचा संबंध बिब्याच्या डागांशी असावा. या झाडाचा गोंद फार औषधी आहे. तमिळ शब्दाचे मूळ वेऽ = जळणे यात असावे.

तोल्काप्पियम् च्या आरंभी पनम्पारनार याने केलेल्या स्तुतीचा आरंभः

वटवेऽङ्कटन् तेन्कुमरि आयिटैत्

तमिळ्कुरुम् नल्लुलकत्तु

'उत्तर-वेंकट दक्षिण-कुमरि यांच्यामध्ये

तमिळ-नामक चांग-लोक'

वेंकट चा अर्थ मराठीतल्यासारखाच.

द १४४८ कुमरि = डोंगरातली शेती. 'कन्या कुमारी'मधील कुमारी हे संस्कृतकरण आहे. भाषिक संकरात शब्दांचे थोडे बदल होऊन, खासकरून दैवतांच्या नामरूपात केवढे बदल होतात हे यावरून दिसून येते.

परिपाटल् : तमिळ संघवाङ्मयापैकी, २२ पूर्ण आणि ११ अपूर्ण अशा गाण्यांचा ३ संग्रह. यात तिरुमाल् विषयक सहा गीते आहेत. परिपाटल् हे एका छंदाचे नाव आहे. संघवाङ्मयात भक्तीचा आविष्कार असलेला हा एकच संग्रह.

माल् : (मा = काळा) : काळा, काळेपणा, मेघ, विष्णू द ३०१८

मुल्लै : तोल्काप्पियातील मुल्लै ची व्याख्या :

मायोऽन् मेऽय काटुरै उल्कम् (पोरुल् ५)

'तिरुमाल्ची सत्ता असलेला वनाचा प्रदेश'

याचा थोडासा निर्देश 'इतिहासपूर्व मराठमोठी : १५. पंचजन समाज' यात आला आहे.

बलराम : परिपाटल् १ मधील तिरुमाल्चे वर्णन :

... एऽन्तिय

वाय्विल्ङ्कुम् वलै नाञ्जिल् ओरुकुळै ओरुवन्

'उचलून

मुख-प्रकाशक बाकदार नांगर, तळपत-कुंडल-धारी'

यावरील संपादकीय टीप :

तिरुमाल् कृष्ण आणि बलराम यांचा एकाच वेळी अवतार घेऊन आला. जाणते सांगतात की कृष्ण पाऊण भाग आणि बलराम पाव भाग नारायणांश घेऊन जन्माला आले. यामुळे बलरामालाच तिरुमाल् मानून आपल्या स्तवनाला कवीने आरंभ केला. याचे अवधान ठेवले पाहिजे.

माले : कोशातले या शब्दाचे उदाहरण :

काष्ठाचा नांगर गळ्यांत। खांडश्मश्रु वाढलें बहुत। ब्राह्मण आला मालें मागत। करा साहित्य म्हणतसे॥

या शब्दाचा अर्थ 'कर्जफेडीसाठी भिक्षा' असा दिला असला तरी या उदाहरणातल्या वर्णनावरूनसुद्धा त्याचे पूर्वकालीन धार्मिक आचाररूप अजमावता येते. 'माल्' हा अंश असलेले, तिरुमाल्शी संबंध असू शकेल असे काही आणखी मराठी शब्द :

मालण	अतिशय सुस्वरूप स्त्री (लक्ष्मी?)
मालीतुळस	रानतुळस
मालें	संगजिऱ्यासारखा पूड होणारा दगड (अंगावर पट्टे ओढण्यासाठी?)

वर्णन : परिपाटल् १५ मधील वर्णन : ओळी ५४-५६

कल्लणि पचुन्तुलविनवै, करुङ्कुन्रनैयवै;
ओल्लोलियवै; ओरुकुळैयवै;
पुल्लणि पोलङ्कोटियवै;
'मधासारखी ताजी कोवळी तुळसी धरणाऱ्या, काळ्या पहाडाचा रंग धारण करणाऱ्या;
तेजाचा लोळ अंगी असणाऱ्या; अद्वितीय कुंडलधारी;
गुरुडप्रभेप्रमाणे सुंदर माला धारण करणाऱ्या...'

परिपाटल् १३ मधील वर्णन :

मणिवरै यूरन्त मुङ्गुल् आयिरुरु
आणिवनप्पमैन्त पूनतुकिल् पुनैमुटि
'रत्नगिरीला बिलगल्या मेघातिल सूर्याची
प्रभा-थोरवी-वाहत्या फुलांबराचा परिधानी'...

४ चेट्चि : या फुलाचे शास्त्रनाव इक्झोरा कोक्सिनिआ. मराठी नावे : बकुली, पंकुल, पेंडगुल. फुले लाल, वर्षभर.

त ३७६८

लक्ष्मी : परिपाटल् १ मधील वर्णन : ५

आयिरम् विरित्त अणङ्कुटै अरुन्तलै
तीयुमिळ् तिरनोटु मुटिमिचै अणवर
मायुटै मलर् मार्पिन् मैयिल्वाल्-वळैमेऽनि
'सहस्र पसरल्या भीतिप्रद अरुवार*
गरळ-ओकत्या, धीरत्वाने, फणांवरी सुस्थिर
लक्ष्मीयुत विशाल-वक्ष, हीणहीन-धवल-शंख-कान्ती'

(*अरुवार=दुर्मिळ, अलभ्य. ज्ञानेश्वरीतल्या या शब्दाचे विवेचन 'म्हाटेचि बोल' या निबंधात आहे)

इरकम् : त ३०४ इरङ्कु करुणा येणे

रखुमाई या नावाशी जुळणारा दुसरा शब्द; इर – इरवल्=भिक्षा विनवणी इत्यादी अर्थाच्या बीजावरून असलेला मलैयाळम् शब्द :

द ४०० इरकुक भिक्षा मागणे.

दिंडी : त १८७२तिण्टाडु, तिण्टाट्टम् ६

तिण्टि एक प्रकारचा ढोल
तिण्टि खाणे (नागपंचमीच्या दिवशी शेतकरी 'दिंडे' करतात.)
तिण्टन बळकट जाड पुरुष (मराठी (धिंडका')

वारकरी : द ४३११ वरु (आज्ञार्थः वा) येणे.

द ४३८७ वार् वाहणे (वारि = पाणी)

त ३६१० वारम् < वार् मधुर गीत. मुख्य गायकाला विसावा मिळावा म्हणून साथीदाराचे गाणे. देवतास्तोत्र. एक प्रकारचा नाच.

(वारियर् हे देवाचे सेवेकरी असतात)

पांडुरंग : द ३२०९ पण् करणे. अलंकरण ७

त २४४८ पण् गीत, संगीत. मुखवट्याचा नाच
त २४४९ पण्टर् भाट, खालच्या जातीतले गायक
त २५९६ पण्टरङ्कम् शिवाचा नाच
पाण्टरङ्कम शिवाने त्रिपुराचा नाश केला तेव्हा केलेला नाच.

या दोन्ही शब्दात अरङ्कम् आहे. त्याचा अर्थ

द १६६ अरङ्कु, अरङ्कम् रंगभूमी, नृत्यकला, सभागृह

पण्डरांच्या नाचालाच शिवाच्या नृत्याचे उन्नत रूप आले हे उघड दिसते. पाण्डुर म्हणजे पांढरा हे नंतरचे आरोपण.

पाल् = दूध, त्याचे पानूर हे भूतवाचक धातुसाधित रूप, यावरून दुधी या

अर्थी 'पांढरे' आले असावे हे 'मराठी भाषेचे मूळ' मध्ये आले आहे.

इटुबा, इट्ठल : त ३७६ ईट्टम् मेळावा, झुंबड, भक्तमेळा

त ३७७ ईण्टु एकत्र येणे, मोठ्या संख्येने असणे

यांच्या मुळाशी ई = देणे, ईन् = विणे यांसारखे धातू असावेत. आणखी एक शब्द आहे :

द ३७८ इट्टलम् जमाव, झुंड वगैरे

यातल्या ळ च्या महाप्राणामुळे इट्ठल असे रूप होणे शक्य आहे.

८ इटुबा, विटोबा : त २७५ इट्टि (तुळना : यष्टि) भाला.

ईट्टि (तुळना : यष्टि) भाला. कोशातले याचे उदाहरण परिपाटल् ५.६६ 'मुरुगन्' मधून दिले आहे :

चेरियिलै ईट्टियुम् कुटारियुम् कणिच्चियुम्

'गर्द-माळलेला भाला अन् कुऱ्हाड अन् फरशी.'

इट्टि हा शब्द मात्र परभाषेतून आला आहे असे सूचन आहे. त ३७६

९ तिरुमाल् आणि मुरुगन् : दोघांचीही वर्णने काव्यमयच आहेत. त्यामुळे दोघांच्याही अशा सामान्य गोष्टी असणे अस्वाभाविक नाही. शेवल् म्हणजे नरपक्षी असाही अर्थ आहे. दैवतांना पुढील काळात जे काटेकोर साचेबंद रूप प्राप्त झाले ते आदिम काळात नव्हते असा याचा अर्थ आहे. त्यामुळेच नियमबद्ध मूर्तिविद्येच्या शिफारशी या आदिम दैवतांच्या मूर्तींना लागू पडत नाहीत.

विट्ठल : द ४४१९ विट्टू सोडणे, टाकून देणे

विटु स्वतंत्रता.

पुंड्या : द ३५०८ (कन्नड) पुण्ड / मराठी पुंड

द ३५०६ पुण् जखम, गळू.

मुळात लोकभाषेतल्या शब्दावरून पुण्ड्र वगैरे उद्भ्रंश झाले असावेत याचे हे सूचन आहे. 'पुंड्या' पुंड, म्हणून मातलेलाच असणार.

हळदीची पूड : त २४५० पण्टारम् ग्रामदेवतांचे पुजारी छोट्याशा पेटीत ठेवलेली पिवळी पूड प्रसाद म्हणून लोकांना देतात ती. फुलमाळा विकणारी अब्राह्मण शैवांची जात.

हा मराठी भंडार आहे हे सांगायला नकोच. तो जेजुरीच्या खंडोबाशी आणि तुळजापुरच्या भवानीशीही संबंधित आहे. तेव्हा आदिम काळी समाजाला उपयोगी अशा प्रथेत त्याचे मूळ असणे शक्य आहे.

विटोबा, विष्णु : विठ्ठलाच्या मिथ्यस्वरूपावरून अनेक व्युत्पत्ती बसवल्या गेल्या आहेत. तमिळ शब्दांवरूनही अशा व्युत्पत्ती निघू शकतात हे 'इट्टिकै'

याची तमिळ-संस्कृत फोड करून दाखविले आहे.

विठ्ठलाचा विष्णूशी संबंध कन्नड बिट्ट वरून सामान्यतः लावतात. सध्याचा कन्नड मुलूख मराठी मुलूखाला जवळ आहे हे याचे मुख्य कारण. तमिळ विट्टुणु हा विष्णु चा अपभ्रंश. तरी कन्नड-मराठी जुळत्या शब्दांमध्ये बऱ्य असा भेद आहे, तेवढासुद्धा तमिळ-मराठी रूपात नाही हे लक्षात घ्यावे.

पुन्हा, या पश्चात् – व्युत्पत्ती असू शकतात. विष्णू या शब्दाचे संस्कृत मूळ किंवा मूलार्थ यांच्याबाबतही एकमत नाहीच. यास्काने (निरुक्त १२/१८) विष्णु म्हणजे व्याप्त, प्रविष्ट किंवा व्यापक हे तिन्ही अर्थ त्याच्या त्रिविक्रम-रूपाला अनुसरून दिले आहेत. भारतीय मिथ्यांमध्ये तमिळ–संस्कृत मिथक्रिया (परस्पर परिणाम) झालेली आढळते. ती पाहता, विण् या तमिळ शब्दाचा विष्णूशी संबंध जुळू शकतो.

द २४२२ विण् आकाश, स्वर्ग मेघ

(मलै०) विण्णवर् देवगण

(माल्तो) बिन्ये विजेचा, वादळाचा देव

तुलना : द ३९९४ मिन् वीज चमकणे. वीज

त ३६६५ विण्णु विष्णु

पंढरपूर : 'पण्डरांचे गाव' ही व्युत्पत्ती 'द्रविड महाराष्ट्र'मध्ये सुचवली आहे. १०

पागन् द ३२१९ पण्टि गाडी। तुलना : मराठी बांडी

द ३३३१ पाकन् माहुत, सारथी

त २५८० पाकर् गाडीचे पाते (बावकाड)

चंद्रभागा : त २५८१ पाकु < भाग नदीतट.

या कोशात हा शब्द संस्कृतवरून दाखवला आहे.

द ३१५४ पकु भाग करणे इ०

हे शब्दबीज 'भाग' ला जवळचे आहेच. 'पङ्कु' 'भंग' यांसारखे तुल्य अर्थध्वनींचे शब्दही ही जवळिक दाखवतात.

अरंगम्, नट्टु : परिपाटल् ४ मधील दुसऱ्या ओळीत आरूरु नट्टु (नदी बेट) चा उल्लेख आहे :

अळलपुरै कुळैकोळु निळल् तरुम् पलचिनै
आलमुम् कटम्पुम् नल्यारु नट्टवुम्
काल्वळक्कु अरुनिलै कुन्रमुम् पिरवुम्
अव्ववै मेऽय वेऽरु वेऽरु पेयरोऽय्! ६९

'हाळीपरी फळदळे, दाट सावली देणाऱ्या शाखा (यांनी युक्त)
वड अन् कदम्ब, आणि सुंदर नदी-बेट
यात वाहता रोधक-काय शैलही, अन्यहि (स्थाने)
ती ती व्यापुन, वेगवेगळी नावे मेळवित्या!'

११ सोलै : परिपाटल् १५ वरून

चिलम्पारु अणिन्द चीर्केलु तिरुविन्
चोऽलैयोटु तोटर्मोळि मालिरुङ्कुन्रम्
'सिलंबु नदी शोभवी श्री तेजे, तिरु...
'सोलै' आरंभ शब्द,... माल्-वसतीचा शैल.'

गद्यार्थ : सिलम्बु नदी ज्याला शोभविते असा तिरुमालाचा 'सोलै' शैल.

तमिळमधली स्मृती : संघवाङ्मयात आढळणारे खास शब्द मराठीत, मराठी स्थळ-नामांत वगैरे आढळतात. यावरून मराठीभूमीवर तमिळची प्राचीन वहिवाट असावी. त्या वहिवाटींची ही स्मृती अशी कल्पना. 'द्रविड महाराष्ट्र' मधील शेवटचा भाग पहावा.

युग : 'कांही एक गोष्ट कांही एक क्रमानें एकदा घडून ती तशाच कालक्रमाने पुनः घडण्याचे जे कालपरिणाम तें युग' हा जो ज्योतिषांतील अर्थ...
— शं. बा. दीक्षित : भारतीय ज्योतिषशास्त्र पृ. २४

इट्टु, विट्टु, विटोबा

विठ्ठलविषयीची शोधसामुग्री तमिळाईत आपल्याला किती मोठ्या प्रमाणावर मिळू शकते हे या सटीप निबंधावरून कळेल. आजवर विठ्ठलाचा शोध ज्या प्रमाणांनी मराठी संस्कृत कन्नड या भाषांमध्ये घेतला गेला त्याच भाषिक-मिथ्यकादि प्रमाणांनी तमिळेतही हा शोध घेतला. तमिळ ही 'इतिहासपूर्व मराठमोळी' होती हे मानीव यापूर्वी मांडले आहे. त्यानुसार लोकभाषेतल्या विठ्ठलाच्या नावाचा अर्थच तमिळवरून शोधता येईल.

हे लोकभाषिक नाव इठ्या, इठू, इठल्या अशा विविध रूपांत ऐकू येते. त्यांच्या ग्रंथरूपात आलेला 'व' ही वश्रुती तमिळ आणि मराठी या दोन्ही भाषांत इकाराद्य शब्दांना जोडण्यात येत असते. तमिळमध्ये ट आणि ण हे दोनच मूर्धन्य वर्ण असल्याने मराठी ठ तमिळ ट च्या रूपात आपल्याला शोधावा लागेल. 'पाण्डियन्' या तमिळ विशेषनामाचे संबोधनाचे रूप 'पाण्डिया' असे लिहिले जाते; त्याचा जो उच्चार होतो तो मराठी 'पांड्या' सारखाच. अशा तुलनेतून 'इठ्या' सारख्या रूपाची पीठिका आपल्याला कळते. तमिळ अन्त्य ल्कार धातूचे साधित रूप दाखवण्यासाठी येतो. या सर्व पार्श्वभूमीवर विठ्ठलाचे मूळ आपण 'इ-ट्-' या तमिळ

बीजात शोधू शकतो :

द ३६८	इटम्, इटै	स्थळ, स्थान, जागा
	इटलम्	रुंदी, विस्तार
द ३६९	इटवु, इटै	त्रास, दुःख, दैन्य
द ३७०	इटलै	एक झाड : ओलिआ डिओइका. (मलैयाळम्) जलद जळणारे एक लाकूड.

याची मराठी नावे : एदन, करंब, लौकी, पर-जांब. हे झाड छोटे, तुळतुळीत सालीचे, एकलिंगी (पपईसारखे– नर, मादी वेगळे), जांभळस गोटुळ्या फळाचे आहे. घाटात सगळीकडे होते. याचे लाकूड कठीण खरबरीत, बळकट असते. तोडल्याबरोबर त्याला गोड वास येतो. म्हणून उत्तर कानडा जिल्ह्यात त्याला गुलाबी चंदन म्हणतात. लाकूड कोरीव कामासाठी वापरतात. (गॅझेटियर वरून)

द ३७२	इटि	गडगडाट करणे, गर्जणे (मलैयाळम्) वीज. तडिताघात
द ३७५	इटु	ठेवणे
३७६		- वर मारणे, धक्का लागणे
द ३७८	इटुक्कु	अरुंद बोळ, चिमटा, चिमट्यात सापडणे
	इट्टलम्	गर्दी
	इट्टु	लहान. अरुंद
द ३७९	इटै	जागा करून देणे, बाजूला होणे
	इटचल्	(मलै०) कुटुंबातील वितुष्ट, वेगळे होणे
द ३८०	इटै	मधला भाग, कंबर, (कन्नड) एड
द ३८१	इटै, इटम्	डावी बाजू
द ३८२	इटै, इटैयर्	धनगर, मुल्लै प्रदेशातले गोप मेंढपाळ वगैरे.

ठळक टाइपात दिलेले अर्थ पाहिल्यास विठ्ठलासंबंधीची काही खास मिथ्ये त्यांवरून स्पष्ट होतात असे दिसेल. एका ठिकाणी उभे राहणे, कंबर दोन्ही हातांच्या चिमट्यात धरणे, रखुमाईचे वेगळे राहणे, धनगरांचा देव असणे या तथ्यरूप मिथ्यांची फोड त्यातून उघड होते. इटलै हे झाडाचे नावही फार सूचक आहे. आद्य देवमूर्ती लाकडाच्या असत हे ध्यानी घेता मूळ विठ्ठलमूर्ती या एकलिंगी झाडाच्या लाकडाच्या असणे असंभाव्य नाही.

जनमानसात विठोबाची मुद्रा कोणती आहे? एखादा माणूस विठोबासारखा उभा राहिला आहे असे आपण केव्हा म्हणतो? दोन्ही हात कमरेवर ठेवून तो उभा राहतो तेव्हा. त्यावेळी त्याच्या पायाखाली वीट आहे की दगड की लाकडाचे पिंडे

याचा सुतराम विचार आपण करीत नाही. 'उभा विटेवरी' हेही त्याचे (मिथ्यमूळ) रूप अविरत उद्घोषित असूनही, 'कर कटेवरी' याच (तथ्यमूळ) रूपात आपण विठोबाला पाहतो. ते आदिम रूप आहे. ती नृत्यातली मुद्राही आहे. या सर्व अनेकविद प्रमाणांवरून असे दिसते की

> इठू, विठू, विठोबा, विठ्ठल हे प्रागितिहास काळातल्या गवळी-धनगर या अवस्थेतल्या समाजाचे दैवत महाराष्ट्र प्रदेशात चालत आलेले आहे आणि त्याच्या नावाचा अर्थ 'कर कटेवरी ठेवोनिया उभा' इतकाच आहे.

□ □ □

११. तेतीस कोटी देवा, गोंधळा यावं

शिंगणापुरच्या महादेवा, मुंगीघाटावरनं यावा। १
तुकाई भवानी आई, घाटशिळा सोडून येई।
जोतिबा खळोबा धावा, तरंग काठी होऊन पावा।
ओझर-रांजण गणपती, यावा, विघ्नं आमची सोडवा।
गुंधुळ मांडला, गोंधळ वाढला, हा गोंधळ सोडवावा।
तेतीस कोटी देवा, गोंधळा यावं
बोलाचं बोलीचं सत्य ऐकावं॥

गोंधळे वाघ्ये भुत्ये डौरी : सूत चारण कथेकरी : आम्हा सगळ्यांची एकच परी : घरोघरी देवादारी : डफ संबळ डौर खंजिरी : वाजवून त्यांच्या तालावरी : धर्म नीती सांगतो खरी : आणि त्यांच्यासाठी : करतो किती उठाउठी : शब्द मोडतो २
अर्थासाठी : चारचार भाषा धरतो वेठी : ह्याची गोटी त्याच्या पाठी : तमिळ संस्कृत कन्नड मराठी : भराभरा येतात ओठी : गोंधळ घालतो दिवसरात्री : अर्थ अरत्री ना परत्री : आता उकल एकसूत्री : दावतो देखा अपुल्या नेत्री : उदो उदो ग जाणाई.

जाण-आईचा उदय होतच असतो. तिला त्यासाठी आवाहनाचा सोस नसतो.
हाकारे घालीत असतो आम्ही. मदतीसाठी. तिला कळावे म्हणून तिच्या भाषेत. ३
तिची स्थापना करणाऱ्या आमच्या पूर्वजांच्या तमिळ भाषेत, 'उदवु' म्हणजे मदत. ती आम्ही फिरफिरून मागतो 'उदो उदो' करत. आता तरी म्हटले पाहिजे : उदो उदो ग तमिळाई!

तिच्या 'उदवु'नेच शिंगणापुरातल्या शिंगणा चा अर्थ लागतो. सिंघण चे मूळ
सिंह खरे. पण सिंह चे मूळ सांगताना पाणिनीसुद्धा अडखळले, आणि 'हिंसितो तो ४
सिंह' सांगून झाले मोकळे. तो तर तमिळ चिङ्गन् - सिङ्गन्! त्यातला चि-सि म्हणजे चिटकणे - पकडणे, अनेक शब्दांमध्ये येतो. ऐका चिखल - चिक्कल् हो!

गती मंद करतो तो मुंगी घाट. मती गुंग करते ते 'मुंगी'चे मूळ. त्या
घाटातून नेतात पाण्याच्या कावडी, आणि करतात महादेवाची पाण्यात कोंडी... ५

का=काठी , वडि=दोरी . कावडीची प्रथा तमिळनाडूतही अजुनी आहे . मुङ्गु म्हणजे
पाण्यात बुडविणे आणि मुङ्गिल् म्हणजे बांबू . महादेवाला पाण्यात 'मुंगण्या'साठी
'मुङ्गिल'च्या नळकांड्यातून पाणी नेत असावे . आजही बघा , या मुंगी घाटातल्या
कावडींना लावलेले रांजण 'खालच्या टोकाशी निमुळते होत जाणारे , तांब्या-पितळेचे'
असतात .

६ शंभुमहादेवाला नवसाखातर 'मुडूप , कानगी' वाहतात . तमिळ मुडुक्कु म्हणजे
विनवणी , काङ्गिचै म्हणजे इच्छा .

तुळजापुरची भवानी तुकाई-यमाई अशा अनेक रूपांत अवघ्या महाराष्ट्रात
बसून आहे . त्यांची उत्पत्ती सांगतात की , सीताहरणानंतर राम वनात हिंडत होते ,
तेव्हा मायावी सीतारूपानं पार्वती त्यांच्यासमोर आली . 'श्रीराम म्हणे 'तू का आई' । तेची
नाम लोकांचे ठायी । अद्यापी राहिलेसे पाही । म्हणती तुकाई जगदंबा ॥ '— हे तर
एकनाथांनी सांगितले . मग बाकीची आम्ही भीकनाथ मंडळी काय काय सांगणार
७ नाय ? खरे तर , तमिळ तुकै म्हणजे तुडवणे , कशा-कशावर नाचणे , तुडवून मारणे .
तुकाईने हेच सारे केले अन महिषासुराला ठार मारले— होय की नाही ! म्हणून ती
तुकाई ! सीतामाईशी , पार्वतीदेवीशी संबंध नाई ! तशीच यमाई . ती असेल तमिळ
एमूमै म्हणजे 'आमची आई .' तर यल्लम्मा म्हणजे एल्लमूची— सगळ्याची अम्मा !

तुळजापुरी आणि जेजुरीच्या गडी , प्रचंड शिळा आहेत दगडी . त्यांना देवीचं ,
८ म्हाळसाबाईचं रूप आम्ही दिलं . लोक त्यांना घाटशिळा किंवा घटशिळा म्हणतात .
तमिळ कल् म्हणजे दगड तर चिलै म्हणजे मूर्ती . कट्शिलै असा जोड उच्चार . तसेच
आपले तांदळे . आकार ना वकार अशा दगडाच्या देवाला म्हणतात तांदळा . आम्ही
सांगत असतो की मोरया गोसाव्यांना तांदळा गवसला . . . तांदळाच्या दाण्यासारखा
त्याचा आकार म्हणून त्याला तसं म्हणतात . पण ते दडपून हो . तान् म्हणजे स्वतः ,
तळि म्हणजे देऊळ . तांदळि म्हणजे देव-स्थान , स्वयंदेव . भाव तेथे देव , तांदळ्यांत
का नसावा ?

आमच्या जोतिबाचा डोंगर , त्यातला दगड दगडावर आपटला तर साक्षात
घंटीसारखा आवाज होतोय . तिला तमिळाईत म्हणतात मणि . अन् मणि म्हणजे
रत्नही . झाला की त्या डोंगराचा रत्नागिरी . मणि च्या अर्थीच तमिळ 'ओळि' -
९ त्याचा अर्थ उजेड , जाळ असाही . मग आमचा देव 'ज्योति'बा झाला . तिथंच
यमाई पण होती . शास्त्रीबुवा म्हणाले , 'शिष्यांनो , ऋग्वेदात यमी आहे , यमराजाची
बहीण . यमी यमाला सांगते , मला भोग दे . ही यमाई यमीच बरं का !' मग आम्ही
जोतिबाचं न् यमाईचं लगिन लावायला लागलो .

आमचा रवळनाथ तो इरवल्नाथ आहे . इरवल् म्हणजे भिक्षा मागणे . त्याच्या

काठीला तरंग म्हणतात. ती तमिळ तरङ्गम्.

'गणानां गणपति' पार वेदातला ना? मंगलाष्टकातसुद्धा म्हणतात– विघ्नेश्वरः च ओझरे, ग्रामे रांजणसंस्थितः। ' वगैरे. आता ओझर अन् रांजण काय संस्कृत का? १०
अवो, ओऽच्चन् म्हणून तमिळाईत गावदेवांच्या पुजाऱ्यांची जात होती. त्यांचा काही संबंध असेल ओझरशी. अन् राञ्ज म्हणजे कोल्मी भाषेत देवानि झपाटायचं. रांजणाची न् राञ्जची सांगड बसेल.

किती क्षेत्राच्या ठिकाणी निम घेतात. म्हणजे काय, तर निंबाचा पाला कमरेला लावून प्रदक्षिणा घालतात. संन्यासाचं सोंग ते. मुळात तमिळ नी– म्हणजे सगळं सोडून देणे.

असा आम्ही गोंधळ घातला म्हणा. पण वासना वाईट नव्हती. तमिळ गोंधळ ११
म्हणजे नाच. सगळेच नाचायला लागल्यावर गोंधळम् म्हणजे गोंधळ होणारच. आमची थोरी, सांगू नये पण सांगतो, शब्दाची. अहो, ज्ञानेश्वर-माऊली म्हणाली, 'हे शब्दब्रह्म अशेष, तेथ वर्णवपु निर्दोष'. आमच्या तमिळेत पंधरा स्वर, अठरा व्यंजनं. सगळ्यांना आम्ही केले 'कोट्टै'– गड किंवा मंदिर! आणि तुम्हाला दिले तेतीस कोटी देव. शब्दाचा खेळ, त्याचा बसवावा मेळ, म्हणून व्यंजनागणिक एक १२
देणं अशी अठरा पुराणं! उदो उदो ग जाणाई!

□

१२

आवाहनाला साद देऊन जाण – आई म्हणजे ज्ञानदेवी प्रसन्न झाली तर भाषेच्या मदतीनं शब्दाच्या मायेनं जो गोंधल भल्याभल्यांच्या मनात उभा केला आहे तो संपून खऱ्या शब्दब्रह्माची ओळख होईल. येथे गोंधळीच आपली कैफियत देत आहे. तो शब्दांचा प्रभू असतो तसा शब्दांचा दासही असतो. शब्दांचे अर्थच घेऊन समर्थ अर्थाची शब्दरचना करतो म्हणून प्रभू, तर वाच्यार्थाहून खोल अर्थ प्रत्येक शब्दात आहे असे मानून तो देवादिकांच्या संदर्भात श्रद्धाळूपणे पुढे आणणारा म्हणून शब्दांचा दास.

गोंधळासाठी जोंधळ्याच्या ताटांच्या तिकाटण्याखाली चौक भरतात. आजही तमिळनाडूत पोंगल (संक्रात)सारख्या सणाच्या दिवशी देवाची पूजा मांडतात तिच्यात पाच ऊस लावतात. इतर सरंजामही चौकासारखाच पुष्कळसा असतो. गोंधळ आणि पूजा यांचा अनुबंध अशा विधिविधानातून दिसतो. मराठशाही आणि तमिळाई यांचे या बाबतीतले नाते शब्दातूनही प्रत्ययाला येते :

द १७४५ कोन्तलम् गोंधळ, गडबड

द १७४६ कोन्तलम् मुखवटा, मुखवटयाचा नाच
(तेलुगु) गोण्ड्लि नाचणे

या शब्दांवरून गोंधळ या प्रकाराचे आदिम मूळही लक्षात येईल. 'संगीत-रत्नाकर' नामक ग्रंथात गोण्डलम् या 'संस्कृत' नावाने गोंधळाचा उल्लेख येतो. हे नाव संस्कृत ग्रंथात असले तरी 'प्राचीन' नाही आणि 'संस्कृत' भासले तरी उद्भ्रंश आहे हे स्पष्ट आहे.

संस्कृतिक बाजू पाहिली तर आदिम समाजाच्या मुखवटयाच्या नाचातून हा पूजापाठाचा प्रकार विकसित होत गेला असे दिसते. भारतीय संस्कृतिकोशात म्हटल्याप्रमाणे 'भूतमाया 'सारख्या एकाद्याच देवीशी तो निगडित नसावा. गोंधळाच्या सुरुवातीला 'तेतीस कोटी' देवांना आवाहन करण्याची पद्धत या नैकनिष्ठेची खूणच वाटते.

तेतीस, अठरा, अशा आकड्यांना श्रद्धाक्षेत्रात मंगलार्थ प्राप्त झाले आहेत. याचे मिथ्यबोधक कारण काय? मिथ्याचे आदिमूळ आपण कोठे मानतो यावर ते अवलंबून राहील. सगळ्या श्रद्धा वेदांमधून निघाल्या असे मानणारा बारा आदित्य, अकरा रुद्र इत्यादी एकूण तेतीस प्रकारच्या (कोटींच्या) देवांवरून तेतीस कोटी देवांची संख्या उपपादितो. खगोलातील गोचरांवरून उपपत्ती लावणाराला 'सिंह राशीतून दर तेतीस वर्षांनी प्रचंड उल्कावर्षाव होतात' यात त्यांचे मूळ सापडेल. भाषाईचा गोंधळी भाषेतल्या अक्षरांशी त्याचा संबंध जोडील. त्याला तमिळमधली वर्णसंख्या अनुकूल आहे.

१ मिथ्यांचे हे कूट प्रश्न आहेत. त्यांची उत्तरे उघड दिसत नाहीत. दैवतांच्या नावागावांचे प्रश्न तेवढे कठीण नाहीत. तमिळाईला कौल लावला तर समाधानकारक उत्तरे मिळतात. सुरुवातीला ज्या देवांना आवतणं दिलं आहे त्यांच्या नावागावांची फोड पुढे केली आहे. त्यांची माहिती 'कुलदैवत' या महाराष्ट्र लोकसाहित्य समितीच्या ग्रंथातून घेतली आहे. लोकश्रद्धेने त्यांचा संबंध कशाशी ना कशाशी लावून ठेवलाच आहे. गोंधळी त्या श्रद्धेलाच मुखर करीत असतो.

२ त्याचा उद्देश निर्मळ असतो. लोकमनाला सात्त्विक (आणि) करमणूक देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. त्यात मिथ्यकथा चांगल्या कामाला येतात. दोनचार भाषा येत असल्या तर फारच बरे. त्यांच्या मिथक्रियेतून [परस्पर-क्रियेतून] मिथ्यकथा घडवता आणि वाढवता येतात. या भाषांचे ज्ञान त्याला जनसंपर्कातून आणि पर्यटनातून मिळत असते. ते बोलभाषांचे असते; खोलवर असेलच अशी खात्री नाही. कधी दुसऱ्या भाषेतला आशयच तेवढा आपल्या भाषेत आणतो, कधी आशय आणि शब्द दोन्ही, तर कधी शब्दच तेवढा घेऊन त्याला नवा अर्थ देतो.

पण हा सगळा अभिव्यक्तीचा भाग झाला. आशयाच्या अंगाने गोंधळ्यांसारख्या एकूणच समाजवर्गाचे कार्य संस्कृतीचे संवहन आणि संवर्धन हे असते. संवहनातून जुन्या परंपराचे सातत्य टिकते. माता-रूपातली दैवतभक्ती मानवसमाजात पुरातन काळापासून चालत आली आहे. त्यामुळे तिच्या आवाहनात येणारे शब्द पुष्कळ प्राचीन असण्याचा संभव. त्यांचे नेमके अर्थ आपल्या भाषेच्या परिघात स्पष्ट होत नाहीत हीसुद्धा त्यांच्या प्राचीनत्वाचीच खूण. म्हणून अशा मराठी शब्दांचा शोध तमिळमध्ये घ्यायचा. ३

द ५२२ उतवु (उतवि) मदत, मदत करणे

द ६३८ ऊतु फुंकणे (वाद्य वगैरे)

यातल्या पहिल्या शब्दावरून उदो उदो या आवाहनाचा अर्थ आर्तभक्तीचा वाचक होईल. दुसऱ्या शब्दावरून तो शिंगासारखे वाद्य वाजण्याच्या सोपस्काराशी निगडला जाईल. दोन्ही शक्यता आदिम समाजाशी भिडणाऱ्या आहेत. पण त्यांचे मानसशास्त्र शोधायचे तर इतर आदिम समाजातल्या उपचारांशी आणि मिथ्यांशी तुलना करावी लागेल. तूर्त उदोउदो उद्घोष बराच पुरातन आहे एवढा सारांश पुरेसा आहे.

४ पुरातन म्हणताच, ध्वनिसाम्यावरून 'उदोउदो<उदय<उद्+इ+अच्' अशी अनुलोम संस्कृत उपपत्ती लावणे समर्थनीय ठरणार नाही. सर्व शब्द धातूंवरून स्पष्ट करण्यासाठी हिनस्ति इति सिंहः अशा प्रकारची पाणिनीय व्युत्पत्ती येते. सिंह हा तमिळ शब्दाशी जुळता, मुक्त भेद मानला तर

द २०६०	चिङ्कु (चिङ्कि-)	पकडले जाणे
	चिक्कु–	गुंतणे, अडकणे
	चिक्केन	घट्ट, चिकटपणे
द २०६१	चिक्केन	झटकन, तावडतोब
द २०६५	चिङ्कु (चिङ्कि-)	लहान होणे, कमी होणे

यांसारख्या शब्दांमधून सिंहाच्या स्वभावविशेषांचे दर्शन होते. चिङ्कम् हा शब्द तमिळ लेक्सिकनमध्ये सिंह वरूनच दिला आहे. पण तङ्कु = राहणे, तक्कु = पक्के होणे यासारख्या अनेक उदाहरणात दिसणारा, ङ्कु आणि क्कु या अन्त्यांनी व्यक्त होणारा सकर्मक <--> अकर्मक अर्थसंबंध लक्षात घेतला तर चिङ्कु-चिक्कु यांच्यात 'पकडणे, चिकटणे, झडप घालणे' हेही अर्थ असले पाहिजेत. त्याच क्रियांचा कर्ता तो चिङ्कम् किंवा सिंह. हिंसा करणे हा ढोबळ धर्म भेदकपणे सिंहाचाच आहे असे नाही, शिवाय वर्णांची उलटापालट करून हिंस् धातूवरून सिंह हे नाम सिद्ध करावे लागते.

कल्पक अर्थनाचा अवलंब करून मुंगी या प्राणिवाचक ध्वनीचा संबंध मुंगी ५

घाटाशीही गोंधळी कदाचित जोडीत असतील. 'ज्या घाटातून मुंगीच्या मंद गतीनेच, मुंग्यांसारखी यात्रेकरूंची रीघ लागलेली असते...' असा कल्पनाविलास घाटाच्या नावावर होऊ शकेल. पण त्या स्थानाभोवती जमा झालेल्या परंपरा, उपासना आणि त्या सर्वांची पुरातनता यांचा विचार करून सर्वच संबद्ध शब्दांची सुसंगत उपपत्ती तमिळवरून लावता येते.

६ मुडुप, कानगी यांसारखे शब्द तर जणू त्या देवस्थानापुरते परिभाषिकच होऊन बसलेले असतात. मुडुक्कु = विनवणी, काङ्गिचै = इच्छा हे नवस या अर्थाचे शब्द आहेत आणि लक्षणेने त्यांचा संबंध, वाहिलेल्या वस्तूशी लागतो. पण त्यांच्याशी जुळते शब्द 'वाहणे'च्या अर्थाचेही सापडतात :

द ४०३०	मुटिप्पु	बांधणे, गाठ मारणे, बंडल करणे
(तुळू)	मुडुपु	मूर्तीला वाहिलेली, पैसे रत्ने वगैरेची पुरचुंडी
द १२०९	काण्	पाहणे
	काणिक्कै	देऊळ, गुरू, महात्मा इत्यादींना खुषीने दिलेले दान, दक्षिणा वगैरे

यावरून नवस आणि वाहणे यांतला मूळचा शब्दसंबंधही दिसतो आणि या प्रथांचे मूळही उमगते. काङ्गिचै हा कांक्षावरून आलेला असेच म्हटले आहे. कानगी म्हणजे मुळात कांक्षाच असेल तर मराठी आणि तमिळ या दोहींतही एकादा संस्कृत शब्द एकाच रीतीने पालटतो असे म्हणता येईल.

७ एकनाथांनी गोंधळ्याचा मुखवटा घेऊन तुकाईचे कल्पक अर्थन केले. कदाचित समाजात आधीच रुळलेल्या लोकव्युत्पत्तीला त्यांनी मिथ्यकाव्याचे रूप दिले, कदाचित समाजात रुळलेल्या प्रथांना स्वतःला हवे ते उन्नत रूप देण्याच्या कांक्षेने त्यांनी हे स्पष्टीकरण काढले. काही असले तरी उपपत्तीचा आधार शब्द ही स्थिती होतीच. त्यांच्या कथेवरून तुकाई या दैवताचा वस्तुनिष्ठ इतिहास मात्र कळत नाही. शब्दाच्याच वस्तुनिष्ठ शोधावरून मात्र तुकाई हे नाव देवीच्या वर्णनाचेच आहे, ते तमिळ शब्दात सापडते हे सर्व कळते. एवढ्या एकाच शब्दावरून देवीची प्राचीनता सिद्ध होत नाही; 'तुळजा भवानी' या 'मराठी संशोधन पत्रिका'मधल्या निबंधात या मिथ्याच्या इतर अंगांचाही परामर्श घेतला आहे त्यांतून ती सिद्ध होते.

८ घाटशिळा, घटशील यांसारख्या शब्दांवरून डोंगरांनाच घंटांचे किंवा घटाचे मिथ्यरूप प्राप्त झाले. डोंगरासारख्या जड वस्तूंवर मराठी शब्दावरूनच मिथ्य आरोपिले गेले म्हणजे घाटशिळेने व्यक्त होणाऱ्या संकल्पनेचा जन्महो मराठीच्या स्पष्ट उदयानंतरचा असल्याचे आपोआपच मानले जाते. तमिळमूलक आधारावर त्या संकल्पनेचा उदयकाल पुष्कळच मागे जातो. लोकदैवते प्राचीनच आहेत, ओबडधोबड आणि साहित्यात

अनुल्लेखित असली तरी त्यांची परंपरा दीर्घ आहे हे मानले तर संस्कृतीच्या विकासाचा इतिहास वेगळ्या रीतीने मांडावा लागेल.

यमाईला यमी म्हणणाऱ्या शास्त्रीबुवांचा दृष्टिकोन असा नसतो. वेदांमध्ये ९
उल्लेखिलेली दैवते सगळी उन्नत, उन्नत संस्कृतीतली, उन्नत वर्गांनी पूजिलेली होती, त्यांची अपभ्रष्ट रूपे गावंढ्यांनी उराशी बाळगली आहेत असे त्यांचे मत असते. बरोबर याच्या उलटही एक मतप्रवाह आहे. वेदांमध्ये गायिलेला दैवतसंघ हाच मुळी आदिम समाजात प्रचलित असलेल्या दैवतांचा बनला आहे आणि वेदांची भाषा यास्क-पाणिनींच्या काळीच (सनपूर्व ८००-६००) दुर्बोध झाली होती त्यामुळे त्यांचे खरे स्वरूप झाकले गेले आहे हा तो मतप्रवाह. वेदांची भाषा उलगडण्याचे प्रयत्न गेल्या दीडशे वर्षांत भारतयुरोपीय भाषाकुळाच्या परिघात झालेच आहेत. दक्षिणी भाषांचाही आधार त्या कामात घेतला तर आणखी गूढे उलगडतील, यमाई आणि यमी यांच्या खऱ्या स्वरूपा-संबंधावर नवा प्रकाश पडेल.

खरे पाहता संस्कृतीची थोरली आणि धाकटी परंपरा सारख्या एकमेकात १०
मिसळतच असतात आणि थोरली म्हणतात ती कदाचित धाकटीचेच परिष्कृत रूप असल्यामुळे प्रत्यक्षात कमी वयाचीही असू शकेल. संस्कृत मंगलाष्टके आणि गणपतिपूजा ही थोरल्या परंपरेतली. ओझर, रांजण अशा 'असंस्कृत' ग्रामनावांशी या थोरल्या दैवताची परंपरा जोडली जाते, त्या ग्रामनावांना देव-पितरांच्या पूजेशी संबंधित अर्थ असतात, तेव्हा या दोघांचा संबंध चिंतनीय ठरतो. ओऽझन् याच्याशी ओझासारखे शब्द जुळतात तसेच ओत्तु-होतृ यांच्याशीही त्याचा जवळचा संबंध दिसतो. त्यामुळे उपासनापद्धतींमध्येही विरोध दिसत नाही. गणपती हेच आदिम समाजातले दैवत मानले म्हणजे वर्तुळ पूर्ण होते. वेगवेगळ्या आदिम दैवतांची उपासना चालणाऱ्या या स्थानी कालांतराने गणपती या एकाच दैवताचे महत्त्व वाढले आणि गणपती हे थोरले दैवत मानणारांनीही त्यांना आपल्या स्तोत्रपाठात स्थान दिले असे म्हणता येईल.

या विचारसरणीला गोंधळ म्हणजे मूलतः नाच या अर्थाने पुष्टी मिळते. कोऽ ११
म्हणजे देव असा अर्थ असल्याने गोंधळ (कोन्तल्) हा देव-नाच म्हणून परिणत किंवा उदितही झाला असेल. ज्यांना आपण रानटी समजतो त्या आदिम समाजांच्या जीवनाचे, नाच हे प्रधान अंग असते आणि ते त्यांचे भावजीवन व्यक्त करीत असते. दैवतांशी निगडित उपासनाप्रकार चिकटपणे मूळचे स्वरूप (किमान नावे) टिकवून धरतात हे विश्रुतच आहे. तुकाई-भवानी मातृदेवता, खंडोबा-स्कंद ही पुत्रदेवता, दोन्ही भक्कम जुन्या. त्यांच्या नावाने घातला जाणारा गोंधळ म्हणजे नाच म्हणजे तसाच पुरातन. आज मराठी बोलणारांच्या लोकजीवनातल्या या परंपरांची मुळे किती अज्ञात भूतकाळातून वर आलेली आहेत!

□□□

१२. भाषा मूळ अडाण्याची

रामराम. या, बसा. आमच्या खोपटात पहिल्यानिच आलात. खेड्यापाड्याल
१ येतंय कोन? त्यात आमची राहनी ही अशी. घर मंजी बांधल्यालं,रचल्यालं न्हाई.
श्यान लावून भुई सारावल्याली. कोंबड्यांची पिलं येऊन पिळाकत्यात न् धान
करत्यात. दारात शेरडं करडं, गुरंढोरं. गुरंसुद्धा वंगाळ. पान्यासाठी हिरीवर
न्यावीत तर तरातरा येरोडीला पळत्यात. कशातून काय बोलायला लागलो वो! हे
आमचं चऱ्हाट असंच लांबत जाईल. खुशाल उचलावं आन कुळवाला न्हायतर
नांगराला लावावं! काय?

२ पन हे वाडवडलांपासून असंच चालत आलंय बघा. अवो, आमी अडाणी
माणसं. अडाणी मंजे अज्ञान नव्हत आं. त्याहायला वाचायला येत नाही येवढंच.
आठवन मातर पक्की असति हां. अगदी बेचाळीस पिढ्यांच्या आधी कोन काय
बोलत व्हतं त्याचीसुद्धा आठवण हुती. तोंडातोंडीच बरं का.

आमी असं बोलतुचालतू त्याच्यावर जाऊ नका. तसे आलतुफालतू नाय.
३ खालतीवरती बघतो अन अगदी छातीवर हात ठिवून सांगतो : वाडवडलांची भाशा
कशी व्हती ते आम्हाला पुसा. त्यांनी पेरलं तसं उगावलं आन तसंच आम्ही
जोगावलं. न्हाईतर आम्ही शेतकरी ते काय?

वानीबामनांची बोली अशी नसती– कबूल. वाईच जिभंला आढा दिऊन
बोलत्यात. पन असलीनकली कसं वळखायचं सांगा बघू. आताऽ, आमच्या माणसांनी
४ सुनंला सांगितलं, अग लेकराला थानाला लाव. न्हायतर म्हनलं, अग त्याला आमा
पाज. तर बामनीनकाकू हसत्याल. व्हय का नाय? पन इच्यार करा, ज्ञानेसर
म्हाराज थान म्हनाले का नाय? आन, वाडवडलांच्या भाशेत अम्मम् म्हनत्यात ना!
मंग बरूबर कोन? का इच्याराला विचार म्हनलं की वानीचं पानी निर्मळ झालं?

५ आमी श्यान म्हनतो न् तुमी शेण म्हनता. ह्यात श्येनं कोण? तमिळमंदी
शाण म्हनत्यात ते आमी टिकवलं, तुमी वाईच शेंडं लावलं. आमच्या हिरीला
विहीर म्हननार तुमी. मी म्हनतो तिचं मूळ काय? अवो, तमिळ एऱ्रि. ह्या र मुळं

ह आला . तिच्यातून पानी काढायला चऱ्हाट लावतो ते तमिळ चरदु . बादली पव्हरा
लावून पानी शेंदावं म्हनलं तर शेन्दु तमिळच की . पानी ज्या पाटानि न्हेतो त्याला
ते म्हनत्यात काल्-वाय् . तुम्ही सुद्द बोलता ना ; म्हनता का नाही कालवा ? मंग
आमीच जरा हिकडंतिकडं केलं तर कशाला वो कालवा ?

खरं मंजे खेड्यापाड्याची माहिती तुमाला असते कमी केशवायन्मः
माधवायन्मः यांच्यातच सगळं आलं असं वाटतं का नाही तुमाला ? अवो , तेवढ्यानि
नाहि होणार ! तुमचा दोस नाहि म्हणा . वाडवडलांनी खेडं नावच ठिवायला नको ६
हुतं . केड्डु म्हंजे वाईट दिवस येणे . पाडि मंजे मातर शहरगाव , गवळगाव बरं का .

आम्ही खेड्यात नशिबाला बोल लावीतच कामधंदा करायचा . त्याला वाडवडील
तमिळमंदी म्हनाले शेय् , शेय्ति . पाहाटंच्या पान्यात आमची आई जात्यावर ववी ७
गायची , ' बंधू करीती । धंदा शेईति ॥ ' त्या जुन्या मानसांला शेतीवाचून धंदाच
माहीत नव्हता .

शेतीच जर तमिळ तर नांगर , कुळव , कोळपं , वरंबा , कुदळ तमिळवरून
का नाही येणार ? जोंधळा पेरू म्हणता , तमिळ पेरू मंजे पैदा करायचं . दिवस
उगावलो खालती अन् मावाळतो वरती . तुमी म्हनाल ह्ये कसं ? तर , तमिळमधे
उगवतीला म्हनत्यात किळ-क्कु अन मावळतीला म्हनत्यात मेऽऱ्कु . कील मंजे खाली ८
अन् मेऽल् मंजे वर . काल्डवेल म्हणून मिशनचे साहेब व्हते . ते म्हनले : मावळतीला
उच डोंगुर म्हनून ती वरती आन उगवतीला खालाटी म्हनून ती खालती . तसं
असलं तर आपल्या देशावर तर हे किती नेमकं हाये बघा ना . मंग त्या तमिळ
बोलनारांला आमचे वाडवडील म्हनलं तर काय चुकलं ?

आता वगालाच आलंय तवा सांगतु तुमाला . आमी असं करतु , सांगतु ,
बोलतु , म्हनतु ना तसंच ज्ञानेसर माउलीनीसुद्धा लिहून ठिवलं हाये . अन् बारीक ९
सोध घ्या , तमिळमंदी असलं तु-त्तु-दु तुमाला घावत्याल . ल्येहनाराचं काम हाये
त्ये — सोध घेन्याचं .

आमी आंगठेबहाद्दर . येउनजाउन खानारपिनार , अघळपघळ बाता करणार ,
आनखी शेताडीला जानार . हे अघळ म्हनलो ना , तेसुधा तमिळ अगल म्हंजे लांबरुंद ;
लंबीचवडी बाते म्हणत्यात त्यातलं . पहिल्यापरथमच धानीशेनीचं बोलला हुतो .
आता बघा , कोंबडीचं पिलू पिळाकतं . पिळै तमिळ अन पिलुक्कै मंजी शीट तीबी
तमिळ . तसंच एरु मंजे शेणखत . गायगुरं शेताडीला घान खायाला जात्यात तवा
आम्ही म्हनतो येरोडीला गेली . त्यानला जायची लाज नाही , आमाला बोलायची
लाज नाही .

पन कधीकधी आमीसुद्धा करेक्ट भाशा बोलतो हां . ह्ये घरच बघा . मेढीवर १०

आढं, आढ्यावर वासं अन वाशावर तुराटी. सगळं एकाला एक बांधलेलं. म्हणून आम्ही म्हनतो घर पाहावं बांधून. तुम्ही भिती रचनार, पेंड टाकणार अन तरी म्हननार घर 'बांधलं' म्हणून. हे वाडवडलांचं वळान. त्यांच्या तोंडी कट्टु मंजे बांधायचं अन कट्टडम् मंजे इमारत.

तुम्ही म्हनाल हा अडाणी ग्यानबा लई गिन्यान शिकवायला लागलाय. अडाणी
११ म्हनून तुमीच म्हनायला लागलात. तुम्ही मंजे तुमचे वाडवडील समजा. ते असायचे सगळ्यात मोठे. बाकीच्यांला हाक मारायची, 'अडा, अडा' म्हणून. चुकत असलो तर तसं सांगा– पन ह्या अडा वरूनच आम्ही अडानी झालो असंल का म्हाई?

आता अखेरीला एक ग्यानबाची मेख उपटून दाखवतो. कपाळी आडवा
१२ गंध लावल्यागत छाप मारल्य ना त्यो कसाबी वाचा. अर्थ निघंल. मूळ भाषा आमच्यासारख्या अडाण्यांची असती. भाषा मुळात अडाण्यांची असती. आणखी ऐका, अडाण्यांची भाषा मूळ असती. ह्या अडाण्यांच्या मराठी भाषेत जर तमिळ भरलेली असली तर मूळ भाषा कोणती? बोला... निघालात? बरं. लक्ष असू द्या. रामराम.

□

१२ समाजात विचारवहनाचे साधन म्हणून भाषा उपयोगाला आली त्या काळाची कल्पना करावी. समाज आदिम होता. त्यातला प्रत्येक घटक आजच्या मोजमापाने अडाणी होता कारण माणसे एकत्र आणून मुद्दाम द्यायचे म्हणून ज्ञान दिले जात नव्हते. सगळेच जीवन आदिम सहजपणाने चालत होते. त्यातलाच भाषा हा एक व्यापार.

तेव्हाच्या नेणत्या माणसाभोवती निसर्ग आणि अडाणी समाज असे. आज भाषा असते. तेव्हा प्रत्येकजण भाषा घडवण्यात सहभागी होता, आज आधीच घडलेली भाषा समजून घेण्यात, शिकण्यात, नेणत्याचे जाणतेपण घडत असते. आणखी जाणते व्हायचे तर औपचारिक शिक्षण घेऊन अडाणीपणा घालवावा लागतो. अडाणी आणि शिकलेला हा भेद आजकालच्या जमान्यातला आहे, आदिम कालातला नव्हे. मानवसमाजाच्या जीवनात वा इतिहासात हा 'आजकाल' वर्षांच्या शेकड्यांनी किंवा हजारांनी मोजावा लागतो तर आदिमकाल किती मागे न्यावा लागेल याची कल्पनाच करावी.

आजच्या भाषेपासून सुरुवात करून पूर्वभाषेकडे जाताना कळत नकळत आजच्या संकल्पनांचा अडसर येत असतो. मूळ भाषा अडाण्यांची असते यात न

पटण्यासारखे काही नाही. तरीपण चालू जमान्यात एकाच भाषेची जी विविध रूपे प्रचलित असतात त्यांपैकी महत्त्व कोणाला यावरून जुन्याही काळाची काहीशी तसलीच कल्पना केली जाते. भाषिक विज्ञान आता असले भेद मानीत नाही हे खरे. पण त्याच्याही प्रयोजनाचा भाग येतो तेव्हा पुढली दोन तत्त्वे तेवढ्या कसोशीने पाळली जात नाहीत.

उदाहरणार्थ, प्राचीन भाषांचे पुरावे मुख्यतः लिखित भाषेतले असल्यामुळे पुष्कळसा तुलाभ्यास लिखित भाषारूपांपुरताच मर्यादित झाला आहे. ही लिखित भाषा अडाण्यांच्या भाषेशी समरूप असली तर त्या अभ्यासात काही उणे राहणार नाही. पण त्या दोहोंमध्ये पुष्कळ फरक असला तर प्रमादिक फलिते निघण्याचा संभव असतो. लिखित भाषेत 'मी गेलो होतो' असे म्हणतात तर अडाण्यांच्या भाषेत 'मी गेल्तो' असे बोलतात. या दोन व्यक्तरूपांचे 'व्याकरण' अगदी वेगळे होऊ शकते. पहिल्यात 'जाणे' हे मुख्य क्रियापद, होणे-असणे हे सहायक क्रियापद, गेलो हे भूतकालवाचक धातुसाधिताचे रूप (प्रथमपुरुष एक वचन) इत्यादी संस्कृतनिष्ठ वर्णन होईल. दुसऱ्यात 'गेल्' (चेल्) हा क्रियाशब्द गेल्त हे भूतवाचक रूप आणि गेल्तो हे त्याचे प्रथमपुरुषी रूप अशी तमिळवरून उपपत्ती लागू शकेल. या दोन रूपांपैकी 'गेल्तो' हे 'गेलो होतो' पेक्षा मुळाला अधिक जवळचे असले पाहिजे कारण कसलाही नियामक संस्कार न झालेल्या अडाणी-भाषेतले ते आहे. एका लहानशा पण संपूर्ण वाक्यावरून इतके मूलगामी भेद उघड होतात. मग सुट्या सुट्या शब्दांच्या भिन्न उच्चारणांमुळे त्यांच्यात किती अगणित भेद होत असतील!

शब्दकोशात आलेले रूपच 'वरच्या दर्जाचे, प्रमाण, किंवा विशेष' असे भाषिक विज्ञानिक मानीत नाहीत हे खरे. पण संस्कृत-मराठी संबंधापुरतेच पाहिले तर संस्कृत व मराठी शब्दांची तुलना आजवर शब्दकोशांवरूनच झालेली आहे. 'ध्वनिकाचे नियम अबाधित असतात' हा भाषिक सिद्धांत खूपसा शब्दकोशातल्या शब्दरूपांवरच आधारलेला आहे. मोल्स्वर्थच्या कोशात वान्नर हे वानर चे अडाणी रूप (व्हल्गर करप्शन) म्हटले आहे. वानर हे 'चांगले' रूप का, तर संस्कृतात तसे आहे. त्याचा अर्थ 'वानम् म्हणजे वनात होणारी फळे वगैरे 'राति' म्हणजे घेतो असतो तो' किंवा 'वा म्हणजे विकल्पाने जो नर म्हणजे माणूस असतो तो' असा संस्कृत कोशात आहे. वान्नर, वान्हेर ही अडाणी रूपे तमिळ वानर् (म्हणजे आकाशात किंवा वरच्या प्रदेशात राहणारे) याच्याशी तुळली तर न न्हन्न यांच्या ध्वनिसाम्यामुळे जुळतात. आणि वानर चा सहज अर्थही आपल्याला मिळतो. म्हणून ध्वनिकाचे नियम अबाधित मानले तरी तपासासाठी घेतलेली रूपेच संस्कारित अशी असली तर निष्कर्ष वेगळे निघतात. यामुळे भाषेचा यथातथ्य अभ्यास अडाणी

रूपांवरूनच करणे योग्य आहे.

तो केल्यावर कालभेदी विश्लेषणाने प्रतिलोम पद्धतीने आपण 'मूलभाषे'पर्यंत पोचू तेव्हाही तिचे अडाणी रूप 'अधिक मूळचे' धरले पाहिजे. 'अडाणी मराठी शब्द प्राचीन तमिळमध्ये सापडतो' असे म्हणणे पुरे नाही. ती प्राचीन तमिळही लिखितच आहे. म्हणून तिच्यातल्या अडाणी रूपापाशी गेले पाहिजे. ते आपल्याला उपलब्ध नसते. पण म्हणूनच त्याचे भान सतत ठेवावे लागते.

अनेक शब्दांचा, वाक्यांचा किंवा विधानांचा तुलभ्यास करून अडाणी आणि लिखित (किंवा प्रमाण) भाषारूपांमधले बदलाचे नियम विगमनाने काढता येतील. मराठी किंवा तमिळ यांच्या आजच्या अडाणी x प्रमाण रूपांवरून निघणारे नियम त्या भाषांच्या प्राचीन लिखित रूपांना लावून 'प्राचीन अडाणी' रूपे सिद्ध करता येतील. ती कल्परूपे होतील. या कल्परूपांमधून सिद्ध होणारे भाषेचे मानीव रूप हे 'अडाण्यांची भाषा मूळ असती' या ग्यानबाच्या तत्त्वानुसार, मूळ रूप म्हणता येईल.

१ 'खेड्यापाड्याला येतंय कोन?' ही ग्यानबाची तक्रार मराठी भाषेच्या अभ्यासाबाबत अगदी खरी आहे. आपला ऐंशी टक्के समाज खेड्यात राहतो तरी त्याच्या मुखात असलेल्या भाषेच्या पायावर फारसा अभ्यास किंवा संशोधन झालेले नाही. मग त्या भाषेला प्रथमता देणे तर दूरच राहिले. प्रस्तुत लेखमालेतच या दिशेने प्रयत्न होत आहे. ग्यानबा हा अडाणीपणाचे प्रतीक मानला जात असला तरी 'ज्ञानबा'च आहे आणि अडाण्याच्या भाषेचे त्याचे ज्ञान पक्के आहे. स्वतःकडे कमीपणा घेत तो जितकी विधाने करतो त्या साऱ्यांचे तमिळमूलक स्पष्टीकरण पुढे तो देतो. भाषेचे व्यंक्तारूप अडाणी असले तरी तिच्यातल्या प्रतिमा लक्षणीय असू शकतात. ग्रामीण भाषेत हा जिवंतपणा पुष्कळदा नागर भाषेहून अंमळ अधिक दिसतो. म्हणून ग्यानबा त्याच्या बोलण्याचे चऱ्हाट औताला लावायची भाषा करतो.

२ अडाणी हा शब्द अज्ञानी वरून उपपादिला जातो ते योग्य नसल्याचे ग्यानबा सुचवतो. त्याचबरोबर रूढ अर्थाने अडाणी असलेला माणूस ज्ञानाला पूर्णपणे पारखा नसतो हेही तो सुचवतो. निसर्गदत्त मानवी बुद्धीच्या मदतीने त्यालाही पुष्कळ ज्ञान प्राप्त होत असतेच. त्यातून त्याच्याकरवी जे सृजन होते ते आदिम स्वरूपाचे असू शकते. भाषा हे असेच आदिम सृजन आहे. त्यात निसर्गक्रमाने होणारे बदल–देश, काल, लोक यांच्या प्रभावाने– अडाण्यांच्यातच आदिमपणे होत असतात. म्हणून भाषाविषयक ज्ञानसाधनेत या अडाणी भाषेलाच महत्त्व आहे. ती नोंदलेल्या स्वरूपात नसते. पण म्हणूनच थिजलेल्या अपरिवर्तनीय रूपात नसते, जिवंतपणे बदलत असते. मात्र परंपरा-सातत्याची मानवी प्रवृत्ती येथेही काम करीत असतेच. त्यामुळे

समाजमनाच्या उत्कट श्रद्धा, आकांक्षा, चालीरीती यांना व्यक्तरूप देणारी भाषा बरीच टिकून राहते.

पितरांविषयीचा पूज्यभाव मानवी समाजामध्ये आदिम काळापासून चालत आला आहे. त्यांच्या स्मृतीसाठी म्हणा किंवा आज्याचा पुनर्जन्म नातूच्या रूपाने होतो या समजुतीने म्हणा, आज्याचे नाव नातवाला ठेवण्याची प्रथा चालत आली आहे. तमिळमध्ये तर नातवाला 'पेऽरन्' (म्ह० त्या नावाचा) या शब्दाने आजा आणि नातू या दोघांचाही निर्देश करतात (त २८९९). परंपरेची आठवण शब्दरूपाने पक्की जतन करून ठेवण्याचाच हा प्रकार आहे. या अर्थानेच अडाण्याची आठवण पक्की असते आणि वाडवडिलांच्या भाषेशी जवळचे नाते ठेवून असते. ३

त्याचमुळे अडाण्याच्या भाषेतला थान शब्द आजच्या नागरभाषेत स्तन म्हणून चलनात असला तरी ज्ञानेश्वरांच्या 'नागर पद्यबंधात' अडाणी स्वरुपात येतो. आमा या शब्दाचा अम्मम् (द १५२) शी निकट संबंध असल्याचे दिसते. तमिळ शब्दात जोडध्वनी आला असला तर त्याच्याशी जुळत्या मराठी शब्दात जोडध्वनीच्या आधीचा ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो असा एक सामान्य विगम दिसतो. त्याच्याशी अम्म चा आमा होणे जुळते. तर, अडाणी भाषेतून ध्वनिकाची पुष्टी होते. ४

शेण-श्येनं, कालवा-काल्व्या या नागर-ग्रामीण शब्दजोड्यांवर ग्यानबा कोट्या करीत आहे. श्यान ला शेण लिहिताना आलेल्या एकाराच्या मात्रेला 'शेंडं लावलं' म्हणून हिणवीत आहे. शुद्धअशुद्धाचा जोजार त्याला मान्य नाही. भाषिकालाही तो मान्य नाही. त्यामुळे ग्यानबाचा मोहरा ठीकच आहे. त्याला दक्षिणी कोशाचे पाठबळ आहे– त्याच्या शब्दात, वाडवडलांच्या भाषेचे : ५

द १३५८	चाणम्	शेण
द २२६५	चे-चेप्-	सरळ
	चेज्–चेवे	योग्य मार्गाने, सरळपणे
द ७६३	एऽरि	शेतपाण्याचा तलाव
द ७३५	एर्रि–	पाणी भांड्यातून वगैरे ओतणे
द २३१०	चेऽन्तु	चाकावरून, कप्पीवरून दोर ओढणें
द १२३९	काल्वाय्	पाट, कालवा
द १०९६	कलावु	रागावणे, रुष्ट होणे, क्षोमणे

मराठीतले शब्द सोडून ग्यानबा केडु सारख्या, वाडवडिलांच्या तमिळ शब्दांचेही दोन अर्थी उपयोग करीत आहे. ६

द १६१४ केडु नाशणे, नष्ट होणे, नासणे, वाईट दिवस येणे

याचा संबंध खेडे शब्दाशी नाही. खेडे शब्दाचे मूळ खेटक असे सांगितले जाते पण

ते केवळ उद्भ्रंश रूप दिसते. ध्वनी आणि अर्थाच्या अंगांनी खेडे ला जुळणारे दक्षिणी शब्द :

द १६६९	चेऽरि	गाव, खेडे, वाडी, आळी, परायांचा [हरिजनांचा] वाडा
(क०)	केऽरि	आळी
द १६८०	चेऽरु	चिखल, दलदल
(तुळू)	केऽदु	चिखल
(तुल्य तमिळ)	चेय्	शेत
(तुल्य संस्कृत)	केदार	शेत (विशेषतः पाण्याखालचे)
द १६४८	चेरि	दाट असणे (पाने वगैरे), गर्दी असणे

या सर्वांमधून 'शेती करणाऱ्या वसाहतींची' जी प्रतिमा उभी राहते तीच खेड्याचे मूळ असावी.

द ३३४७	पाटि	गाव, शहर, वाडी, गवळीवाडा

याचाही अर्थ खेडे शी तुल्य असल्यामुळेच खेडेपाडे असा जोडशब्द प्रचारात आला.

७ एकाच शब्दाचे जोड अर्थही असू शकतात. अर्थविस्ताराच्या क्रियेमुळे आलेला नवा अर्थ मूळच्या अर्थाच्या जोडीने नांदू शकतो. याचमुळे शेतीचा अर्थ सामान्यतः एका विशिष्ट व्यवसायापुरता असला तरी 'धंदा' हा जनरल ['जनांमधला,' साधारण] अर्थही त्याच्या तमिळ स्वरूपाला आहेच.

द १६२८	चेय्	करणे, बनवणे ; कृती
	चेय्ति	क्रिया, व्यवसाय, आचार
द १६२९	चेय्	शेत, विशेषतः पाण्याखालचे शेत

शेती आणि धंदा यांची 'कामधंदा'सारखी एकरूपता शेतीप्रधान संस्कृतीच्या भाषेत असू शकते. आजकाल 'उद्योग' म्हटले की 'यंत्र-उद्योग'च असतो त्याप्रमाणे.

जात्यावरच्या ओवीत शेईति असा उच्चार येतो त्याचा चेय्ति मधल्या य् शी साक्षात संबंध नाही. मात्रापूर्ती करण्यासाठी शे मधल्या ए चा उच्चार लांबवण्याकरता हा ई आला आहे. तमिळ साहित्याच्या आदिपरंपरेत अशा प्लुतीला स्थान दिलेले आहे. लेखनात ही प्लुती कशी दाखवावी याची तोल्काप्पियातील सूत्रे :

४१ शब्दात ध्वनी कमी पडला तर दीर्घ स्वरानंतर संगत ऱ्हस्व स्वर येऊन प्लुती होते. [उदा. आअ ऊउ ओऽओ]

४२ ऐ औ या दोन वर्णांची प्लुती इ आणि उ यांनी होते (उदा० ऐइ औउ]

संघवाङ्मयात असे प्लुतिकारक स्वर पुष्कळदा भेटतात. 'आअ' चा उच्चार मराठीत

'आऽ' असा लिहिला जाईल.

पूर्व-पश्चिम या अर्थांनी खालती-वरती या शब्दांचा उपयोग खेड्यापाड्यात सर्रास होत असतो. तमिळमध्ये कीळ् आणि मेऽल् हे नेमके याच अर्थाचे शब्द प्रमाणभाषेतही वापरले जातात. त्यांच्यावरून काल्डवेल यांच्या 'कंपॅरेटिव्ह ग्रामर ऑफ दि द्रविडियन ऑर साउथ इंडियन फॅमिली ऑफ लँग्वेजेस'मध्ये काढलेले अनुमान : ८

> मलयाळम् भाषा पूर्वदिशेचा निर्देश करण्यासाठी जो शब्द वापरते त्यावरून ती तमिळमधून उद्भवल्याचे दाखवता येते. तो शब्द किळक्कु; अर्थ : खाली, खालच्या बाजूला; पश्चिम दिशा निर्देशिण्यासाठी वापरला जाणारा 'मेऽल्कु' वर, वरच्या बाजूला– याच्याशी जुळणारा. दोन्ही शब्द निश्चितच पश्चिम किनाऱ्यावर नव्हे तर तमिळ देशात, घाटाच्या पूर्वेच्या देशात, उद्भवले. तेथे उत्तुंग पर्वतमाला सगळीकडे पश्चिमेलाच उभी आहे, म्हणून तेथे पश्चिमेला जाणे म्हणजे वरती जाणे तर पूर्वेकडेस जमिनीचा ढाळ खालती, समुद्राकडे आहे. (२०)

बुद्धीला विशेष न पटणाऱ्या तर्कपद्धतीने फार मोठे भाषिक अनुमान येथे काढले गेले आहे. त्याच तर्कपद्धतीने मराठी-तमिळचाही संबंध जुळतो. पण तो तेवढ्यावरच आधारला तर फसवा ठरेल. असे शब्द अधिक प्राथमिक आणि सर्वदेशीय किंवा विश्वल गोचरांवरून बनत असले पाहिजेत. 'दिवस वर आला' असे ज्या सहजपणाने म्हणतात त्याच सहजपणे 'पश्चिमेकडे सूर्याचे जाणे' म्हणजे 'वरती जाणे' असा वाक्प्रचार आला असेल. त्यावरून पूर्व ही 'खाळती' झाली असेल. ग्यानबाला थोरामोठ्यांचा आधार आहे इतकेच!

करतु, बोलतु ही ग्रामीण मराठीतली रूपे प्रमाणभाषेत करतो, बोलतो अशी लिहिली जातात. यांना मुक्तभेद मानता येईल. ग्रामीण रूपे 'अशुद्ध' आहेत असे आता कोणी भाषिक विज्ञानिक मानीत नाही. पण कालभेदी विश्लेषणात करतु करतो यांची पूर्वापरता तपासली तर करतु ला जुनेपणाचा मान द्यावा लागेल. त्यासाठी ज्ञानेश्वरीचा संदर्भ घेतला. ज्ञानेश्वरीत गीतानुवादाची सुरुवातच असल्या एका रूपाने झाली आहे : 'पुत्रस्नेहें मोहितु। धृतराष्ट्र असे पुसतु।' (१.८५). यातले 'असे पुसतु' हे रूप आजच्या प्रमाण भाषेत 'पुसत आहे, पुसतो आहे' असे होईल. 'प्रतिध्वनि न समातु। उपनतसे॥ (१.१२६). यात 'समातु' हे धातुसाधित आहे. 'समावणारा' या अर्थाचे. 'जैसा सींहु गजघटा आंतु। संचरे लीळा विदारतु।' (१.१६१) यात 'विदारीत' असा अर्थ आहे. आजच्या मराठीतल्या अशा वेगवेगळ्या साधितांची घटना करणारा तु प्रत्यय तमिळमध्ये ९

भरपूर आहे. शिवाय या अन्त्य उ चा उच्चार बोलण्यात जवळजवळ लोपून अ असाच होतो. म्हणजे उच्चारित तमिळ रूपाचे आजच्या प्रमाण मराठीतल्या 'पुसत समावत विदारत' अशा रूपांशी साम्य दिसते. हे साम्य मूलतः अडाण्याच्या भाषेवरून आपल्या ध्यानात येते ही येथे महत्त्वाची बाब आहे.

१० मानवी व्यवहारातले प्राथमिक महत्त्वाचे शब्द दोन भाषांमध्ये सारखे असणे ही त्यांचा संबंध असल्याची खूण मानतात. खाणेपिणे, हगणेमुतणे या प्राथमिक क्रिया आहेत. त्यांचे, विशेषतः हगण्यामुतण्याचे शब्द अडाण्यांच्या भाषेत मूळच्या स्वरूपात बहुधा टिकून राहतात. शिष्टभाषेत त्यांच्यासाठी वेगळ्या धातु-शब्दांचा उपयोग केला जातो. जसे, हगणेमुतणे मलमूत्रविसर्जन या प्रौढ नावाने उल्लेखितात. अडाण्यांची भाषा मात्र त्यातले बारीक भेदसुद्धा जपते; माणसांच्या आणि जनावरांच्या या क्रियांसाठी वेगळे शब्द वापरते. शास्त्रीय चर्चेत परिभाषेचा काटेकोरपणा असतो तसाच या अडाणी शब्दांमध्ये आपल्याला दिसतो. उदा०

पिळकणे	< द ३४४१ पिळुक्कै < द ३४४० पिळि	शेळ्यामेंढ्याची वगैरे शीट दाबून पिळणे, गाळणे, (तेल वगैरे), धार घालणे.
येरोड	< द ६९६ एरुकु एरु	पातळ हगणे, (गुरांचे) खत, शेण, गू
पिल्लू	< द ३४४६ पिलुक्कु द ३४४९ पिळ्ळै	(ओठ) विलग करून उघडणे मूल, मुलगा, अनेक प्राण्यांची पिले वगैरे

अडाणी मराठी शब्दांचे जुळते शब्द दक्षिणी कोशात आहेत यावरून मराठी-दक्षिणी बोलणारांची एकरसताच स्पष्ट दिसते. समाजाच्या आदिम अवस्थेपासून ती चालत आली आहे हेही उघड होते.

'घर बांधणे' यासारख्या शब्दप्रयोगात ही आदिमता अशीच व्यक्त होते. आद्यकाळात झाडापाल्यांची बांधणी करूनच निवारा केला जाई. या निवाऱ्यांना कट्टु=बांधणे यावरून कट्टडम् हे नाव तमिळमध्ये रूढ झाले तेच इमारत या अर्थाने वापरात आले. कठडा सारखा मराठी शब्द त्याशी जुळता आहे. मराठीत 'बांधणे' संस्कृत 'बन्ध्' वरूनच आले काय?

द ३४०	पन्तल्	मांडव, भांडार, राई
द ३२४१	पन्तु	दोऱ्याचा किंवा दोरीचा गुंडा, चेंडू

या दक्षिणी शब्दांवरून 'पन्त' = बन्ध् = बांधणे असे संमत समीकरण बसवायला हरकत नाही.

अडाण्याची भाषा असो की स्वतः अडाणी असो, त्यांचे नामकरण 'गुणदर्शक' आहे आणि ते नाव ठेवणाराला खरेच नावे ठेवायची आहेत. 'अज्ञान' या संस्कृत शब्दाशी त्याचा काही संबंध दिसत नाही. दक्षिणी कोशावरून : ११

द ६१	अटा	कनिष्ठाला व मुलाला जवळिकेने आणि शत्रूला तिरस्काराने लावलेले संबोधन
(मलै०)	अटन्न	कनिष्ठ दर्जाच्या माणसांना बोलावण्याचा उद्गार

अटन्न-अडन्न यावरून अडान होणे सहज आहे. आजही अडाण्याच्या मराठी भाषेत तो 'अडानी'च आहे!

अडानी जेव्हा 'ग्यानबा' होतो तेव्हा 'भाषा मूळ अडाण्याची' असे भाषांचा मागोवा घेत, भाष्यकारांना न पुसता सांगून मोकळा होता!

□ □ □

१३. नखशिखान्त तमिळ

"सकाळचे प्रहरीं स्नान करून व डोईवरचे केस विंचरून, पिंजून म्हटलें तरी चालेल, आणि ते मोराचे पिसाऱ्याप्रमाणे फुलवून व पाठीवर सोडून, ते उडवीत व मोराप्रमाणे डौलदार पावले टाकीत जात असता मद्रासेत पुष्कळ लोक दृष्टीस पडतात."

हे वर्णन आजकालचे नव्हे; १९३३ साली प्रसिद्ध झालेल्या 'प्राचीन द्राविड' या लक्ष्मण गोविंद घाणेकर यांच्या पुस्तकातले आहे.

दोन हजार वर्षांपूर्वीच्या गाथासप्तशतीतला एक नायक प्रियेला
१ 'शिखिपिच्छलुलितकेशा : मोरपिसाऱ्याप्रमाणे पसरलेल्या केसांची' असे संबोधीत आहे. स्त्रीपुरुषांच्या डोकीच्या केसांशी मोरपिसाऱ्याची प्रतिमा अशी अखंड निगडित झालेली आहे. मोर हाच मुळी तीन हजार वर्षांपूर्वीही भारताचा निर्यात माल होता. त्याचा
२ हिब्रू बायबलात तुकि, तूकि असा उल्लेख आला आहे. तो द्रविडकुळातील शब्दाचा आद्य लिखित उल्लेख मानतात. त्याचे तमिळ मूळ तोऽकै, म्हणजे मोरपिसारा किंवा कुंतल. या तोऽकै – तोऽहै ने मराठीला डोकी-डोई-डोके दिलेले दिसतात. 'डोइस मुंडासे, डोके धुतले, डुई भादरली, डोकीत उवा झाल्या' अशा विविध उद्गारांनी डोके आणि केस या दोन्हींचा अनुबंध मराठीत जपून ठेवला आहे. शौपेनहोएर या स्त्रीद्वेष्ट्या जर्मन तत्त्ववेत्त्याने एक कुभाषितच बनविले होते : बायका म्हणजे लांब केसांच्या अन आखूड बुद्धीच्या.

डोळे आणि छिद्र यांचा असाच संबंध दिसतो. सुईच्या नेढ्याला इंग्रजीत डोळा म्हणतात. तमिळ कण् म्हणजे डोळा, छिद्र, भोक; काण् म्हणजे पाहणे. काणा म्हणजे न बघणारा. आपल्या डोळा शी संबंधित तमिळ तोळ् म्हणजे भोक पाडणे; तोळै म्हणजे भोक. दिसणे हा अर्थ तोऽन्रु मध्ये दिसतो.

हे दिसणे जतन करण्यासाठीच पापणीची फडफड चालू असते. तमिळ
३ पार् = पाहणे, पाय् = उडी मारणे, पसरणे, फैलावणे वगैरे, पापा = डोळ्याची बाहुली आणि पापात्ति = फुलपाखरू. शरीर-अवयवांना अशी नावे देणारे त्या

त्या समाजातले नवकवी असले पाहिजेत. म्हणून त्यांना वेगवेगळ्या भाषांमधून शब्द उचलण्याचे वावडे नसावे. त्यामुळे बत्तिशीचे बारसे करताना त्यांनी संस्कृत दन्त घेतला आणि तमिळ ईरु म्हणजे हिरडीमध्ये रोवला. र मुळे ई चा हि होऊन ही ही करण्याचीही सोय झाली!

तोच प्रकार ओठ आणि मिशीचा. संस्कृत अधर म्हणजे खालचा आणि ओष्ठ म्हणजे 'वरचा' ओठ. पण तरुणपणी त्याच्यावर स्वार होणारी मिशी ४ म्हणजे तमिळ मीशै. मीशैचा दुसरा अर्थ वरचा भाग असाच आहे. ही मिशी किती तमिळ आहे म्हणाल तर तिने स्त्रीसुलभ ठसकेबाज म्हण त्या भाषेला दिली आहे: मारल्यावाचून मुले अन् पिळल्यावाचून मिशा वळणावर येत नाहीत!

या म्हणीतल्या मराठी 'मुले'चा संबंध तमिळ मुलै शी जोडावा का? मराठी ही संस्कृत कुळातली भाषा म्हणून तान्हे चा संबंध स्तन्य (स्तनातले दूध) याशी ५ जोडतात. तो जर सुसंगत असला तर मुले-मूलै कमी त्रासात अधिक सुसंगत; कारण मुलै म्हणजे स्तनच.

पुढे चलावे. म्होरं चला म्हटल्यास गावंढळपणाचा दोष येतो. तसा, मोहरा फिरवून, म्होरक्या हा शब्द शिष्टभाषेत आपण चालवून घेतो. या सर्वांचे मूळ असावे तमिळ मोऽरै = चेहरा, मुख, हनुवटी; कानडी मोऽरे = मुख, चेहरा.

असाच, अवयवाचा शब्द नसला तरी शब्दाचा अवयव म्हणून मराठीत राहिलेला तमिळ शब्द कै, म्हणजे हात. कैवार, कैपक्ष, कैकाडी हे सारे त्याचे ६ कैदी. कैकारन् म्हणजे हस्तकुशल. कैकाडी बांबूच्या टोपल्या हस्तकुशलतेने विणतात म्हणून. त्यांचा संबंध कीकट किंवा कीचक या बांबूवाचक संस्कृत शब्दांशी जोडायला नको.

पोट चा संबंध संस्कृतशी जोडलेलाच नाही. गाथासप्तशतीत प्राकृत शब्दांची संस्कृत छाया बहुधा तशीच असते. पोट्ट ची छाया मात्र 'उदर' अशीच दिली ७ आहे. कानडीत पोट्टे म्हणजे पोट तसाच गर्भ हाही अर्थ आहे. मुळात गर्भाशयामुळे मोठे होणे हेच त्याचे भेदक लक्षण दिसले असणार. पोटुशी म्हणजे गर्भारशी या ग्रामीण मराठी शब्दात त्याचा वंशज आहे. तमिळ पोट्टचूचि हा स्त्री या अर्थी निंदावाचक आहे. पोट्टि म्हणजे वेश्या.

पोटाखाली गुह्य भाग येतात. ते आवरणात ठेवणे हे सभ्यतेचे गमक. त्यांचे शब्दही आवरणात राहावे लागतात. डॉ० जॉन्सन या आद्य इंग्रजी कोशकाराला ८ तत्कालीन विशाल महिला म्हणाल्या, "तसले' शब्द तेवढे तुम्ही द्यायला नको होते." जॉन्सन म्हणाले, बाई, तुम्ही तेच तर हुडकीत होतात! असे हे अवघड जागचे सोपे शब्द सर्वांना माहीत असतात. मराठीतले 'तसले' शब्दही तमिळ,

कानडी आहेत. काही त्या भाषांतही आवरणावरूनच आले आहेत; डोके केसांवरून ओळखले तसे. पोच्चु म्हणजे माय-अंगावरचे केस.

९ गुडघा, नडघी, घोटा यांनी दर्शित अवयव आणि त्यांच्या मूलशब्दांचे अर्थ यांच्यात बरीच मिसळ दिसते. संस्कृत घोटक वरून गुडघा व घोटा हे दोन्ही दाखवले आहेत. (घोडा हा प्राणीसुद्धा). कुदै = उडी मारणे, कोडु = वाकडे, कोट्टै = आठोळी; नड = चालणे, नडु = मध्यभाग इत्यादी अनेक शब्दांमधून त्यांचा मूळ पत्ता सापडेल.

पोटि-बोटि = (कणसाप्रमाणे) फुटणे, यात हातापायांच्या बोटांचे मूळ असावे.
१० शेऽण् म्हणजे उंची, लांबी. त्यावरून मस्तकाच्या शेंड्यावरची शेंडी उद्भवली असणार. तात्पर्य, शरीरवर्णनात आपण मराठी भाषिक नखशिखान्त तमिळ आहोत!

□

शरीरवर्णनाचे शब्द हे भाषेतले प्राथमिक शब्द मानले जातात. भाषांच्या कुळीडाळी ठरवताना त्यांना मानाचे स्थान असते. मराठीचा जन्म संस्कृत कुळातला असे मानले असले तरी डोके, डोळे, हाड यासारख्या शब्दांची व्युत्पत्ती आकळत नाही ही खंत महाराष्ट्र-सारस्वतकारांनी व्यक्त करून ठेवली. शब्दांच्या वंशावळीत दक्षिणी भाषांचा समावेश केला तर ती खंत नाहीशी करता येते.

१ व्युत्पत्ती म्हणजे शब्दाचा नुसता अर्थ-ध्वनि-विषयक किंवा भाषिक विचार ही कल्पना, विशेषकरून प्राथमिक शब्दांच्या बाबतीत, सोडून द्यावयास हवी. शब्दांचा विचार समग्र संस्कृतीच्या, मानवी विकासाच्या संदर्भात करावयास हवा. आदिम भाषा तर्कशुद्ध विश्लेषणाचा परिपाक म्हणून निर्माण झाली असे मानता येत नाही. पण त्याचबरोबर ज्ञान संपादण्याच्या किंवा साम्यभेदांनी वर्गणे करण्याच्या मानवी क्षमतेला डावलून चालत नाही. तोऽकै आणि डोके यांच्यातल्या ध्वनिसाम्यावरून सुरूवात करून संस्कृतीतल्या त्यांच्याविषयीच्या कल्पना ध्यानात घेऊन आपण त्यांची एकरूपता ठरवतो.

स्त्रीपुरुषांच्या–खासकरून स्त्रियांच्या–केशकलापाशी मयूरपिच्छांची तुलना होते, कारण स्त्रियांचे केस मनोहारी असतात एवढेच नव्हे तर जन्मभर टिकणारे असतात. स्त्रियांना टक्कल पडत नाही ही वैद्यकसंमत वस्तुस्थिती आहे.

२ सॉलोमन राजाच्या जहाजांमधून मोर चन्दन आणि माकडे हा विविध माल ओफिर नावाच्या बंदरातून निर्यात होत असे. बायबलातील या विधानाचा उल्लेख काल्डवेल यांच्या तुलव्याकरणात (पृ० ९०) आणि माक्सम्यूलर यांच्या 'भाषणां'मध्ये

आला आहे. दोघांनीही त्यावरून 'तमिळादी भाषा आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात बोलल्या जात असत' असा निष्कर्ष काढला. सॉलोमन राजाचा काळ सनपूर्व एक हजार मानलेला आहे. भाषेतल्या प्राथमिक शब्दांचे मूळ किती जुने आहे याची कल्पना यावरून येऊ शकेल.

त्या जुन्या काळात ज्या अनेक बोली प्रचारात असतील त्यांच्यातले शब्द एकमेकींमध्ये उचलले जाणे अकल्पनीय नाही. उत्तर कालात ज्या वेगळ्या भाषा म्हणून नांदू लागल्या त्यांच्यातले शब्द असे गोळा झालेले असतील. माक्सम्यूलर यांनी आपल्या 'भाषणे' ग्रंथात (पृ० ३२९) म्हटले आहे : ३

> आर्यकुळातल्या विविध बोलींनी पुरविलेल्या मोठ्या संख्येच्या समार्थ शब्दांमधून ग्रीकांनी एकाला चिरंजीवी केले, रोमनांनी दुसऱ्याला. स्वाभाविक निवडीचे हे तत्त्व आणखी व्यापकपणे लागू होऊ दिले तर, एकाच उगमातून निघणाऱ्या भाषा कालांतराने साध्यातल्या साध्या वस्तूसंबंधीचे पूर्णपणे वेगवेगळे शब्द मेळवितील, हे उघड आहे.

म्हणून दात आणि हिरडी यांचे मूळ उगम दोन वेगळ्या भाषांमध्ये आढळले तर काही विपरीत नाही. उलट, असे संमिश्रण असंख्य शब्दांच्या संबंधात दिसून येते तेव्हा या भिन्न कुळांतल्या भाषांचा संपर्क अतिप्राचीन काळीही झाला होता असेच अनुमान काढावे लागते.

त्याऐवजी चालू समजुतीप्रमाणे संस्कृत आणि दक्षिणी भाषांचा केवळ उत्तरकालीन देवघेवीपुरताच संबंध मानला तर व्युत्पत्तीही मानीवानुसार बदलतात. मिशी शब्दाची उपपत्ती द्रविड व्युत्पत्तीकोशानुसार अशी बसेल : ४

द ३९६६	मिचै	उंचावरची जागा
	मीचै	वरचा भाग
द ३९९६	मीचै	मिशी (तुल्य मराठी : मिशी), मिशा

तर तमिळ लेक्सिकन मधली नोंद अशी :

त ३२११	मीचै	(तुल्यः श्मश्रु) मिशी [उपयोगाचे उदाहरण कम्ब रामायणातले.]

महाराष्ट्र शब्दकोशात संस्कृत श्मश्रु आणि कानडी मीशि असे दोन समान शब्द दिले आहेत. संबंध तमिळ भाषेचीच उपपत्ती संस्कृतवरून लावणाऱ्या एका ग्रंथात मयिर् म्हणजे केस हा तमिळ शब्द श्मश्रु वरून दाखवलेला आहे!

आणि श्मश्रु ची उपपत्ती काय? 'श्म मुखं श्रूयते लक्ष्यतेऽनेन। श्म म्हणजे मुख ज्याने दिसते ते!' श्मश्रु च्या आधीचाच शब्द श्मशान. त्याच्या उपपत्तीत श्मन् म्हणजे शव असे धरले आहे! म्हणजे श्मश्रु, श्मशान या शब्दांचे अर्थ

संदर्भावरून श्म या ध्वनीवर अर्थारोपन करून काढले आहेत. ही अनुलोम अर्थाने आहेत, अनुलोम व्युत्पत्तीसुद्धा नव्हेत.

प्रतिलोम पद्धतीने पाहिले तर मिशी-मीचे इत्यादी शब्दांमधला 'वरची' या अर्थाचा मूळ शब्द हे मिशीचे मूळ आणि श्मश्रु हे संस्कृत उद्भ्रंशस्वरूप आहे असे दिसते. या उद्भ्रंशाचा उगम श्मशानातल्या कर्मकांडातून झाला आहे काय हे शोधणेच उद्बोधक होईल.

५ संदर्भावरून सुचवल्या जाणाऱ्या व्युत्पत्तीचे उदाहरण म्हणून तान्हे<स्तन्य हे घेतले. यातले अर्थिक शब्दांच्या आंतरिक नात्यातले नाही, बाहेरून लादलेले आहे. वरवरची, पण संस्कृत-मराठी शब्दांमध्ये आहेत त्याहून अधिक, साम्ये पाहून मुलै>मुले अशी व्युत्पत्ती सुचवली जाईल. त्यापेक्षा दक्षिणी कोशातल्याच मुलै शी मुले चा संबंध जास्त चांगला दिसतो :

द ४०८७	मुलै	स्त्रीचा स्तन, स्तनाग्र
द ४१००)	मुलै	कोंब, झाडाचा किंवा रोपट्याचा कोवळा मोड,
त ३२९०)		कोवळीक, मुलगा. (क्रि०) केस किंवा शिंग वाढणे, मोड येणे
द १७५९	कोम्पु	फांदी. प्राण्याचे शिंग

माक्सम्यूलर यांनी स्वाभाविक निवडीची क्रिया सांगितली ती येथे उत्तम प्रकारे दिसते. कोम्बु म्हणजे तमिळमध्ये शिंग तर मराठीत कोंब, कोंभ. मुलै म्हणजे तमिळमध्ये वनस्पतीचा कोंभ तर मराठीत वंशाचा कोंभ. मुळ् म्हणजे काटा, अणीदार वस्तू. या सर्व समाहारातून मुलै = स्तनाग्र हा अर्थही त्याच्या अणीदार-पणामुळेच आला असणार. त्याशिवाय, वृक्षवल्लींची मुले आणि माणसांची मुले यांच्यातही मुलै मधून अभेदभावना दिसते. मुलैचा एक अर्थ बांबू आहे आणि त्याचे वंश हे संस्कृत नावही प्रसिद्ध आहे!

६ पोकळ बांबूला 'चीकयति-आवाज करतो' यावरून 'आद्यन्तविपर्ययाने' 'कीचक' असा संस्कृत शब्द अशाच स्वाभाविक निवडीतून उचलला गेला, नंतर अस्वाभाविक व्युत्पत्तीचा धनी झाला. पोकळ बांबू किचकिच करणारच.

द १२७३	कीच्चु	पाखरांचे चिवचिवणे, कर्कश ओरडणे
	कीच्चिटु	पाखरे पाली चुकचुकणे, कुचकुचणे, (लहान मूल) किंचाळणे

यातून येणाऱ्या कीचक शब्दाला मूळ संस्कृत मानून कैकाडी शी त्याचा संबंध जोडून ती जमात आर्यवंशीय वगैरे ठरू शकेल! अशी समाजशास्त्रीय अनुमाने निघतात तेव्हा खरा धोका असतो. भाषिक मग भाषेपुरते मर्यादित राहत नाही, प्रयुक्त

होते. ज्या सामाजिक किंवा मानसिक सिद्धांतावर ते भाषिक उभारले गेले त्याला पुष्टी देणारी तात्पर्येच या क्रियेतून निघणार यात नवल ते काय? म्हणजे ज्ञानशोधाच्या क्षेत्रात हा गोलगोल फिरण्याचा प्रकार होतो.

म्हणून ही कोंडी फोडून, भाषिकापुरते बोलायचे तर, सर्व भारतीय भाषांचा ७
एकत्र आणि समग्र विचार केला पाहिजे. तो करताना भाषिक विज्ञानाची मूलतत्त्वे तेवढी आधाराला घेऊन त्यांच्या प्रयोजनांनी आजवर काढलेल्या सिद्धांतांकडे साशंक नजरेने पाहावयास लागले पाहिजे. उदा० संस्कृत आणि प्राकृत ग्रंथांचे अस्तित्व ही वस्तुस्थिती; ज्यांचे भाषिक पंचांग स्पष्टपणे मांडता येईल अशा या विविध भाषा आहेत हे गृहीत धरणेही योग्य. पण त्यांचा संबंध मायलेकींचा, बहिणी-बहिणींचा, नणंदभावजयांचा का सख्या मैत्रिणींचा होता याबद्दल अनाग्रही प्रश्नचिन्ह समोर ठेवूनच शोधाची वाटचाल सुरू केली पाहिजे.

पोट शब्दाचे उदाहरण त्या स्वरूपाचे आहे. सगळी प्राकृत शब्दसंपदा संस्कृतवरूनच आलेली असती तर या प्राकृत छायाशब्दांचे संस्कृत वस्तुरूप उपलब्ध असते, कारण हा प्राथमिक शब्द आहे. उलट द ३६७७ आणि आसपासच्या बीजशब्दांनुसार जर पोट आणि संबंधित शब्द प्राकृत, मराठी, हिंदी, गुजराती आणि अनेक दक्षिणी भाषांत आहेत तर त्याला सर्वभारती शब्द मानून भाषांचे संबंध तपासले पाहिजेत. त्या तपासणीत उदर शब्दाचाही अंतर्भाव होईल आणि त्याची प्रतिलोम उपपत्ती सापडेल.

पोट हा चलनातला शब्द असला तरी उदर हा समार्थ संस्कृत शब्द सगळ्या ८
भारतीय भाषांमध्ये साहित्यात, काव्यात वापरला जात असतो. तो तसा वापरण्यामागे काही खास उद्देश नसतो. सुरताशी संबंधित अवयवांचे संस्कृत शब्द मात्र सहेतुक वापरले जातात. मूलतः मलमूत्रांची इंद्रियेच सुरतक्रियेशी संबंधित असल्यामुळे आणि नंतर संस्कृतिक दंभामुळे, सुरत-इंद्रियांचा उघडावाघडा उल्लेख ती इंद्रिये उघडीवाघडी ठेवण्याइतकाच अश्लील आणि ओंगळ मानला जाऊ लागला. या अडचणीवरचा एक उपाय म्हणजे त्यांच्याबाबतचे प्रत्यक्ष शब्द टाळून अप्रत्यक्ष किंवा रूपकात्म शब्दांनी त्यांचा उल्लेख करणे. जसे, लहान मुलाच्या बुलीला मिरची म्हणणे. अडाण्याच्या बोलीत हा प्रकार तर शिष्टभाषेत अप्रत्यक्ष म्हणून संस्कृत शब्दाचा वापर हा प्रकार चालतो. त्यांच्याबाबतचे मूळ शब्द मात्र समाजात वापरात असतात आणि ज्या थरांमध्ये त्यांचे फारसे शुभाशुभ नसते त्यांच्यात त्या मूळ शब्दांचा मुक्त वापरही होत असतो.

हे 'अवघड जागचे सोपे शब्द'च भाषेतले प्राथमिक शब्द असतात, सभ्यतेसाठी वापरले जाणारे पर्याय आणि समार्थ किंवा उद्भ्रंशरूप संस्कृत शब्द हे प्राथमिक

नसतात; मग ते संस्कृत शब्द कितीही जुने किंवा नवे असोत. मराठीतले हे प्राथमिक शब्द सगळे दक्षिणी भाषांशीच जुळणारे आहेत आणि त्यांच्यात आदिम शब्दघटनेच्या खुणाही दिसून येतात. उदाहरणार्थ,

द ३५२८	पुल्	गवत, गवत-कुळ (उदा० बांबू)
द ३५३२	पुल्, पुलि	वाघ
द ३५३३	पुल्कु	आलिंगणे, मैथुन करणे
द ३५३४	(क०) बुल्लि	पुरुषाचे लिंग

पहिल्या दोन शब्दांत हिरव्या रंगाच्या साम्यावरून तर पहिल्या आणि तिसऱ्या-चौथ्या शब्दात ताठपणासारख्या गुणधर्मांच्या साम्यावरून शब्दयोजना झाली असेल.

द ३६६४	पोच्चु	मायअंगावरचे केस, योनी, गुद
(क०)	पुच्चि	योनी
द १४१३	कुण्टि	टिर्री, ढुंगण
(क०)	कुण्डे	गुद [गांड]
द १४१४	कुण्डु	गोळा, जड आणि गोलाकार वस्तू

यांतले हिरवेकच्चे मराठी शब्द शिष्टभाषेला नको असतात. पण शिष्टभाषेने कवळलेला शब्दही मुळात हिरवाकच्चा असू शकतो; कवळणे, कवेत घेणे वगैरे :

द ११११	कवर्	दुबेळकी फांदी, दुधार नदी
(मलै०)	कव	दुबेळकी फांदी, टांगांच्या मधली जागा
द १११४	कववु	लालसा धरणे, आलिंगणे, मैथुन करणे

यातला अर्थविकास उघड आहे.

९ अनेक बोलींमधल्या समार्थ शब्दांची सरमिसळ किंवा आलटपालट जशी गुड्घा घोटा यांसारख्या शब्दांमध्ये दिसते तशीच चेहऱ्यावरच्या अवयवांच्या शब्दांमध्ये दिसते. याची कारणे सर्वभाषिक अभ्यासातूनच उकलली जातील. तूर्त या प्रकारची उदाहरणे नोंदता येतील.

द ३००९	नाक्कु	जीभ	* नाक
द ११८९	कन्नम्	कान, गाल	* कनपट, कान
द १२३७	काल्	लाळ गळणे	* गाल?
द ४०००	मुक	वास घेणे	
द ४००३	मुकम्	तोंड	* मुख
द ४१२२	मूक्कु	नाक	
द २८७९	तोण्टै	घसा, गळा	* तोंड
द ३०६९	नुतल्	कपाळ, भुवई, कवटी	* निढळ, निटिल

द ३११८ नेऱ्रि कपाळ * नेत्र?

शेवटच्या शब्दाचा उच्चार नेट्रि असा होईल. त्यावरून संमत तत्त्वानुसार नेत्र शब्द येणे अशक्य नाही. नी धातूवरून नेत्र अशी बुद्धिगम्य उपपत्ती नंतर दिली जाऊ शकते.

कपाळ आणि डोळे एकाला एक लागूनच आहेत. नखे आणि दात यांचा तसा संबंध नाही. तरीपण साम्ये टिपून वस्तूंना जवळजवळ सारख्या शब्दांनी ओळखण्याची प्रवृत्ती त्यांच्या तमिळ नावांवरून दिसते :

नकम् नख
द २९४४ नकु हसणे, फुलपरी उमलणे, चमकणे
नकाऽर् हसण्याने दिसणारे दात

हाताची चार बोटे एकत्र आणि नखांच्या बाजूने पाहिली तर हसणाराचे दात दिसतात तशी एका ओळीत चमकताना दिसतील. नकु आणि नकम्-नखम् (संस्कृत) यांचा असा संबंध असावा.

शेंडीचे तमिळपण सहज दिसते. पण शिखेचे काय? तिची गुंतागुंत संमत १० तत्त्वांनी अडाण्याची भाषा, मिथ्यविचार, उद्भ्रंशाची प्रक्रिया इत्यादींच्या मदतीने सोडवता येते.

त ४८२ उरि शिंके [अडाणी भाषेत शिकऽ]
त १४२५ चिमिलि शिंके, शेंडी
द २०६० चिकि गुंता होणे. पीळ * शिखा
द ५६४ (मलै०) उरि सरकती गाठ, फासा

शिंके आणि शेंडी यांच्यात साम्य कोणते? सरकती गाठ दोघांनाही असते; किंबहुना गाठ मारलेल्या शेंडीचे चित्र डोळ्यासमोर आणले तर शिंक्यासारखे दिसेल. एरवी गुंता होणे-असणे [चिकि] हे शेंडीचे किंवा शिखेचे लक्षण. शिक्क असा शब्द ऋग्वेदातही आहे असे सांगतात. म्हणजे हा संमत संबंध वेदपूर्व काळापासूनचा आहे.

□□□

१४. चूलमूल, नातीगोती

आनंद मासिकाचे संस्थापक कै. वासुदेव गोविंद आपटे यांनी आपल्या ५९ वर्षांच्या आयुष्यात विविध प्रकारचे सत्त्वगुणयुक्त वाङ्मय निर्माण केले. त्यांच्या शब्दरत्नाकर या मराठी कोशाच्या प्रस्तावनेत मोल्स्वर्थच्या कोशातल्या 'चुकांचे उदाहरण' म्हणून म्हटले आहे, 'मेहुणी म्हणजे मामाची किंवा आतेची मुलगी अर्थात् मामेबहीण किंवा आतेबहीण असा अर्थ दिला आहे! हा विलक्षण अर्थ त्यास कोणीं सांगितला न कळे!'

हा एक अर्थ त्यांना त्यांच्या दूधवाल्याने किंवा भांडीवालीनेही सांगितला असता. कारण, बहुजन समाजात तो प्रचलित आहे. महाराष्ट्रातल्या विवाहसंस्थेचा खास पैलू तो दाखवतो. नवरदेव वरातीनंतर गृहप्रवेश करतो, तेव्हा बहिणी त्याची वाट अडवतात, त्याची लेक आपल्या लेकाला मिळेल असे वचन घेतात, मग वाट देतात. ही सारी परंपरा त्या अर्थात आणि शब्दात साकळली आहे. पुढारलेल्या समाजात ती कदाचित माहीत नसते.

आते-मामेबहीण मेहुणी, हा नातेसंबंध उत्तरेत होत नाही, दक्षिणेत मात्र
१ होतो तेव्हा तो महाराष्ट्रीयांनी द्रविडांकडून उचलला असे समाजविज्ञ सांगतात. मग, ते शब्दही त्यांच्या भाषेतून येणे सहज आहे. मग 'मेहुण' हे 'मिथुन'वरून निघण्यापेक्षा, मेहुणा-मेहुणी ही मैत्तुनन्-मैत्तुनि या तमिळ शब्दांवरून निघणे जास्त सयुक्तिक. मावशीही मातृष्वसा किंवा मातृपुच्छ असण्यापेक्षा तमिळ माद्दि — माशिश म्हणजे बायकोची बहीण असणे अधिक तर्कसंगत. मुले होण्याच्याही आधीचे ते नाते असल्याने मुलांनी बापाकडून तो शब्द उचलणे स्वाभाविक. जेवू घालण्याचे शब्द आईने माहेरचे आणले असावेत. पोळीचेच पहा.

तंजावरच्या मराठशाहीमुळे अनेक कुटुंबे तीनशे वर्षांपासून दक्षिणेत स्थायिक झाली. ती घरात मराठी आणि बाहेर मुलखानुसार तमिळ, कन्नड वगैरे असतात. मद्रासच्या त्यांच्या मराठा शिक्षण फंडाच्या सुवर्णउत्सवाला कै. शंकरराव देव पाहुणे
२ होते. पाहुण्यांसाठी खास मराठी पुरणपोळीचा बेत होता. देव आनंदचकित झाले

होते. खरे तर पोळि बोळि हे शब्द तमिळ-मलैयाळम् भाषांमध्ये आणि हा पदार्थही त्या मुलखामध्ये रूढ असल्याचे आपल्याला माहीत नसते. मागे मागे गेले तर त्याचा संबंध बहुधा पो म्हणजे फुगणे, फुलणे या तमिळ शब्दाशी असावा. असे आपल्या ह्या खास पक्वान्नाचे नाव मूळचे तमिळ असावे.

पोळीसारखेच पुरण घातलेली पण उकडलेली 'दिंडे' नागपंचमीच्या दिवशी
मराठी शेतकऱ्यांच्या घरी करतात. त्यांचे नाव असे का म्हणून विचारले तर ३
कुळवाच्या लाकडी दिंडाशी संबंध जोडतील. तमिळ तिण् म्हणजे खाणे यावरून तिण्डि दिण्डि म्हणजे खाण्याचा पदार्थ हे त्याचे मूळ असावे.

हे सारे वाढून घ्यायला लागणारे ताट, तमिळ तट्टम् असणार. ठोकून ठोकून
सपाट बनवल्याचा इतिहास त्या शब्दातच आहे. तट्टम् सपाट, तर वट्टि गोल. ४
वट्टि म्हणजे एक माप, टोपली. आपल्या ताटातली वाटी वट्टि ची बहीण असावी. चप्पत्ति – सप्पत्ति – सप्पत्तै म्हणजे चपटे किंवा सपाट. चपातीचा पत्ता यात शोधावा काय?

चप्पत्तै म्हणजे चपात्या असोत नसोत, अत्तै म्हणजे मात्र आत्या, कोकणची
आत्ते. अत्तैचा भाऊ अत्तन् किंवा अप्पन् म्हणजे वडील. त्या दोघांचेही वडील ५
तात्ता, आपले तात्या. आच्चि आपल्या आजी झाल्या. अण् म्हणजे वरचा, मग अण्णा म्हणजे वरचा किंवा थोरला भाऊ; अक्का म्हणजे थोरली बहीण. आपली 'बाई' कोणत्या भाषेतून आली हे अजून गूढ आहे. बहुधा तमिळ. पै म्हणजे सौंदर्य, नव्हाळी. पै साठी पय् म्हणणे तमिळला मंजूर आहे. तेव्हा तमिळ सौंदर्यमूर्ती पै, पय् – बय– बयो– बाय अशा पैदल रस्त्याने मराठी बाई होऊन आली असावी.

या पै चा बीजशब्द, हिरवे या अर्थाचा पच. हिरवे ते तेव्हा सुंदर होते. पाचि = हिरवे असलेले. पाचूची आठवण यायला हरकत नाही. पाचि म्हणजे शेवाळही, पण त्यातल्या कठोर वर्णांना जरा मृदू केले तर सुंदर हिरवीगार 'भाजी'
तयार होईल! ६

भाजीपाले, डाळी, धान्ये या चुलीभोवती सापडणाऱ्या अनेक गोष्टी तमिळने मराठीला दिल्या आहेत. वाळ्=पांढरेपणा – कडव्या वालांचा. वट्ट = गोल त्यावरून वट्टाणि = वाटाणा. वाङ्गम्=वांगे. त्याचा देठ 'कातरल्या 'सारखा म्हणून तमिळेत
ते 'कत्तरि क् काय्'. कोथिंबिरीची पाने कशी कोरल्यासारखी, म्हणूनच कदाचित ७
ती कोत्तुमल्लि किंवा कोरीव जाई, तर कोशिंबीर बहुधा मूळची कोऽशुम्बरि. लवलवती शेंग म्हटले की चवळीची आठवण येते. तमिळ चवळ् म्हणजे लवलवणेच.

कोवळ्या पानांना इल, इलै म्हणतात. वंशवेलीच्या कोवळ्या पानांना,

८ मुलंलेकरांना इलैयर् म्हणतात. तमिळला जरूर वाटणारी पण मराठीला तशी न वाटणारी, ल आधीची इ लोपविली तर लैयरच्यामध्ये आपली 'लेकरं' लपलेली दिसतील. त्यांचे तमिळनुसार 'कल्याण' करायचे म्हणजे लग्न करायचे, लेकील
९ नाणम् (न्हाण) आले, म्हणजेच संकोचाची, लज्जेची भावना आली की लग्नाची घडपड सुरू होते. केऽलूवन् - नवरामुलगा नक्की होतो. तोच कोकणचा घो, तमिळ कोऽ. सारे केऽलिर् – सोयरे जमा होतात. वधूवरांना – वदुवै आणि केऽलूवन्
१० यांना - केळवणाची जेवणे होतात. मंडळी जास्त म्हणून चूलैयर – भट्टीवर – स्वैपाक होतो. जेवण ऊनऊन, पिण्याचे पाणी – तण् नीर – थंड नीर असते. चुवै [चव] घेत घेत जेवण होते. जेवणानंतर कुणाच्या तरी वट्टुवम् [बटवा] मधून पानसुपारी-
११ कातचुना निघतो. विडे चघळीत मद्राशांची टिंगल करणे सुरू होते. वास्तविक भाषेच्या नात्याने तेही केळवणातले केऽलिर् असतात : अज्ञात, अविदित तरी उपस्थित.

□

११ तमिळाईशी मराठशाईचे भाषेचे नाते दाखवण्यात नात्यांच्या भाषेचा मोठाच उपयोग होईल. इरावती कर्वे यांच्या 'मराठी लोकांची संस्कृति'मध्ये पृ. १४६-१९२ वर 'मराठी कुटुंब' संस्थेचा विचार केला आहे. त्यात नातेवाचक शब्दांच्या व्युत्पत्ती, उपपत्ती, सामाजिक अर्थ इत्यादिकांची चर्चा आहे. ती पहिली असता व्युत्पत्तीवरून किती दूरगामी निष्कर्ष काढले आहेत ते लक्षात येईल. त्या बहुतेक व्युत्पत्तींसाठी 'मराठीची आई संस्कृत' हे गृहीतकृत्य आहे आणि 'महाराष्ट्रातील कुटुंबपद्धति ही संस्कृति-संघर्षाची निदर्शक आहे' असा निष्कर्ष आहे (पृ. १९१).

इतिहासातला भूतकाळ, राष्ट्रीय वर्तमानकाळ आणि महाराष्ट्रातील समाजाचा भविष्यकाळ या तिन्ही विषयींच्या आपल्या विचारांवर अशा निष्कर्षांचा मूलगामी परिणाम होऊ शकतो. म्हणून भाषिकाच्या या प्रयुक्तीकडे चिकित्सेने पाहिले पाहिजे. त्यासाठी या नाते-शब्दांची निरखणे उपयुक्त होतील. येथे आपण या सर्व शब्दांकडे केवळ भाषिक दृष्टीने पाहणार आहोत. म्हणून त्या ग्रंथातील या संदर्भातली काही विधाने पार्श्वभूमीसाठी नोंदून घेऊ :

आत्या शब्दाचे मूळ काय असावे कळत नाही. कदाचित् तें तात शब्दाचे स्त्रीलिंगी रूप असावे . . .किंवा कानडींतील अत्ते शब्दापासून आल्याचा संभव जास्त दिसतो. (१५७)

मावशी शब्द मातृष्वसा ह्या शब्दावरून आला नसून मातृपुच्छ (माउच्छ,

आईच्या मागूनची = आईची धाकटी बहीण) ह्या शब्दावरून आला असावा असा डॉ. कर्वे यांचा तर्क आहे. पुढे येणाऱ्या मावशी शब्दाचे विवेचन पाहिल्यास ह्या तर्काला बळकटी येते. (१५७)

"मेहूण" शब्द संस्कृत "मिथुन" म्हणजे जोडपे ह्या शब्दापासून साधलेला आहे. (१५८)

ल्योक किंवा लेक शब्दाचे मूळ माहीत नाही. (१५९)

मामाची बायको आत्या अशा संज्ञा मात्र उत्तरेकडच्या कुटुंबपद्धतील मुळीच जुळत नाहीत ... नातेवाचक संज्ञांची ही पद्धत मराठी लोकांनी द्राविडांकडून उचललेली दिसते. (१६०)

बाई शब्दाचा नक्की अर्थ काय असावा हे माहीत नाही, पण तो मातृवाचक असावा असे वाटते. (१६३)

वहिणीचेच वोहिणी असे जुने रूप आढळते. वोहिणी शब्द एक धेडगुजरी समास आहे. वधू+अग्गि=घरातील थोरली सासुरवाशीण, थोरल्या भावाची बायको असा अर्थ आहे. (१६५) १

मराठीतल्या सगळ्या नातेवाचक संज्ञा निरखणाला घेतल्या तशाच सर्व दक्षिणी भाषांमधल्याही तुला-विचाराला घेतल्या असल्या तर यातली अनेक विधाने सहज बदलून गेली असती. नुसती विधानेच नव्हे तर निष्कर्षही बदलले असते. मामाची बायको आत्या एवढी एकच संज्ञांची पद्धत (च) तेवढी द्राविडांकरून उचलली असे नसून सारा नातेवाचक शब्दसंसारच त्या भाषांशी जुळता आहे. हे माहीत झाल्यावर उत्तर-दक्षिण संस्कृति-संघर्ष किंवा आत्याची मुलगी न करण्यात जित-जेते-संबंधातली श्रेष्ठकनिष्ठता अशा संकल्पना पुढे आल्या नसत्या.

व्युत्पत्ती आणि सामाजिक पार्श्वभूमी यांचा विचार बरोबरीने करावयास हवा. मिथुन-मैथुन वरून मेहूण हा शब्द निघत असेल तर मैत्तुन वरून तो येण्यात ध्वनिकाची तरी मुळीच अडचण येणार नाही. त्या शब्दाचे अर्थ 'बायकोचा किंवा नवऱ्याचा भाऊ, मामाचा किंवा आत्याचा मुलगा' असेच असल्यामुळे तोच उगमाचा शब्द असणे सयुक्तिक ठरते. या नात्यात शरीरसंबंध गृहीत धरलेला नाही. 'प्री-पल्लवन् तमिल इंडेक्स 'मध्ये मैत्तुनर् चा एक अर्थ 'एकाद्याची थट्टामस्करी करण्याचा अधिकार ज्यांना आहे ते' असा दिला आहे. आणि बहुजनसमाजात मेव्हणा-मेहुणा या संज्ञेचा उपयोग या अर्थानेही होत असतो.

मावशीसाठी मातृष्वसा हे निव्वळ भाषांतर आहे आणि ते ध्वनिकाच्या नियमांना उतरत नसल्यामुळे मातृपुच्छ हा कल्पित शब्द पुढे आला आहे. खुद्द पुच्छ हा शब्द संस्कृत-मूलक असण्यापेक्षा 'पोच्चु = माय-अंगावरचे केस' याच्याशी संबंधित

असावा. जनावरांतल्या मादीची योनी झाकण्याचे त्याचे कार्य नावाला अनुरूपच आहे. उद्धृत ग्रंथातले मावशीविषयक विवेचन ती 'आईची धाकटी बहीण' या गृहीताला अनुसरून म्हणजेच मातृपुच्छाच्या कल्पनेला धरून असल्यामुळे त्याने त्या व्युत्पत्तीला बळकटी येत नाही.

२ नात्यागोत्याप्रमाणे जेवणाखाण्याचेही मराठी शब्द दक्षिणी भाषांशी जुळते आहेत :

त २९७०	पोऽलि	गहू, डाळ, साखर वगैरेंचा केलेला गोड खाद्यपदार्थ
त २९६९	पोऽल्	पोकळ वस्तू

यावरून पोळीचे मूळ कळते. 'तमिळनाडूत गहू कुठे होतो?' अशी शंका निघेल. महाराष्ट्रात इनामगावच्या उत्खननात सनपूर्व १५०० च्या सुमाराचे गव्हाचे दाणे सापडले आहेत यावरून गव्हाची लागवड भारताच्या दक्षिणार्धात किती पुरातन आहे हे समजते. भाषेचा प्रदेशिक विस्तार आजच्यावरून ठरवू नये हे पुन्हा सांगणे नकोच.

३ लोकव्युत्पत्ती शब्दांची स्पष्टीकरणे कशी करते याचे 'दिंड' हे उदाहरण. पोळी गोल असते तर दिंड चौकोनी. त्याचा दणकट आकार कुळव या औताच्या मुख्य आडव्या लाकडाच्या दणकट रूपाशी जुळतो. पण एवढ्याने ते स्पष्टीकरण खरे किंवा मिथ्यरूपातही मूळचे असेल असे मानता येत नाही.

४ तट्टम > ताट, वट्टि > वाटी अशा शब्दांमध्ये पुढच्या जोडाक्षरामुळे आधीचा स्वर दीर्घ झाल्याचे दिसते. अर्थाच्या अंगाने तो शब्द

द २४६६	तट्टु	ठोकणे, दणके देणे तुल्य: सं० ताडन
द २४६४	तट्टि	वेताचा किंवा बाळ्याचा तट्टा

यासारख्या शब्दांच्या तुलनेने कळतो.

द २४६०	तटै	बांध, बंधारा	*थडी
द २४६०	तटुप्पु	अडथळा करणे, दाबात ठेवणे	* दडपणे
द २४६५	तट्टि	चड्डी तुल्य : सं० धटी	* धडुते

यांसारख्या उदाहरणांवरून त या लिखित वर्णाने मराठीतल्या थ द ध या वर्णांचे सूचन कसे होते हे समजून येईल.

५ आत्या आणि बाप यांचा भावंड-भाव त्यांच्याविषयीच्या शब्दांतही आहे.

द १२१	अत्तन्	बाप, वडीलधारे, मोठा माणूस
	अत्तै	बापाची बहीण, सासू, मोठी स्त्री
	अत्तान्	थोरल्या बहिणीचा नवरा

द २५८०   तात्त   आजोबा तुल्य सं० तात

यांवरून आत्या हे तात चे स्त्रीलिंगी रूप नक्कीच नाही हे ध्यानात येईल. तसाच वहिणी किंवा वोहिणी हा घेडगुजरी समास मानण्याचे कारण नाही :

द ९६   अण्   वरचा भाग

द ११२   अण्णि   थोरल्या भावाची बायको

द ४२९२ (कोलमी) वन्न   भावाची बायको

यांवरून वैनी, वहिणी, वोहिणी वगैरे मुक्तभेद मानता येतील.

थोड्याफार फरकाच्या अशा शब्दरूपांना एकाच भाषेत 'मुक्तभेद', एकाच ६
'कुळातल्या' दोन भाषांत 'जुळे शब्द,' भिन्न कुळातल्या भाषांमध्ये 'ऋणशब्द' असे म्हणतात. संस्कृत आणि दक्षिणी भाषांमध्ये अशी समान शब्दरूपे आढळली तर त्यांना फारतर 'ऋणशब्दांची' पदवी मिळते. सामान्यत: संस्कृतला धनको आणि दक्षिणी भाषेला ऋणको मानण्याकडे भाषिकांचा कल असतो. गेल्या तीसएक वर्षांत प्रा. बरो यांनी काही शब्दांपुरते तरी संस्कृतला ऋणकोचे स्थान सुचवले आहे. आर्य लोक बाहेरून आले, त्यामुळे येथल्या झाडाझुडपांची नावे लोकभाषांमध्ये होती तीच संस्कृतात त्यांनी घेतली असा हा दृष्टिकोन आहे. त्याच संस्कृत नावांचे अपभ्रंश होतहोत मराठीतली नावे झाली असे मानले जाते.

पण हा प्रवास संस्कृतमार्गे होण्यापेक्षा थेटच दक्षिणी > मराठी असा झालेला दिसतो. वनस्पतिवाचक अनेक शब्द दक्षिणी-मराठीत सम, तत्सम, तद्भव अशा रूपांमध्ये दिसतात तर इतर अनेकांची उपपत्ती दक्षिणी शब्द-बीजांवरून चांगली लागते. भाजीपाले, डाळी, धान्ये यांची अशी काही उदाहरणे :

द ४१०४   मुला   मुळा

द ३७७८   वेण्टि   भेंडी

द १४५५   कुम्पलम्   भोपळा

यातल्या पहिल्या शब्दात तमिळ – मराठीत फरकच नाही. वेण्डि – भेंडी यात वे चा भे झाला आहे. हा ध्वनिक बदल व–ब–भ या मुक्तभेदाचे उदाहरण. अर्थिक अंगाने वेण्डि या नावात भेंडीचे दोन सहज दिसणारे विशेष टिपले आहेत :

द ४५०९ वेण्टु (वेण्टि-)   उन्हात वाळणे - वाळवणे, कोळपणे
[नाम] नळीचा वगैरे पोकळपणा

भेंडी उन्हात वाळून, कोळपून, पोकळशी होते. याशिवाय मातीच्या कच्च्या विटा उन्हात वाळवून करतात त्यांना भेंडा (अ. व. भेंडे) असा शब्द खेड्यात वापरतात. तुळूमध्ये 'पाण्यात वाढणाऱ्या हलक्या स्पंजी वनस्पतीला बेण्डु' अशा शब्द आहे. मराठीत अशाच हलक्या लाकडाच्या एका झाडाला भेंड हेच नाव आहे.

कुम्पलम् या शब्दात कुमि = ढिगारा यावरून फळांच्या संदर्भात झालेला वर्णनपर अर्थविस्तार दिसतो. कुम्भफला हे त्याचे संस्कृत तुल्यरूप दिले आहे. या कुम्भाकाराचे, ढीगपणाचे सूचनच भोपळा मधल्या भो वरून होत असावे :

द ३६५८ पोङ्कु बुद्‌बुदणे, सुजणे, वाढून मोठे होणे

यातला पो हा मूळ शब्द. पोफळ सारख्या फळनावात तो पो असाच राहिला, भोपळा मध्ये पो> बो> भो असा बदलला.

द २७५६ तुवर् तुरटपणा

द २७५७ तुवरै तूर

यांच्यात मराठी तूर या डाळीचे अस्तित्व आहे. उडीदाच्या डाळीला तमिळ शब्द उळुन्दु आहे. त्यातला ळ आणि मराठी ड यांची जुळणी बसते. वाळ् = वाढणे यासारखी. मूग यासाठी उळुन्दु हाही पर्याय शब्द आहे. पण त्याची फोड

द ४००७ मुकिळ् कळी रूप पावणे, फुलासारखे मिटणे

(कन्नड) मुगि डोळे, तोंड वगैरे बंद करणे-होणे.

यांतल्या अर्थावरून चांगली होते. मुगाचा दाणा असा बंदच असतो. पुन्हा, या शब्दाचे तुल्य संस्कृत शब्द मुकुल, मुद्‌गर हे दिले आहेत. मुगाचा संस्कृत उद्‌भ्रंश मुद्‌ग हाच आहे. मूग गिळून बसणे म्हणजे 'मुकिळुन' किंवा तोंड बंद करून बसणेच होय. या वाक्प्रचाराच्या संदर्भात संस्कृत व्युत्पत्तीला मूग गिळून बसावे लागते.

वरी, नाचणी (रागी) कोकणचा प्रांत पिकवतो. त्यांची तमिळ नावे वरकु आणि इराकि. ज्वारी बाजरी देशावर होतात. द २३५९ तमिळ चोलम्, चोन्नल; कन्नड जोल, तेलुगु जोन्न, जोन्नल यांनी ज्वारीचाच बोध होतो. त्या अनेक मुक्तभेदांचीच आणखी मुक्त रूपे शाळू, जोंधळा या मराठी नावांमध्ये आहेत. साहजिकच संस्कृत यवनाल हा उद्‌भ्रंश म्हणता येईल.

बाजरी हिरवी असते हे तिच्या नावाचे कारण दिसते. मराठीतल्या प फ ब भ या चारी ध्वनींसाठी तमिळ प हे एकच लिखित अक्षर शब्दकोशात दिसेल. पाचि = हिरवी वस्तू, पाचु = हिरवेपणा यांतून 'भाजी' लसलसली तशीच 'बाजरी' ही दाणा धरील. 'बर्जरी' हा भरजरी संस्कृत उद्‌भ्रंश अर्थरहित आहे.

७ मग हे सर्व शब्द मराठीत पिकले आणि इतर दक्षिणी भाषांत विकले असे कशावरून झाले नाही? एकाच प्राचीन कालस्तरावर या सर्व बोली अस्तित्वात होत्या या मानीवानुसार पिकण्या-विकण्याच्या किंवा धनको-ऋणको अशा वेगवेगळ्या भाषा गृहीत धरण्याचे कारण राहत नाही. तरीपण ज्या भाषेवरून एकाद्या शब्दाची फोड व्यवस्थित करता येत असेल तिच्यात तो आधीचा होता असे ठोकळ मानाने मानायला हरकत नाही.

दक्षिणी भाषांची फोड संस्कृत-निरपेक्ष रीतीने झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या शब्दांची घडण त्यांच्यातल्या कल्पशब्दांवरून कल्प-शब्दबीजांवरून वगैरे, स्पष्ट करता येते. मराठीची शब्दसंपत्ती दक्षिणी पण फोड सगळी संस्कृतवरून, त्यामुळे कल्पशब्दांपर्यंत किंवा शब्दबीजांपर्यंत पोचून मराठी शब्दांची फोड होऊच शकली नाही. म्हणून, कदाचित प्राचीन-मराठी रूप हेच अशा एका शब्दगटाचे मूळ असले तरी ते स्पष्टपणे भावत नाही. त्यामुळे साधार व सार्थ व्युत्पत्तीसाठी दक्षिणी भाषांच्या निरखणांकडेच वळावे लागते.

'कोशिंबीर' शब्दात ही भाषिक कोशिंबीर भली जमली आहे. त्या शब्दाचे तमिळ लेक्सिकनमधील उपपादन :

त ११७३ कोऽचुम्परि< मराठी कोशिंबरी एक प्रकारची पच्चडि, डाळ आणि इतर घटकांचे बनवलेले खाद्य

तर महाराष्ट्र शब्दकोशानुसार (पृ. ८०७)

कोशिंबीर कच्च्या फळांची दह्यांत कालवून केलेली चटणी, रायतें, तोंडी लावणे [सं. कुस्तुंबरु, कानडी कोस्तुंबरी]

सं. कुस्तुंबरी, प्राकृत कुत्थुंभरी हे 'कोथिंबीर'चे ही मूळशब्द म्हणून दिले आहेत. (पृ. ७९४). ते उघडच उद्भ्रंश आहेत. दक्षिणी कोशात मात्र,

द १६९४ कोचु वांगी, आंबे वगैरे उकडून त्याला चिंच, मिरची, मीठ लावून केलेला घोळ.

कन्नड गोज्जु, तुळू गोज्जि हेही निखालस दक्षिणी म्हणून दिले आहेत!

व्युत्पत्तीचा हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ सोडून देऊन विचार केला तर असे दिसते की हा पदार्थ या भाषा बोलणारामध्ये चांगला परिपाठीत होता. त्याच्या मुळाशी 'कोचु=कवठाचा मगज' यासारखा तमिळ किंवा 'कोचणे' सारखा मराठी शब्द असू शकेल.

या मूळ शब्दांविषयीच्या कल्पना बसवताना ते शब्द उपयोगात आणणाऱ्या ८
समाजाच्या मनोभूमिकेत प्रवेश करून अर्थिक संबंध किंवा लक्षणा सुचवली पाहिजे. पशुपालांनी वासरू आणि मूल यांना समान शब्द वापरावा हे जसे सहज तसेच पिके काढणारांनी कोवळ्या पानांशी किंवा कळ्याफुलांशी मुलांची तुलना करणारे शब्द वापरावेत हेही सहज. भाषाकुळांचे कुंपण घातले की मात्र निरखणांचे वावर संकुचित होते आणि लक्षणा ओढूनताणून बसवल्या जातात. 'भारतार्य भाषेतले 'मूल' विषयक काही शब्द' या विषयावर, भांडारकर इन्स्टिट्यूटच्या रजत-उत्सवी वार्षिकात डॉ. कत्रे यांचा लेख आहे. त्यातले उद्धृत : (पृ. २४९).

'पुत्र, मुलगा' यासाठी मराठी आणि कोंकणी यांच्या काही बोलींमध्ये 'झिल्

आणि झिलगा किंवा झिल्गो' हे शब्दध्वनी आपल्याला आढळतात. हे फक्त मध्य-भारतार्य * झिल्ल त्याच 'छोटा' या अर्थाने भिडू शकेल; जसे नेपाळी झिल्ली = मिठाईचे छोटे तुकडे.

मराठी लेंक लेंकरू व गुजराती डीकरी, डीकरो आणि गुजराती डिकू 'छोटीशी काठी (गुरे हाकण्यासाठी?)' यांचा एकमेकांशी घनिष्ट संबंध दिसतो. पहिले चार 'मूल - मुलगा वा मुलगी' दर्शवितात. मध्य-भारतार्य मूळ रूपे * लिक्क (: * लेक्क), * दिक्क * डिक्क– अशी सूचित होतात. याच्यामागे सध्या आपण जाऊ शकत नाही.

भारतार्य भाषेची मर्यादा पार करून दक्षिणी भाषांमध्ये शोध घेतला तर मिठाईचे तुकडे आणि गुरे हाकण्याची काठी यांसारख्या बऱ्याच अननुरूप लक्षणांची गरज पडत नाही :

द २१०७	चिल्	छोटा तुकडा
	चिल्लु चिल्लि	छोटा तुकडा
द २१३५	चिन्न	लहान, लहान वयाचा
(क०)	चिण्ण	मुलगा
द ४३१	इल	पान, पाकळी
द ४३६	इल, इळे	कोवळे. कोवळे, तरुण वय
	इळैयर्	तरुण मुलगे
(ते०)	लेंग	पिले वासरू

प्राकृत आणि गुजराती रूपांचाही यांच्याशीच संबंध जुळू शकतो.

९ कधीकधी सामाजिक आचारावरून व्युत्पत्ती किंवा मूळ शब्दाचा अर्थ ठरवला जातो. विटाळशीला न्हावे लागते या चालू आचारधर्मावरून न्हाण, नहाण याचा अर्थ आणि 'स्नान' हे त्याचे मूळ ही दोन्ही ठरतात. हा आचारधर्म प्राचीन काळीही होताच असे खात्रीने सांगता येत नाही. न्हाऊ घालणे तान्ह्या मुलापासून चालू असते. मुलगी वयात येण्याशी त्याचा संबंध असताच तर त्या न्हाणाला बहुधा काही खास नाव मिळाले असते. या अभावात्म बाबी सोडून शब्दाचे संगत भाषांतले अस्तित्व ही भावात्म बाजू पाहिली तर दक्षिणी भाषांमधून नहाणाचा अर्थ जास्त चांगला लागतो.

द ३०१४	नाण्	संकोच, लज्जा
	नाणम्	लज्जा, मुग्धावस्था (स्त्रीसुलभ)
(क०)	नाण्	जननाचे इंद्रिय - लाज वाटण्याचे कारण म्हणून

नहाण येणे म्हणजे मुग्धावस्थेत प्रवेश. आंघोळीशी किंवा पाण्याशी त्याचा संबंध

नाही. म्हणून त्याचे मूळ नाण्, स्नान नव्हे.

पाण्याला नीर् म्हणतात आणि थंड पाण्याला तण्णीर् किंवा तण्णि. १०
बोलण्याचालण्यात तण्णि हाच शब्द प्रचारात आहे :

द २४७३	तण्	थंड, शीतल; कृपा, प्रेम
	तण्णि	थंड पाणी, पाणी
(क०)	तणि	थंडावणे, ताजेतवाने होणे, गळून जाणे.

थंड या मराठी शब्दाचे सर्व अर्थ येथे सापडतात. त्याचबरोबर शीतळतेचा कृपाप्रेमपर अर्थही चिंत्य आहे. भाषिकाच्या दृष्टीने तण्णीर् चे तण्णि होणे लक्षणीय आहे. 'गळून जाणे' तणि या एकाच रूपावरून सगळी पार्श्वभूमी कळणे कठीण आहे. 'गळून जाणे' यासारख्या अर्थावरून आणि आ हा प्रत्यय नकारार्थक असतो हे पाहता 'तण्हा' यासारखा शब्दही याच मुळातून उगम पावला असेल का? असल्यास संमत भाषा-संबंधातला तो एक खुणेचा शब्द होईल.

□ □ □

१५. यादुम् ऊरे, यावरुम् केऽलिर

भारताच्या दक्षिण टोकाच्या तुत्तिकुडि [छोटेसे गाव, तुतिकोरीन] या बंदरापासून पंधराएक किलोमीटरवर सॉयरपुरम् म्हणून वाळूपठार आहे. तिथल्या शुभवर्तमानप्रसारक मंडळीत १८३९ मध्ये एकोणीस वर्षांचा एक तरुण इंग्रज मिशनरी आला. तो भाषाकोविद एवढा की इंग्लंडातून निघाल्यावर आठ महिन्यांच्या बोटीच्या प्रवासात तमिळ शिकून घेऊन त्याने उतरल्याबरोबर त्या भाषेत प्रवचनही केले. सॉयरपुरम्ला उन्हाळा असह्य. त्यात तग धरून निर्वेध अभ्यास करता यावा म्हणून हा तरुण पाण्याने भरलेल्या कुंडात बसून वाचन करी. जन्मभर तमिळाईच्या अभ्यासात आकंठ बुडून जाण्याची ही जणू पूर्वखूणच होती. त्याचे नाव त्याच्या मिशनला साजेसेच होते : जॉर्ज उग्लोव 'पोप'.

डॉ. पोप यांनी आपल्या चाळीस वर्षांच्या भारतवासात तमिळची बहुविध सेवा केली. तमिळ व्याकरण, इंग्रजी-तमिळ कोश, नवनीतासारखे काव्यसंग्रह वगैरे संदर्भसाहित्य तयार केले. १८८५ मध्ये ते आक्सफर्ड विद्यापीठात तमिळचे प्राध्यापक झाले. नंतर त्यांनी तिरु-क्कुरळ ग्रंथाचा छंदबद्ध इंग्रजी अनुवाद केला; तसाच नालडियार् (चौपाया), तिरुवाचकम् [पुण्यवाणी], मणिमेकलै या काव्य-नीतिग्रंथाचाही. मरणोत्तर स्मरणशिलेवर आपला उल्लेख तमिळ् माणवन् [तमिळ-उपासक] म्हणून करावा अशी सूचना त्यांनी दिली होती.

या थोर तमिळ उपासकाने १९०६ साली भारतातल्या मित्रांना नव्या वर्षाच्या शुभकामना म्हणून तमिळ संघवाङ्मयातील पुरनानूरु [बाह्य-चतुःशती] या गाथेतले पुढील आगवल ['अभंग'] इंग्रजीत करून पाठवले होते :

जानिगल

यादुम् ऊरेऽ यावरुम् केऽलिर्
तीदुम् नन्रुम् पिरर् तर वारा
नोऽदलुम् तणिदलुम् अवर्रोऽरन्न
चादलुम् पुदुवदु अन्रेऽ वाळ्तल्

ज्ञानिये

अवघे मूळगाव, सकळ सोईरे
बुरे भले परें देउनि येना।
पोळणे वोळणे तया परीचेच
मरणे नवखे नच। सौख्यजिणे–

इन्दिु एन मगिळुन्दन्रुम् इलमेऽ
मुनिविन्
इन्नादु एन्रलुम् इलमेऽ मिन्नोडु
वानम् तण् तुलि तलैइ आनादु
कल् पोरुदु इरङ्गुम् मल्लल्
पेऽर् यार्रु
नीर् वळिप्पडूउम् पुणैपोल्,
आर् उयिर्
मुरै वळिप्पडूउम् एन्पदु तिरलोऽर्
काट्चियिन् तेलिन्दनम्, आगलिन्
माट्चियिन्
पेरियोऽरै वियत्तलुम् इलमेऽ
चिरियोऽरै इगळ्तल् अदनिनुम् इलमे!

गोड ही हरिख ना।
सोसताना
अगोड ही भाष ना। वीजेसवे–
मेघ थंड धारा घरसून धडल्या–
कडेफोड धावत्या मळ्या
महा नदीच्या
धारेस लागलेल्या नावेपरि
प्रिय जीवन
वाटेस लागते म्हणुन। धीमंतांचे
प्रातिभ उमजले। भल्या
मातुवंत
थोरांना विस्मित न व्हायाचे।
चिल्लरां तुच्छिणे त्याहुनी नाही॥

सगळे गाव आपले, सारे लोक सोयरे; बरे वाईट, दुःखपरिहार कुणी देत नाही, मनातलेच असतात. मरण, सुखाचे वा दुःखाचे जीवन सर्व सारखीच. वळवाच्या पावसाने फुफाटलेल्या धारेला लागलेल्या नावेप्रमाणे हे जीवन आपल्या कर्तुत्वीवाचूनच चालते हे जाणत्यांनी स्वतः जाणून आम्हाला सांगितले. म्हणून मोठ्यांचा अचंबा नाही, छोट्यांची तुच्छता नाही. हा आशय. अनुवादात मूळ तमिळ शब्दांच्या क्रमानेच मराठी प्रतिशब्द योजिले आहेत. त्यामुळे मुळातले सारे सत्त्व कदाचित आले नसले तरी भाषाशरीरे दोन्ही सारखीच आहेत एवढे तरी जाणवावे.

यादुम् ऊरेऽ यावरुम् केऽलिर् यातला आशय तर ओळखीचाच आहे. 'हे विश्वचि माझे घर' म्हणणाऱ्या मऱ्हाटा ज्ञानेश्वराचा, 'वसुधैव कुटुम्बकम्' म्हणणाऱ्या संस्कृत कवीचा तोच आशय आहे. कोणत्याही कितीही वर्षांच्या शुभकामना द्यायला तो समर्थ आहे. माणसाच्या मनातल्या सर्वोत्तम शुभकामनेचा तो उद्गार आहे. भारतात किमान तीन हजार वर्षे कोटि कोटि कंठांनी गायिलेल्या संस्कृतिमूल्याचे ते शब्दरूप आहे.

ते शब्द तमिळ आहेत; म्हणून काही परके नाहीत. भाषा माणसांनी माणसांसाठी बनवल्या आहेत. त्या कोणा एकेका वंशाच्या किंवा देशाच्या मालकीच्या नसतात. कोणती भाषा कोणाहून जुनी यालाही तसा अर्थ नाही. कोणत्या भाषेची इतिहास-साधने किती जुन्या काळापर्यंतची उपलब्ध आहेत एवढेच सांगता येत असते.

भारतापुरते पाहता, आर्य आणि द्रविड असे भाषांचे गट करून त्यांच्यात

आणि त्या बोलणारात आपण जणू भिंती उभ्या केल्या. त्यामुळे संस्कृतभाषिक 'आर्यांचा' लिथुआनिआ किंवा लॅटव्हियातील प्राचीन रहिवाशांशी अथवा तमिळ भाषिक 'द्रविडांचा' ईजीयन किंवा इजिप्शियन लोकांशी संबंध लावताना जी भावना सूक्ष्म गौरवाची असते, ती मराठीचा तमिळशी संबंध लावताना उघड संशयाची बनते. हे शास्त्राला आणि राष्ट्रालाही बरे नव्हे. स्वतंत्र भारतात याही विषयाचा स्वतंत्र आणि शास्त्रीय विचार व्हायला हवा.

'अडगुळं मडगुळं' या बोबडबोलातून सहज पण स्पष्ट दिसलेली मराठी आणि तमिळ यांची जवळिक सामान्यजनांपुढे मांडण्यासाठी स्वातंत्र्यदिनापासून ही 'करविली तैशी केली वटवट'. त्या बोबडबोलापासून 'यावरुम् केऽलिर्' या महावाक्यापर्यंत! 'साधना'च्या एका पानावर, उडतउडत घडलेले हे भाषिक 'दक्षिणायन.'

हे दक्षिणायन येथे समाप्त होत आहे.

□

१ दक्षिणायन समाप्त होते तेव्हाच उत्तरायणाचा आरंभ होत असतो. विज्ञानिक अयनात नवी निरखणे नवे प्रश्न उभे करतात; त्यांची उत्तरे शोधण्यानेच अयन पुढे चालू राहते. तेच येथे 'उत्तरायण'! मराठी भाषासंस्कृतीच्या विज्ञानिक अभ्यासात दक्षिणी भाषांचा विचार फारसा न झाल्यामुळे त्यांच्या संदर्भात काही प्रश्नच आजवर उभा राहिला नव्हता. या पंधरा लेखांमध्ये त्या भाषांचा सर्वांगीण आणि मूलगामी संबंध मराठीशी असल्याचे जे विवेचक कालभेदी पुरावे पुढे मांडले आहेत त्यांचा पुढच्या उत्तरायणाला उपयोग होईल.

त्यासाठी 'यावरुम् केऽलिर् : सकळ सोइरे' हे महावाक्य भारतीय भाषांनाही लावता येईल. या लेखमालेत तमिळ आणि मराठी या दोनच भाषांचा विचार केला असताना 'यावरुम् केऽलिर्' पर्यंत आपण कसे जाऊ शकतो? तमिळ आणि मराठी या आपापल्या परीने त्यांच्या भाषाकुळांच्या चांगल्या प्रतिनिधी आहेत म्हणून. दक्षिणी भाषांमध्ये तमिळला जी प्रथमता दिली जाते तिचा उल्लेख पूर्वी केला आहेच. 'महाराष्ट्राश्रयां भाषा प्रकृष्टं प्रकृतं विदुः– महाराष्ट्रातली भाषा प्रधान प्राकृत असे' हे वचन मराठीच्या संबंधात सांगितले जाते. किंवा 'शेषं माहाराष्ट्रीवत्' वररुचीच्या सूत्रावरून माहाराष्ट्री या मराठीच्या 'पूर्वजे'ची महती प्रतिपादली जाते. त्यामुळे, दोन व्यक्तींच्या नात्यांवरून त्यांच्या घराण्यांचा संबंध जसा स्थापित होतो तसाच तमिळ-मराठी वरून दक्षिणी-उत्तरी, द्रविड-आर्य किंवा तमिळ-संस्कृत यांचा

नातेसंबंध मानता येतो. 'यावरुम् केऽळिर्'चे या संदर्भातले स्वरूपच 'संमत' या लघुशब्दाने व्यक्त होते.

एका अतिशय व्यापक अर्थाने 'यावरुम् केऽळिर्' हे महावाक्य पृथ्वीवरील यच्चयावत वस्तुजाताला, पृथ्वीवरचे म्हणूनही, लागू पडतच असते. तो 'खेळ मेळ (म्हणजे नातेसंबंध; केऽळ् वरून) मर्यादित स्वरूपातच आपल्या ध्यानात येत असतो. आई-भाऊ-बहीण ही साधी नाती लहान मुलला समजतात पण आतेभाऊ, भाचेजावई असली लांबची गुंतागुंतीची नाती त्याला कळत नाहीत त्यातलाच हा प्रकार आहे.

म्हणून मानवसमाजाच्या सर्वच भाषांमध्ये काहीतरी खेळमेळ असण्याची शक्यता तडकाफडकी हातावेगळी करता येत नाही. तरीपण, आकलनाच्या मर्यादेमुळे विशिष्ट भाषांनाच मूळकारण मानून इतरांची उत्पत्ती त्यांच्यामधून झाली असा विचार भारतात (संस्कृताधार) तसाच युरोपातही (हिब्रू-आधार) प्रचारात होता. विल्यम जोन्स यांच्याकरवी युरोपीय भाषाविदांचे निरखणांचे वावर वाढले तेव्हा तो बदलत गेला. पण बदलला तरी त्यातही नव्या मर्यादांचे राज्य सुरू झाले.

२ भारतीय भाषांच्या क्षेत्रात ही मर्यादा आर्य-द्रविड या दोन प्रमुख भाषाकुळांच्या रचनेत व्यक्त झाली. त्या मर्यादेचे एक मुख्य कारण असे होते की नव्या भाषाशास्त्रानुसार भारतीय भाषांचा अभ्यास पहिल्याप्रथम युरोपीय मिशनरी लोकांनीच केला. त्यांच्यातल्या एकेका पंडिताची विशिष्ट भाषाभ्यासाची मर्यादा होतीच; अभ्यासलेल्या भाषेचा पंडितसुलभ अभिमानही त्यांच्यांत उदित होत होता. जोन्सनी संस्कृत भाषेत इंग्रजी किंवा ग्रीकपेक्षाही अभिव्यक्तीची ताकद अधिक असल्याचे सांगितले, फादर स्टीफन्सने 'भाषांमाजी चोखळा' असे मराठीचे गुण गायिले तर पोपनी 'तमिळ माणवन्' हीच मानाची पदवी मानली. तत्कालीन भाषाशास्त्रानुसार १८१६ सालीच दक्षिणी भाषांचे वेगळे कुळ असल्याची कल्पना मांडली गेली होती असा इतिहास आहे. पुढल्या काळात या कुळविभागणीच्या सांगाड्यात रक्तामासाची भर घालण्याचेच संशोधन भाषाशास्त्रात होत राहिले. रॉबर्ट काल्डवेल यांनी दक्षिणी भाषांचे तुलाव्याकरण हा मोठा ग्रंथ १८५६ त लिहिला तो अजूनपर्यंत या विषयावरचा अनुत्तम ग्रंथ मानला जातो. तिकडे माक्सम्यूलर यांनी भारतयुरोपीय भाषाकुळाला 'आर्यन' नाव देऊन, त्यांना अभिप्रेत नसलेल्या वंश-भाषा-एकत्वाच्या चुकीच्या विचाराला भूमी निर्वाळून ठेवली. या दोघाही भाषाविदांनी मोल्सवर्थच्या कोशाचा ओझरता उल्लेख मराठी या 'भारतार्य' भाषेच्या संदर्भात केला आहे. त्यांनी स्वतःच प्रतिपादिलेल्या भाषिक तत्त्वांनुसारच मोल्सवर्थचा कोश त्यांनी खोलवर पाहिला असता तर या भाषाकुळव्यवस्थेविषयी त्यांना शंका आल्या असत्या. या अर्थाचे विवेचन अलीकडेच 'नो आर्यन, नो द्रविडियन' या (स्कॉलर क्रिटिक जाने०

१९८१ अंकातील) निबंधात केले आहे.

भारतीय पंडितांनी ही कुलव्यवस्था मान्य केल्यामुळे त्यांचेही अभ्यास त्या मर्यादितच सीमित राहिले. सुनीतिकुमार चटर्जी यांनी तर 'द्रविडियन' या व्याख्यानमालेत असा क्षोभक विचार मांडला आहे की युरोपियनांच्या वर्चस्वाने अस्वस्थ झालेल्या भारतीय भद्रलोकांना आपली वंश-भाषा युरोपियनांच्या वंशभाषेशी जुळती आहे याचेच गौरव वाटत होते; त्यामुळे दक्षिणी भाषांच्या अभ्यासाबाबत त्यांची वृत्ती काहीशी उदासीन राहिली. भारतीय राष्ट्रवादाच्या विकासात भाषांना वाढते महत्त्व मिळत गेले तसतसे भाषाशास्त्रीय सिद्धांत, या प्रकारच्या वृत्तींमुळे, सामाजिक राजकीय ध्येयांसाठीही राबवले गेले. या पार्श्वभूमीवर 'भाषाकुलाच्या भिंती राष्ट्राला बऱ्या नव्हेत' हा विचार मांडला. एरवी प्रस्तुत अभ्यासात शास्त्राचाच फक्त विचार कर्तव्य आहे.

३ त्या दृष्टीने पाहता, अशा कुलभेदी भाषाभ्यासात एक प्रमुख अडचण लिपिभेदाची असल्याचे ध्यानात येते. 'मी भारतातल्या सगळ्या भाषा शिकलो पण त्या प्रयत्नात डोळे निकामी करून बसलो' असे काही विनोबांनी म्हटले आहे. त्यात या अडचणीचे सूचन आहे. लिपीतली अक्षरे ही वास्तविक चिन्हेच फक्त असतात. भाषेशी लिपीचा अविभाज्य असा काही संबंध नसतो. संस्कृत ग्रंथ रोमन लिपीतही लिहिता येतात. त्या लिपीतल्या वर्णांना खास खुणा जोडून त ट सारख्या उच्चारांचे भेदही दाखवता येतात. असे आहे तरी, जनसामान्यांमध्ये भाषा-लिपींचा अतूट, अभिमान्य असा संबंध मानला जातो. लिपिभेद हाही भाषाभेदाइतकाच मतभेदकारी होऊ शकतो. अभ्यासकांना लिखित ग्रंथादि साधनांवरून शिकावे लागत असल्यामुळे लिखित – बोली या भाषेच्या रूपभेदांबरोबरच लिपिभेदाने होणाऱ्या फरकांची सारखी दखल घ्यावी लागते.

४ एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे: तमिळ आणि मराठी या भाषांमधले लेखन दोन वेगळ्या लिपींमध्ये हल्ली होत असते किंवा बहुतकाळ होत आले आहे या स्थितीवरून तमिळ–मराठींच्या वेगळेपणाला किंवा सारखेपणाला विरोध किंवा पाठिंबा काहीच लाभत नाही. इतिहासिक दृष्टीने पाहिले तर दोन्हीही लिपींचे मूळ ब्राह्मी लिपीपर्यंत पोचवण्यात आले आहे. त्यामुळे इतिहासकालात या भाषा बोलणारांची संस्कृतिक एकता असेल असे मानण्यालाच जागा होते. अगदी आजची छापील अक्षरे घेतली तरी या दोन लिपींमध्ये साम्य दिसतात.

प्रथम स्वरांची आणि व्यंजनांची काही चिन्हे पाहू:

अ அ   इ இ   उ உ   ए எ   एऽ ஏ   : ஃ

क க च ச ट ட प ப य ய र ர
ल ல व வ न ன

एकूण तीस वर्णचिन्हांपैकी पंधरा चिन्हांमध्ये किती सारखेपणा आहे तो येथे दिसतो. बाराखडीचे साम्य उदाहरणादाखल :

क க का கா कि கி कु கு

वरच्याइतके साम्य न दिसणारी स्वर-आणि व्यंजन-चिन्हे तशीच बाराखडीतली काही चिन्हे पुढे देतो :

आ ஆ ई ஈ ऊ ஊ ऐ ஐ ओ ஒ ओऽ ஓ
औ ஔ त த ङ ங ञ ஞ ण ண न ந
म ம ऴ ழ ल ள ऱ ற
की கீ कू கூ के கெ केऽ கே कै கை
को கொ कोऽ கோ कौ கௌ

भेदाची एक छोटीशी बाब अशी की क् चा आपण पाय मोडतो तर तमिळ क् साठी क च्या चिन्हावर टिंब येते.

क् க் ऱ् ற் ऩ् ன் ऌ् ள்

न र ल यांच्या उच्चारांविषयी विवेचन मागे आलेच आहे. के केऽ कै को कोऽ यांसारख्या वर्णांच्या लेखनात पृष्ठमात्रा येते. अशी पृष्ठमात्रा काही मराठी कोरीव लेखांमध्येसुद्धा आढळते. आजच्या बंगाली लिपीतही ती आहे. जुन्या कु च्या लेखनात मराठीशी साम्य दिसते ते कू च्या लेखनात नाही. पण असले अनियमित लेखन नसावे म्हणून लिपीसुधारणेचे प्रयत्न तमिळनाडूत चालू आहेतच. त्यांवरून (आणि आपल्याकडच्याही तसल्या प्रयत्नांवरून) लिपींचे अनित्य आणि परिवर्तनीय स्वरूपच उघडे होते.

तमिळ लिपी नागरीइतकी परिपूर्ण नाही अशी एक हिणवणीची भावना संस्कृत-मराठी शिक्षितांच्यात आढळते. या भावनेचा भाषांच्या तुलाध्वनिकाशी साक्षात संबंध येत असल्यामुळे तिचा विचार करू. तमिळ लेखनात पुढील वर्ण येतात. त्यांची नागरी वर्णांशी तुलना होते :

अ आ इ ई उ ऊ ए एऽ ओ ओऽ औ :
क च ट त प र

ङ ञ ण न म ऩ

य र ळ व ऴ ल

स्वरांच्या बाबतीत फारसा फरक दिसत नाही. दीर्घ ए (एऽ) ओ (ओऽ) यांच्यामुळे थोडी अधिक सूक्ष्मताच उच्चारात येते. तोच प्रकार र न ल यांचा.

क वर्गातली व्यंजने घेतली तर ख ग घ यांच्यासाठी स्वतंत्र चिन्हे नाहीत असे दिसते. मराठीत महाप्राण उच्चार ठसठशीत होतो तसा तमिळमध्ये होत नाही. त्यामुळे खैरे हे नाव कैरे असेच उच्चारले आणि लिहिले जाते. संस्कृत ग्रंथ तमिळ लिपीत छापताना कोणीकोणी ख साठी क, अशासारखी चिन्हे वापरतात. या साऱ्याचा अर्थ असा की तमिळ भाषेपुरते क हे चिन्ह पुरेसे आहे; दुसऱ्या भाषेतला ख तमिळमध्ये बहुधा क उच्चारला जाईल आणि लिहिलाही जाईल. भाषिकाच्या अनुषंगाने विचार केला तर मराठीतल्या ख ध्वनीची तुलना तमिळमधल्या क ध्वनीशी करावी लागेल.

कागा हा जुन्या मराठीतला शब्द तमिळ लिपीत काका असा लिहिला जाईल पण कागा असाच उच्चारला जाईल. लिपीची अपूर्णता म्हणतात ती खरी इथे जाणवण्यासारखी आहे. ज य किंवा ब व यांसारखे उच्चार बंगाली लिपीत एकाएकाच चिन्हाने दाखवले जातात त्यामुळे ही तमिळचीच त्रुटी आहे असे म्हणता येणार नाही. उलट, क हा वर्ण दोन स्वरांच्या मध्ये आला तर त्याचा उच्चार मृदू होऊन ग होतो असा साधारण नियमच असल्याने इंग्रजीच्या रोमन लेखनाइतके अराजक तरी तमिळेत नाही.

नागरी लिपीने बावन चिन्हांचा स्वीकार केल्यामुळे हे अराजक तिच्या बाबतीत आणखीच कमी आहे. पण म्हणून ती परिपूर्ण लिपी आहे, मानवी मुखातून बाहेर पडणारा पडणारा कोणताही भाषिक ध्वनी यथातथ्यपणे लिहून दाखवण्याची कुवत तिच्यात आहे असा दावा करता येत नाही. गवत या साध्या शब्दाचेसुद्धा विविध उच्चार प्रसंगानुसार एका माणसाच्या तोंडून होतात ते या शब्दाच्या लेखनात गवसत नाहीत. असे असले तरी कागा सारखे दोन वेगळे ध्वनी या लिपीत स्पष्ट होतात ते काका या तमिळ लिपिलेखनात होत नाहीत. त्यामुळे तमिळ शब्द लेखनानुसार नागरी लिपीत लिहिला की त्याचा उच्चार मराठी भाषिकाकडून तमिळ भाषिकाच्या उच्चारापेक्षा वेगळा होतो. 'काका' या तमिळ शब्दात 'दोन स्वरांच्या मध्ये येणाऱ्या कठोर वर्णाचा उच्चार मृदू होतो' या नियमाचे मनोमन पालन करून दुसऱ्या क चा उच्चार ग असा करणे हाच एक मार्ग उरतो. 'सरळ, उच्चाराप्रमाणे नागरी चिन्हे का वापरू नयेत?' असा प्रश्न सहजच मनात येईल. सर्व तमिळ भाषिकांच्या तोंडी एकेका शब्दाचा एकच एक उच्चार होत असता तर ते शक्य झाले असते. पण

लिखित च मदुरैला च तर मद्रासला स असा उच्चारला जातो; त्यामुळे त्याच्यासाठी च हे प्रमाण लिखित रूपच जास्त उपयोगी ठरते. या पुस्तकात सर्व तमिळ शब्द या प्रकारेच लिहिले आहेत. प्रस्तुत लेखात छापलेल्या कवितेत मात्र स्वरांमधल्या कठोर व्यंजनांचे मृदु उच्चार छापले आहेत.

तमिळ आणि नागरी लिपींच्या चिन्हांमध्ये आजही साम्य दिसतेच; या साम्याचे खरे कारण, त्या दोन्ही लिपींचे मूळ एकाच – ब्राह्मी– लिपीत आहे हे होय. तमिळनाडूच्या दक्षिण भागात मदुरैच्या आसपास सनपूर्व दुसऱ्यातिसऱ्या शतकातले तमिळ कोरीव लेख उपलब्ध झाले आहेत त्यांची लिपी अशोकाच्या कोरीव लेखांसाठी वापरलेल्या लिपीसारखीच आहे. न र ल यांसाठी न र ळ याच अक्षरांना वेलांटीसारखी वळणे जोडून वर्णांचा फरक दाखवला आहे. 'अडगुलं मडगुलं' हे नाव मुखपृष्ठावर छापताना त्यातली अक्षरे रित्या जागांनी ब्राह्मी लिपीतही दाखवली आहेत. भाषांचा 'संमत' अभेद अशा रीतीने लिपींच्याही 'संमत' अभेदाने चित्ररूप केला आहे!

'यादुम् ऊरेऽ यावरुम् केऽळिर् : सारे मूळगाव सकळ सोईरे' हा कोणा स्थितप्रज्ञाचा घोष आहे. तरी या संमत अभ्यासालाही फार अनुरूप असा आहे. 'द्रविड महाराष्ट्र' मध्ये दाखवल्याप्रमाणे महाराष्ट्रातली यादुम् ऊरेऽ म्हणजे सारीच गावे संमत अर्थनाने अर्थपूर्ण होतात. या गावांचे संस्थापक ज्या संमत (पक्षी अविरोधी) भाषिक संस्कृतीचे होते तिचेच दर्शन 'वाडवडलांच्या बोलीचालींचा मागोवा' घेणाऱ्या या लेखांमध्ये घडत आले.

या घोषाची आठवण ठेवून बूज राखणाऱ्या पोप यांचा परिचय येथे डॉ. के ५
मीनाक्षीसुन्दरम् यांच्या 'कॉंट्रिब्यूशन ऑफ युरोपियन स्कॉलर्स टु तमिळ' या ग्रंथावरून दिला. युरोपीय विद्वानांची देन तमिळलाच नाही तर मराठीला आणि संस्कृतलाही लाभली. आपण त्या सर्वांचे कृतज्ञच आहोत. ते युरोपीय पंडित व त्यांना वाट पुसत किंवा स्वयंप्रज्ञेनेही त्यांच्यासारखीच भाषिक धारणा असणारे भारतीय पंडित पेरियोऽर् म्हणजे थोर आहेत याविषयीही आपल्याला शंका नाही. पण निरखणांच्या पुराव्यांवरून विज्ञानिक रीतीने आपल्याला जर संमत संबंध प्रतीत होत आहे तर तो मान्य करून

पेरियोऽरै वियत्तलुम् इलमेऽ
थोरांना विस्मित न व्हायाचे

ही कवीची आज्ञा पाळून, 'संस्कृत-मराठी-तमिळ भाषिक यावरुम् केऽळिर् सकळ सोईरे' हाच उद्घोष आपणही करू या.

❑ ❑ ❑

संदर्भ साहित्य

ग्रंथात आलेल्या संदर्भसाहित्याची एकत्र नोंद येथे उल्लेखाच्या क्रमाने केलेली आहे. २ आणि ३ चे संदर्भ पानोपानी आहेत. इतरांच्या महत्त्वाच्या उल्लेखांचे पृष्ठांक आकड्यांनी दाखवले आहेत.

१	य रा दाते		महाराष्ट्र शब्दकोश ४ ३७ ११०
२	बरो अँड एमेनो	१९६१	द्रविडियन एटिमॉलॉजिकल डिक्शनरी
३	मद्रास युनिव्हर्सिटी	१९३९	तमिळ लेक्सिकन
४	डॉ. अ ना देशपांडे		प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ९ ११
५	डॉ. ना ग जोशी	१९५५	मराठी छंदोरचना ११ १२ १३ २०
६	डॉ. पां दा गुणे	१९७०	कंपॅरेटिव्ह फिलॉलजी (आ. ३) १७
७	इरावती कर्वे	१९६२	मराठी लोकांची संस्कृति (आ. २) १८ ११७
८	डॉ. रा गो भांडारकर		शैविझम वैष्णविझम अँड अदर मायनर रिलिजस सेक्ट्स : रिप्रिंट १९
९	वि ल भावे संपा. शं गो तुळपुळे		महाराष्ट्र-सारस्वत (आ.५) ५ २१ २३ १०९
१०	गणेश हरी खरे	१९५८	महाराष्ट्राची चार दैवते २५ ६५ ८२
११	डॉ. एच सान्तापॉ अनु. श्री बा रानडे	१९५९	परिचित वृक्ष २६
१२	जेंस बर्जेस	१९६४	रिपोर्ट ऑन दि बुद्धिस्ट केव्ह टेम्पल्स अँड देअर इन्स्क्रिपशन्स (रिप्रिंट) २७,३०,५५
१३	डी डी कोसंबी	१९६२	मिथ अँड रिॲलिटी ३३ ५४

१४	माक्सम्यूलर	१८७६	लेक्चर्स ऑन दि सायन्स ऑफ लँग्वेज ४४ ११०
१५	मॉरिस लेरॉय अनु. ग्लेनव्हिल प्राइस	१९६७	मेन ट्रेंड्स इन मॉडर्न लिंग्विस्टिक्स ४८
१६	एन् सुब्रह्मणियन्	१९६६	प्री-पल्लवन् तमिल इंडेक्स ५६ ५८ ११८
१७	डॉ. के के पिल्ले	१९७५	ए सोशल हिस्टरी ऑफ द तमिल्स ५७
१८	शं बा दीक्षित	१९३१	भारतीय ज्योतिषशास्त्र ५९ ८८
१९			महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर : बॉटनी, टिंबर्स, मेडिसिनल प्लँटस् ८९
२०	महादेवशास्त्री जोशी		भारतीय संस्कृतिकोश ९३
२१	महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती		कुलदैवत ९३
२२	रॉबर्ट काल्डवेल	१९७६	कंपॅरेटिव्ह ग्रामर ऑफ दि द्रविडियन ऑर साउथ इंडियन फॅमिली ऑफ लँग्वेजेस १०४ १०९ १२८
२३	लक्ष्मण गोविंद घाणेकर	१९३३	प्राचीन द्राविड १०७
२४	वासुदेव गोविंद आपटे संपा. गोपीनाथ तळवलकर	१९५६	शब्दरत्नाकर ११५
२५	डॉ. एस् एम् कत्रे	१९४२	ॲनल्स ऑफ दि भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिट्यूट, सिल्व्हर ज्युबिली व्हॉल्यूम मधील निबंध १२२
२६	सुनीतीकुमार चटर्जी	१९६५	द्रविडियन १२९
२७	डॉ. के के मीनाक्षी सुन्दरम्	१९७४	कॉन्ट्रिब्यूशन ऑफ युरोपियन स्कॉलर्स टु तमिल १३२

□ □ □

दक्षिणी शब्दसूची

वर्णानुक्रम तमिळनुसार. तमिळखेरीज इतर भाषा-बोलींमधल्या शब्दांच्या पुढे कंसात संक्षेपाने भाषा दिली आहे; कन्नड : क. कोळमी : को. तुळू : तु. तेलुगु : ते. मलैयाळम् : म. सर्व शब्द कोशगत लेखनानुसार नागरी लिपीत छापले आहेत. मुळात जे उच्चारानुसार छापले आहेत (उदा. अटकु ऐवजी अडगु) त्यांच्यातला उच्चारभेद कंसात दिला आहे. उदा. अटकु (अडगु)

सूचीतील पृष्ठांक ९० ते १३२, प्रत्येकी १ ने वाढवून, ९१ ते १३३ असे धरावेत.

अ

अकल् ९८

अकळ् (अहळ्) ३९ ४५

अङ्का (अंगा) १५

अङ्काटि (अंगाडि) १५

अटकु (अडगु) २ ६

अटक्कु ६

अटशु (अडंचु) ३९

अटन्न (म.) १०६

अटा (अडा) ९९ १०६

अटावटि ३९

अटि ६

अटु, आटु ४३

अटै, अटचु ४३

अडपु (क.) ६

अडवु (क.) ६

अण् १२०

अणूटि (म.) ४३

अण्णि १२०

अत्तन् ११६ ११९

अत्तै ११६

अप्पन् ११६ ११९

अप्पम् ९७ १०२

अम्मा १९

अयल् ३७ ४२

अयिल् ४२

अय्यन् ५०

अरङ्कम् १५ ८५

अरङ्कु ८५

अरित्ति ४४

अरुन्तु ४४

अरल् ४४

अरळु (क.) ३९

अलर् १६ ४४

अलरु १६ १९

अलु ३८ ४३

अलुकै ३८ ४३
अलुक्कु ४३
अलुङ्कु ४२
अलुत्तु ४२ ४३
अल ३८ ४३

आ
आ १५ १७
आक (ग) वल् १२५
आङ्कु (आंगु) ४८ ५१
आच्चि ११६
आय् १५ १८
आयर् १९
आयन् १५
आयि १५ १८
आय्च्चि १५
आर् ५९
आरल् ५९
आल् ६३
आरु ६३

इ
इटम् ८१
इट (म.) ८१
इटच्चल् (म.) ८९
इट्वु ८८
इटलम् ८८
इटलै ८८
इट्ठु ८१
इट्ठंकु ८९
इटै ८८ ८९
इटैयर् ८९
इट्टलम् ८६
इण्टर् (इण्डर्) ६४
इरक्कम् ७४ ८५
इरवल् ९१
इराकि १२१
इरुत्तु ७
इरुप्पु २७
इरुम्पु ७
इस्, इस्सि (क.) ४६
इल इलै ११६ १२३
इलैयर् ११७ १२३
लेंग (ते.) १२३

ई
ई ७४ ८६
ईट्ठु (म.) ८१
ईट्टम् ७४ ८५
ईट्टि ७४
ईण्टु ८५
ईशि ४६
ईरु १०८

उ
उतवु ९० ९४
उरि ११४

ऊ
ऊत्तु ९४
ऊर् ३३

ए
एम्मै ९१

एलुम्पु ७
एळु ६४
एरुरि ९७ १०२
एनुपु ७

एऽ
एऽरि १०२
ऐ ४७
ऐयम् ४७ ५०
ऐयर् ५०

ओ
ओ (त्त) १३
ओत्तु ९६
ओलि १०
ओलि ९१

ओऽ
ओऽ १२
ओऽच्चन् ९२
ओऽतु १३
ओऽत्तल् १३
ओऽम्पु १३
ओऽवम् १० १३
ओऽवर् १० १३
ओऽवाय् १०
ओऽवियन् १०

क
कटवुल् ५८
कट्टु ९९
कडक (ग) पु २

कण् १०७
कत्तरि क् काय् ११६
कन्तु ७२
कन्द (क.) ६१ ६४
कन्दु (क. ते.) ६१ ६४ ७२
कन्नु (म.) ६१
कमकम ४३
करु ६९
करै ५
कलावु १०२
कव (म.) ११३
कवर् ११३
कववु ११३
कन्रु ६१
कन्नम् ११३
का ९१
काङ्कि (ङ्गि) चै ९१
काण् ९५ १०७
काणिक्कै ९५
कार् ६०
काल् ११३
काल् वाय् ९८ १०२
किळ-क्कु ९८
कीऴु १११
कीऴिदु १११
कुण्टि ११३
कुण्डु (क.) ११३
कुण्डे (क.) ११३
कुतै १०९
कुम्पलम् १२०
कुलिर् २८ ३१
कुरु १४

कुरव ५३
कुरिञ्चि ५३ ६९ ७०
केट्टु (ड्डु) ९८
केऽट्टु (तु.) १०३
केऽरि (क.) १०३
कै ७४ १०८
कैकारन् १०८
कोच्चु १२२
कोट्टु (ड्डु) १०९
कोट्‌टै ६४ ९२ १०९
कोत्तुमल्लि ११६
कोन्तलम् ९२ ९६
कोर्‌रवै (कोट्रवै) २२
कोऽचुम्परि (कोशुम्बरि) ११६ १२२
कोऽटि ५१
कोऽट्टम् ६४ ९२

च

चप्पत्ति ११६
चरटम् २६
चरडु २६
चरट्ट्-एनल् २५
चवल् ११६
चाणम् (शाण) ९७ १०२
चिक्कि ११४
चिक्कु ९४
चिक्केन ९४
चिङ्कन् ९०
चिङ्कु ९४
चिण्ण (क.) १२३
चिमिलि ७४ ७८ ११४
चिल् १२३
चिल्लि १२३
चिन्नै ८
चिन्न १२३
चू ४७
चूर् (शूर्) ५८
चूलै ११७
चे १०२
चेय्, चेय्ति ९८ १०३
चेरि १०३
चेल् १००
चेऽ ४७ ५०
चेऽण् ५०
चेऽन्तु (शेन्दु) ९८ १०२
चेऽय् ५४
चेऽयोऽन् ५४
चेऽरि १०३
चेऽरु १०३
चोलै ७५ ८८
चोलम् १२१
चोन्नम् ७
चोन्नल् १२१
जोल (क.) १२१
जोन्न (ते.) १२१
जोन्नलु (ते.) १२१

त

तडुप्पु ११९
तटै ११९
तट्टम् ११६
तट्टि ११९
तण् १२४
तणि ७

तणिचु ७
तण्णि १२४
तण्णि (क.) १२४
तने (क.तु.) ८
तलि ६४ ९१
तात्ता ११६ १२०
तान् २
तिकळ् ६०
तिण् ११६
तिण्टन् ८५
तिण्टाटु (दिण्डाडु) ८५
तिण्टि (दिण्डि) ८५ ११६
तिरङ्कु ३६
तिरळ् २९ ३६
तिरि ३६
तिरु ७३ ७८
ती २
तीट्टु २
तीट्टुतल् २
तीत्तल् २
तुवर् १२१
तुवरै १२१
तू ४७
तेय्व-यानै ५८
तोण्टे ११३
तोल् १०७
तोलै १०७
तोऽन्रु १०७

न

नकम् ११४
नकु (नहु) २२ २६ ११४
नट (नड) १०९
नटु ८७ १०९
नाकु ११३
नाटन् ५९
नाण् १२३
नाणम् १२३
नाय् ३०
नायकन् ३०
नायर् ३०
नायन् २७ ३०
नावितन् ६०
नुतल् ११३
नेर्रि (नेट्रि) ११४

प

पकु ८७
पच ११६
पण् ८५
पण्टर् ७५ ८५
पण्टरङ्कम् ७४ ८५
(पण्डरङ्गम)
पण्टारम् (पंडारम्) ८६
पण्टि ८७
पन्तल् १०५
पन्तु १०५
पयल् ३७
पल् १७
पल १७
पलर् १६
पलरिचोल् १६
पळम् २२
पळपु (पु) २२

पळु २२
पळ् २२
पर् ५१
परि ५१
पाकर् ८७
पाक(ग)न् ७५ ८२ ८७
पाटान् (पाडान्) २०
पाचि ११६ १२१
पाचु १२१
पाणर् ७५
पाण्टरङ्कम् (पांडरंगम्) ८५
पाप्पा १०७
पाप्पात्ति १०७
पाय्, पार् १०७
पाल् ८५
पानर् ८२
पिळि १०५
पिळुकै ९८ १०५
पिलुक्कुक १०५
पिळ्ळै १०५
पुकल् (पुहल्) १
पुच्चि (क.) ११३
पुण् ७४ ८६
पुल् ११३
पुल्कु ११३
पुलि ११२
बुल्लि (क.) ११३
पेऽरन् १०२
पेरु ९८
पै ११६
पोङ्कु १२१
पोच्चु १०८ ११३ ११८
पोटि (बोटि) १०९
पोट्टे (क.) १०८
पोट्टु ८
पोट्टच्चि १०८
पोवडु (ते.) १६
पोऽल् ११९
पोऽलि (पोलि) ११५ ११९

म

मकट्टु (मगड्डु) ५२ ५५
मकिळ् २८ ३१
मट्कलम् २ ६
मटक्कु (मडक्कु) २
मयिर् ६३ ६६
मयिल् ६३ ६६
मयिलि, मयिलालि ६६
मल् मल्लल् मल्लन् ६६
मलन् ६४ ६७
मळै ३४
मर ४०
मरै ४०
मन् ४८
मा ३४
मामळै २९
माल् २२ ३४ ७३ ७८-८३
माळ् माळ्कु (गु) ३८
माळै ५२
मान्-मुटि (डि) ५२ ५५
मान्-मुकुट्ड (मुगड्ड) ५२ ५५
मान्-मरि ५२ ५५
मिवै ११०
मीचै (शै) १०८ ११०

मुकम् ११३
मुकिळ् १२१
मुङ्कि (गि) ल् ९१
मुङ्कु (गु) ९१
मुटिप्पु ९५
मुडुप्पु (तु.) ९५
मुरल् ६४
मुरुक (ग) न् २२ ५४
मुरुकु ५४
मुलै १०८ १११
मुल्लै ८३
मुला १२०
मुलै १११
मुक्कु ११३
मेऽरुकु ९८
मैत्तुनन् ११५ ११८
मैत्तुनि ११५
मोऽरे (क.) १०८
मोऽरै १०८

र

राञ्ज (को.) ९२

व

वङ्कम् ११६
वघि ३१
वटि (वडि) ९१
वट्ट, वट्टि ११६
वट्टाणि ११६
वन्न (को.) १२०
वरकु १२१
वरु ८५
वल्, वल्तु १७
वल् १७
वल्लि ६४
वाकै ७१
वार् ८५
वारम् ७४
वारि ७४
वाल् ११६
वानर् १००
विट्टल् ८६
बिट्ट (क.) ८१
विट्टुणु ७४
विण्, विण्णवर् (म.) ८७
बिन्ये (माल्तो) ८७
वेट्चि ७३ ८४
वेण्टि, वेण्टु १२०
वेण्डु (तु.) १२०
वेरि ५७
वेरियाट्टु ५४
वेरि ७८
वेऽङ्कै ६९ ७६ ८३
वेऽल्, वेऽल् कोट्टम् ५६ ५७
वेऽलन् ५६

□ □ □

सामान्य सूची

सूचीतील पृष्ठांक ९० ते १३२, प्रत्येकी १ ने वाढवून, ९१ ते १३३ असे धरावेत.

अ

अंजन ३०

अडाणी ९७ ९९ १०१ १०५ १०६

अनुलोम ११ १२ १७ ४९

अपभ्रंश भाषा ९ ११ २९

अर्थनिश्चिती ४०

अर्थबदल ४९

अर्थविकास ११३

अर्थविस्तार १२ १७ १८ १०३

अहीर १९

अहोबलम् ८२

आ

आई १५ १८

आत्या ११७

आदिम ९३ ९६ ९९ १०२ १०५

आपटे वा. गो. ११९

'आपटे-संस्कृत-कोश' ६१

आभीर १९

आर्य-अध्या ४७

आर्य : दैवत ५८

संस्कृती ५३ ५४

व्युत्पत्ती ५० ५१

आर्य-द्रविड २६ ६९ ८२ १२७ १२८

आहीर १८ १९

इ

इठुवा ८५ ८६

इनामगाव ११९

इश्श ४६

उ

उच्चार आणि श्रुती ४९ ५०

उडिया १८

उद्‌गार ४७

उद्‌भ्रंश २० २७ ३५ ७९ ८० ११ ११२ १२०

उदो उदो ९०

उन्नयन ७०

उपपत्ती-आदिम ८१

उसनवारी २

ए

एकनाथ ९१ ९५

एरण २३

एलकोट ६४ ७१

ओ

ओझर ९० ९२ ९६
ओठ १०७
ओफिर १०९
ओवी ९

ऋ

ऋग्वेद ९१ ११४

क

कत्रे डॉ. ९ ९१ १२२
कन्नड (कानडी) १ ३७ ४७
कन्याकुमारी ८३
करंजगाव २८ ३३
करंजाळे २८
कर्णाटकू ७६
'कलि त् तोकै' ५९
कल्परचना ११
कल्परूपे १०१
कल्पशब्द ४१ १२२
कानगी ९१ ९५
कार्तिक ६०
कार्ले २८ ३२ ३३
कालिदास ६१
काल्डवेल ९८ १०४ १०९ १२८
कावड ९१
कीचक १११
कुडे ३२
कुमार ६०
'कुमारसंभव' ५६
कुरळ-वेन्या १४
'कुलदैवत' २५ ६५
कुसुंब २२ ५६
कृत्तिका ५ ६० १५८
कृष्ण ७०
केस १०९
कैकाडी १११
कोथिंबीर ११६
कोरीव लेख ५ २७ २९
कोसंबी २५ ३३ ३४ ५६
कोशिंबीर १२२
क्रौंच पर्वत ५३

ख

खंडोबा ६४ ६५ ७० ७२ ९६
खरे ग ह ७८
खांड ६५ ७०
खेडे १०३

ग

गणपती ९० ९२ ९६
'गाथासत्तसई' ५ २६ १०७
'गाथासप्तशती' १०८
गुह्य भाग १०८
गोंधळ ९० ९२ ९६
गोपजन १९
गोपाळकाला ७३ ७७ ८२
गोमाशी ५६
ग्रामीण प्रतिमा १०१
ग्रामीण रूपे १०४

घ

घटशिळा ९१
घाटशिळा ९० ९१

घाणेकर ल गो १०७
घारापुरी ८२
घोटा १०९
घोडा १०९

च
चटर्जी सुनीतिकुमार ५
चंद्रभागा ७५ ८७
चऱ्हाट २६ ९७
चवळी ११६
चिखलपाडा ३५
चौक ९२

ज
जाण-आई ९१
जॉन्सन डॉ. १०८
जुन्नर २८ ३० ३२
जुळते शब्द १२०
जोड अर्थ १०३
जोतिबा ९१
जोन्स १२८
जोशी डॉ. ना ग ११

झ
झाड २६ ५७
झाडांची नावे १२०

ड
डोई, डोकी, डोके १०७
डोळे १०७

ढ
ढेरे डॉ. रा चि २५

त
तंजावर ११५
तमिळ
अन्त्य उ १०५
ए एऽ १३१
ओ ओऽ ९ १३१
कठोर वर्ण ५
जोडध्वनी १०२
तु १०५
द्रविड कुळात प्रधान ५ ४१ ४६
नामशब्द १८
महाप्राण अभाव १९
महिन्यांची नावे ६०
– मराठी संबंध ३६ १०४ ५१ ७५
– ट वर्ग ४३
– त वर्ग ११९
– ड = र ४७ ५१
– लिपी १२९-३२
– वश्रुती ८८
– शब्दपालट ९५
– हकार ४७
– ळ ४२
– न र ल १६ २० २५ ३१ ३८
४३ ९८ १००
– ल ल़ ळ २२ ६४
– वर्ण २
– व्यंजनसंधी ५
– संघवाङ्मय २२ २६ ५६ ६१ ६७
७४
तमिळाई १०४ ३ २६ ११७

तांदळा ९१
तान्हे ११९
तारकासुर ५३ ६१
'तिरु क् कुरळ्' १४ १२५
तिरुपती ७३
तिरुमाल् ७३ ७४ ८४ ८६
'तिरु मुरुग आट्रुप्पडै' ६४
(मुरुगाचा पवाडा) ७०-७१
'तिरु वाचकम्' १२५
तीट ३
तुकाई ९१ ९५ ९६
तुकाराम ५१
तुकि, तूकि १०७
तुत्तिकुडि १२५
तुलाभ्यास ४ १०० १०१
तुळजा ९५
तुळपुळे २३
'तैत्तिरीय संहिता' ५३
'तोल्काप्पियम्' २० ४१ ५१ ५६ ५७
६९ ८१ ८२ ८३ १०३
त्रिपदी १३
त्रिरश्मि ३५

थ

थान ९७

द

दक्षिणी-मराठी १२० १२१ १२३
१२७
दंडनाक २३
दिंड ११६ ११९
दिंडी ७४ ८५
दिव्यप्रबन्धम् ३०
देकार्त ४९
देव, शंकरराव ११५
देवयानी ५३
देवसेना ५८
देशपांडे डॉ. अ ना ९ ११
दैवताची मूळरूपे ७९ ८०
द्रविड भाषासंघ (भाषाकुळ) १ ४ ५
४२ ४७
द्रविड (वंश) ५२ ५४ ५८
'द्रविड महाराष्ट्र' ४१

ध

ध्वनिक १००
ध्वनिबदल ७ ४३ ४९

न

नक्कीरर् ६८
नहपान ३५
नहाण, न्हाण १२३
नहुष २२ २३ २४
ना-हांबी २३ २४
नाग २८
नागवंश २३ ३१
नाचणे ७९
नातेवाचक संज्ञा १८
नादशब्द १९ २८
नामदेव ७५
नाभिक ६३
नायन्मार् ३०
नालडियार् १२५
पंढरपूर ७५

'पत्तु प् पाट्टु' ६७
परंपरा, थोरली धाकटी २४ ६६
परंपरा सातत्य ६७ ९४ ९६
'परिपाट (ड) ल्' ७३ ८३
पळसदेव २१
पनम्पारनार्- ८३
पांडवलेणी २९
पांडुरंग ८५
पाणिनी ९० ९५
पापणी १०७
पितळखोरे २७ ३०
पिलू ९७
पिळकणे ९८
पुच्छ ११८
पुंडलिक (पुंड्या) ८६
'पुरनानूरु' १२५
पैठण २७
पोट ११२
पोप डॉ. १२५
पोवाडा २०
पोळी ११६
पृष्ठमात्रा १३०
प्रतिलोम ११ २० २६ १११ ११२
प्रतिलोम तुलाभ्यास ४१
प्रागितिहास ६५
प्रागितिहास प्रमाणे ७५ ७६ ७७ ८२

ब
बरो प्रा. १२०
बरो आणि एमेनो ४
बर्जेस २७ २९ ३५ ५५
बलराम ८३
बाई ११६ ११८
बाजरी १२१
बांधणे ९९
'बायबल' २४ १०७
बोली (भाषा) ४ ४४ ९३
– अनियम ४४
– ध्वनिक ६१
– प्रथमता ६१
– ब्रेटन ४८

भ
भगवानलाल इंद्रजी २७
भंडार ८६
भलरी १६
भले १७
भवानी ९६
भाऊ दाजी (डॉ.) २७
भाजीपाले ११६
भाजे २७ ३०
भांडारकर डॉ. २७ ३५
भारतार्य कुळ ४ ४२ १२८
भारती ८०
भाषा
– अडाणी १०१
– आदिम ४८
– आदिम सृजन १०१
– उतरंड ४९
– एकच विचार ११२
– कारक प्रभाव ५०
– धनको-ऋणको १२१
– पाचांची संहती ४०
– प्रमाण भाषा १०१

– विकसित भाषा ४९
– लोकभाषा ४५
– साहित्यपूर्व भाषा ४४
– भाषाकुळे ४४ १२९
– भाषिक एकता ६२
– भाषिक (विज्ञान) १०० ११२
– भाषांचा संपर्क ११०
– इतिहास साधने १२६
– भारतीय १२८
भेंड, भेंडा, भेंडी १२०
भोपळा १२०

म

'मणिमेकलै' १२५
मराठमोळी २६
मराठशाई ११७
मराठी
– असल ४०
– आदिकाळ ३ २४ ६१
– आर्यभाषा २३
– उदय ४०
– ग्रामीण ४८
– द्वित शब्द ३८
– नेणतेपणाचा काळ ३५
– पूर्वभाषा २३
– शब्दाभ्यास ४१
मऱ्हाटा ४०
मल्लारी ६६ ६७
मल्ह ६८
मल्हार ६३
महाड ३२
महाबलिपुरम् २९
म(मा)हाराष्ट्री १ ३ १७ १२७
'महाराष्ट्र सारस्वत' ५ १०९
महालया ५२
माक्सम्यूलर २५ ४४ १०९ १११ १२८
मानमोडी ५२ ५५
मामल्लपुरम् २९
मामालाहार २८ ३३ ३४
मावलाया ३४
मावळ २८
मावशी ११५ ११७ ११८
माळे ७३ ८४
मिथक्रिया ९३
मिथ्य २३ २६ ५४ ५६ ६१ ७९ ९३ ९५
मिथ्यकथा २४ २९ ६६ ५९ ९३
मिशी १०८
मुक्तभेद ४२ ४५ १२०
मुंगी घाट ९०
मुडूप ९१ ९४ ९५
मुरळी ६४ ७१
मुरुगन् ५२ ५३ ५७ ६४ ६९ ७०
मुलगा ५३ ६१ १२२
मुले १०८
मूग १२१
मूर्तिविज्ञान ६४ ७०
मेहुण ११५ ११८
मैराळ ६३
मैलार ६३
मोरया गोसावी ९१
मोल्सवर्थ १०० ११५ १२८ १२९
मोहिनीराज ५२

म्हाळसा ९१
म्होरं १०८

य
यमाई ९१ ९६
यमी ९१ ९६
यास्क ८७ ९६

र
रखमाई ७३ ७८
रवळनाथ ९१
राजवाडे १७ ४९
रांजण ९० ९६
'रामनगरी' ६३
रामेश्वर ७३

ल
लक्षणा १२३
लक्ष्मी ८४
लिपिभेद १२९
लिपी:मराठी व तमिळ १२९
लिपी:तमिळ-नागरी १३०
लिपी:ब्राह्मी १३१ १३२
लेटिश (भाषा) ५९
लोकदेव ६५
लोकदैवते ९५
लोकाचार ६४
लोकोक्ती ६२
लोखंडी ३१

व
वनदुर्गा ६८
वररुची १२७
'वर्णन' शब्द ८०
वर्णमाला ५
वल्क २८
वल्रूक ३२
वंशपरंपरा १०
वाघ्ये ६४
वारकरी ८५
वारी ७४ ७९
वाल्या-वाल्मीकी ६७
विठ्ठल ७३-८९
विठ्ठल-काल ७५
विनोबा ९ १२९
विष्णू २१ २२ २४ २५ ५८ ७४ ७६
७७ ८१ ८६ ८७
वेलणकर ९ ११
वेंकटेश ७६
वेऽङ्कै ७३ ७६
वेट्चि ७३ ७७
वैजयंती ७४ ७७ ७८
व्याकरण १००
व्याख्या शब्द १३ ८१
व्युत्पत्ती १०९
– मानीवानुसार ११०
– लक्षणा १२२
– वरून निष्कर्ष ११७
– संदर्भावरून १११
– सहज ७
– सामाजिक आचारावरून १२३

श
'शतपथ ब्राह्मण' ५३

शब्द ४०
– गावरान १२
– जेवणाखाणाचे ११९
– नातेवाचक ११८
– प्राथमिक १०५
– शरीर वर्णनाचे १०९
– सरमिसळ ११३
– हिरवेकच्चे ११३
शहाजहान ५३ ६२
शहाजी ५२ ६२
शातवाहन ३३
शिंके ७४
शिंगणापूर ९०
शिवाजी ५२
शुद्धअशुद्ध १०२
शेंडी १०९ ११४
शेती ९८ १०३
शेंदणे ९८
शौपेनहोएर १०७
श्यान ९७
श्येनं ९७
श्मशान ११० १११
श्मश्रु ११०

स

'संगीतरत्नाकर' ९२
संमत ७ १९ २६ ५१ ६० ७२ ८०
११४ १२४ १२८
सरडेश्वर २१
सरदेसाई गो.स. ६२
संस्कृत १ २६
– व प्राकृत ११२
संस्कृती २६
– काळ ६०
– तमिळ-मराठी ७७
– समास ५८
सॉलोमन १०९
सॉयरपुरम् १२५
सिंह ९० ९४
सिंहराशी ९३
सुप्रभातम् ७
सुब्बलक्ष्मी ७३
सोलापूर ७५
स्कन्द ६० ६३ ६४ ६६
कन्दु ७२ ९६
स्टीफन्स (फादर) १२८
स्थळनाम ३४ ७६ ८२

ह

हनुमान-मिथ्य ३१
हिरडी १०८
होता (संस्कृत) १३

ज्ञ

ज्ञानशोध १११
ज्ञानेश्वर १ ३७ ३८ ५१ १०२ १२६
ज्ञानेश्वरी ४ १६ १७ ३७ ३९ ८५
९८ १०४

□ □ □

विश्वनाथ खैरे

एकलव्य
वंशाचा व्यास
युरेका
हिरकनी
घोड्यापुढं गीता

युगाणी
अक्षरे
इमराठी गाणी

द्रविड महाराष्ट्र
मराठी भाषेचे मूळ
अडगुलं मडगुलं

भारतीय मिथ्यांचा मागोवा
ज्ञानेश्वरांचे चमत्कार
वेदातली गाणी
साहित्य मिथ्य माहित्य

साहित्य अकादेमीच्या
'भाषा सन्मान २००८' चे मानकरी
विश्वनाथ खैरे यांच्या
'अडगुलं मडगुलं' या पुस्तकाची तिसरी आवृत्ती

या पुस्तकाला राज्य शासनाचा १९८१–८२ चा
'भाषाशास्त्र आणि व्याकरण' विभागातला
उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार मिळाला होता.

बोबडगाणी, जनपद छंद–गीते, भावनोत्कट उद्गार,
शरीर–अवयवांचे नात्यागोत्यांचे जीवनव्यवहाराचे
संस्कृतिव्यवसायाचे म्हणजेच एकंदर भाषेचे शब्द, मिथ्यकथा,
लोकदैवते, कोरीव लेख, आर्ष मराठी काव्ये, लोककाव्ये इतक्या
विविध अंगांनी मराठी आणि तमिळ यांचा संबंध या पहिल्यावहिल्या
संमत लेखनात स्पष्ट झाला आहे.

ISBN 81-85280-10-X